# बहुरूप गांधी

# बहुरूप गांधी

**अनु बंदोपाध्याय**

प्रस्तावना

**जवाहरलाल नेहरू**

अनुवाद

**शोभा भागवत**

**कजा कजा मरू प्रकाशन**

**बहुरूप गांधी**
अनु बंदोपाध्याय

**मराठी अनुवाद**
शोभा भागवत

बहुरूप गांधी हे पुस्तक प्रथम १९६४ साली पॉप्युलर प्रकाशनने प्रकाशित केले होते.
दुसरी आवृत्ती १९७०
एनसीईआरटी १९९५
आदर इंडिया प्रेस २००४
प्रथम मराठी संस्करण २ ऑक्टोबर २००४

© कजा कजा मरू प्रकाशन

**मुखपृष्ठ**
मुद्रा

**रेखाचित्र**
आर.के. लक्ष्मण व निकी थॉमस

**प्रकाशक**
कजा कजा मरू प्रकाशन
द्वारा गरवारे बालभवन,
सारसबागेसमोर, पुणे ४११ ००२
फोन : (०२०) २४४४२१०९

**मुद्रक**
मुद्रा, ३८३ नारायण पेठ, पुणे ४११ ०३०

**किंमत**
रुपये ८०/-

माझ्या आईनं मला शिकवलं
सगळ्या कामांचा आदर करायला.....
तिला अर्पण!

# प्रस्तावना

प्रधान मंत्री भवन
नवी दिल्ली

हे पुस्तक मुलांसाठी लिहिलं आहे; पण मोठी माणसंही ते आनंदानं वाचतील असा मला विश्वास वाटतो. त्यांना हे पुस्तक वाचून मोठा लाभ होणार आहे.

गांधीजी एखाद्या कल्पित कथेसारखे झाले आहेत. ज्यांनी त्यांना पाहिलेलं नाही, विशेषतः आजच्या मुलांनी, त्यांना असं वाटेल की ते म्हणजे कुणी असामान्य सुपरमॅन होते म्हणून त्यांनी एवढी मोठी कामं केली. त्यामुळे गांधीजींच्या जीवनातल्या सामान्य साध्या गोष्टी मुलांसमोर ठेवायला हव्यात. ह्या पुस्तकानं ते काम केलं आहे.

त्यांचं अनेक गोष्टींमध्ये रस घेणं हे असामान्य होतं आणि जेव्हा ते असा रस घेत तेव्हा ती गोष्ट ते अतिशय खोलात जाऊन करत. त्यांचा रस वरवरचा नव्हता. जीवनातल्या छोट्या छोट्या गोष्टी करतानाही ते ज्या प्रगल्भतेनं त्या करत त्यामुळे त्यांची माणुसकी लक्षात येते. त्यांच्या व्यक्तिमत्वाचा तो पाया होता.

मला हे पुस्तक वाचताना आनंद झाला कारण या पुस्तकात गांधीजींचं राजकारणी आणि प्रसिद्ध व्यक्ती असं चित्रण केलेलं नाही तर विविध कामं ते कशी करत याबद्दल तपशीलवार लिहिलं आहे. त्यामुळे आपल्याला कदाचित गांधीजी जास्त चांगले समजतील.

**जवाहरलाल नेहरू**
नवी दिल्ली
१० मार्च १९६४

## अनुवाद करताना

गांधीजी देशाला स्वातंत्र्य मिळवून देणा-या चळवळीचे नेता म्हणून माहीत होते पण त्यांचं महात्मापण अनेक छोट्या गोष्टीमधून उलगडत गेलं. स्वतः हातमागावर विणलेल्या खादीच्या साड्या कस्तुरबांना देणारे, त्यांची पोलकी शिवणारे, अनेकांचे केस कापणारे, सँडल्स बनवणारे, कपडे धुणारे, सुटाबुटात असतांना हातात खराटा घेऊन मुता-या साफ करणारे, ७८व्या वर्षी उकिडवे बसून सहका-यांना स्वयंपाकघरात खाक-याचं प्रात्यक्षिक दाखवणारे, आश्रमातली छोटी बाळं रात्रभर सांभाळणारे, ताटात गहू घेऊन ते निवडणारे, जात्यावर गहू दळणारे गांधीजी कुठे सर्वांना माहीत असतात? आज सगळीकडे मॅनेजमेंट, एफिशियन्सी वर्क कल्चर, स्मार्ट वर्क, टाइम मॅनेजमेंट याबद्दल शिकवलं जातं. पण असं जाणवतं की, गांधीजी सर्व मॅनेजमेंट गुरूंचे गुरू होते. त्यांना फक्त देशाचं स्वातंत्र्य नको होतं. प्रत्येक माणसाचं स्वातंत्र्य हवं होतं. स्वावलंबनाशिवाय स्वातंत्र्य शक्य नाही हे जेवढं देशाच्या बाबतीत खरं आहे, तेवढंच माणसाच्या बाबतीतही.

गांधीजींची जीवनशैली आज विशेष अनुकरणीय वाटते कारण चंगळवादाला शह देण्यासाठी याखेरीज संयमाचं, निर्धाराचं दुसरं साधन कुणाकडेच नाही. शिक्षण याचा अर्थ आयुष्यातले कष्ट नाहीसे होणं असा केला जातो. गांधीजी सर्व कष्टाची कामं किती आनंदानं, मनापासून करत हे वाचणं आपल्या डोळ्यात अंजन घालतं. एखाद्याची जीवनशैली मुळापासून बदलण्याची ताकद या पुस्तकात आहे असं मला जाणवलं पुस्तकाच्या लेखिका अनु बंदोपाध्याय यांनी अनुवाद आणि प्रकाशनाला अनुमती दिली, त्यांच्याविषयी कृतज्ञता! हे पुस्तक अनुवादित करण्यासाठी ज्यांनी प्रेरणा दिली त्या अरविंद गुप्तांना धन्यवाद! 'मुद्रा'च्या नीटस, तत्पर छपाईबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार!

२ ऑक्टोबर २००४ **शोभा भागवत**

## दोन शब्द

ह्या पुस्तकाचं हस्तलिखित माझ्याकडे १९४९ पासून पडून होतं. १९४८ मध्ये मी डी.जी. तेंडुलकरांच्या “महात्मा” या पुस्तकाचं हस्तलिखित वाचलं. तेव्हा मी नुकतंच बंगालमधलं माझं कस्तुरबा प्रशिक्षण केंद्राचं काम सोडलं होतं. मी ग्रामीण भागात काम केलं होतं. माझ्या असं लक्षात आलं की, माझ्या भोवतालच्या प्रशिक्षणार्थी मुलींना आणि ग्रामीण लोकांना गांधीजींबद्दल फारच थोडी माहिती होती. ते गांधी जयंती साजरी करत, रोज सूत काढत आणि प्रार्थनाही करत. काहींनी स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला होता आणि तुरुंगातही गेले होते. पण गांधीजींचं खरं योगदान काय होतं ते त्यांना माहीत नव्हतं. कदाचित् मला चुकीचं समजलं असेल पण मला मनापासून तसं वाटलं मात्र.

मला अजूनही अनेकजणांबद्दल असंच वाटतं. रोज भेटणारी अनेक माणसं असतात, त्यातली काही सुशिक्षित असतात आणि त्या सर्वांना शारीरिक कष्ट नको असतात. माझा स्वतःचा श्रमप्रतिष्ठेवर विश्वास नाही पण शारीरिक श्रम किती कंटाळवाणे असतात हे मला माहीत आहे त्यामुळे माझ्या नोकरांचं काही कष्टाचं काम रोज मी करत असते अशासाठी की माझी कधीही अशी धारणा होऊ नये की चार पैसे टाकून कुणालाही मी स्वतःसाठी राबवून घेऊ शकते.

सामान्यतः लोक आपल्या पोटापाण्यासाठी नाइलाज म्हणून जे कष्ट करतात, ती सर्व कामं गांधीजी आनंदानं करीत असत हे सिद्ध करण्याचा मी प्रयत्न केला आहे. काही गोष्टी मी हेतुपूर्वक पुनःपुन्हा लिहिल्या आहेत. मला यातून गांधीजींचे अंध भक्त तयार

करण्याची इच्छा नाही. माझी एवढीच इच्छा आहे की, गांधीजींची ओळख नव्या पिढीला फक्त राष्ट्रपिता किंवा स्वातंत्र्य मिळवून देणारे नेता एवढीच असू नये आणि त्यांनी त्यांना समजून घ्यावं आणि मग त्यांच्यावर टीका करावी.

ह्या पुस्तकाची संकल्पना माझी आहे. मी ते कुमारांसाठी लिहिलं आहे. डी.जी. तेंडुलकरांच्या "महात्मा" पुस्तकातून सर्व मजकूर घेतला आहे. ह्या छोट्या पुस्तकासाठी मी त्यांची अतिशय ऋणी आहे. मला माझ्या भावना शब्दात व्यक्तही करता येणार नाहीत. श्री. एन.जी. जोग यांनी माझं हस्तलिखित वाचलं. श्री. एम. चलपती राव यांनी नॅशनल हेराल्डमधली वीस रेखाटणं या पुस्तकासाठी वापरायला परवानगी दिली.

श्री. आर. के. लक्ष्मण यांनी माझ्या पुस्तकासाठी चित्रं करून दिली त्याबद्दल मी त्यांची ऋणी आहे.

जवाहरलालजींनी पुस्तकाला प्रस्तावना लिहून दिली याबद्दल त्यांचीही मी अतिशय आभारी आहे.

हजारो तरुण मुलं हे पुस्तक वाचतील त्यातल्या एकानं जरी गांधीजींनी केलेली कामं आचरणात आणली तरी मला आनंद होईल.

**अनु बंदोपाध्याय**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | कर्मवीर | १ |
| २. | बॅरिस्टर | ५ |
| ३. | शिंपी | १३ |
| ४. | धोबी | १६ |
| ५. | न्हावी | १९ |
| ६. | भंगी | २४ |
| ७. | चांभार | ३१ |
| ८. | नोकर | ३७ |
| ९. | स्वयंपाकी | ४३ |
| १०. | डॉक्टर | ४८ |
| ११. | परिचारक | ५४ |
| १२. | शिक्षक | ५८ |
| १३. | विणकर | ६५ |
| १४. | सूत काढणारे | ६९ |

| | | |
|---|---|---|
| १५. | बनिया | ७६ |
| १६. | शेतकरी | ८४ |
| १७. | लिलाव करणारे | ९१ |
| १८. | भिकारी | ९४ |
| १९. | डाकू | १०१ |
| २०. | कैदी | १०९ |
| २१. | सेनापती | ११८ |
| २२. | लेखक | १२६ |
| २३. | पत्रकार | १३५ |
| २४. | मुद्रक व प्रकाशक | १४२ |
| २५. | नवीन पद्धती आणणारे | १४६ |
| २६. | गारुडी | १५४ |
| २७. | पुरोहित | १६० |
| | घटनाक्रम | १६७ |

# कर्मवीर

एक यशस्वी वकील त्यांच्या अशीलांना सल्ला देत असे. तुमचा वेळ आणि पैसा कोर्टाच्या खटल्यांमध्ये वाया घालवू नका. तुमची भांडणं कोर्टाबाहेर मिटवा. त्यांना मोकळा वेळ मिळाला की ते हिंदू, मुस्लिम, ख्रि चन, पारसी, बौद्ध धर्माविषयीची पुस्तकं वाचत. मोठ्या विचारवंतांची पुस्तकं वाचत. ह्या पुस्तकांच्या वाचनातून आणि चिंतनातून त्यांची अशी खात्री पटली की, प्रत्येक माणसानं रोज काहीतरी शारीरिक कष्ट करायला हवेत. नुसतं बौद्धिक काम करणं पुरेसं नाही. सुशिक्षित, अशिक्षित, डॉक्टर, वकील, न्हावी, सफाई कामगार, सर्वांना त्यांच्या कामासाठी सारखा पगार मिळायला हवा.


त्यांनी हळूहळू त्यांची जीवनपद्धती बदलली आणि समोर दिसेल त्या कामाला हातभार लावायला सुरुवात केली. आश्रमात आपलं कुटुंब आणि मित्रपरिवार यांच्याबरोबर साधं समूहजीवन जगायला सुरुवात केली. त्यांचे काही युरोपियन मित्रही आश्रमात राहायला आले. ते सर्वजण शेतक-यांसारखे कष्टमय आणि स्वतंत्र जीवन जगले. जमीन नांगरायचे, फळबागा लावायचे. पैसे देऊन नोकर-माणसं नेमलेली नव्हती. त्या शेतावर हिंदू-मुसलमान, ख्रि चन, पारसी, ब्राह्मण, शूद्र, कामगार, वकील, गोरे, काळे सर्वजण एका मोठ्या कुटुंबाचे सभासद असल्यासारखे रहात असत. सर्वांची जेवायची जागा एकच होती आणि तिथे ते समाईक जेवणघरात सर्वांसाठी केलेलं एकाच प्रकारचं जेवण जेवत. त्यांचं जेवण साधं असे आणि कपडे जाडेभरडे. प्रत्येकाला महिन्याच्या खर्चासाठी चाळीस रुपये मिळत. हे वकीलही अशाच प्रकारे तिथे रहात पण त्यांची महिन्यांची कमाई ४००० रुपये होती. कष्टमय दिनक्रम ते काटेकोरपणे पाळत आणि फक्त सहा तास विश्रांती घेत.

शेतावर जेव्हा प्रथम झोपडी बांधण्याचं काम चालू होतं तेव्हा गांधीजीच प्रथम त्या सांगाड्यावर चढले. तेव्हा त्यांनी कामगाराचा जाडाभरडा निळा पोषाख घातला होता. त्याला अनेक खिसे होते त्यातले काही लहान-मोठ्या खिळ्यांनी आणि स्क्रूंनी भरले होते. एका खिशातून हातोडी डोकावत होती. कमरेच्या पट्टयाला एक छोटी करवत आणि गिरमिट लटकत होतं. दिवस दिवस ते तळपत्या उन्हात करवतीनं आणि हातोडीनं काम करत.

एक दिवस जेवणानंतर ते पुस्तकांची मांडणी करायला बसले. सलग सात तास त्यांनी काम केलं आणि थेट छताला पोचणारी मांडणी तयार केली. आश्रमाकडे येणारा रस्ता खराब होता पण तो तयार करायचा तर पैसे नव्हते. त्यांनी रोजच्या फिरण्यात परत येताना छोटे दगड जमा करायला सुरुवात केली. त्यांचे साथीदारही तसंच करत आणि काही काळातच रस्ता बनवण्यासाठी लागणा-या दगडांचा ढीग जमा झाला. अशाप्रकारे ते इतरांना कामाला लावत. आश्रमातली मुलंही बागकामात, स्वयंपाकात, झाडझूड करण्यात, सुतारकाम आणि चांभारकाम करण्यात, छापखान्यात खिळे जुळवण्यात भाग घेत.

ते म्हणत की, ”आपण इतक्या कठीण परिस्थितीत का येऊन पोचलो आहोत कारण आपण गवंडी, चांभार, सुतार, लोहार, न्हावी यांना आपल्यापेक्षा कमी दर्जाचं मानलं. त्यांच्या व्यवसायाबद्दल सहानुभूती राखली नाही. त्यांच्यापासून काही शिकलो नाही. त्यांची सगळी संस्कृती, प्रतिष्ठा नष्ट केली. कौशल्यपूर्ण कामांना आपण खालच्या दर्जाचं मानलं आणि कारकुनीला वरचा दर्जा दिला आणि यातून आपण स्वतःच्या गुलामगिरीला आमंत्रण दिलं”.

हे बॅरिस्टर रोज पहाटे जात्यावर गव्हाचं पीठ दळत आणि नंतर नीटनेटका पोषाख करून पाच मैल चालत आपल्या कचेरीत जात. स्वतःचे केस स्वतः कापत. कपड्यांना इस्त्री करत. ते कुष्ठरोग्याच्या जखमा धूत आणि मुता-या स्वच्छ करायचीही त्यांना लाज वाटत नसे. आळस, भय आणि तिरस्कार हे शब्द त्यांच्या शब्दकोषात नव्हते.



ते त्यांच्या वृत्तपत्रांसाठी लेख लिहीत, स्वतःच टंकलेखन करत. स्वतःच्या छापखान्यात त्यांचे खिळे जुळवत आणि गरज पडली तर स्वतः हातानं छपाई-यंत्र फिरवून मदत करत. पुस्तकांची बांधणी करण्याची कला त्यांना चांगली अवगत होती. त्यांचे सृजनशील हात स्फूर्तिदायक संपादकीयं लिहित, पत्रं लिहीत आणि तेच हात चरख्यावर सूत काढत, हातमागावर कापड विणत, नवनवीन पदार्थ तयार करतं, शिवणकाम करत, फळांची झाडं वाढवत, भाज्या काढत आणि हेच हात जमीन खोदण्यात, विहिरीतून पाणी काढण्यात, लाकूड तोडण्यात आणि गाडीतून जड माल उतरवून घेण्यातही मागे नसत.

तुरुंगात असतांना त्यांना कठीण, कोरडी जमीन कुदळीनं खोदावी लागे, किंवा घोंगडीचे फाटलेले तुकडे नऊ नऊ तास शिवावे लागत. जेव्हा ते थकून जात तेव्हा ते देवाची प्रार्थना करत की, मला अधिक शक्ती दे. आपल्याला दिलेलं कोणतंही काम करायला आपण कमी पडू ही कल्पनाच त्यांना सहन होत नसे.

त्यांच्या अगदी तरुण वयात ते अनेकदा ४०-४० मैल चालत जाऊन दुकानातून सामान खरेदी करत कारण तेच दुकान सर्वात जवळ असे. एकदा ते एका दिवसात ५५ मैल चालले. रूग्ण वाहून नेणारा स्वयंसेवक म्हणून त्यांनी एकदा जखमी सैनिकाला सलग ३० ते ४० मैल वाहून नेलं. वयाच्या ७८व्या वर्षीही अनेक आठवडे ते रोज १८ तास काम करत. कधी कधी तर हे कामाचे तास २१ होत. त्या वयात ते कोणतेही शारीरिक कष्ट करू शकत नसत पण ते सूतकताई करत आणि रोज सकाळी थंडीतही दवानं भिजलेल्या खेडेगावातल्या सडकेवरून अनवाणी तीन ते चार मैल चालत जात. त्यांच्या कामावरच्या या लोकविलक्षण श्रद्धेबद्दल आणि क्षमतेबद्दल दक्षिण आफ्रिकेतल्या त्यांच्या सहका-यांनी त्यांना 'कर्मवीर' ही पदवी दिली होती.

कर्मवीर मोहनदास करमचंद गांधींचा जन्म २ ऑक्टोबर १८६९ या वर्षी झाला.

❊❊

५

# बॅरिस्टर

गांधीजींनी १८ व्या वर्षी मॅट्रिकची परीक्षा पास केली. त्यानंतर लगेचच ते कायद्याचं शिक्षण घ्यायला लंडनला गेले. त्यांच्या मोधबनिया समाजातले परदेशी जाणारे ते पहिले गृहस्थ. 'इनर टेम्पल' मध्ये प्रवेश घेतल्यावर गांधीजींच्या असं लक्षात आलं की कायद्याच्या परीक्षा देणं फारच सोपं आहे. जेमतेम दोन महिने नोटस् वाचून कितीतरी लोक परीक्षा पास होत होते. गांधीजींना नोटस् वाचून परीक्षा देणं काही पटलं नाही. त्यांना ती फसवणूक वाटली. त्यांनी परीक्षेला असलेली पुस्तकं मुळातून वाचायचं ठरवलं आणि त्यासाठी बरेच पैसेही खर्च केले. "कॉमन लॉ"चे जाडजूड खंड वाचण्यासाठी त्यांना नऊ महिने कसून अभ्यास करावा लागला. ते 'लॅटिन' शिकले आणि 'रोमन लॉ'ची मूळ पुस्तकं वाचून काढली. बॅरिस्टर्सना त्या काळी 'डिनर बॅरिस्टर्स' म्हणत असत कारण त्यांना तीन वर्षात १२ टर्मस् कराव्या लागत आणि किमान ७२ मेजवान्यांना उपस्थित रहावं लागे. या महागड्या जेवणांचा खर्च विद्यार्थ्यांनाच करावा लागत असे.

गांधीजींना अशा मेळाव्यात मिसळण्याची सवय नव्हती. त्यांना वाटायचं की, बॅरिस्टर होण्याशी जेवणाचा आणि वाइन पिण्याचा काय संबंध आहे? तरीही त्यांना जेवणांना जावं लागलं. ते शाकाहारी होते आणि मद्य घेत नसत. त्यांना सगळे पदार्थ खाता यायचे नाहीत आणि मद्य ते घ्यायचे नाहीत त्यामुळे ब-याच विद्यार्थ्यांना ते जोडीदार म्हणून हवे असत.

ही जेवणं आणि हे वाचन यातूनही गांधीजींचा बुजरेपणा गेला नाही. खटला चालवताना पुस्तकी ज्ञान कसं वापरावं ते त्यांना कळेना. एका इंग्रजी वकिलानं त्यांना म्हटलं की, "प्रामाणिकपणा आणि मेहनत या गोष्टी चांगला वकील होण्यासाठी पुरेशा

आहेत. याच गुणांवर पुरेसे पैसेही मिळवता येतात” यामुळे गांधीजींना हुरूप आला. कायद्याचा तीन-चतुर्थांश भाग तर सत्य घटनांनी व्यापलेला असतो. खटल्यात या भागाकडे लक्ष दिलं की, बाकीचं कायदा पाहून घेतो. त्या ब्रिटिश वकिलांनी असंही सांगितलं की त्यांनी इतिहास आणि सामान्य ज्ञानाची पुस्तकं वाचावीत. गांधीजींनी हा सल्ला मानला.

इंग्लंडमध्ये थोडा काळ गांधीजींनी स्मार्ट ‘इंग्रजी सद्‌गृहस्थ’ बनण्याचा प्रयत्न केला. त्यांनी योग्य प्रकारे उच्चार करणं, भाषण करणं, नृत्य करणं, व्हायोलिन वाजवणं आणि सूटबूट घालणं याचा सराव केला. लंडनमधल्या सर्वात फॅशनेबल दुकानातून त्यांनी महागातला सूट खरेदी केला आणि सोन्याची घड्याळाची साखळीही घेतली. ते उंच टोप्या आणि टायही वापरायचे. तरुण स्त्रियांबरोबर ते मैत्रीही करायचे. हळूहळू त्यांचं जीवन आरामाकडे आणि चैनीकडे झुकू लागलं. काही महिन्यांनी त्यांच्या लक्षात आलं की आपण फारच वेडेपणा करत होतो. या महागड्या सवयींमुळे ते आपल्या मोठ्या भावावर पैशांचं ओझं टाकत होते. ते इंग्लंडला कायदा शिकायला आले होते, ब्रिटिश माणसासारखी राहणी शिकायला नाही. ताबडतोब त्यांनी आपली राहणी बदलली. त्यांनी एक कमी भाड्याची खोली घेतली. स्टोव्ह घेतला आणि स्वतःच स्वतःचा नाश्ता, रात्रीचं जेवण तयार करायला सुरुवात केली. दुपारचं जेवण ते स्वस्त शाकाहारी उपहारगृहात घ्यायला लागले आणि वाहनांचा खर्चही त्यांनी बंद केला. गांधींजी रोज आठ ते दहा मैल चालत असत.

इंग्लंडमध्ये ३२ महिने राहिल्यावर, योग्यवेळी ते बॅरिस्टर झाले. दोन दिवसांनी ते भारतात बोटीनं परत जायला निघाले.

भारतात पोचल्यावर त्यांनी मुंबईत भाड्याचं घर घेतलं आणि स्वयंपाकी ठेवला. आता ते हायकोर्टात नियमितपणे जात आणि खटले कसे चालतात त्याचं निरीक्षण करत. कोर्टाच्या वाचनालयात ते बराच वेळ बसत. भारतीय कायद्याची पुस्तकं त्यांनी वाचली.

त्यांचा पहिला खटला अगदी साधा होता. त्यांना त्यासाठी ३० रुपये फी मिळणार होती. २२ वर्षांचा हा तरूण अननुभवी बॅरिस्टर जेव्हा बोलायला उभा राहिला तेव्हा एकदम त्याचं अवसान गळालं. डोकं भणभणायला लागलं, तोंडातून शब्द फुटेना, लाजिरवाण्या अवस्थेत त्यांना कोर्टातून निघून जावं लागलं. नंतर त्यांनी पुन्हा त्या कोर्टात खटला चालवला नाही.

एकीकडे खर्चांचा डोंगर जमत होता आणि कमाई जवळजवळ शून्य! त्यांना दावे लिहिणं चांगलं जमत होतं पण ते बॅरिस्टरचं काम नव्हतं आणि त्यातून पुरेसे पैसेही मिळत नव्हते. सहा महिने हा अनुभव घेतल्यानंतर गांधीजी राजकोटला घरी परत गेले. तिथे भाऊ होता आणि इतर कुटुंबही होतं. त्यांच्या भावाला खात्री होती की, हा आपला इंग्लंडहून शिकून आलेला बॅरिस्टर भाऊ यशस्वीपणे व्यवसाय करील पण त्यांची घोर निराशा झाली. गांधीजींना फारच वाईट वाटलं.

राजकोटला नवीनच प्र न समोर उभा राहिला. जे वकील त्यांना खटले देत त्यांना नियमाप्रमाणे पैसे द्यावे लागत. गांधीजींनी असं कमिशन द्यायला नकार दिला. त्यांच्या नीतीमध्ये ते बसेना. भावानं मध्यस्थी केली आणि गांधीजींनी समझोता केला. त्यावेळी गांधीजी दर महिन्याला ३०० रु. मिळवत होते. पण या कामात त्यांना आनंद वाटत नव्हता आणि आजूबाजूचा खोटेपणाही पटत नव्हता.

यावेळी सुदैवानं त्यांच्याकडे दक्षिण आफ्रिकेतल्या एका श्रीमंत मुसलमान व्यापा-याचं काम चालून आलं. त्यांना या कामाबद्दल १५७५ रुपये मिळणार होते. शिवाय पहिल्या वर्गाचं जाण्या-येण्याचं भाडंही मिळणार होतं. त्यांनी हे काम स्वीकारलं आणि आफ्रिकेत जायला निघाले. त्यांचं जहाज झांजिबारला पोचलं. तिथे कोर्टाचं काम कसं चालतं हे पहायला ते गेले. हिशेबाच्या संदर्भातले अनेक प्र न त्यांच्या लक्षात येईनात. ते आफ्रिकेला ज्या खटल्यासाठी आले होते तो मुख्यतः हिशेबाच्या संदर्भात होता. गांधीजींनी मग अकाउंटिंगचं पुस्तक आणलं आणि काळजीपूर्वक वाचून काढलं.

डर्बनला पोचल्यावर तिस-या दिवशी गांधीजी कोर्टात गेले. तिथल्या न्यायमूर्तींनी त्यांना त्यांची पगडी काढायला सांगितलं. गांधीजींनी पगडी उतरवायला नकार दिला आणि ते बाहेर पडले. दक्षिण आफ्रिकेत पाऊल टाकल्यापासून ते पहात होते गोरे लोक भारतीयांना वाईट वागणूक देत होते. त्यांचं तिथे स्वागत नव्हतं आणि त्यांच्यावर "हमाल बॅरिस्टर" असा शिक्का पडला. या अपमानांनी ते अस्वस्थ झाले.

दादा अब्दुल्ला गांधीजींचे अशील होते. त्यांच्याकडून त्यांनी सर्व तपशील समजावून घेतले आणि प्रकरणाचा सखोल अभ्यास केला. त्यांनी असा विचार केली की, दोन्ही बाजूंनी वकिलांवर फार काळ खर्च केला तर त्यांचं फार नुकसान होईल. आपल्या अशीलाचे पैसे खर्च करून आपण ते मिळवणं आणि मानाचं स्थान मिळवणं त्यांना पटलं नाही. त्यांचा असा विश्वास होता की, कायद्याचा सल्लागार म्हणून दोन्ही विरुद्ध बाजूंना एकत्र आणणं हेच त्यांचं खरं काम होतं. न्यायालयाबाहेर हे प्रकरण मिटवावं म्हणून दुस-या बाजूच्या लोकांना भेटण्याचा त्यांचा आग्रह होता. दादा अब्दुलांची याला तयारी नव्हती तेव्हा गांधीजी म्हणाले, "आपण जे विश्वासानं मला सांगितलं आहे ते कोणालाही कळणार नाही याची खात्री बाळगा. त्यांनी समेट करावा यासाठी मी फक्त त्यांना सुचवीन."

गांधीजींनी मध्यस्थी करूनही हे प्रकरण वर्षभर टांगून राहिलं. गुंतागुंतीची प्रकरणं उत्तम वकील कसे हाताळतात ते अभ्यासण्याची गांधीजींना संधी मिळाली त्यांनी पुरावे तयार केले. दोन्ही बाजूंचं समाधान होईल अशा प्रकारे खटल्याचा समेट झाला. पण गांधीजींना मात्र ह्या व्यवसायाबद्दल घृणा निर्माण झाली. दोन्ही बाजूंच्या समर्थनाचे मुद्दे कायदा उभे करू शकतो आणि खर्च वाढत जातो.

डर्बनच्या न्यायालयात गांधीजींनी वकिली सुरू केली तेव्हा बालसुंदरम् नावाचा कामगार तिथे आला. त्याचे कपडे फाटले होते आणि पुढचे दोन दात पडले होते. त्याच्या गो-या मालकांनी त्याला मारलं होतं. गांधीजींनी त्याला शांत केलं. त्याला गो-या डॉक्टरकडे उपचारांसाठी नेलं आणि त्याची दुखापत गंभीर असल्यामुळे तसं

प्रमाणपत्र मिळवलं. बाळसुंदरम्‌चा खटला त्यांनी लढवला आणि जिंकला. त्यानंतर त्याला चांगला मालक मिळवून दिला. ह्या घटनेमुळे गरीब भारतीय कामगारांत ते एकदम लोकप्रिय झाले. दीनदुबळ्यांचा रक्षणकर्ता म्हणून त्यांची कीर्ती भारतापर्यंत पोचली. त्यानंतर लोक त्यांच्याकडे निराधार लोकांचा मित्र म्हणून पाहू लागले.

एक वर्षाचा अनुभव घेतल्यावर गांधीजींचा आत्मविश्वास वाढला. काही वाद-विवादानंतरच "कूली बॅरिस्टर"ला नाताळ सर्वोच्च न्यायालयात वकिली करण्याची परवानगी मिळाली. गोरे वकील त्यांना प्रकरणं देत नसत. याशिवाय त्यांनी स्वतःच आपल्या वकिलीत काही अडथळे निर्माण केले, काही मर्यादा घालून घेतल्या. वकिली व्यवसाय हा खोटेपणाचा व्यवसाय नाही हे सिद्ध करण्याचा त्यांचा निर्धार होता. त्यांनी स्वतः कधीही काही खोटं सांगितलं नाही आणि कधी खटला जिंकण्यासाठी खोटे साक्षीदार तयार केले नाहीत. अशील जिकलं किंवा हरलं तरी ते कायम ठरलेली फी घेत असत. कोणी फी दिली नाही तरी ते कधी अशीलाला स्मरणपत्र पाठवत नसत. वैयक्तिक रागामुळे ते कोणावर खटला भरत नसत. त्यांच्यावर दक्षिण आफ्रिकेत चार वेळा हल्ला झाला. तरी त्यांनी हल्लेखोरांना कोर्टात खेचलं नाही आणि त्यांना शिक्षा दिली नाही. त्यांच्या वीस वर्षांच्या वकिलीत शेकडो प्रकरणं त्यांनी न्यायालयाबाहेर मिटवली.

एकदा एक खटला चालवतांना त्यांच्या लक्षात आलं की, अशील अप्रामाणिक आहे. मग पुढे तो खटला चालवण्याऐवजी त्यांनी न्यायमूर्तींना खटला रद्द करायला सांगितला आणि अशीलाला खोटं प्रकरण आणल्याबद्दल समज दिली. गांधीजी एकदा म्हणाले होते - कमी दर्जाचा वकील म्हणून मी वकिलीला सुरुवात केली. माझ्या अशीलांचं माझ्या वकिलीच्या कौशल्याबद्दल काही फार चांगलं मत नव्हतं. पण त्यांनी पाहिलं की काहीही झालं तरी मी खरं तेच बोलतो तेव्हा ते माझ्यापाशी राहिले. त्यांच्याकडे अशा प्रकारे आलेले लोक त्यांचे मित्र बनले आणि सहकारी बनले. गांधीजींचं व्यवसायातल्या प्रामाणिकपणाबद्दल इतकं नाव झालं होतं की त्यांनी एकदा

एका अशीलाला तुरुंगात जाण्यापासून वाचवलं. वयस्कर अशील चोरट्या मार्गांनी कस्टम्स ड्यूटी न भरता माल आणीत असे. अगदी लाज जायची वेळ आल्यावर त्यानी हे गांधीजींना सांगितलं. गांधीजींनी त्याला गुन्हा कबूल कर आणि दंड भर असं सांगितलं. गांधीजी न्यायमूर्तींना भेटले आणि कस्टम्स अधिका-यांनाही त्यांनी खरी गोष्ट सांगितली. त्यांच्या अहवालाबद्दल कोणतीही शंका घेतली गेली नाही आणि गुन्हेगाराला फक्त दंड झाला. कृतज्ञता म्हणून त्या अशीलानं हा सर्व प्रसंग छापून घेतला आणि त्यांच्या कचेरीत लावला.

दुस-या एका प्रसंगी त्यांच्या अशीलाच्या कागदपत्रात चुकीची हिशेबाची नोंद होती. गांधीजींनी ती चूक दुस-या बाजूला दाखवली आणि त्यावर प्रतिवाद केला. न्यायमूर्तींनी याबद्दल प्रथम गांधीजींना दोष दिला पण निकाल त्यांच्या बाजूनं दिला. न्यायमूर्तींनी दुस-या बाजूला सांगितलं 'समजा गांधींनी ती चूक मान्य केली नसती तर तुम्ही काय केलं असतं? 'गांधीजी उलटतपासणी घेण्यात प्रवीण होते. न्यायमूर्तींना आणि वकिलांना त्यांच्याविषयी आदर वाटे. त्यांची बरीच अशीलं गोरी होती. भारतात आणि दक्षिण आफ्रिकेतही त्यांना असे आढळून आलं की १०० खटल्यांपैकी ९९ खटल्यात भारतीयांना युरोपियनांविरुद्ध न्याय मिळत नसे. त्यामुळे त्यांनी म्हटलं, "एखाद्यातरी इंग्रजाला भारतातल्या निर्घृण हत्यांबद्दल कडक शिक्षा झाली आहे का? इंग्रज अधिका-याच्या खटल्याकडे आणि त्याला झालेल्या किरकोळ शिक्षेकडे पहा. त्यांनी जाणूनबुजून केलेल्या असहाय्य निग्रोंच्या छळाबद्दल ही विनोदी शिक्षा-" स्वतःचेच कडक नियम पाळून आणि कायद्या विरुद्ध अनेकदा ताशेरे झाडूनही गांधीजींचा व्यवसाय वाढत गेला. भारतात त्यांनी फार कमी काळ वकिली केली. दक्षिण आफ्रिकेत त्यांनी २० वर्षांवर वकिली केली.

सुरुवातीला त्यांनी चांगल्या वस्तीत घर भाड्यानं घेतलं. एखाद्या नव्या बॅरिस्टराला शोभेसं घर थाटलं. युरोपियन पद्धतीनं ते सजवलं. रविवारी सुट्टीच्या दिवशी ते मेजवानी आयोजित करत. त्याचं घर सर्वांना खुलं होतं. ते जवळच्या मित्रांना आणि सहका-यांना घरी रहायला बोलवत. त्यांचं ऑफिस घरापासून ६ मैल दूर होतं. काही

महिने ते सायकलवरून जात. नंतर ते चालत जात असत. त्याकाळी ट्राममध्ये भारतीयांना पुढच्या जागेवर बसायला परवानगी नव्हती. म्हणून ते ट्रामनं जात नसत. त्यांना त्यासाठी खास परवानगी मिळण्यासारखी होती. हळूहळू त्यांनी स्वतःची राहणी बदलली आणि गरीब भारतीयांसारखे स्वतःला समजू लागले. चाळिसाव्या वर्षी जेव्हा त्यांना दर महा सरासरी ४००० रु. मिळायचे तेव्हा त्यांनी वकिली सोडून दिली आणि सार्वजनिक कामाला वाहून घेतलं. स्वतःची सर्व मालमत्ता आश्रमाला दिली स्वतः कष्ट करू लागले आणि शेतावर राहू लागले.

काही वर्षांनंतर गांधीजींनी वकिलांच्या प्रचंड फीबद्दल त्यांचा निषेध केला. भारतात न्यायालयं महागडी आहेत असं त्याचं म्हणणं होतं. त्यांना लोकांच्या गरिबीशी काही घेणं नसतं. वकील दर महिन्याला ५० हजार ते एक लाख रुपये कमाई करू शकतो. गांधीजी म्हणत, "वकिली हा काही ज्याच्याकडे आशेनं बघावं असा व्यवसाय नाही. समाजावर वकील आणि न्यायालयं यांचा पगडा नसता तर आपलं जगणं जास्त सुखाचं झालं असतं. वकिली व्यवसाय माणसाला अनीती शिकवतो. फितवलेले साक्षीदार दोन्ही बाजूला असतात. पैशांसाठी ते स्वतःचा आत्मा विकतात." न्याय निर्दोष असावा आणि वाजवी असावा, महाग नसावा यासाठी न्यायपद्धतीत मूलभूत बदल व्हायला हवेत, असं त्यांना वाटे. ते स्वतः गरिबांचे खटले लढत आणि त्यासाठी फी घेत नसत. आणि सार्वजनिक कामासाठी खटला चालवायचा असेल तर प्रत्यक्ष खर्चाखेरीज काहीही पैसे घेत नसत. जेव्हा गरीब भारतीय रहिवाशांना तिथलं प्रशासन बेघर करत असे, तेव्हा गांधीजी त्यांच्या बाजूनं उभे रहात. प्रत्येक खटला चालवण्यासाठी ते अतोनात परिश्रम घेत आणि फक्त १५० रु. फी घेत. त्यांनी चालवलेल्या ७० खटल्यांपैकी फक्त एकात त्यांना अपयश आलं. त्यांच्या कमाईपैकी अर्धी रक्कम ते धर्मादाय संस्थेला देणगीदाखल देत असत.

आपल्या देशातील लोकांना मानवी अधिकार मिळावेत यासाठी सरकारला विरोध करायला शिकवत. त्यासाठी त्यांना तुरुंगात जावं लागलं होतं आणि दक्षिण आफ्रिकेच्या तसंच भारतीय न्यायालयातही त्यांच्यावर खटले चालविण्यात आले होते. अनेकदा ते

तुरुंगात गेले. दक्षिण आफ्रिकेत ज्या कोर्टात त्यांनी १० वर्षे वकिली केली. त्याच कोर्टात त्यांना बेड्या घातलेल्या अवस्थेत आरोपीच्या पिंज-यात उभं राहावं लागलं. भारतात त्यांना अशा प्रकारे पहिली शिक्षा झाल्यावर त्यांचं नाव बॅरिस्टर – यादीतून वगळण्यात आलं.

गांधीजींनी ब्रिटिश न्यायालयांविरुद्ध असहकार पुकारला आणि पंचायतींचं पुनरुज्जीवन व्हावं याचा प्रचार केला अशा प्रकारे कायदा मोडणा-या या वकिलानं हाक दिल्यावर अनेक प्रथितयश वकिलांनी त्यांची वकिली सोडली आणि स्वातंत्र्य चळवळीत ते सामील झाले.

वकिलांच्या एका संघानं त्यांना अभिनंदनाचं पत्र पाठवलं होतं त्याला उत्तर देतांना ते म्हणाले, "माझं नाव तर वकिलांच्या यादीतून काढून टाकलं आहे. आता मला कायद्याच्या ज्ञानाचा विसर पडला आहे. आता मी कायद्यांचा अर्थ लावत न बसता कायदे तोडण्यात गुंतलो आहे."

❖❖

# शिंपी

दक्षिण आफ्रिकेत गांधीजींना दोनदा सक्त मजुरीची शिक्षा झाली. काही आठवडे त्यांना फाटलेल्या गोधड्यांचे तुकडे शिवावे लागले आणि जाड कापडातून खिसे कापण्याचं काम नऊ नऊ तास करावं लागलं त्यांनी आपलं काम वेळेआधीच पुरं केलं आणि शिवण्यासाठी अधिक कापड मांगितलं.

भारतीय तुरुंगात काही दिवस त्यांनी सिंगर शिवणयंत्रावर काम केलं. तुरुंगातलं हे सर्व काम ते आपण होऊन करत. त्यांना शिवणयंत्र चालवण्यात तरबेज व्हायचं होतं. माणसांऐवजी येणा-या मोठ्या यंत्रांना त्यांचा विरोध होता. भांडवलदारांची गुलामगिरी आणि यंत्रांची गुलामी करणं त्यांना मान्य नव्हतं. यंत्रामुळे माणसाच्या हातचं काम जाणं त्यांना पसंत नव्हतं. भारतापुढचा प्र न लोकांना आराम पुरवण्याचा नाही तर त्यांचा रिकामा वेळ उपयोगात आणण्याचा होता. शिवणयंत्राचा त्यांनी अपवाद केला होता कारण “शिवणयंत्र हा अतिशय उपयोगी शोध आहे. सिंगरची पत्नी हातानं शिवण करत असे आणि ते मोठं कंटाळवाणं काम होतं. पत्नीच्या प्रेमामुळे सिंगरनं तिचे कष्ट कमी करण्यासाठी शिवणयंत्राचा शोध लावला या यंत्राच्या निर्मितीमागे प्रेम होतं.”


गांधीजींनी एकदा आश्रमातल्या एका भगिनीला लिहिलं होतं – “तुझा जो काही सलवार-कमीज पोषाख शिवायचा असेल त्याची काळजी करू नकोस. मी स्वतः ते शिवण करून देईन. आपल्याला सिंगर शिवणयंत्र उसनं आणता येईल. काही तास शिवण केलं तर जरूर तो पोषाख तयार होईल”. गांधीजी हातशिलाई सुंदर करत. कस्तुरबांची पोलकी ते बेतत आणि शिवत असत.

ते स्वतः चरख्यावर सूत काढत, हातमागावर त्याचं कापड विणत आणि स्वतःचा कुडता शिवत. चांगले तयार शिंपी आणि चर्मकार आश्रमातल्या प्रशिक्षणार्थींना विनामूल्य शिकवत असत.

चंपारण्यातल्या उठावाच्या वेळी गांधीजी तिथल्या शेतक-यांना मार्गदर्शन करत होते तेव्हा ब्रिटिश पत्रकारानं त्यांच्यावर टीका केली होती. त्यानं असं म्हटलं की, चंपारण्यातल्या उठावात यश मिळावं म्हणून गांधीजींनी तात्पुरता भारतीय वेष परिधान केला आहे. गांधीजींनी त्याला उत्तर लिहिलं, "मी स्वदेशीचं व्रत घेतल्यामुळे माझे कपडे संपूर्णपणे हातानं विणलेले आणि शिवलेले असतात. मी स्वतः किंवा माझे सहकारी हेच करतात."

नंतरच्या काळात गांधीजींनी कुडता वापरणं सोडून दिलं आणि कमरेला आणि अंगावर पंचा वापरू लागले. तरीही कधीकधी ते आपल्या रुमालाच्या किंवा पंचाच्या कडा हातानं शिवत असत. स्वतः एकीकडे शिवण करता करता ते त्यांच्या मदतनीसांना तोंडानं पत्राचा मजकूर सांगत असत. आगाखान पॅलेसमध्ये जेव्हा त्यांना स्थानबद्ध केलं होतं तेव्हा त्यांनी तिथल्या तुरुंगाधिका-यांना खादीचे हातरुमाल वाढदिवसाची भेट म्हणून दिले होते. प्रत्येक रुमालावर त्या अधिका-यांच्या नावाची आद्याक्षरं त्यांनी सुबकपणे भरलेली होती. त्यावेळी ते ७४ वर्षांचे होते.

एकदा त्यांच्या आवडत्या शालीवर खादीच्या तुकड्यांचं ठिगळ लावण्याचं काम एका भगिनीकडून त्यांनी मार्गदर्शन करून, करून घेतलं होतं. आपल्या गरीब देशवासियांचे प्रतिनिधी म्हणून ते ब्रिटिश पंतप्रधानांबरोबर गोलमेजपरिषदेसाठी गेले होते आणि बकिंगहॅम राजवाड्यात एका टी-पार्टीला गेले होते तेव्हा हीच शाल त्यांनी पांघरली होती. त्यांनी दिसण्याची कधीही पर्वा केली नाही. त्याचबरोबर त्यांना फाटलेले, ओंगळ कपडेही चालत नसत. एकदा एका बैठकीत त्यांच्या एका सहका-याच्या खादीच्या शालीला त्यांनी एक छिद्र पडलेलं पाहिलं. लगेच त्यांनी त्याला अशी चिठ्ठी पाठवली – "फाटके कपडे घालणं हे आळशीपणाचं लक्षण आहे. त्यामुळे त्याची लाज



वाटायला हवी; पण ठिगळ लावलेले कपडे असं सांगतात की तुम्ही गरीब आहात पण कामसू आहात. उद्योगी आहात. मला तुमच्या चादरीला छिद्र पडलेलं आवडलं नाही. ते गरिबीचं किंवा साधेपणाचं लक्षण नाही. पत्नी नसण्याचं, पत्नी वाईट असण्याचं किंवा आळशीपणाचं ते लक्षणं आहे."

❋❋

# धोबी

बॅरिस्टर गांधी जेव्हा न्यायालयात जात तेव्हा त्यांचा पोषाख अतिशय व्यवस्थित युरोपियन पोषाख असे. रोज त्यांना शर्टाइतकीच स्वच्छ कॉलर हवी असे. एक दिवसाआड ते शर्ट बदलत असत. त्यांचं धोब्याचं बिल बरंच असे. त्याशिवाय धोबी वेळेवर कपडे देत नसे. चांगले कपडे शिलकीत ठेवायचे तर खूप खर्च होत असे. तीन डझन शर्टस् आणि कॉलर्स असले तरी धोबी घोटाळा करीत असे.

गांधीजींना त्यांचा खर्च कमी करायचा होता. एकदा ते घरी आले ते धुण्याची संपूर्ण सामग्री बरोबर घेऊनच. त्यांनी धुलाईवरचं एक पुस्तक आणलं आणि ते काळजीपूर्वक वाचून काढलं कपडे चांगल्या प्रकारे कसे धुवायचे याच्या सूचना मिळाल्यावर त्या अंमलात आणायला सुरुवात केली. बिचा-या कस्तुरबांना नुसतं पहायला परवानगी नव्हती. गांधीजींनी त्यांना पण धुण्याची कला शिकवली. ही नवी लहर म्हणजे गांधीजींच्या रोजच्या कामात नव्या ओझ्याची भर होती पण ते हार मानणारे नव्हते. धोब्याच्या छळापासून मुक्त व्हायचा त्यांनी नि चय केला होता आणि स्वतंत्र व्हायचं ठरवलं होतं. एकदा त्यांनी कॉलर धुतली आणि ती कडकपण केली. या कामाची सवय नसल्यानं त्यांनी तिला इस्त्री केली तेव्हा इस्त्री पुरेशी गरम नव्हती. त्यांना कॉलर जळण्याची भीती वाटत होती. ती कॉलर घालून ते न्यायालयात गेले. ती जरा जास्तच कडक झाली होती आणि ताठ उभी रहात होती. त्यांचे मित्र हसायला लागले. गांधीजी जराही डगमगले नाहीत. ते म्हणाले, 'हा माझा पहिलाच प्रयत्न आहे कपडे धुण्याचा. त्यामुळे स्टार्च जरा जास्त झाला. पण काही बिघडत नाही. तुम्हाला करमणुकीचं साधन तर मिळालं!"



"इथे लॉंड्रीज काय कमी आहेत का?" एकानं विचारलं. "नाही, पण लॉंड्रीचं बिल फार येतं. नवी कॉलर विकत घ्यायला जेवढे पैसे पडतात तेवढेच जवळ जवळ कॉलर धुवायला पडतात. आणि तरीही धोब्यावर कायमचं अवलंबून रहावं लागतं. त्यापेक्षा मला स्वतःचे स्वतः कपडे धुतलेले परवडतात. नंतर त्यांनी स्वतः तरबेज धोबी असल्याचं सिद्ध केलं.

गोखले एकदा गांधीजींकडे रहायला आले. त्यांना गांधीजी गुरु मानत असत. गोखल्यांना एका पार्टीला जायचं होतं. त्यांचं उपरणं चुरगाळलेलं होतं आणि धोब्याकडून धुऊन घ्यायला वेळ नव्हता. गांधीजींनी त्यांना विचारलं, "मी चांगली इस्त्री करून देऊ का?" गोखले म्हणाले, "माझा तुझ्यावर वकील म्हणून विश्वास आहे; पण धोबी म्हणून नाही. जर तू उपरणं जाळलंस तर काय?" गांधीजींनी आग्रह धरला आणि इस्त्री केली. गोखल्यांना त्यांचं काम पाहून आनंद वाटला. गांधीजींना इतका आनंद झाला की ते म्हणाले, "आता सगळ्या जगानं मला नावं ठेवली तरी मला पर्वा नाही."

दक्षिण आफ्रिकेतल्या त्यांच्या आश्रमात पाण्याचा तुटवडा असे आणि स्त्रियांना लांबच्या झ-यावर कपडे धुवायला जावं लागायचं. गांधीजी त्यांना मदत करीत. खादीचं उत्पादन तेव्हा नव्यानं सुरू झालं होतं. तेव्हा हातमागावरच्या साड्या फार जाड आणि जड असायच्या आश्रमातल्या स्त्रियांनी त्या नेसण्याचं मान्य केलं होतं पण त्या धुवायची वेळ आली की त्या कुरकुर करायच्या. गांधीजींनी धोबी व्हायचं मान्य केलं. त्यांना इतरांचे कपडे धुवायला लाज वाटायची नाही. एकदा ते एका श्रीमंत माणसाकडे पाहुणे म्हणून गेले. न्हाणीघरात गेल्यावर त्यांना एक स्वच्छ धोतर जमिनीवर पडलेलं दिसलं. त्यांनी अंघोळ केली आणि स्वतःच्या कपड्यांबरोबर ते धोतरही धुऊन टाकलं. उन्हात वाळत घालायला ते घेऊन गेले. कारण उन्हात कपड्यातले जंतू मरतात आणि कपडे स्वच्छ दिसतात. यजमानांनी विरोध केला. ते म्हणाले, "बापूजी, हे काय करताय तुम्ही?" गांधीजी म्हणाले, "का बरं? यात काय चुकीचं आहे? स्वच्छ धोतर आहे, मळलं असतं म्हणून मी धुऊन टाकलं मला स्वच्छता करायला काडीची लाज वाटत नाही." गांधीजींना लाज वाटली नाही पण त्यांचे यजमान मात्र खजिल झाले.

तुरुंगात गांधीजी कधी कधी स्वतःचं धोतर, पंचा, हातरुमाल धुऊन टाकत आणि इतरांचे कष्ट वाचवत. कस्तुरबांच्या शेवटच्या आजारपणात आगाखान पॅलेसमध्ये कस्तुरबांनी वापरलेले हातरुमाल गांधीनी गोळा करत आणि धुऊन टाकत.

आयुष्यभर ते स्वतःच्या पोषाखाबद्दल अगदी जागरूक होते. लहानपणी ते इतर मुलांशी स्वतःचं मिलचं धोतर स्वच्छ ठेवण्याची स्पर्धा करत. विहिरीतून पाणी काढून ते कपडे धूत असत. गांधीजींना साधेपणाचं कौतुक होतं पण अजागळपणा, चुरगळलेले कपडे त्यांना कधी आवडायचे नाहीत. त्यांचं स्वतःचं धोतर, पंचा, अंगावरचा पंचा पांढरा शुभ्र असे आणि त्याला एकही सुरकुती नसायची ते स्वच्छतेचं मूर्तिमंत चित्र होते.

**

# न्हावी

दक्षिण आफ्रिकेत आल्यानंतर आठवड्याभरानं काही कोर्टाच्या कामासाठी त्यांना एक रात्र मोठ्या शहरात राहण्याची वेळ आली. त्यांनी भाड्याची गाडी केली आणि गाडीवाल्याला चांगल्या हॉटेलमध्ये घेऊन जायला सांगितलं. गांधी हॉटेलच्या व्यवस्थापकाला भेटले आणि राहण्यासाठी खोली मागितली. गो-या व्यवस्थापकानं गांधीजींकडे नखशिखान्त पाहिलं आणि म्हणाला, "माफ करा पण आमच्याकडच्या सर्व खोल्या गेल्यात. जागा नाही" गांधीजींना एका भारतीय मित्राच्या दुकानात रात्र काढावी लागली. त्यांनी जेव्हा मित्राला घडलेला प्रसंग सांगितला तेव्हा तो म्हणाला, "हॉटेलमध्ये आपल्याला जागा मिळेल असं तुम्हाला वाटलंच कसं?" गांधीजींना आ चर्य वाटलं, ते म्हणाले, "का बरं?" मित्र म्हणाला, "हळू हळू तुमच्या सगळं लक्षात येईल आणि तुम्हाला समजू लागेल" आणि दक्षिण आफ्रिकेत भारतीयांना किती अपमान सहन करावे लागतात त्याबद्दल गांधीजींच्या ब-याच गोष्टी लक्षात आल्या, त्यांना मार खावा लागला. त्यांना लाथा खाव्या लागल्या. गाडीतून त्यांना ढकलून दिलं गेलं. फूटपाथवरून ढकललं गेलं कारण ते भारतीय होते. काळे होते. तरी त्यांना कळेना की गोरे लोक काळ्यांचा इतका तिरस्कार का करतात. ख्रि चन धर्म हा तर प्रेमाचा धर्म आहे आणि त्याप्रमाणे सगळी माणसं ही एकाच देवाचे पुत्र असतात ना?

एकदा गांधीजी केस कापण्याच्या दुकानात गेले. गो-या न्हाव्यानं विचारलं, "काय पाहिजे?"

गांधीजी म्हणाले, "मला केस कापायचे आहेत"

तो म्हणाला, “माफ करा. मला तुमचे केस कापता येणार नाहीत. जर काळ्या माणसाचे केस कापले तर माझी गोरी गि-हाइकं येईनाशी होतील”

हा अपमान गांधीजींना जिव्हारी लागला. त्यांना असं वाटलं की या अपमानाच्या दुःखानं धुमसत राहण्यात अर्थ नाही किंवा वर्तमानपत्रात लेखी आवाहनं करण्यातही अर्थ नाही. त्यांना स्वावलंबी व्हायला हवं. स्वतःची स्वतः कामं करायला हवीत. ताबडतोब त्यांनी केस कापण्याची साधनं आणली आणि घरी गेले. घरी आरशासमोर उभं राहून त्यांनी केस कापायला सुरुवात केली. दाढी करणं अवघड नव्हतं पण स्वतःचे स्वतः केस कापणं कठीण गेलं. अर्थातच हे काम एका बॅरिस्टरचं तर मुळीच नव्हतं! त्यांनी कसेतरी केस कापले पण डोक्याच्या मागच्या बाजूचे केस कापणं जमेना. तिथे घोटाळा झाला. नेहमीप्रमाणे त्याचं फार काही वाटून न घेता ते कोर्टात गेले. त्यांचे विदूषकासारखे केस पाहून मित्रांची हसता हसता पुरेवाट झाली. एकानं विचारलं, “गांधी, तुमच्या केसांना काय झालं? काल रात्री उंदरांनी कुरतडले का काय?” गांधीजींनी प्रांजळपणे सांगितलं, “नाही. गो-या न्हाव्यानं काळ्या माणसाचे केस कापायला नकार दिला म्हणून मी स्वतःचे केस कापायचे ठरवले. कसे का असेनात!”

हा केशकर्तनातला गांधीजींचा पहिला अनुभव होता. तेव्हा ते २८ वर्षांचे होते. त्यानंतर ते नेहमी कात्री आणि केस कापण्याचे हातयंत्र वापरत. आश्रमात न्हाव्याला बोलवणं ही टाळण्याची गोष्ट होती. आश्रमवासी एकमेकांचे केस कापत. आश्रमातल्या विद्यार्थ्यांनी साधेपणानं जगावं असं गांधीजींना वाटे. कोणत्याही प्रकारचा नखरा, सुंदर पोषाख किंवा चमचमीत पदार्थांना तिथे मनाई होती. एका रविवारी सकाळी मुलं अंघोळीला चालली होती. गांधीजींनी एकेकाला बोलावलं आणि त्यांचे केस कापले. त्यांना अशा प्रकारे केस इतके बारीक डोक्याबरोबर कापलेले आवडले नाहीत. एकदा त्यांनी आश्रमातल्या दोन मुलींचे लांब केसही कापले होते.

दक्षिण आफ्रिकेत तुरुंगात केसांना कंगवा मिळत नसे आणि दोन महिने किंवा जास्त सजा झाली असेल तर त्या कैद्यांचे सर्व केस कापून चकोट केला जाई.



मिशापण कापून टाकत. गांधीजींना आणि त्यांच्या बरोबरच्या लोकांना या नियमातून सूट दिली होती. पण गांधीजींना तुरुंगात सर्व अनुभवातून जायचं होतं. तेव्हा आपले केस कापून हवे आहेत असं त्यांनी लेखी पत्र दिलं तेव्हा तिथल्या अधिका-यानं त्यांना कात्री आणि केस कापण्याचं हातयंत्र दिलं. गांधीजी आणि त्यांचा एकाद-दुसरा सहकारी रोज दोन तास इतरांचे केस कापत.

आगाखान पॅलेसमधे स्थानबद्ध असताना त्यांच्याबरोबर एक आश्रमवासी भगिनी होती. तिच्या डोक्यात कोंडा झाला होता. त्याचा तिला त्रास होत होता. एकदा तिनं अनवधानानं म्हटलं, "बापू, मी केस कापून टाकू का आणि कोंड्यासाठी काही औषध लावू का डोक्याला?" गांधीजी म्हणाले, "हो. लगेच कर. कात्री घेऊन ये." कात्री आणल्यावर गांधीजींनी भराभर केस कापून टाकले. महात्मा न्हावी तेव्हा ७५ वर्षांचे होते.

स्वदेशी चळवळीच्या दरम्यान गांधीजींनी परदेशी रेझर्सवर बहिष्कार घातला आणि स्वदेशी वस्तरा वापरू लागले. हळूहळू त्याचा वापर कसा करायचा ते त्यांच्या लक्षात आलं आणि समोर आरसा न घेता एवढंच काय पण साबण, ब्रशही न वापरता ते दाढी करू लागले. तेव्हा त्यांना दाढी करण्याच्या कलेतला मोठा टप्पा आपण गाठला असं वाटलं असावं. त्यांनी हे प्रशस्तीपत्रकही देऊन टाकलं, "मुन्नीलालनं मनापासून माझी चांगली दाढी केली. तो स्वदेशी वस्तरा वापरतो आणि साबणाशिवाय दाढी करतो." त्यांच्या काही अनुयायांनीही या प्रकारे दाढी करायला सुरुवात केली आणि अशा प्रकारे दाढी करण्याचा त्यांना प्र न वाटेनासा झाला.

खेड्यापाड्यातले न्हावी कधी कधी सर्जन म्हणून कसे काम करतात हे गांधीजींना माहीत होतं. एखाद्याचं गळू कापणं किंवा पायातला काटा काढणं ते करायचे पण त्यांचे कपडे आणि अवजारं मात्र अस्वच्छ असत.

एकदा सेवाग्राममधला एक हरिजन सेवक म्हणाला, "मला वर्ध्याला जायचं आहे" कशासाठी विचारलं तर म्हणाला, "दाढी करायला"

"तुला या गावात नाही का दाढी करता येत?"

"सवर्ण न्हावी माझी दाढी करणार नाहीत आणि इथे कोणी हरिजन न्हावी नाही" त्यानं उत्तर दिलं.

"मग त्या न्हाव्याकडून मीदेखील दाढी करून घेणार नाही" गांधीजी म्हणाले. त्यांनी त्या न्हाव्याकडून सेवा घेणं बंद केलं. खेडोपाडी हिंडताना त्यांना वेळही मिळत नसे केस कापायला - दाढी करायला आणि न्हाव्याच्या दुकानाची गरज भासे.

खादीच्या प्रचारासाठी पदयात्रा चालू होती. तेव्हा त्यांना खादी वापरणारा न्हावी हवा होता. स्वयंसेवकांनी खूप धावपळ केली असा न्हावी शोधायला. गांधीजी म्हणाले, "आपल्या स्वदेशी कामामध्ये न्हावी आणि धोबी मंडळींना सामील करून घ्यायला पाहिजे. न्हावी मंडळी गप्पा चांगल्या मारतात. ते स्वदेशीचा संदेश संगळीकडे पसरवतील". ओरिसामध्ये एकदा गांधीजी न्हाव्याची वाट पहात होते. त्यांना एक महिला येताना

दिसली तिनं कानात मोठी मोठी कानातली घातली होती, नाकात नथ होती, गळ्यात हार होता, हातात लाखेच्या बांगड्या होत्या. गांधीजींनी विचारलं, “तुम्ही माझे केस कापणार आहात का?” तिनं हसून मान डोलावली आणि ती वस्त-याला धार लावू लागली. गांधीजींनी तिला विचारलं, “तुम्ही एवढे जड दागिने का घातले आहेत? ते तुम्हाला चांगले नाही दिसत. ते बेढब आहेत त्यात खूप मळ साचला आहे.” तिच्या डोळ्यात पाणी आलं. ती म्हणाली, “काय सांगू तुम्हाला? या खास प्रसंगासाठी मी ते उसने आणलेले आहेत. तुमच्यासारख्या देवमाणसापुढे मी चांगले दागिने न घालता आले तर ते बरं दिसलं असतं का?” गांधीजींच्या डोक्यावर आणि हनुवटीवर वस्तरा फिरवून झाल्यावर तिनं तिला मिळालेले पैसे गांधीजींच्या पायाशी ठेवले, नमस्कार केला आणि निघून गेली.

**

# भंगी

गांधीजींच्या वडिलांच्या घरी राजकोटला उका नावाचा एक झाडणारा होता. तो सफाई करायचा. गांधीजींनी कधी उकाला स्पर्श केला तर पुतळीबाई त्यांना लगेच अंघोळ करायला लावत. एरवी स्वभावानं गरीब, आज्ञाधारक असणा-या मुलाला हे मुळीच आवडत नसे. ते १२ वर्षांचे असताना आईशी वाद घालत." उका आपल्याकडची घाण साफ करतो. त्याच्या स्पर्शानं मला कसा काय विटाळ होईल? मी तुझी आज्ञा पाळणार नाही असं नाही पण रामयण सांगतं की रामानं गुहक नावाच्या चांडाळाला आलिंगन दिलं होतं. रामायण आपल्याला काही चुकीचं सांगणार नाही." या वादाला पुतळीबाईंकडे उत्तर नसायचं.

गांधीजी दक्षिण आफ्रिकेत सफाईचं काम शिकले त्यांचे तिथले मित्र प्रेमानं त्यांना थोर सफाईकामगार म्हणत. तिथं तीन वर्ष राहिल्यानंतर ते भारतातून बायको आणि मुलांना घेऊन जाण्यासाठी आले होते. त्या काळात मुंबई प्रांतात प्लेगची साथ आली होती. राजकोटला ती पसरण्याची शक्यता होती. गांधीजींनी ताबडतोब राजकोट स्वच्छ करण्यासाठी काम करायचं ठरवलं. त्यांनी प्रत्येक घराची पाहणी केली आणि मो-या स्वच्छ ठेवण्यावर भर दिला. अंधारे, घाणेरडे, दुर्गंध येणारे, किड्यांनी भरलेले संडास पाहून त्यांना भयंकर वाटले. वरच्या वर्गातली काही घरं गटारांचा वापर करत आणि तिथे तर असह्य घाण होती. तिथं राहणारे लोक लक्ष देत नव्हते. गरीब अस्पृश्य लोक जास्त स्वच्छ घरांमध्ये राहत होते. त्यांना गांधीजींचं म्हणणं पटलं. गांधीजींनी सुचवलं की दोन वेगवेगळ्या बदल्या वापराव्यात एक मूत्रासाठी आणि दुसरी मलासाठी त्यामुळे स्वच्छता वाढली.



गांधी कुटुंब राजकोटमध्ये प्रसिद्ध होतं. गांधीजींचे वडील आणि आजोबा राजकोट आणि शेजारच्या इतर राज्यांचे दिवाण म्हणून काम पहात. ७० वर्षांपूर्वी दिवाणांचा बॅरिस्टर मुलगा घरोघरी जातो आहे आणि ड्रेनेजची पहाणी करतो आहे हे करायला फार मोठं धैर्य लागत असे. गांधीजींना या प्रकारचं नैतिक धैर्य कुठल्याही कामात कमी पडलं नाही. ते अनेक पा चात्य पद्धतीवर टीका करीत पण हेही वारंवार मान्य करत की सफाई ख-या अर्थानं ते पा चात्यांकडून शिकले. भारतात त्यांना त्या प्रकारच्या स्वच्छतेची लोकांना ओळख करून द्यायची होती.

गांधीजी दक्षिण आफ्रिकेतून तेव्हा दुस-यांदा भारतात आले. तेव्हा ते कलकत्त्याच्या काँग्रेसच्या शिबिराला उपस्थित राहिले. दक्षिण आफ्रिकेत भारतीयांना कशी वाईट वागणूक मिळते त्याबद्दल ते सांगायला आले होते. त्या काँग्रेस शिबिरात स्वच्छतागृहांची

व्यवस्था दयनीय होती. काही प्रतिनिधींनी तर, त्यांच्या खोलीसमोरच्या व्हरांड्यांचा उपयोग मुतारीसारखा केला होता. इतरांनी त्याला आक्षेप घेतला नाही पण गांधीजींनी ताबडतोब निषेध नोंदवला. स्वयंसेवकांशी ते सफाईबद्दल बोलले तेव्हा ते म्हणाले, “हे सफाई कामगारांचं काम आहे, आमचं नाही”. गांधीजींनी खराटा मागून घेतला आणि स्वतः सफाई केली. तेव्हा ते सुटाबुटात होते. स्वयंसेवक अवाक् झाले. पण कोणीही त्यांना मदत करायला पुढे झाला नाही. अनेक वर्षानंतर भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे गांधीजी मार्गदर्शक झाले तेव्हा स्वयंसेवकांनी एक भंगी पथक निर्माण करून शिबिरात काम केलं. एकदातर फक्त ब्राह्मणांनी भंगीकाम केलं. हरिपुरा काँग्रेसच्या अधिवेशनात दोन हजार शिक्षक आणि विद्यार्थ्यांना भंगीकामाचं प्रशिक्षण दिलं होतं. काही विशिष्ट लोकांनाच सफाई करायला लावायची आणि त्यांना अस्पृश्य म्हणायचं हे गांधीजींना मान्य नव्हतं. त्यांना भारतातून अस्पृश्यताच नाहीशी करायची होती.

दक्षिण आफ्रिकेत गोरे लोक भारतीयांना त्यांच्या अस्वच्छ सवयींबद्दल नावं ठेवत. गांधीजींनी त्यांची घर पाहिली आणि त्यांना घरं आणि परिसर स्वच्छ ठेवायला सांगितलं सार्वजनिक सभांमध्ये ते याविषयी बोलत आणि वृत्तपत्रातही लिहीत. डर्बनमधलं गांधीजीचं घर पा चात्य पद्धतीनं बांधलेलं होतं. न्हाणीघरातलं पाणी बाहेर जात नसे. कमोडस् वापरली जात. खोलीमध्ये विधीसाठी पात्र ठेवली जात. गांधीजींच्या बरोबर त्यांचे जे कारकून रहात त्यांची विधीपात्रं गांधीजी साफ करत असत. ते कस्तुरबांनासुद्धा ही सफाई करायला लावत. स्वतःच्या लहान मुलांनाही ते शिकवत एकदा एका खालच्या जातीच्या कारकुनाचं विधीपात्र साफ करताना कस्तुरबांनी तोंड वाकडं केलं तर गांधीजींनी त्यांना सांगितलं, “जातपात पाळायची असेल तर घराबाहेर व्हा.” एकदा साबरमती आश्रमात अस्पृश्य जोडप्याला प्रवेश दिला म्हणून गांधीजींच्या जवळच्या शुभचिंतकांनी त्यांच्यावर बहिष्कार टाकला होता.

एकदा दक्षिण आफ्रिकेतल्या तुरुंगात गांधीजींनी सांडपाण्याची चेंबर्स साफ केली. पुढल्या वेळी तुरुंगाच्या अधिका-यांनी त्यांना सफाई कामगाराचं काम दिलं.

वीस वर्षं दक्षिण आफ्रिकेत राहिल्यानंतर गांधीजी शेवटी ४६व्या वर्षी १९१५ या वर्षात त्यांच्या सहका-यांबरोबर भारतात कायमचे परत आले. त्या वर्षी हरिद्वारच्या कुंभमेळ्यात त्यांनी आणि त्यांच्या तरुण सहका-यांनी भंगीकाम केलं. त्याच वर्षात त्यांनी पुण्याला सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटीच्या घरांना भेट दिली. काही सभासदांनी एका सकाळी असं पाहिलं की, गांधीजी मो-या साफ करतायत. त्यांना ते आवडलं नाही. पण गांधीजींचा असा विश्वास होता की, अशा प्रकारचं काम स्वराज्यासाठी माणसाला लायक ठरवतं.

त्यांनी सबंध भारताचा एकदाच नाही तर अनेकदा प्रवास केला कुठेही गेले तरी त्यांना या ना त्या स्वरूपात अस्वच्छता दिसत असे. सार्वजनिक मुता-यांचा रेल्वे स्टेशनवरचा आणि धर्मशाळांमधला दुर्गंध आणि घाण भयानक असे. खेड्यापाड्यातून माणसं बैलगाड्या घेऊन यायची ते रस्तेही वाईट अवस्थेत असायचे. पवित्र कुंडातलं पाणी किती वाईट आहे हे न बघता लोक त्यात डुबक्या घेत. ते स्वतःच नदीकाठी अस्वच्छता पसरवत. काशी विश्वेश्वराच्या मंदिरातल्या संगमरवरी फरशीवर चांदीची नाणी जडवलेली असत त्यात प्रचंड घाण साठून राहत होती. मंदिराची बहुतेक प्रवेशद्वारं अरूंद घसरड्या रस्त्यांची होती. रेल्वेनं प्रवास करणारे लोक तर रेल्वेचे डबे इतके घाण करत की भारतात अगदी थोड्या लोकांना बूट घालणं परवडत असलं तरी अनवाणी चालण्याची कल्पनासुद्धा भारतात करता येत नसे. मुंबईसारख्या शहरात रस्त्यावरून चालणा-या लोकांना आसपासच्या इमारतीतून कोणीतरी अंगावर थुंकण्याचा धोका असे.

नगरपालिकांना उद्देशून गांधीजी म्हणत, “तुमच्या प्रशस्त रस्त्यांबद्दल मी तुमचं अभिनंदन करतो. तुमची दिव्यांची उत्तम व्यवस्था आणि तुमच्या सुंदर बागा यांबद्दलही अभिनंदन! पण सांडपाण्याची व्यवस्था नीट नसेल, रस्ते, गल्ल्या दिवसा आणि रात्रीही स्वच्छ ठेवल्या जात नसतील तर त्या नगरपालिकेला अस्तित्वात राहण्याचा अधिकार नाही. अनेक नगरपालिकांसमोर सांडपाण्याची अव्यवस्था हा सर्वात मोठा प्र न आहे. भंगी मंडळी कशा अवस्थेत राहतात याचा तुम्ही विचार तरी करता का?

लोकांना ते म्हणत, "तुम्ही स्वतः जोवर हातात झाडू आणि बादली घेत नाही तोवर तुमची गावं, शहरं स्वच्छ होणार नाहीत." ते शाळा पहायला जायचे तेव्हा शिक्षकांना म्हणत, "पुस्तकी शिक्षण देण्याबरोबरच मुलांना तुम्ही उत्तम स्वयंपाकी आणि उत्तम सफाई तज्ज्ञ बनवाल तर तुमची संस्था आदर्श करू शकाल" विद्यार्थ्यांना त्यांचा सल्ला असे, "तुम्ही स्वतःच तुमचे भंगी झालात तर तुम्ही तुमचा परिसर स्वच्छ ठेवाल. व्हिक्टोरिया क्रॉस मिळवण्यापेक्षाही चांगला भंगी व्हायला जास्त धैर्य लागतं."

आश्रमाजवळ राहणारे खेडूत आपल्या मैल्यावर माती टाकायला नकार देत. ते म्हणत, "हे भंग्यांचं काम आहे. मैल्याकडे पाहणंही पाप आहे तर त्यावर माती टाकणं हे जास्तच पाप होईल" गांधीजी खेड्यांमधल्या सफाईकामावर स्वतः देखरेख करत. त्यांना उदाहरण घालून देण्यासाठी ते काही महिने स्वतः हातात झाडू-बादली घेऊन जात. मित्र आणि पाहुणे त्यांच्याबरोबर जात. ते बादल्या भरून कचरा, मैला गोळा करत आणि तो खड्ड्यांमध्ये पुरून टाकत.

आश्रमातही सर्व सफाईचं काम आश्रमवासीच करत. गांधीजी त्यांना मार्गदर्शन करत. वेगवेगळ्या धर्मांची, वंशांची, रंगांची माणसं तिथे राहत. आश्रमाच्या परिसरात कुठेही कचरा दिसत नसे. सगळा कचरा खड्ड्यांमध्ये पुरला जाई. भाज्यांची देठं, सालं आणि वाया गेलेलं अन्न खताच्या खड्ड्यांमध्ये जाई. मैल्यामधूनही सोनखत तयार केलं जाई.

सांडपाण्याचा उपयोग बागेसाठी होत असे. बांधलेली ड्रेनेज व्यवस्था नसूनही आश्रमात माशा नसत. दुर्गंधी नसे. गांधीजी स्वतः आणि त्यांचे सहकारी आळीपाळीनं सफाई करत. त्यांनी बादली-मुता-या आणि खड्ड्यांचे संडास वापरणं सुरू केलं. आश्रमात येणा-या सर्व पाहुण्यांना ते हे नवे शोध मोठ्या अभिमानानं दाखवत. गरीब असोत वा श्रीमंत, नेते असोत वा अनुयायी, भारतीय, परदेशी सर्वांना ही स्वच्छतागृहं वापरावी लागतं. या प्रयोगामुळे हळूहळू भंगीकामाविषयीचा तिरस्कार आश्रमवासियांच्या मनातून निघून गेला.

गांधीजींना जेव्हा केव्हा सफाईचं काम करायची संधी मिळत असे, तेव्हा त्यांना फार आनंद होत असे. संडास किती स्वच्छ आहेत यावरून लोकांच्या स्वच्छतेची समज लक्षात येत असे ते म्हणत, शहात्तराव्या वर्षी मोठ्या अभिमानानं ते म्हणत, "माझा संडास इतका स्वच्छ असतो की त्यात तुम्हाला एकही डाग दिसणार नाही आणि कसलीही दुर्गंधी येणार नाही. मी स्वतः माझा संडास साफ करतो." ब-याच वेळा ते स्वतःचं वर्णन भंगी असं करत आणि सफाईकामगार म्हणून मरण आलं तरी ते समाधानानं जातील असंही म्हणत. कर्मठ हिंदूंना ते म्हणत की अस्पृश्यांबरोबरच माझ्यावरही सामाजिक बहिष्कार घाला.

ते भंग्यांच्या वस्तीत जात असत आणि भंगी आपल्या कहाण्या त्यांना सांगत. गांधीजी म्हणत सफाईचं काम करण्यात काही कमीपणा नाही. ते त्यांना दारू पिणं, मांसाहार करणं सोडून द्यायला सांगत. त्यांनी सफाईकामगारांच्या संपाला कधीही पाठिंबा दिला नाही. भंग्यांनी आपलं काम एक दिवसही बंद ठेवता कामा नये असा त्यांचा आग्रह होता.

हरिजन पत्रिकेत त्यांनी आदर्श भंगी कसा असावा याबद्दल लिहिलं होतं. "संडास योग्य प्रकारे बांधण्याचं तंत्र त्याला अवगत हवं आणि नेमकी सफाईची तंत्रंही माहीत हवीत. मैल्याची दुर्गंधी कशी नष्ट करायची, काय प्रकारची जंतुनाशकं कशी वापरली की रोगराई पसरणार नाही हेही त्याला माहीत हवं. त्याचप्रमाणे मल-मूत्रापासून खत कसं तयार करायचं हेही त्याला माहीत हवं." सफाईकाम जबरदस्तीनं कुणाच्यातरी गळ्यात घालायचं यापेक्षा गांधीजींना ते न टाळता येण्याजोगं समाजकार्य या पातळीवर न्यायचं होतं.

खादी यात्रेच्या दरम्यान गांधीजींचं एका सार्वजनिक सभेत भाषण होणार होतं. त्यात सफाईकामगारांना जायला बंदी होती. गांधीजींना हे समजलं तेव्हा ते आयोजकांना म्हणाले, "तुम्ही तुमची भाषणं आणि पैसे तुमच्याकडेच ठेवा. मी फक्त अस्पृश्यांचीच सभा घेणार आहे. ज्यांना यायचं असेल त्यांनी त्या सभेत या."

मृत्यूपूर्वी दोन वर्षं गांधीजी काही दिवस मुंबई आणि दिल्लीतल्या सफाई कामगारांच्या वस्तीत राहिले होते. त्यांना त्यांच्या घरात राहायचं होतं आणि त्यांचं जेवण जेवायचं होतं पण त्या गोष्टी करायला त्याचं वय फार होतं. नाही म्हटलं तरी त्या लोकांनी गांधीजींची खास व्यवस्था केलीच.

गांधीजी एकदा सिमल्याला व्हॉइसरॉयना भेटायला गेले. एका सहकारी पुढा-याला तिथली भंगी वस्ती पहायला पाठवलं. जनावरांना राहायलाही ही वस्ती योग्य नाही असं जेव्हा त्यांना सांगितलं गेलं तेव्हा दुःखानं ते म्हणाले, "आज आपण भंगी बांधवांना पशूच्या पातळीवर नेलं आहे. त्यांना स्वतःची मानवी प्रतिष्ठा विकून, आत्मसन्मान विकून काही पैसे मिळवावे लागतात. भंगी माणूस त्याचं जेवण कसं जेवतो बघा. कच-यातच बसून, एखाद्या संडासाच्या भिंतीला सावलीत बसून तो जेवतो. एखाद्याला खच्ची करायला ही एकच गोष्ट पुरेशी आहे. भंगी मैल्याची टोपली डोक्यावरून घेऊन चाललाय, हे दृश्यच त्यांना वैताग आणायचं. योग्य ती अवजारं वापरून किती व्यवस्थित भंगीकाम करता येतं ते गांधीजी दाखवत. ती एक कलाच होती आणि ते स्वतः ती नीटसपणे करत, स्वतः अस्वच्छ न होता!

एकदा एका परदेशी माणसानं गांधीजींना विचारलं, "तुम्हाला जर भारताचा एक दिवसापुरता व्हाइसरॉय केलं तर तुम्ही काय कराल?"

गांधीजी म्हणाले, "व्हाइसरॉयच्या घराजवळची भंगीवस्ती मी साफ करीन."

"आणखी एक दिवस तुम्हाला दिला तर?"

"तेच काम मी दुस-या दिवशीही करीन".

❋❋

## चांभार

६३ व्या वर्षी गांधीजींना येरवड्याच्या तुरुंगात ठेवलं होतं. बरोबर वल्लभभाई पटेल होते. वल्लभभाईंना सँडल्स करून हवे होते पण तुरुंगात त्या वर्षी कुणी चांगला चांभार नव्हता. गांधीजी म्हणाले, "मला चांगलं चामडं आणून द्या मी तुमच्यासाठी सँडल्स बनवतो. खूप वर्षांपूर्वी शिकलेली कला माझ्या हातात अजून आहे का बघूया. मी फार चांगला चांभार होतो. सोदेपूरच्या खादी प्रतिष्ठानच्या वस्तुसंग्रहालयात माझ्या कारागिरीचा नमुना पहायला मिळेल. मी खरं तर ते सँडल्स '–' यांच्यासाठी पाठवले होते. ते म्हणाले हे मी पायात कसे घालू? हे तर डोक्यावर ठेवायला हवेत. "टॉलस्टॉय फार्मवर मी असे बरेच बनवले होते."

१९११ मध्ये गांधीजीनी त्यांच्या भाच्याला लिहिलं - "सध्या मी सँडल्स तयार करण्यात गुंतलो आहे. मला हे काम आवडतं आहे आणि ते येथं आवश्यकही आहे. मी आजवर १५ जोड बनवले आहेत. तुला जेव्हा नवीन सँडल्स हवे असतील तेव्हा मला पायाचं माप पाठव."

ही कला ते दक्षिण आफ्रिकेत असताना शिकले. त्यांचे जर्मन मित्र कालेनबाख यांच्याकडून गांधीजींनी इतरांनाही पादत्राणं बनवायला शिकवलं आणि शिष्यांनी त्यांच्या गुरूंपेक्षाही चांगली पादत्राणं बनवली. त्यांची पादत्राणं फार्मच्या बाहेर विकली जात.

त्या दिवसात गांधीजींनी पायजम्या बरोबर सँडल्स वापरण्याची पद्धत सुरू केली होती. उष्ण प्रदेशात बंद बुटांपेक्षा सँडल्स जास्त आरामशीर वाटतात आणि थंडीत त्यात आतून मोजेपण घालता येतात.

सरदार पटेल, जवाहरलाल आणि इतर काही मंडळी एकदा गांधीजींचा काही सल्ला घ्यायला सेवाग्रामला गेली होती. गांधीजी प्रशिक्षणार्थींच्या एका गटाला सूचना देत होते. "सँडल्सचे पट्टे इथे असले पाहिजेत आणि टाके असे इथे घालायचे, आणि तळाशी जिथे पायाचा जास्त दाब पडतो तिथे चामड्याचे तुकडे तिरके लावायचे" गांधीजींच्या मार्गदर्शनानं चुका दुरूस्त होत होत्या. एक पुढारी म्हणाले, "पण ते आपला वेळ वाया घालवताहेत" गांधीजी म्हणाले, "त्यांच्या शिकण्यावर राग काढू नका. तुम्हाला वाटलं तर तुम्हीही पहा चांगले सँडल्स कसे तयार होतात ते."

एकदा गांधीजींनी आणि त्यांच्या सहका-यांनी खेड्यातल्या चांभारांना मेलेला बैल कापताना पाहिलं. त्यांनी त्यांच्या गावठी सुरीनं मेलेला बैल व्यवस्थित कापला. त्यांचं कौशल्य गांधीजींवर प्रभाव टाकून गेलं. त्यांना कुणीतरी सांगितलं की शल्यविशारदसुद्धा हे काम इतकं नीटसपणे करू शकणार नाही. गांधीजी म्हणत प्रत्येक वैद्यकीय शाखेचा विद्यार्थी हा चांभारच असतो. पण डॉक्टराच्या कामाला समाजात मान आहे पण सफाई करणारा किंवा चांभार कमी दर्जाचा मानला जातो. हिंदूंना ते अस्पृश्य वाटतात.

गांधीजींना नुसते जोडे शिवून समाधान वाटलं नाही त्यांना चांगला चांभार व्हायचं होतं. जगभरचे लोक पायात जोडे वापरतात. ते कातडं धट्ट्याकट्ट्या जनावरांना मारून मिळवलं जातं, गाई, बैल, मेंढ्या, बकरे मारले जातात. गांधीजींना पशुहत्त्या मान्य नव्हती. आपल्या पत्नी किंवा मुलगा यांच्या आजारपणात त्यांना गाईच्या मांसाचं सार किंवा अंडी देण्याला नकार देणारे गांधीजी जोड्यांसाठी प्राणी मारणं मान्य करतील हे शक्यच नव्हतं. पण त्यांना चामड्याची गरज भासत होती.

नैसर्गिकपणे मृत्यू पावलेल्या प्राण्यांचंच कातडं वापरायचं असं त्यांनी ठरवलं. अशा प्रकारे तयार झालेले बूट, सँडल्स अहिंसक चप्पल म्हणून ओळखले जात. प्राणी मारून त्याचं कातडं वापरणं सोपं होतं आणि कातडी कमावणारे लोक अहिसंक कातडं पुरवत नसत....... त्यामुळे गांधींना कातडं कमावण्याची कला शिकावी लागली.

त्यांच्या असं लक्षात आलं की नऊ कोटी रुपयांची बिनकमावलेली कातडी दरवर्षी निर्यात होतात. शास्त्रोक्त पद्धतीनं ती कातडी कमावून कोट्यवधी रुपयांच्या त्यांच्या वस्तू परदेशातून भारतात येतात. यात नुसतं पैशांचं नुकसान नव्हतं तर संधीचं होतं. कातडी कमावण्याचं आपलं कौशल्य वापरण्याची आणि चामड्याच्या चांगल्या वस्तू तयार करण्याची संधी आपण गमावत होतो. सूत तयार करणारे, विणकर जसे बेकार झाले होते तसेच शेकडो कातडी कमावणारे आणि चांभार उपजीविका घालवून बसले होते. कातडी कमावण्याचा व्यवसाय हलका कधीपासून मानला जाऊ लागला ते गांधींना कळेना. पूर्वीच्या काळी असं नसावं पण आज मात्र लक्षावधी माणसं कातडं कमावण्याचा उद्योग करतात आणि त्यांना पिढ्यान् पिढ्या अस्पृश्य मानलं जातं. उच्चवर्गीय लोक त्यांना दूर ठेवतात आणि त्यांना कलाहीन, शिक्षणहीन, अस्वच्छ आणि लाजिरवाणं जीवन जगावं लागतं. खरं तर कातडी कमावणारे, सफाईकाम करणारे, पादत्राणं बनवणारे लोक समाजाची सेवा करतात, उपयोगी काम करतात तरीही जाती पाती पाळण्यामुळे देशाच्या एका हिश्शाला लाजिरवाणं जीवन जगावं लागतं. इतर देशात एखाद्यानं कातडी कमावणं, पादत्राणं करणं हा व्यवसाय म्हणून निवडला तर त्याला अस्पृश्य समजत नाहीत.

हा ग्रामीण उद्योग पुन्हा जिवंत करण्यासाठी गांधीजींनी जनतेला आवाहनं केली. कातडी कमावण्यासाठी रसायनं पुरवणा-यांकडून ही कला जिवंत ठेवण्यासाठी मदत मिळवली. कातडं कमावण्याच्या सुधारित पद्धतीमुळे गोमांस खाणंही बंद होईल असं गांधीजींना वाटे. जेव्हा मेलेली गाय ढोराच्या घरी आणली जाई. तेव्हा सबंध कुटुंबाला आनंद होई. मेलेल्या जनावराच्या मांसाची मेजवानी असा त्याचा अर्थ असे. मुलं त्या जनावराभोवती नाचत. आणि जेव्हा त्याचे तुकडे करत तेव्हा मुलं हाडं आणि मांसाचे तुकडे एकमेकांवर टाकत. गांधीजींना या दृश्याचा उबग येई.

अस्पृश्य ढोरांना गांधीजी विचारत, "तुम्ही हे मृत मांस खाणं सोडून नाही का देणार? ते तुम्ही सोडलं नाहीत तर मी तुम्हाला अस्पृश्य मानलं नाही तरी जुन्या



विचारांचे लोक तुम्हाला टाळतील. ती वाईट घाणेरडी सवय आहे." ते म्हणत, "आम्ही मेलेल्या जनावराला फाडायचं, कातडी काढायची, तर मांस खायचं नाही हे शक्य नाही." गांधीजी वाद घालत, "का बरं? मी तुमच्यासारखं काम करताना तुम्हाला दिसेन पण मी मृत मांस खाणार नाही. माझ्या पूर्वीच्या अनुभवावरून मी सांगतो की, भंगीकाम आणि कातडं कमावण्याचं काम अतिशय स्वच्छ आणि निरोगी पद्धतीनं करता येतं."

साबरमती आणि वर्ध्याच्या आश्रमात गांधीजींनी कातडं कमावण्याचा विभाग सुरू केला. त्याची सुरुवात छोट्या प्रमाणात होती. पण नंतर कातडी साठवून ठेवण्यासाठी पक्की इमारत बांधली. गांधीजींनी इमारतीसाठी ५०,००० रु. मिळवले तिथे आश्रमातली मुलं तज्ज्ञ चांभारांच्या मदतीनं कातडी कमावण्याचं काम करीत. तिथे बनवलेल्या चामड्याच्या वस्तूंची खुल्या बाजारात विक्री होई. सर्व काम मृत जनावरांच्या कातड्यांपासून होई.

गांधीजींनी कलकत्त्याच्या चामड्याच्या राष्ट्रीय कारखान्याला भेट दिली. क्रोम लेदर बनवण्याची सगळी प्रक्रिया बारकाईनं पाहिली.

त्यांनी तिथे खारवलेल्या कातड्यांना केस निघून येण्यासाठी चुना कसा लावतात ते पाहिलं. रंग कसा लावतात तेही पाहिलं. रवीन्द्रनाथ टागोरांच्या शांतिनिकेतनात चामड्याच्या संदर्भात बरंच संशोधन होई. तेही गांधीजी समजून घेत. ग्रामीण लोकांची पूर्वापार चालत आलेली कातडी कमावण्याची कला गांधीजींना हरवून जायला नको होती. तसंच ही कला खेड्यांकडून शहरांकडे जायला नको होती. कारण त्यात ग्रामीण लोक उध्वस्त होणार होते. त्यांचे हात आणि डोकं कौशल्यानं वापरण्याची संधी ते गमावणार होते. मेलेलं जनावर खेडेगावातून एका जागेपासून दुसरीकडे नेण्यासाठी ते काही चांगला मार्ग शोधत होते. ढोर लोकं ते ओढत नेत त्यामुळे कातड्याला इजा होत असे. त्यामुळे कातड्याची किंमत कमी होत असे. त्यांना हाडांचा उपयोग कसा करावा ते माहीत नसे त्यामुळे ते ती कुत्र्यांना घालत. हाडांपासून बनवलेल्या कपाटांच्या मुठी आणि बटणं परदेशातून भारतात येत. हाडांची पूड हे चांगलं खत असतं.

गांधीजी चांभारांच्या झोपड्यांतून गेले. त्यांच्याशी मिळून मिसळून राहिले, बोलले. त्यांनीही गांधीजींवर विश्वास टाकला आणि आपलं भविष्य बदलण्याचा निर्धार करून आलेला मित्र म्हणून त्यांच्याकडे पाहिलं. त्यांच्या वस्तीत गांधीजी गेले तेव्हा त्यांनी पिण्याचं पाणी नाही म्हणून तक्रार केली. सार्वजनिक विहिरीवर त्यांना पाणी भरायला बंदी होती. देवळात जाण्यास मनाई होती. लोकं त्यांना टाळत आणि गावाबाहेरच्या वस्तीत त्यांना रहावं लागे. गांधीजींना या सगळ्याचं फार दुःख झालं, लाजही वाटली. त्यांना मदत करून त्यांना उपकृत करण्यावर गांधीजींचा विश्वास नव्हता. त्यांनी स्वतःच्या पायावर उभं रहावं अशी त्यांची इच्छा होती. त्यांनी टागोरांजवळ भविष्यवाणी वर्तवली की जेव्हा शारीरिक श्रमांकडे माणसं तुच्छतेनं पाहू लागली तेव्हा भारताचा काळा दिवस उगवला आणि असाही दिवस उगवेल की जेव्हा आपल्याच बांधवांना मानवी अधिकार ज्यांनी नाकारले त्यांना या अन्याय्य आणि निर्दय कृत्यांचा जाब द्यावा लागेल.

ढोर मंडळींना कामाचा योग्य मोबदला मिळावा, खरं शिक्षण मिळावं, वैद्यकीय मदत मिळावी यासाठी समर्पित कार्यकर्त्यांची एक फळी निर्माण व्हावी असं गांधीजींना वाटत होतं. त्यांनी रात्रशाळा चालवाव्यात, हरिजन मुलांना सहलींना घेऊन जावं त्यांना वेगवेगळी ठिकाणं दाखवावीत. त्यांनी स्वतः चांभार वस्तीत रात्रशाळा उघडल्या आणि हरिजनांसाठी काम करण्यावर लक्ष केंद्रित केलं.

चर्मकारांनीही या कामाला प्रतिसाद दिला आणि केवळ मृत जनावरांचीच कातडी वापरण्याचं आश्वासन दिलं. काहींनी दारू पिणं आणि मृत मांस खाणं सोडून देण्याचं कबूल केलं. गांधीजी एकदा चांभारांच्या सभेला गेले तेव्हा त्यांच्या पायात फाटक्या चपला होत्या. ते दौ-यावर होते आणि जास्तीचा सँडल्सचा जोड बरोबर नव्हता. चांभारांच्या हे लक्षात आलं आणि त्यातल्या दोघांनी अहिंसक चपलेचा एक जोड केला आणि त्यांना भेट म्हणून दिला.

गांधीजींनी एकदा दक्षिण आफ्रिकेत असताना, त्यांना तुरुंगात घालणा-या जनरल स्मटस्‌ना हातानी बनवलेल्या सँडल्स भेट म्हणून दिल्या होत्या. गांधीजींच्या ७० व्या वाढदिवशी जनरल स्मटस्‌नं लिहिलं, "तुरुंगात त्यांनी माझ्यासाठी सँडल्सची जोडी बनवली. मी अनेक उन्हाळ्यांमध्ये ती वापरली तरी या थोर माणसाच्या चपला वापरण्याची माझी योग्यता नाही अशी माझी भावना आहे"

***

## नोकर

आश्रमात गांधीजी नोकर-चाकरांनी करायची अनेक कामं करत. त्यापूर्वी जेव्हा ॲटर्नी म्हणून ते हजारो रुपये मिळवत तेव्हा रोज सकाळी ते नियमितपणे गहू दळत. कस्तुरबा आणि मुलंही त्यांना मदत करत त्यामुळे त्यांना ताजी जाडसर कणिक मिळायची. कोंड्यासकट पूर्ण अन्नाच्या पोळ्या करता यायच्या. साबरमती आश्रमात गांधीजींनी हे काम चालू ठेवलं. जातं दुरूस्त करण्यात ते तासन् तास घालवत. एकदा कोणीतरी तक्रार केली की आश्रमात पुरेसं पीठ नाही तेव्हा गांधीजी ताबडतोब उठले आणि गहू दळायला त्यांनी हात लावला. दळण्यापूर्वी ते धान्य निवडत असत.

आश्रमाला भेट देणा-यांना नेहमी गांधीजी धोतर नेसून धान्य निवडत असताना दिसत. बाहेरच्या लोकांदेखत कोणतंही काम करायला त्यांना लाज वाटत नसे. एकदा स्वतःच्या इंग्रजीचा अभिमान असलेला एक कॉलेज कुमार गांधीजींना भेटायला आला. आणि म्हणाला, “बापू माझी काही मदत होण्यासारखी असेल तर सांगा.” त्याची अपेक्षा होती की, बापू त्याला काही लिखापढीचं काम देतील. गांधीजींच्या ते लक्षात आलं आणि ते म्हणाले, “बरं, आता तुला थोडा वेळ काढता येत असेल तर हे ताटभर गहू निवडून दे” त्याची पंचाईत झाली. एक तासभर गहू निवडल्यावर त्याची दमछाक झाली आणि थकलेल्या आवाजात त्यानं गांधीजींचा निरोप घेतला.


काही वर्षं गांधीजींनी आश्रमात कोठीदाराच्या मदतनीसाचं काम केलं. सकाळच्या प्रार्थनेनंतर ते स्वयंपाकघरात भाज्या चिरायला जात असत. त्यांना जर कुठे कचरा किंवा जळमटं दिसली तर सहका-यांना ते फैलावर घेत. भाज्या, फळं, धान्य यांचं

आहारमूल्य त्यांना चांगलं माहीत होतं. एकदा एका आश्रमवासियानं बटाटे न धुताच कापले. गांधीजींनी त्याला समजावून सांगितलं की, बटाटे किंवा लिंबं कापण्यापूर्वी का धुतली पाहिजेत. एकदा एक सहकारी नाराज झाला कारण त्याला काळे डाग पडलेली केळी दिली होती. गांधीजी म्हणाले त्यांनी मुद्दामच ती केळी त्याला दिली कारण त्याच्या पचनशक्तीला ती पिकलेली केळीच योग्य होती. गांधीजी स्वतः जेवणाचं वाटप करत त्यामुळे त्यांना कधी अन्नाबद्दल तक्रार करायला संधी मिळत नसे. दक्षिण आफ्रिकेतल्या तुरुंगात ते शेकडो कैद्यांना दररोज दोनदा जेवण वाढण्याचं काम करत.

आश्रमातला एक नियम असा होता की, प्रत्येकानं आपापली भांडी स्वच्छ करायची. स्वयंपाकाची भांडी लोक आळीपाळीनं गट करून घासत. एकदा गांधीजींनी स्वयंपाकाची मोठी भांडी घासायला घेतली. हाताला राख लावून गांधीजी एक पातेलं घासत होते. कस्तुरबा तिथे आल्या आणि त्यांना तिथून उठवत म्हणाल्या, "हे तुमचं काम नाही. इथे खूप लोकं आहे हे करायला" गांधीजी तेव्हा उठले आणि त्यांना ते काम दिलं. घासायला घेतलेलं भांडं चकाकू लागेपर्यंत त्यांचं समाधान व्हायचं नाही. तुरुंगात एका कैद्यानं घासलेली भांडी त्यांना पसंत पडली नाहीत. तेव्हा त्यांनी लोखंडाची भांडी घासून कशी चांदीसारखी चमकतात त्याचं प्रात्यक्षिकच दाखवलं.

आश्रमाचं बांधकाम चालू होतं तेव्हा काही पाहुण्यांना तंबूत झोपावं लागलं. एकाला आपलं अंथरूण कुठे ठेवायचं माहीत नव्हतं त्यामुळे त्यानं ते गुंडाळून ठेवलं आणि तो चौकशीला गेला. तो परत आला तर गांधीजी खांद्यावरून त्याची वळकटी घेऊन चालले होते.

आश्रमापासून थोड्या लांबच्या विहिरीवरून पाणी आणणं हे रोजचं काम होतं. एकदा गांधीजींना बरं नव्हतं आणि तरी त्यांनी दळणाचं काम केलेलं होतं. एका सहका-याला असं वाटलं की आता गांधीजींनी जास्त काही कष्टाचं काम करू नये आणि त्यानं सगळी लहान मोठी भांडी भरून टाकली. गांधीजींना हे आवडलं नाही, त्यांना वाईट वाटलं आणि त्यांनी एक लहान मुलाचा टब उचलला आणि त्यात पाणी



भरून डोक्यावरून घेऊन आले. त्या सहका-याला प चात्ताप झाला. शारीरिकदृष्ट्या अगदीच अशक्य असल्याशिवाय गांधीजींना केवळ आपण महात्मा आहोत म्हणून किंवा वयस्कर आहोत म्हणून कोणतंही रोजचं काम टाळलेलं आवडायचं नाही. कुठलंही काम करण्याची विलक्षण शक्ती आणि इच्छाशक्ती त्यांच्यापाशी होती. थकवा त्यांना माहीतच नव्हता. कित्येक दिवस त्यांनी २४-२५ मैल स्ट्रेचरवरून माणसं वाहण्याचं काम केलं. ते खूप चालत असत. टॉलस्टॉय फार्मवरून ते रोज ४२ मैल चालायचे.

बरोबर घरी केलेली न्याहारी घेऊन ते पहाटे दोन वाजता चालायला सुरुवात करत, खरेद्या करत आणि संध्याकाळी परत येत. इतर मित्रमंडळी आणि तरूण सहकारी त्यांच्या त्या उदाहरणाचं आनंदानं अनुकरण करत.

एकदा काही कामगार लोक तलावाचं काम करत होते. एका सकाळी ते कामानंतर त्यांची फावडी, खोरी, घमेली घेऊन परत आले तर त्यांच्यासाठी गांधीजींनी फळांच्या नाश्त्याच्या ब-याच ताटल्या भरून तयार ठेवलेल्या होत्या. एकानं विचारलं, ''तुम्ही आमच्यासाठी एवढा त्रास का घेतलात? आम्ही तुमच्याकडून ही सेवा घेण्याच्या पात्रतेचे तरी आहोत का?" गांधीजी हसत म्हणाले, "अर्थात! मला माहीत होतं की तुम्ही थकून परत याल – मला तुमची न्याहरी तयार करायला बराच वेळ होता."

भारतीयांचे प्रसिद्ध नेते म्हणून दक्षिण आफ्रिकेतून एकदा गांधीजी लंडनला गेले. एका भारतीय माणसाचं काही काम होतं. काही भारतीय विद्यार्थ्यांनी तिथे त्यांना जेवायला बोलावलं. आणि स्वतः स्वयंपाक करायचं ठरवलं. दुपारी दोन वाजता एका सडसडीत माणसानं येऊन त्यांना भांडी घासायला, भाज्या स्वच्छ करायला आणि इतर अनेक कामात मदत केली नंतर त्या विद्यार्थ्यांचे पुढारी तिथे आले तर त्यांना असं आढळलं की हा माणूस म्हणजे दुसरं कोणी नसून त्यांचे संध्याकाळचे सन्माननीय पाहुणे होते!

गांधीजींना आपल्यासाठी इतरांना कामाला लावणं पसंत नव्हतं. राजकीय अधिवेशनांनंतर ते अनेकदा झोपण्यापूर्वी रात्री १० वाजता झाडून काढताना दिसायचे. कोणीतरी अनुयायी धावत जाऊन त्यांना मदत करायचा आणि ते हसून दूर व्हायचे. ग्रामीण भागातल्या दौ-यांमध्ये दिव्यातलं तेल संपलं तर कोणातरी थकलेल्या सहका-याला उठवण्यापेक्षा ते चंद्रप्रकाशात पत्र लिहीत बसायचे. नोआखलीच्या पदयात्रेत गांधीजींनी फक्त दोन सहका-यांना त्यांच्याबरोबर राहण्याची परवानगी दिली. त्यांना खाकरा कसा करतात माहीत नव्हतं. गांधीजी स्वयंपाकघरात गेले आणि एखाद्या तयार स्वयंपाक्यासारखं बसून खाकरा करून दाखवला. ते तेव्हा ७८ वर्षाचे होते.

त्यांना मुलं फार आवडत. जन्मानंतर पहिले दोन महिने त्यांनी स्वतःच्या मुलांना कधी इतर कुणा नर्सच्या हाती सोपवलं नाही. पालकांचं प्रेम आणि लक्ष मुलांच्या विकासात फार महत्त्वाचं आहे असं त्यांना वाटे. एखाद्या आईसारखं ते लहान बाळाचं करत, जेवू घालत आणि त्याला हसवत. दक्षिण आफ्रिकेत तुरुंगातून सुटून ते घरी आले तेव्हा त्यांच्या मित्राची पत्नी श्रीमती पोलक त्यांना खूप बारीक आणि अशक्त झालेल्या दिसल्या. त्या तेव्हा त्यांच्या बाळाला अंगावरून सोडवत होत्या. बाळ त्यांना विश्रांती घेऊ देत नसे की झोपू देत नसे. सारखं रडायचं. त्याच रात्री गांधीजींनी बाळाला त्यांच्याकडे घेतलं. ते दिवसभर कामात असत. सभांमध्ये भाषणं करत. चार चार मैल चालून रात्री १ ला घरी येत. मग त्या बाळाला जवळ घेत आणि स्वतःजवळ झोपवत. बाळाला तहान लागली तर म्हणून पाण्याचा तांब्या जवळ ठेवत पण त्याची कधी जरूर लागली नाही. बाळ त्यांच्यापाशी कधी रडलं नाही आणि शांतपणे झोपलं. पंधरा दिवसानंतर ते बाळ आईपासून पूर्णपणे सुटलं आणि हा प्रयोग यशस्वी झाला.

आश्रमात जेव्हा कुणा माणसाच्या मदतीची गरज लागे तेव्हा त्यांचा आग्रह हरिजन माणूस नेमण्यासाठी असे. अस्पृश्यता नष्ट व्हावी हा त्याच्यामागे हेतू होता. ते सांगत "नोकरमाणसांना आपण पैसे देऊन नुसतं राबवून घेता कामा नये तर त्यांना स्वतःच्या भाऊ-बहिणींप्रमाणे वागवायला हवं. काही त्रास होईल, काही चो-या होतील, खर्च वाढेल तरी हा प्रयोग वाया जाणार नाही."

त्यांना स्वतःसाठी नोकर ठेवणं कधीच माहीत नव्हतं पण भारतीय तुरुंगात एकदा बरोबरच्या कैद्यांनी त्यांची बरीच सेवा केली. एकानं त्यांच्यासाठी फळं धुऊन आणली. एकानं बकरीचं दूध काढलं. एकजण त्यांचा स्वतःचा मदतनीस झाला. चौथ्यानं त्यांचा पायखाना साफ केला. एका ब्राह्मणानं त्यांची भांडी घासली तर दोन युरोपियन कैदी रोज त्यांचा पलंग बाहेर आणत.

ब्रिटिश माणसं आणि देशी नोकर यांच्यात कौटुंबिक नाती निर्माण झाल्याचं पाहून गांधीजींना फार आनंद व्हायचा. एकदा एका यजमानानं आपल्या नोकराची ओळख

नोकर म्हणून करून न देता आपला कुटुंबीय म्हणून करून दिली तेव्हा गांधीजींना फार समाधान वाटलं होतं.

एकदा खूप वर्षं काम केलेल्या एका नोकराला निरोप देताना गांधीजी म्हणाले, "मला तुझ्याबद्दल किती कृतज्ञता वाटते आहे ते मला सांगता येत नाही. मी माझ्या आयुष्यात कोणालाच नोकर मानलं नाही. पण भाऊ-बहिण मानलं. तूही मला तसाच आहेस. तुझ्या सेवेची परतफेड करणं मला शक्य नाही पण परमेश्वर ते काम मोठ्या प्रमाणात करेल".

**

# स्वयंपाकी

महादेवभाई देसाईंनी एकदा गांधीजींना विचारलं, "बापूजी, फीनिक्स आश्रमात राहायला लागण्यापूर्वी तुमच्याकडे स्वयंपाकी होता का?" गांधीजी म्हणाले, "नाही. मी केव्हाच त्याला सुट्टी देऊन टाकली होती तो चांगला स्वयंपाकी होता पण तो म्हणायला लागला की मसाले न वापरता त्याला नाही अन्न शिजवता येत. ताबडतोब मी त्याला रजेवर पाठवलं आणि त्यानंतर स्वयंपाकी कधीही ठेवला नाही" हा प्रसंग घडला तेव्हा गांधीजी जवळ जवळ ३५ वर्षांचे होते.

इंग्लंडमध्ये असताना १८व्या वर्षी त्यांनी प्रथम स्वयंपाक केला. ते पक्के शाकाहारी होते. शाकाहारी असण्याची तेव्हा इंग्लंडमध्ये नक्कीच फॅशन होती. त्यांना साधारणपणे पाव, लोणी, जॅम आणि उकडलेल्या भाज्या दिल्या जात. गांधीजींना सगळं बेचव लागायचं. आईनं केलेल्या चविष्ट मसालेदार पदार्थांची त्यांना सवय होती.

काही महिने शाकाहारी उपहारगृहात जेवण घेतल्यावर त्यांनी काटकसरीने रहायचं ठरवलं त्यांनी एक खोली भाड्यानं घेतली आणि एक स्टोव्ह आणला आणि स्वतःच नाश्ता आणि रात्रीचं जेवण बनवायला लागले. रोज साधारणपणे २० मिनिटात ते स्वयंपाक करीत आणि रोजचा अन्नावरचा खर्च १२ आण्यावर जाऊ नये याची काळजी घेत.

गांधीजींनी जेव्हा सॉल्टचं 'प्ली फॉर व्हेजिटेरियानिझम" वाचलं आणि लंडन व्हेजिटेरियन सोसायटीच्या संपर्कात आले तेव्हा त्यांनी आहारात बरेच बदल केले.

बॅरिस्टर झाल्यावर ते भारतात परत आले तेव्हा मुंबईत त्यांनी एक लहान घर भाड्यानं घेतलं आणि ब्राह्मण स्वयंपाकी ठेवला. ते स्वतः अर्धा स्वयंपाक करीत आणि



स्वयंपाक्याला इंग्लिश शाकाहारी पदार्थ शिकवत. नीट-नेटकेपणा आणि स्वच्छता यांच्याबद्दल त्यांचा जरा जास्तच आग्रह असे. स्वयंपाकघरात तर जास्तच. त्यांनी स्वयंपाक्यालाही त्याचे कपडे कसे धुवावेत हे शिकवलं आणि नियमितपणे अंघोळ करायलाही शिकवलं. दक्षिण आफ्रिकेत किंवा भारतात मात्र कधीही पगार देऊन स्वयंपाकी नेमले नव्हते. गांधीजींना असं वाटे की, एका जेवणात अनेक पदार्थ शिजवणं हा निव्वळ वेळेचा आणि श्रमांचा अपव्यय आहे. आश्रमात असलेल्या वेगवेगळ्या सभासदांच्या वेगवेगळ्या चवींचे चोचले पुरवणं त्यांना मान्य नव्हतं. त्यांनी सर्वांना साधा जेवणाचा बेत सुचवला. जेवण सार्वजनिक स्वयंपाकघरात शिजवलं जायचं.

गुंतागुंतीची आणि कठीण पाककला त्यांनी सोपी केली. त्यांच्या आश्रमात भात, भाकरी, कच्च्या कोशिंबिरी, मसाले न घालता उकडलेल्या भाज्या फळं आणि दूध

किंवा दही जेवायला असायचं. मिष्टान्न आणि दुधाच्या मिठाईच्या जागी ताजा गूळ आणि मध असायचा.

जस्ट यांचं रिटर्न टु नेचर हे पुस्तक वाचून गांधीजींची खात्री पटली की जिभेचे चोचले पुरवण्यासाठी कुणी खाऊ नये तर शरीर सुदृढ ठेवण्यासाठी खावं. गांधीजींनी आहाराचे प्रयोग करायला सुरुवात केली आणि तो त्यांचा आयुष्यभराचा छंद झाला. काही प्रयोगांमध्ये कच्च्या आहाराचा अंतर्भाव होता आणि काही प्रयोगांमुळे त्रासही झाला. ५ वर्षं ते फक्त फळांवर राहिले. एकदा चार महिने ते फक्त मोडाची कडधान्यं खाऊन राहिले आणि त्याबरोबर कच्चे पदार्थ खाल्ले त्यामुळे त्यांना अपचनाचा बराच त्रास झाला.

फीनिक्स आश्रमात त्यांनी शाळेच्या मुख्याध्यापक पदाची आणि त्याबरोबर प्रमुख आचाऱ्याची जबाबदारी घेतली. दक्षिण आफ्रिकेतल्या भारतीयांनी जेव्हा यूरोपियन लोकांसाठी मेजवानी आयोजित केली होती तेव्हा गांधीजींनी पदार्थ तयार करण्यात आणि वाढण्यातही भाग घेतला.

फीनिक्स आश्रमातून जेव्हा पहिली सत्याग्रहींची तुकडी निघणार होती. तेव्हा गांधीजींनी त्यांना जेवण दिलं होतं. त्यांनी मोठ्या प्रमाणावर पोळ्या केल्या होत्या, टोमॅटोची चटणी, भात, रस्सा आणि खजुराचा गोड पदार्थ केला होता. एकीकडे स्वयंपाक करण्यात हात गुंतलेले असताना दुसरीकडे ते सत्याग्रहाची पद्धत आणि तुरुंगातलं जीवन याबद्दल सांगत होते. तेव्हा सत्याग्रहींची संख्या २५०० झाली. गांधीजींनी पदयात्रेचं नेतेपद घेतलं आणि स्वयंपाकी म्हणूनही काम केलं. एक दिवस आमटी पातळ झाली तर दुसऱ्या दिवशी भात अर्धाकच्चा राहिला. लोकांची त्यांच्यावर एवढी श्रद्धा होती की त्यांचा स्वयंपाक सर्वांनी आनंदानं खाला. काहीही कुरकुर केली नाही. दक्षिण आफ्रिकेत तुरुंगात असताना देखील ते सहकाऱ्यांना स्वयंपाकात मदत करत.

गांधीजी पाककलेला शिक्षणातला महत्त्वाचा भाग मानत आणि टॉलस्टॉय फार्म वरच्या सर्व लहान मुलांना स्वयंपाक करता येतो याचा त्यांना अभिमान होता. दक्षिण

आफ्रिकेतून भारतात परत आल्यावर शांतिनिकेतनच्या विद्यार्थ्यांना त्यांनी ही दीक्षा दिली. सार्वजनिक स्वयंपाकघर चालवण्याच्या कल्पनेचं त्यांनी स्वागत केलं आणि आळीपाळीनं स्वयंपाक करायला सुरुवात केली. रविन्द्रनाथांना हा प्रयोग कितपत यशस्वी होईल याची शंका होती तरी त्यांनी प्रयोगाला आशीर्वाद दिला.

एकदा मद्रासमध्ये गांधीजींना एक विद्यार्थी वसतिगृह पाहून फार नवल वाटलं होतं. तिथल्या स्वयंपाकघरातून वेगवेगळ्या जातीच्या लोकांची जेवणाची सोय तर होतीच पण त्यांच्या विशिष्ट चवीचे मसाले वापरून सुंदर स्वयंपाक केला जात असे. एकदा बंगालमध्ये एका घरी असंख्य पदार्थ त्यांना जेवणात वाढले होते ते पाहून त्यांना फार अस्वस्थता आली. त्यानंतर त्यांनी एका दिवसात फक्त पाच पदार्थ खाण्याचं व्रत घेतलं. बिहारमधली वर्षानुवर्षांची अस्पृश्यतेची प्रथा मोडून काढली आणि चंपारण्याच्या खटल्यात मदत करणा-या सर्व वकिलांना एका जेवणघरात जेवायला लावलं. आरोग्य चांगलं ठेवणा-या आणि स्वच्छ स्वयंपाकावर त्यांचा भर होता जिभेचे चोचले पुरवण्या-या मसालेदार पदार्थांवर नव्हता.

गांधीजी कडुलिंबाच्या ताज्या पानांची चटणी करत. ती क्विनाइनसारखी कडू लागे. तेलाच्या घाणीवरून आणलेली पेंड आणि दही यांचं मिश्रण. चिंच-गुळाचं सरबत. बारीक ठेचलेले सोयाबीन कोणतेही मसाले न घालता. कोणत्याही हिरव्या पानांची कोशिंबीर. पोळ्यांचा चुरा करून त्याचं केलेलं पुडिंग, दलियाची खीर, गव्हाची कणिक भाजून केलेली कॉफी.

इंग्लंडला जाताना बोटीवरून गांधीजींनी त्यांच्या भाच्याला लिहिलं होतं – "केळ्याचं पीठ दोन भाग आणि एक भाग कणिक मिसळून आम्ही बिस्किटं केली. रोट्या केल्या." केक करण्याची पाककृती त्यांनी लिहून पाठवली. ती अशी होती – "थंड पाण्यात पीठ तीन तास भिजवून ठेवायचं. पिठात आधी तूप घालून चांगलं चोळून घ्यायचं आणि नंतर पाणी घालून चांगलं मळायचं."

त्यांना अनेक पदार्थ करता यायचे. केक, भात, आमटी, भाज्यांचं सूप, कोशिंबीर, संत्र्यांचा आणि संत्र्यांच्या सालीचा जॅम, यीस्ट किंवा बेकिंग पावडर न वापरता केलेला पाव, पोळ्या आणि पातळ खाकरे. त्यांनी आश्रमात पाव आणि बिस्किटं करायला सुरुवात करून दिली. सेवाग्राममध्ये एक विशेष प्रकारची भट्टी वापरत. त्यात शेकडो लोकांचा भात एकदम तयार होत असे. त्यात पाव होत असे आणि अगदी कमी खर्चात भाज्या उकडल्या जात.

त्यांच्या एका सहका-यानं एकदा म्हटलं होतं, "अलीकडेच कोणीतरी सांगितलं की, गवतात खूप जीवनसत्वं असतात. नशिबानं आश्रमात गांधीजी नव्हते तेव्हा हा शोध लागला. नाहीतर त्यांनी स्वयंपाकघर बंद केलं असतं आणि आम्हाला हिरवळीवर चरायला सोडलं असतं."

गांधीजी एकदा एक आदर्श निवासी शाळा पहायला गेले त्यांना तिथली स्वयंपाकघराची रचना आवडली नाही. आणि ते शिक्षकांना म्हणाले, "नुसतं पुस्तकी शिक्षण देण्यापेक्षा त्याबरोबर मुलांना उत्तम स्वयंपाक करता आला आणि सफाई करता आली तरच तुमची शाळा आदर्श शाळा होईल."

❊❊

## डॉक्टर

राजकोटच्या आल्फ्रेड हायस्कूल मधून गांधीजी मॅट्रिक झाले. जेव्हा त्यांच्या पालकांनी त्यांना कायदेशिक्षणासाठी इंग्लंडला पाठवायचं ठरवलं तेव्हा गांधीजींनी विचारलं, "मला वैद्यकीय शिक्षणासाठी नाही का पाठवता येणार?" त्यांच्या सर्वात मोठ्या भावानं याला आक्षेप घेतला कारण तिथे मृत शरीराचं विच्छेदन करावं लागेल आणि वैष्णवाला ते करणं निषिध आहे. गांधीजींच्या वडलांना करमचंदांना ते कधीच आवडलेलं नव्हतं.

३९ व्या वर्षी गांधीजी पुन्हा दक्षिण आफ्रिकेतून इंग्लंडला गेले आणि वैद्यकीय शिक्षण घ्यायचं ठरवलं. पुन्हा प्राण्यांचं विच्छेदन हा प्रश्न समोर उभा राहिला. जिवंत प्राण्यांचं विच्छेदन, सिरम आणि इंजेक्शन तयार करण्यासाठी जिवंत प्राणी कापणं त्यांना सहन झालं नाही. असं विच्छेदन कोणत्याही धर्माला मान्य नाही. सर्व धर्म म्हणतात आपल्या स्वतःच्या शरीरासाठी एखाद्या प्राण्यांचा जीव घेणं योग्य नाही. गांधीजीच्या दृष्टीनं ॲलोपथीची प्रॅक्टीस करणारे सर्वजण सैतानाचे शिष्य होते आणि पा चात्य वैद्यक म्हणजे जादूटोण्याचा अर्क होता. आयुर्वेदाच्या वैद्यांना नवीन प्रयोग करण्यात रस नसे याचा त्यांची निषेध केला. ते स्वतः निसर्गोपचार करू लागले तेव्हा त्यांना समाधान मिळालं.

त्यांनी कुहनेचे ग्रंथ वाचले आणि रोग बरा करण्यासाठी त्यांचा पाण्याचा वापर पाहून ते प्रभावित झाले. हळूहळू त्यांनी स्वतःवर, मुलांवर, पत्नीवर प्रयोग सुरू केले आणि भोवतालच्या पंचमहाभूतांच्या सहाय्यानं उपचार करणं त्यांना पटत गेलं. पाणी,

माती, ताजी हवा आणि सूर्यकिरण यांची त्यांनी उपचारात मदत घेतली त्यांनी आधुनिक वैद्यकशास्त्रातल्या गोळ्या, पावडरी घेऊन कधीही शरीरात विष पेरलं नाही. त्यांचा भर उपवास, आहारात बदल आणि वनस्पतीच्या उपयोगावर होता.

आजारी माणसाचं निरीक्षण करून व्यवस्थित निदान करण्याची असामान्य शक्ती त्यांच्याजवळ होती. त्याचा त्यांना आजारी माणसावर उपचार करताना खूप उपयोग झाला. त्यामुळे आजारी माणसं बरी होत. दक्षिण आफ्रिकेत अनेक युरोपियन आणि भारतीय लोक त्यांचा सल्ला घेत आणि ते त्यांच्या काही अशीलांचे फॅमिली डॉक्टर झाले होते त्याकाळी त्यांची उपचाराची पद्धती वैद्यकीय शास्त्राच्या नियमांविरुद्ध होती. नंतरच्या काळात डॉक्टरांनी काही प्रमाणात त्याचा अंगिकार केला.

त्यांच्या मुलाला विषमज्वर झाला होता तेव्हा डॉक्टरांनी अंडी आणि चिकनचं सूप प्यायला सांगितलं. गांधीजींना मांसाहार मान्य नव्हता. त्यांनी मुलावर उपचार करायला सुरुवात केली आणि त्याला पाणी आणि संत्र्याचा रस दिला. अंगाभोवती ओली चादर गुंडाळली. मुलाचं दुखणं वाढलं तेव्हा गांधीजी थोडे निराश झाले पण निसर्गोपचार त्यांनी चालू ठेवला आणि त्याला बरं केलं. विषमज्वराचे आणखी अनेक रूग्ण त्यांनी इंजेक्शन शिवाय बरे केले.

अनेकदा त्यांनी वैद्यकसत्ता नाकारली. कस्तुरबांना एकदा शरीरातलं रक्त कमी होण्याचा त्रास होत होता. डॉक्टरांनी त्यांना गाईच्या मांसाचा काढा घ्यायला सांगितलं. पण गांधीजी आणि कस्तुरबा दोघांनीही ते नाकारलं. गांधीजींनी त्यांना लिंबाचं सरबत अनेक दिवस दिलं आणि त्यांना बरं केलं. डाळ आणि मीठ त्यांनी खाऊ नये असं गांधीजींनी त्यांना सुचवलं. क्षणभर कस्तुरबा गांधीजींचा जिद्दी स्वभाव विसरल्या आणि पुटपुटल्या “तुम्हाला सांगणं सोपं आहे पण तुम्ही सोडाल का डाळ आणि मीठ?” ताबडतोब गांधीजी म्हणाले, “हो तर, डॉक्टरांनी मला सांगितलं तर मी लगेच बंद करीन आणि तसं सांगितलं नसलं तरी मी आत्ताच एक वर्षासाठी डाळ आणि मीठ सोडून देतो” नंतर कस्तुरबांना वाईट वाटलं त्यांना अश्रू आवरेनात त्यांनी गांधीजींना



विनंती केली तरी त्यांनी त्यांचा निर्णय बदलला नाही. रूग्ण आणि डॉक्टर दोघांनीही मीठ आणि डाळ खाणं बंद केलं.

आणखी एका प्रसंगी कस्तुरबांना नियमितपणे उपवास करायला आणि कडुलिंबाचा रस घ्यायला सांगितलं होतं. गांधीजींचा भर पोट साफ ठेवण्यावर होता. शरीरात साठलेली विषारी द्रव्यं नाहीशी करण्यासाठी ते उपवास किंवा हलकं अन्न घेणं आणि एनिमा घेण्याचा सल्ला देत. अति खाण्यामुळे आणि नियमित व्यायाम न केल्यानं डोकेदुखी, अपचन, अतिसार आणि बद्धकोष्ठ होतं असा गांधीजींचा विश्वास होता. तब्येत चांगली ठेवायची तर भरपूर आणि भरभर चालणं याचा नि चित उपयोग होतो असं ते म्हणत. तुरुंगातही रोज सकाळी आणि संध्याकाळी ते असलेल्या जागेत चालायचे. प्राणायामाचेही अनेक प्रकार ते सांगत. मानसिक स्वास्थ्य बिघडलं की शारीरिक आजार होतात असं ते म्हणत. रामनाम म्हणजे त्यांच्या दृष्टीनं परमेश्वरावर पूर्ण श्रद्धा असणं आणि सर्व काळज्या विसरून जाणं होतं. सर्व रूग्णांसाठी तो उपचार होता.

दक्षिण आफ्रिकेत एकदा एका पठाणानं गांधीजींवर हल्ला केला तेव्हा गांधीजींनी चेहरा, कपाळ आणि बरगड्यांना मुक्कामार बसला होता त्यावर स्वच्छ मातीचा लेप लावला आणि सूज लवकरच उतरली. मातीचा लेप लावण्याचा उपाय ते प्लेग, ताप, मलेरिया, कावीळ, रक्तदाब, भाजणं, देवी, हाडमोडणं या सर्व दुखण्यांसाठी करत. बोटीच्या प्रवासात एकदा मुलाच्या हाताचं हाड मोडलं. गांधीजींनी मातीचा लेप लावला आणि जखम बरी झाली. अनेक रूग्णांना बरं करण्यात त्यांना यश आलं होतं तरी ते सांगत की ह्या उपचारांचा डोळे मिटून स्वीकार करू नका. असे अपारंपरिक प्रयोग करण्यात थोडा धोका असतो हे त्यांना माहीत होतं. ते मान्य करत की प्रकृती ठणठणीत ठेवण्याविषयी स्पष्ट मतं हाच त्यांचा आरोग्याचा मार्ग होता. काही प्रसूतीगृहं उघडावीत, रूग्णालयं उघडावीत, दवाखाने काढावेत हा त्यांचा आग्रह नव्हता तर लोकांना स्वच्छता आणि निरोगी जगण्याचे मार्ग शिकवावेत यावर भर होता. रोग झाल्यावर बरे करत बसण्यापेक्षा रोग होऊ नयेत यासाठी त्यांचे प्रयत्न होते.

आधुनिक वैद्यकातल्या औषधांचा त्यांनी बाऊ केला नाही. कॉल-याची साथ आली असताना सेवाग्राम मधल्या आणि गावातल्या सर्वांनी लस टोचून घ्यायला त्यांनी परवानगी दिली. तुरुंगात त्यांच्यावर ॲपेंडिसायटिसची शस्त्रक्रिया केली होती आणि त्यावर त्यांना अनेक लोकांची पत्रं आली. तेव्हा त्यांनी ही चूक झाली असं मान्य केलं होतं.

निसर्गोपचाराच्या मर्यादा त्यांना माहीत होत्या तरी अनेक कारणांसाठी ते त्याचा प्रचार करत. भारतातल्या गरीब जनतेला हे उपचार परवडण्याजोगे होते. ते शंभर टक्के स्वदेशी होते. सत्त्याहत्तर साली त्यांनी पुन्हा उत्साहानं निसर्गोपचार सुरू केले आणि उरळी कांचन या गावी निसर्गोपचार केंद्र सुरू केलं. तिथे काहीही महागडी उपकरणं नव्हती. चांगल्या आदर्श डॉक्टरला औषधांचं उत्तम ज्ञान असावं आणि ते त्यानं जनतेला विनामूल्य द्यावं. यावर त्यांचा विश्वास होता. डॉक्टरांसाठी काहीतरी वार्षिक मानधनाची रक्कम ठरवावी असा त्यांचा विचार होता म्हणजे ते रूग्णांकडून पैशांची अपेक्षा करणार नाहीत. मग रूग्ण गरीब असोत वा श्रीमंत. काही काळ त्यांनी

रूग्णांना तपासण्याचं आणि उपचार लिहून देण्याचं काम केलं. राजूसाठी लिहिलेले उपचार असे होते – “सूर्यस्नान, कटिस्नान, घर्षण स्नान, फळांचा रस, दूध वर्ज्य, दह्यावरचं पाणी, जर दह्यावरचं पाणी पचन नसेल तर फळांचा रस आणि उकळलेलं पाणी प्यावं.” पार्वतीसाठी लिहिलेले उपचार - फक्त मोसंबीचा रस. कटिस्नान, घर्षणस्नान पोटावर मातीपट्टी, नियमित सूर्यस्नान, एवढं केलं तरी ती बरी होईल. रामनामाचं महत्त्व तिला समजावून सांगावं.” आश्रमातले लोक विनोदानं म्हणत, “बापूंचा सहवास हवा असेल तर आजारी पडावं.” आजारी माणसाच्या सगळ्या बारीक-सारीक गोष्टी बापूंना माहीत असत. आणि रोज चालून परत येताना ते सर्व रूग्णांना भेटत. पथ्याचं जेवण कसं तयार करावं याच्या तपशीलवार सूचना ते देत. त्याचप्रमाणे रूग्णाला स्पंजिंग कसं करावं, मसाज कसा करावा, एनिमामध्ये किती सोडा आणि किती मीठ घालावं तेही सांगत. तेव्हा त्यांनी सेवाग्राममध्ये रोज सकाळी एक तास रूग्णांसाठी द्यायला सुरूवात केली तेव्हा जवळपासच्या गावांमधून खूप रूग्ण येऊ लागले. गांधीजींचा सल्ला असे – भाज्या खा, ताक प्या, मातीच्या पट्टया लावा. कधी कधी ते स्वतः रूग्णाची विष्ठा तपासत. जर रूग्ण फार अशक्त नसला तर त्याला मोकळ्या हवेत ठेवत. रूग्णाची सर्व परिस्थिती नीट अभ्यासल्यावरच ते उपचार सांगत. एकदा एका सहका-याला काही मानसिक ताणामुळे रक्तदाबाचा त्रास होत होता. त्यामागचं कारण शोधण्यासाठी गांधीजींनी त्याच्याशी गंभीरपणे चर्चा केली आणि चर्चेपूर्वी आणि नंतर रक्तदाब तपासला दुस-या दिवशी त्याला लाकडाची फळी त्यावर काढलेल्या रेषेवर सरळ कापायला लावली आणि हे करण्यापूर्वी आणि नंतर रक्तदाब तपासला. तिस-या दिवशी त्याला आश्रमात एक फर्लांग पळायला लावलं आणि त्याच्या आधी आणि नंतर रक्तदाब पाहिला. शेवटच्या दिवशी त्याचा रक्तदाब कमी झालेला दिसला पण पहिले दोन दिवस तो वाढलेला दिसला. गांधीजींनी त्याला लिहून दिलं, “जेव्हा रक्तदाब वाढला आहे असं वाटेल तेव्हा चालत जा.” गांधीजी कितीही महत्त्वाच्या कामात किंवा चर्चेत असले तरी रूग्णांच्या उपचारांबद्दल, त्यांच्या खाण्यापिण्याबद्दल अंघोळीबद्दल कोणालाही सल्ला विचारता येत असे.

अनेक प्रसिद्ध नेते गांधीजींच्या कडक पहा-यात असत. त्यांना त्यांच्या आज्ञा पाळाव्या लागत. तुरूंगातही ते सहका-यांची शुश्रूषा करण्याची परवानगी मिळवत.

एकदा दम्याचा त्रास असलेल्या एका सहका-यानं त्यांची मदत मागितली. गांधीजींनी त्याला धूम्रपान सोडायला सांगितलं आणि त्यानं ते मान्य केलं. तीन दिवस झाले तरी काही सुधारणा नव्हती. त्याला दिवसाकाठी गुपचूप एक दोन तरी सिगरेटस् ओढल्याशिवाय चैन पडत नसे. एकदा रात्री त्यानं सिगरेट पेटवायला काडी ओढली आणि त्याच्या चेह-यावर बॅटरीचा उजेड पडला. त्याला गांधीजी समोर उभे असलेले दिसले. त्यानं गांधीजींची क्षमा मागितली, धूम्रपान सोडलं, आणि लवकरच त्याचा दमा कायमचा बरा झाला. बादशाह खान यांना डोक्याच्या कातडीला काही त्रास होत होता. गांधीजींनी त्यांना काही घरगुती उपचार सांगितले त्यांनी त्या उंच्यापु-या पठाण नेत्याला दुखण्यापेक्षाही जास्त त्रास सहन करावा लागला. वल्लभभाईंच्या पायात एकदा काटा रुतला. गांधीजींनी त्यावर आयोडीन ऐवजी बिब्बा लावला वल्लभभाई म्हणाले, "बिब्ब्याच्या आगीपेक्षा मला काट्याचं टोचणं परवडलं असतं".

⁂

# परिचारक

एकदा काँग्रेसचे काही नेते गांधीजींच्या सल्ल्यासाठी सेवाग्रामला गेले. गांधीजी दोन आजारी सहका-यांवर उपचार करत होते. त्यांना ताप होता म्हणून ते मातीपट्टी आणि कटिस्नानाचा उपचार करत होते. एका नेत्यानं विचारलं, "आपण स्वतः हे सगळं करण्याची जरूर आहे का?" गांधीजींनी उत्तर दिलं" दुसरं कोण करणार हे? तुम्ही गावात पाहिलंत तर ६०० लोकं असली तर त्यातली ३०० आजारी असतात."

कुमार वयापासून गांधीजींना शूश्रूषेची ओढ होती. शाळा सुटली की घरी आजारी वडलांची शुश्रूषा करायला ते धावत पळत जात. वडलांना ते औषध देत, जखमांवर पट्टी करत, वैद्यांनी सांगितलेली औषधं तयार करत. ते मोठे झाले तसतशी ही शुश्रूषेची आवड वाढत गेली. दक्षिण आफ्रिकेत एका धर्मार्थ रूग्णालयात ते रोज दोन तास सेवेसाठी जात. तिथे ते उपचार सांगायला शिकले. हे काम करण्यामुळे त्यांना त्यांच्या वकिली कामांना वेळ पुरत नसे त्यामुळे अनेक खटल्यांचं काम ते एका मुस्लिम मित्राला देत असत.

१८९६ या वर्षी गांधीजी काही काळासाठी भारतात परत आले होते. भारतातल्या नेत्यांना ते दक्षिण आफ्रिकेतल्या निवासी भारतीयांबद्दल माहिती देण्यात गुंतले होते. "हिरवं बातमीपत्र" लिहिण्यात आणि वाटण्यात त्यांचा बराच वेळ जाई. तरीही जेव्हा त्यांना कळलं की, त्यांचे मेव्हणे बरेच आजारी आहेत आणि बहिणीला परिचारिका ठेवणं परवडत नाही, त्यांनी त्यांना आपल्या घरी आणलं, स्वतःच्या खोलीत त्यांनी व्यवस्था केली आणि रात्रंदिवस त्यांची सेवा केली.

गांधीजींच्या आठ वर्षांच्या मुलाच्या हाताचं एकदा हाड मोडलं होतं. महिनाभर गांधीजी त्यांच्या जखमांवर उपचार करत होते. त्यांनी डॉक्टरांचं बँडेज काढून टाकलं. जखम धुतली आणि त्यावर स्वच्छ मातीचा लेप लावला आणि बरा होईपर्यंत हात बांधून ठेवला. दुस-या दहा वर्षाच्या मुलाला एकदा विषमज्वर झाला होता. गांधीजींनी त्याची ४० दिवस शुश्रूषा केली. त्यांनी मुलाला ओल्या चादरीत गुंडाळलं आणि त्यावर कोरडी ब्लँकेटस् गुंडाळली. मुलगा खूप रडत होता तरी हा उपचार चालू ठेवला. ते प्रेमानं काळजी घेत शुश्रूषा करत पण त्यांना उपचारात हयगय चालत नसे. एका विषमज्वराच्या रूग्णावर १५ दिवस ते उपाय करत होते. मातीचे आणि कटिस्नानाचे उपचार होते. दर दीड तासानं ते त्या मुलाच्या पोटावर एक इंच जाडीची नवीन मातीपट्टी लावत होते. ताप उतरल्यावर त्यांनी मुलाला पिकलेल्या केळ्यांचा आहार सांगितला. गांधीजी स्वतः १५ मिनिटं केळी कुस्करत होते आणि ते खाण्यासाठी मुलाचं मन वळवलं. हे काम त्यांनी त्याच्या आईकडेही सोपवलं नाही कारण तिनं प्रेमानं जास्त खाऊ घातलं असतं. रूग्णाची शुश्रूषा करत असताना त्याचं मन शांत राहील याची काळजी ते घेत. सर्व सवयींच्या व्यसनांच्या ते विरुद्ध होते पण एकदा एक दक्षिणी मुलगा आजारी होता आणि त्याला कॉफी प्यावीशी वाटत होती तेव्हा गांधीजींनी त्याला स्वतः कॉफी करून दिली.

ते रूग्णांचं अंग पुसत, एनिमा देत, अंघोळ घालत, मातीपट्टी लावत. परिचारिकेपेक्षाही प्रेमानं ते उपचार करत. आपल्याला यामुळे काही लागण होईल अशी भीती त्यांना वाटत नसे. एकदा एक कुष्ठरोगी भिकारी त्यांच्याकडे आला. गांधीजींनी त्याला आसरा दिला. त्याच्या जखमांवर काही दिवस उपचार केले आणि मग त्याला रूग्णालयात पाठवलं. एकदा तुरुंगात बरोबरच्या कैद्यात कुष्ठरोगाची लक्षणं दिसू लागली. गांधीजींनी त्याला नियमित भेटण्याची परवानगी मिळवली. नंतर त्याला सेवाग्राममध्ये आणलं गांधीजी रोज त्याच्या जखमा धूत असत.

दोन ऐतिहासिक प्रसंगी गांधीजींना शुश्रूषेची मोठी संधी दिली. एकदा दक्षिण आफ्रिकेतल्या शेतक-यांच्या युद्धात आणि नंतर झुलु प्रतिकाराच्या वेळी या दोनही प्रसंगी त्यांनी भारतीय रूग्णवाहिकांचं दल उभारलं आणि रूग्णांची सेवा केली, जखमींना वाहून नेलं. पारिचारक दलाचे नेते म्हणून त्यांनी उत्तम कामगिरी केली, मैलोनमैल चालले, अनेक मैल जखमींना वाहून नेलं. जखमी झुलूंची त्यांनी आनंदानं सेवा केली कारण गो-या परिचारिकांनी त्यांची शुश्रूषा करायला नकार दिला होता. त्यांच्या जखमा चिघळू लागल्या होत्या. गो-या सैनिकांवर देखील गांधीजींनी उपचार केले. त्यांच्या या सेवेसाठी त्यांना झुलू-युद्ध-पदक आणि कैसर ए हिंद सुवर्णपदक मिळालं.

दक्षिण आफ्रिकेतल्या सोन्याच्या खाणींमध्ये प्लेगची साथ आली आणि अनेक भारतीय कामगार आजारी पडले. गांधीजींना हे कळताक्षणी ते चार मदतनीस घेऊन तिथे हजर झाले. जवळ रूग्णालय नव्हतं. एक रिकामं गोडाऊन उघडलं. त्यात काही खाटा टाकल्या आणि २३ रूग्ण तिथे हलवले. तिथल्या नगरपालिकेनं गांधीजींच्या या तातडीच्या हालचालीबद्दल आभार मानले. जंतुनाशक औषधं दिली. एक परिचारिका पाठवली. तिनं प्लेग होऊ नये म्हणून ब्रँडीचा साठा आणला होता. गांधीजींचा या उपायावर विश्वास नव्हता. त्यांनी वैद्यकीय मदत सुरू केली. रूग्णांची अंथरूणं स्वच्छ केली. रात्री त्यांच्याजवळ ते बसून रहात त्यांच्याशी गप्पागोष्टी करून त्यांना हसवत. तिथल्या डॉक्टरांच्या परवानगीनं तीन रूग्णांवर त्यांनी मातीचे उपचार केले त्यापैकी दोन रूग्ण वाचले इतर सर्व रूग्ण त्या परिचारिकेसह मरण पावले. सेवा करायची तर रूग्णांइतकीच स्वतःचीही काळजी घ्यायला हवी. गांधीजी जेव्हा भरपूर काम करत तेव्हा कधीही पोटभरून जेवत नसत. ते एनिमा देण्यात, कटिस्नान घालण्यात तेलानं मालिश करण्यात, मातीच्या पट्टया लावण्यात, ओल्या चादरींचा प्रयोग करण्यात तज्ज्ञ होते. रक्तदाब कमी करण्यासाठी ते डोक्यावर मातीपट्टी लावत. कपाळावर मातीपट्टी लावलेली असताना एका जपानी कवींना योने नोगुची यांना ते म्हणाले, “माझा जन्म भारतीय मातीतून झाला आणि तीच माती की मुकुटासारखी लावतो.”

रूग्णाची प्रकृती गंभीर झाली तरी गांधीजी विचलित होत नसत. स्वतःची पत्नी व मुलांची सुद्धा त्यांनी अशा परिस्थितीत शांतपणे सेवा केली होती. कस्तुरबा दक्षिण आफ्रिकेत दोनदा गंभीर आजारी होत्या. डॉक्टरांनी तर त्या आजारपणातून उठतील ही अशाच सोडली होती. गांधीजींनी अत्यंत धीरानं, धैर्यानं आणि सावध राहून त्यांची सेवा केली.

दक्षिण आफ्रिकेतल्या तुरुंगातून सुटका झाल्यावर त्या अतिशय अशक्त झाल्या होत्या. गांधीजी त्यांना दात घासायला मदत करत असत. त्यांना कॉफी करून देत त्यांना एनिमा देत. त्यांचं शौचपात्र स्वच्छ करत आणि एकदा तर त्यांनी त्यांचे केसही विंचरण्याचा प्रयत्न केला. सकाळी सकाळी त्यांनी त्यांना बिछान्यावरून उचलून बाहेर आणलं आणि झाडाखाली सावलीत मोकळ्या हवेत दिवसभर ठेवलं. सूर्य फिरत होता तसे ते त्यांचा बिछाना हलवत होते.

दक्षिण भारतात प्रशिक्षित परिचारिका मिळणं कठीण होतं. आणि गो-या परिचारिकेनं काळ्या स्त्रीची सेवा करायला नकार देण्याची शक्यताही होती जेव्हा कस्तुरबा गर्भवती होत्या तेव्हा गांधीजींनी दाईकामाचा अभ्यास केला आणि त्यांच्या शेवटच्या मुलाच्या जन्माच्या वेळी कस्तुरबांना मदत केली.

आगाखान पॅलेसमध्ये कस्तुरबांच्या शेवटच्या आजारपणात ७५ वर्षांचे गांधीजी त्यांना आराम पडावा म्हणून कटिस्नान देत.

येरवडा तुरुंगात गांधीजींवर शस्त्रक्रिया झाली होती तेव्हा त्यांची शुश्रूषा करणा-या परिचारिकेनं त्यांची प्रशंसा केली. ती म्हणाली, "शुश्रूषा करणं ही नेहमी आनंदाची गोष्ट नसते. पण गांधीजींची सेवा करण्याची संधी मिळणं मात्र शुद्ध आनंदाचा अनुभव होता. डॉक्टर मला म्हणाले, "तू यापूर्वी असे रिपोर्टस् लिहीत नव्हतीस मी म्हटलं गांधीजींसारखा रूग्णही मला यापूर्वी मिळाला नव्हता."

❊❊

# शिक्षक

गांधीजींचं लग्न कस्तुरबांशी झालं तेव्हा ते तेरा वर्षाचे होते. कस्तुरबाही त्याच वयाच्या. त्या काही शिकलेल्या नव्हत्या. किशोरवयीन नव-यानं त्यांना लिहायला, वाचायला शिकवायचा प्रयत्न केला पण तो वाया गेला १९१४ या वर्षी बोटीतून इंग्लंडला जाताना ते रोज एक तास कॅलनबाखना गुजराथी शिकवत आणि कस्तुरबांना गीता आणि रामायण वाचून अर्थ समजावून सांगत. कस्तुरबांनाही त्याची गोडी वाटे.

७३ व्या वर्षी कस्तुरबा त्यांच्याबरोबर आगाखान पॅलेसमध्ये स्थानबद्ध होत्या. गांधीजींना तेव्हा मोकळा वेळ असे. त्यांनी रामायण आणि भागवताचे काही खंड कस्तुरबांसाठी संपादित केले होते. ते रोज त्यांच्याबरोबर बसत आणि त्यांना भूगोल, गुजराथी साहित्य आणि व्याकरण शिकवत. त्यावेळी कस्तुरबा वयस्कर होत्या आणि दुःखानंही खचून गेल्या होत्या. त्यांनी त्यांच्या शिकवण्याला प्रतिसाद दिला नाही. तुरुंगात असताना गांधीजींनी एका चिनी कैद्याला इंग्रजी शिकवलं, नंतर आयरिश तुरूंगाधिका-याला गुजराथी शिकवलं, नंतर भाचीच्या मुलीला, नातीला इतिहास, भूगोल आणि भूमिती शिकवली. ७४ व्या वर्षी ते सहजपणे भूमितीय आकृत्या नेमक्या काढत.

शिक्षक म्हणून स्वतःच्या क्षमतेबद्दल गांधीजींना चांगलाच आत्मविश्वास होता. पण शिक्षक म्हणून त्यांची दृष्टी आणि शिकवण्याची पद्धत फार वेगळी होती. दक्षिण आफ्रिकेत एक न्हावी, एक कारकून आणि एक दुकानदार या तिघांना इंग्रजी शिकायचं होतं पण शिक्षकाला द्यायला पैसे नव्हते. नियमित वर्गांना जायला वेळ नव्हता. गांधीजी त्यांच्या घरी जात आणि ६ महिन्यात त्यांना हिशेब ठेवण्यापुरतं आणि पत्रं लिहिण्यापुरतं इंग्लिश शिकवलं.

कधी कधी गांधीजी त्यांच्या मुलांना तोंडी पाठ देत. त्या काळी त्यांना फारसा वेळ नसायचा त्यामुळे मुलं त्यांच्याबरोबर चालत ऑफिसपर्यंत जायची आणि वाटेनं गांधीजी त्यांच्याशी गुजराथी साहित्य, काव्य आणि इतर विषयांबद्दल बोलत. त्यांना इंग्रजी शिकवण्यासाठी थोडा काळ गांधीजींनी एक शिक्षिका नेमली होती. त्यांच्या इंग्रज मित्रांकडून ही मुलं इंग्रजी शिकली.

फीनिक्स आश्रमात तिथल्या मुलांसाठी गांधीजींनी प्राथमिक शाळा सुरू केली. ते स्वतः मुख्याध्यापक होते आणि इतर आश्रमवासी त्यांना मदत करत असत. अनेक धर्मांचे विद्यार्थी तिथं होते आणि शिक्षक वेगवेगळ्या देशातून आलेले असत - इंग्लंड, जर्मनी, भारत. शिक्षकांना शारीरिक श्रमाची इतकी कामं असत की कधीकधी ते शाळेत थेट शेतातूनच घोट्यापर्यंत मातीचे, चिखलाचे पाय घेऊन येत. गांधीजी कधीकधी एखाद्या बाळाला हातात जोजवत शिकवत असत. गांधीजींनी ते स्वतः करत नाहीत असं कुठलंही काम विद्यार्थ्यांना सांगितलं नाही. घाबरट शिक्षक आपल्या विद्यार्थ्यांना कधीही निर्भय बनवू शकणार नाही असा त्यांचा विश्वास होता. शिक्षक स्वतः मुलांसमोरचा आदर्श पाठ असायला हवा. गांधीजींचं वाचन विस्तृत होतं आणि सतत ते नवं काही शिकायला उत्सुक असत. पासष्ठाव्या वर्षी त्यांनी आकाशनिरीक्षण शिकायला सुरूवात केली.

फीनिक्स आश्रमातली शाळा प्रायोगिक होती आणि त्यात अनेक कडक नियम असत. राहणी साधी आणि कष्टाची होती. चहा, कॉफी, कोको पिणं मान्य नव्हतं कारण त्याचं उत्पादन गुलामांकडून करून घेतलं जायचं. जवळजवळ सर्व विद्यार्थी निवासी होते. गांधीजी पुस्तकं घेऊन क्वचित शिकवत असत. पुस्तकांचं ओझं मुलांवर टाकून त्यांच्या बुद्धीला अपंग बनवणं त्यांना मान्य नव्हतं. त्यांच्या लहानपणी अभ्यास डोक्यात ठोसून भरल्यामुळे वाचनाचा आनंद कसा नाहीसा व्हायचा ते त्यांच्या चांगलं लक्षात होतं. लेखन, वाचन गणित यांनाही ते फार महत्त्व देत नसत. हृदयाची, मनाची मशागत आणि चारित्र्याची उभारणी हे त्यांच्या शिक्षणाचे हेतू होते. मुलांना सर्व धर्मांबद्दल आदर बाळगायला शिकवलं जायचं. रमझानच्या महिन्यात मुस्लिम मुलांबरोबर



हिंदू मुलंही उपवास करत. काही मुस्लिम मुलगे काही काळ हिंदू कुटुंबात रहात असत. ते यजमानांबरोबर बसून जेवत. सगळे शाकाहारी होते. ते एकच समान प्रार्थना म्हणत आणि बागकामात, साफसफाईत, चांभारकाम करण्यात, सुतारकाम करण्यात, स्वयंपाक करण्यात एकमेकांना हातभार लावत. संगीत ऐकण्याची आवड त्यांच्या कानांना होती. रोज सायंप्रार्थना व्हायची. भजनं आणि इतर प्रार्थना पियानोच्या साथीनं म्हटल्या जात. टेनिस किंवा क्रिकेट खेळण्यापेक्षा मुलांनी रोजची शारीरिक श्रमाची कामं करावीत आणि सुदृढ व्हावं असं त्यांना वाटे. टॉलस्टॉय फार्मवर आणि साबरमती

आश्रमातही गांधीजी जोडे बनवायला शिकवत. टॉलस्टॉय फार्मवर ते उर्दू आणि तमिळ यांचे प्राथमिक धडेही देत. मातृभाषेतून साहित्याचे धडे दिले जात. गांधीजींना गुजराथी, मराठी, हिंदी, उर्दू, तमिळ, इंग्रजी, फ्रेंच आणि लॅटिन या भाषा येत.

साबरमती आश्रमात शाळेची फी आकारली जात नसे. पण पालकांनी आश्रमाला यथाशक्ती देणगी आपणहून द्यावी अशी अपेक्षा होती. चार वर्षांच्या वरची मुलं निवासी म्हणून घेतली जात. इतिहास, भूगोल, गणित आणि अर्थशास्त्र हे विषय मातृभाषेतून शिकवले जात. संस्कृत, हिंदी आणि एक द्रवीड भाषा अनिवार्य होती. इंग्रजी ही गौण भाषा होती. उर्दू, तमिळ, तेलगू आणि बंगाली अक्षरंदेखील शिकवली जात. दिवसातून तीनदा जेवण असे. ते अगदी साधं असे आणि मिठाखेरीज इतर कोणतेही मसाले वापरत नसत. सर्वजण साधे कपडे वापरत. स्वदेशी कापड वापरण्यावर भर होता. गांधीजी सहशिक्षणाचा प्रचार करत. "आपण मुलगे मुली हा भेदभाव सोडला पाहिजे. मुलांना धोका पत्करण्याची परवानगी द्यायला हवी. मुलांना इतकं जपून ठेवण्याची गरज नाही. कधी मुला-मुलींमध्ये काही चुकीची वर्तणूक घडली तर गांधीजी शुद्धीसाठी उपवास करायला बसत.

चरख्यावर सूत काढण्याबरोबर, सरकी काढणं, कापूस पिंजणं शिकवलं जाई. त्यामुळे मुलांना काहीतरी व्यवसाय शिक्षण मिळे आणि त्यांच्या शिक्षणासाठी होणारा खर्च ते थोडातरी भरून काढत. शाळेला सुट्टी नसायची. आठवड्यातून दोनदा त्यांना थोडा मोकळा वेळ मिळायचा तेव्हा ते आपली स्वतःची कामं करत असत. वर्षातून तीन महिने ते पायी चालत प्रवास करायचे. त्यासाठी तब्येत मात्र ठणठणीत असायला लागायची. गुजरात विद्यापीठात गांधीजी न्यू टेस्टामेंटमधल्या गोष्टी तोंडी सांगायचे आणि इंग्रजी निवडक साहित्याचे वर्ग घ्यायचे.

गांधीजींना वाटायचं की, उच्चशिक्षणाची सगळी यंत्रणाच बदलून टाकायला हवी. तरच ती फक्त मध्यमवर्गातल्या काहींची मिरासदारी न राहता लक्षावधी गरीब मुलांच्या गरजा भागवू शकेल. त्यांना दिसत होतं की, कोवळ्या उमलत्या वयात मुलांची खूपशी

शक्ती इंग्रजीवर प्रभुत्व मिळवण्यात खर्ची पडत होती. ती भाषा त्यांना सर्वस्वी परकी होती आणि हे करताना मुलं स्वतःच्या भाषेपासून, साहित्यापासून, समृद्ध वारशापासून तुटत चालली होती. उच्चशिक्षण घेऊन मुलांच्या आत्मविश्वासात वाढ होत नव्हती आणि त्यांना आपण शाळा-कॉलेजचं शिक्षण पूर्ण केल्यावर करणार तरी काय असा प्रश्न त्यांच्या मनात होताच. उच्चशिक्षण म्हणजे भारतातल्या विविध संस्कृतींचा आदर्श मिलाफ असावा आणि आधुनिक काळातल्या अनुभवांनी तो समृद्ध व्हावा अशी त्यांची इच्छा होती. विद्यार्थी उत्तम प्रकृतीची, प्रामाणिक आणि बुद्धिमान ग्रामीण माणसं व्हावीत, कधीही अर्थार्जन करू शकतील एवढी त्यांची तयारी असावी. मुलांना लेखनापूर्वी वाचायला शिकवावं यावर त्यांचा भर होता. उत्तम हस्ताक्षर हा शिक्षणाचा एक भाग आहे असं ते मानत आणि स्वतःच्या वाईट हस्ताक्षराची त्यांना लाज वाटे. ते शिक्षकांना सांगत की, मुलांना आधी सरळ रेघा, कंस, त्रिकोण, पक्षी, फुलं, पानं यांची चित्रं काढायला द्या म्हणजे मग ती अक्षरं लिहू शकतील त्यांना गिरवावी लागणार नाहीत. सध्याचं प्राथमिक शिक्षण म्हणजे नुसता देखावा आहे कारण त्यात भारतातल्या ग्रामीण मुलांच्या गरजांचा विचार केलेला नाही असं त्यांचं मत होतं.

मुलांमधलं जे काही सर्वोत्तम होतं ते बाहेर यावं अशी गांधीजींची इच्छा होती. मुलांना त्यांना केवळ साक्षर बनवायचं नव्हतं तर ताठ कण्याची स्वाभिमानी माणसं बनवायचं होतं. शिक्षणाबद्दल ३० वर्षं चिंतन केल्यानंतर त्यांनी हस्तकलेतून शिक्षण देण्याची पद्धती सुरू केली. वयाच्या ६३ व्या वर्षी तुरुंगात असताना त्यांनी ह्या शिक्षण सिद्धान्ताचा प्रयोग सुरू केला आणि नंतर वर्धा शैक्षणिक प्रकल्पात त्याचं रूपांतर मूलोद्योगामधे झालं.

गांधीजी शारीरिक शिक्षेच्या विरुद्ध होते. त्यांच्या सबंध आयुष्यात त्यांनी एकदाच एका बंड मुलाला छडीनं मारलं होतं. पण नंतर आपला स्वतःवरचा ताबा गेला यामुळे त्यांचा अंतर्बाह्य थरकाप झाला होता. मुलानं पुन्हापुन्हा गांधीजींकडे क्षमा-याचना केली ती त्या माराच्या दुःखामुळे नव्हे तर त्यानं गांधीजींची मानसिक शांती नाहीशी केली म्हणून.

गांधीजी विद्यार्थ्यांना खेळात चढाओढ करू देत पण शिक्षणात चढाओढ त्यांना मान्य नव्हती. त्यांची गुण देण्याची पद्धतीही आगळी-वेगळी होती. ते हुषार मुलांबरोबर इतर मुलांची तुलना कधीच करत नसत तर एखाद्या मुलानं स्वतःचाच अभ्यास, गृहपाठ अधिक चांगला केला तर त्याला अधिक गुण देत. विद्यार्थ्यांवर ते पूर्ण विश्वास टाकत आणि परीक्षा चालू असताना त्यांच्यावर कुठलाही पहारा ठेवत नसत. आश्रमातल्या शिक्षणात मुलाचं स्वातंत्र्य हे मार्गदर्शक तत्त्व होतं. ते असं म्हणत की, "लहानात लहान मुलालाही आपण कोणीतरी आहोत असं वाटायला हवं."

गांधीजींना प्रत्येक गावात मूलोद्योगाची शाळा असावी असं वाटत होतं पण त्यांना हेही माहीत होतं की, शाळा किंवा शिक्षक स्वावलंबी झाल्याशिवाय स्वतःच्या पायावर उभे राहिल्याशिवाय हे शक्य नव्हतं. मूलोद्योगाच्या शाळांत मुलांना काहीतरी हस्तकला शिकावी लागे. सूतकताई हा विषय सगळीकडे होता. गांधीजींचा दृढ विश्वास होता की, जगात खरोखर शांतता निर्माण व्हायला हवी असेल आणि खरीखुरी समानतेची ज्योत मनामनात तेवायला हवी असेल तर मुलांपासूनच सुरूवात व्हायला हवी. शिक्षण घेऊन जर मुलं स्वतःच्या हातांचा वापर विसरत असतील किंवा शारीरिक श्रमाची कामं करायला त्यांना लाज वाटणार असेल तर ती निरक्षर राहून त्यांनी दगड फोडण्याचं काम केलं तरी चालेल. त्यांनी स्वतः त्यांच्या नातवाला कापूस कसा तयार होतो, सूत काढायला टकळी कशी करतात, सुतापासून कापड कसं विणलं जातं आणि धागे कसे मोजतात हे सगळं समजावून सांगितलं होतं. त्याला त्यांनी भूगोल, निसर्ग अभ्यास, अंकगणित, भूमिती आणि संस्कृतीचा विकास कसा होत जातो हे सगळं शिकवलं.

गांधीजी मोठ्या विद्यार्थ्यांची सूतकताईची परीक्षा घेत. परीक्षा कठीण असे. सूतकताईमागचा सैद्धान्तिक भाग आणि प्रत्यक्ष कामातला अनुभव यावर पूर्णपणे प्रभुत्व असण्याची अपेक्षा असे. मूलोद्योगाच्या शिक्षणातून मुलं मोठी होताच कुटुंबासाठी काही अर्थार्जन करू लागतात हे गांधीजींनी दाखवून दिलं. तरीही 'नयी-तालीम'चा उद्देश

मुलांना केवळ व्यवसायशिक्षण देणं हा नव्हता पण उद्योगातून मुलामधून संपूर्ण माणूस निर्माण करणं हा होता. शिक्षणातून मुलांनी अभिमानानं फुगून जाऊ नये ही गांधीजींची इच्छा होती. मुलं खुर्चीवर बसली तरी हातात झाडू घ्यायची वेळ आली तरी त्यांना लाज वाटू नये असं त्यांना वाटायचं. नुसतं पुस्तकी शिक्षण देऊन मुलांच्या नैतिक उंचीत एक इंचभर फरक पडत नाही किंवा त्यातून चारित्र्य निर्माण होत नाही हे त्यांनी ठासून सांगितलं.

ते विद्यार्थ्यांच्या सभांमधून बोलत. एकदा त्यांनी काशी विद्यापीठाच्या पदवीग्रहण समारंभात भाषण केलं. या भाषणांमधून ते सांगत की शिक्षण चांगल्या नोक-या मिळण्यासाठी नसतं तर माणसानं आयुष्यभर ताठ कण्यानं वावरावं, जगताना शूर, सैनिक असावं आणि समाजात ताकदीनं, पूर्ण शक्तीनिशी वावरावं यासाठी असतं. शेतक-यांच्या जीवनाचा अभ्यास मुलांनी करावा. ते त्यांचं कर्तव्य आहे. त्यांचं जगणं कसं सुधारेल हे त्यांनी पहावं, विचार करावा. सामान्य माणसातली अंधश्रद्धा दूर करण्यासाठी आणि निराशा दूर करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर जनतेचं शिक्षण करण्याची गरज आहे.

गांधीजींवर रस्किन, टॉलस्टॉय आणि टागोरांच्या विचारांचा प्रभाव होता. शिक्षणतज्ज्ञ म्हणून जगात थोर प्रयोगवीरांमध्ये त्यांचा समावेश होईल. त्यांनी बिहारमध्ये काही शाळा सुरू केल्या. बंगालमध्ये एक राष्ट्रीय विद्यालय सुरू केल आणि अहमदाबादमध्ये राष्ट्रीय विद्यापीठ स्थापन केलं. स्वतःच्या स्वतंत्र अशा इतक्या वेगळ्या कल्पना त्यांच्याकडे होत्या. ह्या शिक्षकाला त्याच्या तरुणपणी मात्र ७५ रु. दर महाची शिक्षकाची नोकरी नाकारली गेली होती कारण ते तेव्हा पदवीधर नव्हते ते फक्त लंडनचे मॅट्रिक्युलेट होते आणि बॅरिस्टर होते!

❋❋

# विणकर

त्यांना पकडण्यात आल्यावर न्यायाधिशानं त्यांना त्यांचा व्यवसाय काय आहे असं विचारलं. गांधीजी म्हणाले, "मी सूत काढतो, विणकर आहे आणि शेतकरी आहे" तेव्हा ते ६४ वर्षांचे होते. त्यावेळी २५ वर्षांपूर्वी त्यांनी 'हिंद स्वराज्य' लिहिलं होतं. त्यात त्यांनी स्वदेशी वस्तू वापरण्याच्या गरजेवर भर दिला होता आणि भारताला आतून आणि बाहेरून होणाऱ्या पिळवणुकीतून मुक्त करण्याचं आवाहन केलं होतं. तोवर त्यांनी हातविणीचं वस्त्र पाहिलं नव्हतं किंवा त्यांना चरखा आणि हातमाग यातला फरकही माहीत नव्हता. पण इंग्लंडमधून कापड आयात केल्यामुळे भारतीय विणकर कसे उध्वस्त झाले होते हे त्यांना माहीत होतं. परदेशी मालाला प्राधान्य देऊन भारतीयांनी इंग्रज सरकारला भारतीय मातीत पाय रोवायला मदत केली होती भारतीय विणकर तलम सूत विणत असत पण स्वतःच्या कापडगिरण्यातल्या कापडाची निर्यात वाढावी म्हणून ईस्ट इंडिया कंपनीनं त्यांच्यात दहशत निर्माण केली, त्यांचे तलमसूत विणणारे अंगठे जबरदस्तीनं कापून टाकले हे त्यांनी पुस्तकात वाचलं होतं.

दोनशे वर्षांपूर्वी भारतातून ३० लाख रूपयांचं हातविणीचं कापड निर्यात होत असे. इंग्रज भारतात आल्यावर ४० वर्षांच्या कारकीर्दीत सर्व निर्यात थांबली आणि पुढल्या १०० वर्षात भारतात दरवर्षी ६० कोटी रूपयांचा माल ब्रिटनमधून आयात होऊ लागला. ब्रिटनच्या एकूण निर्यातीचा तो चौथा हिस्सा होता. याप्रकारे जग ज्याचा हेवा करीत असे असं भारतातलं हातमागाचं उत्पादन मातीत मिळालं. विणकरांच्या हातातून त्यांचा व्यवसाय गेला, ते पुन्हा शेतीकडे वळले आणि उपासमारीनं मृत्युमुखी पडले. एका व्हाइसरॉयनं म्हटलं होतं, "भारतीय विणकरांच्या अस्थींनी भारतातली माती

पांढरी झाली. वाणिज्य क्षेत्राच्या इतिहासात या दुर्दैवी संकटासारखं दुःख शोधून सापडणार नाही.”

गांधीजींनी अनेक गोष्टींचा अभ्यास केला. बंगालमधले मुसलमान विणकर जगप्रसिद्ध ‘शबनम’ विणायचे. त्यांचा व्यवसाय बदलला होता. पंजाबचे स्वाभिमानी विणकर आपले हातमाग सोडून सैन्यात दाखल झाले आणि भारताच्या पारतंत्र्याच्या साखळ्या त्यांनी मजबूत केल्या. कलात्मक आणि सन्मान देणारा व्यवसाय आता बदनाम झाला. गुजराथमधले विणकर कामाच्या शोधात बेघर झाले आणि मुंबईसारख्या मोठ्या शहरात कचरा गोळा करू लागले. त्यांच्या तब्येतीची नासाडी झाली आणि त्यांना दारू पिणं, जुगार खेळणं अशी व्यसनं लागली. अनेक घरं मोडली. कुशल कारागिरांचे, कोणतंही कौशल्य हाती नसलेले कष्टकरी झाले. सूतगिरण्यांमुळे श्रीमंत लोक आणखी श्रीमंत झाले.

गांधीजींनी या पारतंत्र्यातून देशाची सुटका करण्यासाठी परदेशातून होणारी कापडाची आयात बंद करण्याचा निश्चय केला. त्यांच्या मते स्वदेशी (म्हणजेच आपल्या भागत निर्माण झालेल्या वस्तू वापरणं) हा स्वराज्याचा पाया होता. आपल्या देशबांधवांना स्वयंपूर्ण आणि स्वावलंबी बनवणं हे त्यांचं जीवनध्येय होतं. ते साध्य करण्यासाठी त्यांनी काही अटी ठरवल्या. स्वदेशी कापड तयार करण्यासाठी त्यांना कापडगिरण्या उभारायच्या नव्हत्या. कापडगिरणीचे मालक भांडवलदार असतात, गांधीजींचं निरीक्षण असं होतं की आपली अभिरूची कोणी उखडून टाकली नाही तर आपल्याला अंगाला चिकटणा-या तलम कापडापेक्षा खादी जास्त पसंत असेल. जीवन देणारी कलाही असते आणि मारून टाकणारी कलाही असते. मोठ्या प्रमाणावर उत्पादन करणारी यंत्रं कारागिरांमधली सृजनशीलता आणि त्यांच्या बोटांमधली संवेदनक्षमता बोथट करून टाकतात. आसाममधल्या तरूणी हातमागावर कविता विणताना पाहून गांधीजी मंत्रमुग्ध झाले होते.

गांधीजींना हातमागांचं पुनरूज्जीवन करायचं होतं. ते म्हणाले, “तुम्ही वकील असाल तर वकिली सोडून द्या आणि हातमाग चालवा. तुम्ही डॉक्टर असाल तर

आपला वैद्यकीय पेशा सोडून द्या आणि हातमाग चालवा" विणकरांशी ते स्वतः बोलत आणि हातमागांविषयी खरीखुरी माहिती मिळवत. त्यांचा भारतातला पहिला आश्रम सुरू करण्यासाठी त्यांनी अहमदाबादची निवड केली. कारण ते हातमाग उद्योगाचं केंद्र होतं. साबरमती आश्रमात त्यांनी हातमाग आणले. साबरमती आश्रमातले सर्व आश्रमवासी स्वदेशीचं व्रत घेत आणि पाळत. तिथल्या हातमागांवर तयार झालेलं कापडच ते वापरत. त्यावेळची घोषणा अशी होती, "आपल्या गरजेपुरतं कापड स्वतः तयार करा नाहीतर कापड वापरू नका." तज्ज्ञ विणकरांच्या मार्गदर्शनानं विणकामाचा वर्ग चालत असे. आणि काही आश्रमवासी तर रोज आठ आठ तास हातमाग चालवत. गांधीजी स्वतः ४५व्या वर्षी रोज चार ते पाच तास हातमागावर काम करत. प्रत्येक विणकर रोज १२ आणे मिळतील एवढं काम करत असे. सुरुवातील ३० इंच पन्ह्याचं कापड विणलं जाई ते साडी म्हणून उंचीला पुरत नसे. आश्रमातल्या स्त्रियांना पण कापडं जोडून केलेली साडी नेसावी लागे. एकदा एका महिलेनं अशा लांड्या साड्या नेसाव्या लागतात म्हणून तक्रार केली. तिला गिरणीतलं कापड वापरण्याची इच्छा होती. यावर तिच्या पतीनं गांधीजींचा सल्ला घेतला तर गांधीजींनी त्याला मोठ्या हातमागावर कापड विणणं शिकून घ्यायला सांगितलं.

त्यानंतर काही काळातच मोठ्या पन्ह्याचं कापड साडी आणि धोतरांसाठी विणलं जाऊ लागलं. इतर व्यावसायिक विणकरांनीसुद्धा हातसुताची कापडं हातमागावर विणायला सुरूवात केली पण ते कापड ते महाग विकत. गिरीणीतलं सूत हाताळणं सोपं होते त्यामुळे ते त्याला प्राधान्य देत. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर एक खादी कामगार म्हणाला की, "आता आपल्या सरकारनं सूत तयार करणा-यांना मदत द्यावी." दुसरा म्हणाला की, "विणकरांनी ठराविक प्रमाणात हातसूत निर्माण केलं नाही तर त्यांना गिरणीतलं सूत देऊ नये." गांधीजींनी अशा प्रकारच्या कल्पनांना पाठिंबा दिला नाही कारण कोणत्याही प्रकारच्या सक्तीच्या बंधनांनी, खादीबद्दल अप्रीती निर्माण होईल आणि विणकर अशा प्रकारची सक्ती मान्य करणार नाहीत. त्यांनी खादीच्या सुतात सुधारणा करण्याचा सल्ला दिला. त्यामुळे विणकरांना विणताना अडचणी येणार

नव्हत्या. विणकरांनाही त्यांनी धोक्याचा इशारा दिला की जेवढे ते गिरणीच्या सुतावर अवलंबून राहतील तेवढा त्यांचा व्यवसाय कमी होईल आणि शेवटी बंद पडेल. गिरणीमालक माणुसकीनं वागतील असं नाही आणि गिरणीच्या कापडाशी हातमागाचं कापड स्पर्धा करतं आहे असं त्यांना दिसलं तर ते विणकरांच्या गळ्याभोवतालचा फास आणखी आवळतील. त्यांनी कबूल केलं की, “इतर देशात जसं कापड विणतात तसं आपण इथे विणलं असतं तर हातसुताचं कापड विणण्यात ज्या अडचणी असतात त्या आल्या नसत्या. मी जसं सर्वांना सूतकताई शिकायला सांगितलं तसं कापड विणायला शिकण्याचा आग्रह धरला नाही ही माझी चूक झाली.”

❊❊

# सूत काढणारे

गिरणीत तयार झालेल्या सुताचं कापड विणायला गांधीजी शिकले. त्यातून त्यांचं समाधान झालं नाही कारण ते पूर्ण स्वावलंबन नव्हतं. त्यांना कापड तयार करण्यावर संपूर्णपणे प्रभुत्व हवं होतं अगदी कापूस पिकवणं, सरकी काढणं, कापूस पिंजणं यापासून सगळ्या प्रक्रियांवर. पूर्व खेड्यापाड्यात - घरोघरी चरखे असत पण आता ते धूळ खात होते त्यांना गांधीजींनी पुन्हा बाहेर काढलं. एका स्त्री कार्यकर्तीला प्रथम लहान गावात चरखा दिसला आणि तिनं गांधीजींना सांगितलं. त्यांनी ताबडतोब एका सूत कातणा-याला आश्रमातल्या सर्वांना सूतकताई शिकवायला नेमलं. चरख्याचा गुणगुणल्यासारखा आवाज त्यांना शांतवणारा वाटला. ते तेव्हा आजारपणातून बरे होत होते. नंतर ते चरखा चालवायला शिकले. रोज अर्धा तास चरख्यावर काम केल्याशिवाय जेवायचं नाही असं त्यांनी व्रत घेतलं. सूतकताई ही त्यांच्या दृष्टीनं पवित्र गोष्ट होती. त्यांनी हे व्रत अखेरपर्यंत ३० वर्षं पाळलं. प्रवासातही हलत्या गाडीत किंवा डुलत्या जहाजातही ते सूतकताई करीत. जर दिवसभर लोकांच्या भेटीगाठी, महत्त्वाच्या विषयांवर चर्चा किंवा जाहीर भाषणं यात गेला तर रात्री ते सूतकताई करत. काही महिने त्यांचा उजवा हात सतत दुखत होता पण त्यांनी डाव्या हातानं चरखा चालवत सूत काढलं.

जाहीर सभांमध्येही ते एकीकडं सूतकताईचं काम करत. गुरूदेव टागोरांनी एकदा या विषयावर गांधीजींशी दीर्घ चर्चा केली आणि ते म्हणाले, “तुम्ही खूप वेळ वाया घालवलात.” गांधीजी म्हणाले, “नाही. संभाषणात खंड न पडू देता मी सूतकताई करतो. एकेका मिनिटाला सूतकताई करताना मला वाटत असतं की माझ्या देशाच्या

संपत्तीत मी भर घालतो आहे. तर एक कोटी लोकांनी रोज तासभर सूतकताई केली तर राष्ट्रीय संपत्तीत आपण रोज ५०,००० रु. ची भर घातली असं होईल. लोकांना आपापल्या व्यवसायातून बाहेर टाकण्यासाठी चरखा नाही.

गांधीजींचा विचार असा होता की स्वतः काढलेल्या सुताची खादी वापरून गरिबांनी स्वावलंबी व्हावं आणि श्रीमंतांनी नित्यकर्म म्हणून सूतकताई करावी व ते सूत गरिबांना द्यावं. त्या काळातला हा कर्मयज्ञ करण्यातून त्यांनी एकाही भारतीयाला वगळलं नाही. रामन आणि गुरुदेव टागोर यांच्यासारख्या थोर लोकांनीही सूतकताई करावी अशी त्यांची अपेक्षा होती. राजपुत्र असो वा साधा शेतकरी असो त्यांना खायला अन्न आणि अंगावर वस्त्र लागतंच त्यामुळे त्यांनी शारीरिक श्रम केलेच पाहिजेत असा गांधीजींचा विश्वास होता. एकदा ते म्हणाले होते, “सूतकताई करताना एकेका धाग्याबरोबर मी भारताचं भवितव्य घडवतो आहे असा माझा विश्वास आहे. चरख्याशिवाय या देशाला स्वातंत्र्य मिळणार नाही. विद्यार्थ्यांना ते म्हणत, “तुम्ही एक वार खादीचं कापड वापरलंत याचा अर्थ गरिबांच्या हातात काही पैसे गेले. हाती तयार केलेलं जाडंभरडं कापड वापरणं हा जीवनातला अर्थपूर्ण साधेपणा आहे. खादी म्हणजे आपला आत्मा आहे.”

गांधीजींनी त्यांच्या आयुष्यात खादीचा दर्जा बदलण्याला प्रोत्साहन दिलं नाही. ग्राहकांच्या मागण्यांकडेही फार लक्ष दिलं नाही. त्यांना खादीला ब्लीच करणं कधी आवडलं नाही. खादी भांडारांना त्यांची सूचना अशी होती की लोकप्रिय फॅशनचे लाड करू नका लोकांमध्ये नव्या रूची निर्माण करा.

खेडेगावात जी माणसं चार ते दहा महिने निरुद्योगी असत त्यांनी चरखा चालवावा असं गांधीजींना वाटे. यंत्रयुगामध्ये गांधीजी ही चरखा चालवण्याची कला पुन्हा जिवंत करत होते याबद्दल टीकाकार त्यांना हसत. गांधीजी म्हणत, “शिवणयंत्रं आली तरी सुईनं आपली जागा त्याला दिलेली नाही. टाइपरायटर आले तरी हातानं लिहिणं सोडलेलं नाही. सूतगिरण्या आल्या तरी चरखा अगदी आतल्या खेड्यांमध्येही पोचू शकतो. गिरणी मात्र आतवर पोचू शकत नाही.”



असहकाराची चळवळ आणि विदेशी मालावर बहिष्कार घालण्यापूर्वी १९२१ या वर्षी जेव्हा गांधीजींना कोणी भेटायला येत तेव्हा ते खाली बसत. चरखा चालवत आणि कस्तुरबा आणि ते स्वतःचं कापड स्वतः कसं विणतात ते दाखवत. दिवस दिवस ते चरख्याबद्दल बोलत. त्याबद्दल लिहीत आणि सबंध देशाला स्फूर्ती देत. मोतीलाल नेहरूंनी त्यांचे सर्व परदेशी कपडे जाळून टाकले. ते खादी वापरू लागले आणि अलाहाबादच्या रस्त्यावर एकदा त्यांनी खादीची विक्री केली. हजारोंनी त्यांचं अनुकरण केलं.

१९२५ या वर्षी चरखा संघ स्थापन केला आणि ५०,००० चरखे घराघरात फिरू लागले. जवळजवल ५०,००० सूतकामगार १५०० गावांमधून काम करू लागले. याशिवाय विणकर, छपाईकामगार, रंग लावणारी माणसं आणि शिंपी सर्वांनाच काम मिळालं. टकळ्या आणि चरखे तयार करण्याचं काम खोडेगावातल्या सुतारांना आणि लोहारांना

मिळालं. चरख्यानं अशा प्रकारे समाजाला जीवन दिलं, स्त्रियांची अब्रू सांभाळली आणि भुकेल्या मुखांमध्ये घास भरवले.

पुढल्या पाच वर्षात खादीचं उत्पादन आणि विक्री वाढली आणि एक लाखाहून जास्त सूत कामगारांना काम मिळालं. प्रशिक्षणार्थींना खादी तयार करण्यामधल्या सर्व प्रक्रियांचं प्रशिक्षण दिलं जाऊ लागलं. गांधीजी म्हणाले, "ह्या छोट्या गिरणीबरोबर स्पर्धा करेल असं मला जगात काहीही दिसत नाही. चरखा संघानं गेल्या १८ वर्षात लाखो गरजू स्त्री-पुरुषांना चार कोटी रुपये मिळवून दिले. एवढं काम केलेला आणि चरखा संघाएवढंच भांडवल गुंतवलेला एकतरी उद्योग मला दाखवा." काही कुटुंबं अशी होती की त्यांनी कापसासाठी फक्त एक पैसा गुंतवला होता आणि सूत काढायला सुरुवात केली होती. दुस-या दिवशी सूत विकल्यावर हे भांडवल दुपटीनं परत मिळे आणि अशा प्रकारे हळू हळू सूत काढणा-यांना स्वतःचं कापड घेता येत असे.

कमी खर्चात जास्तीत जास्त चांगला धागा देणा-या चरख्यासाठी एक लाख रूपयांचा पुरस्कार जाहीर केला होता. गांधीजींनी येरवड्याच्या तुरूंगात असताना चरख्याला पेटीत मावण्याजोगा आकार दिला आणि ते येरवडा चक्र म्हणून सर्वांना माहीत झाला. आणखी एक स्वस्त आणि साधी टकळी धनुष्य-टकली नावानं गांधीजींनी लोकप्रिय केली त्यांनी असं शोधून काढलं की चरख्याइतक्याच वेगानं, चरख्यावर निघणा-या सुताइतकाच बारीक आणि चिवट धागा या धनुष्य टकळीवर काढता येतो. ते टकळीवरही सूतकताई करत. त्यांचा धागा फार बारीक नसे पण त्याचा पीळ चांगला आणि सारखा असे. ते स्वतः कातलेल्या सुताच्या साड्या कस्तुरबांना देत. कस्तुरबा स्वतः नियमितपणे सूतकताई करत असत.

कोणीतरी सांगितलं की सूतकताईमधून सूत कातणा-याला रोज एक किंवा दोन आणेच मिळतात. गांधीजी म्हणाले, "भारतात सरासरी उत्पन्न दर माणशी दर दिवशी तीन पैसे आहे. जर चरख्यामुळे त्यात मी तीन पैशांची भर टाकू शकलो तरी चरख्याला मी अनेकांची कामधेनू म्हणतो ते बरोबर ठरेल".

गांधीजींचा आग्रह होता की, ग्रामीण स्त्रियांना आणि इतर कताई करणा-यांना योग्य तो मोबदला मिळायला हवा कारण कधीकधी त्यांना दहा मैल चालत यावं तेव्हा ताशी दोन पैसे दरानं पैसे मिळत. कताई करणा-यांना दिवसाला कमीत कमी तीन आणे असा दर ठरवला गेला.

गांधीजी चरख्याचं मूल्य फक्त पैशाच्या स्वरूपात करत नव्हते तर ते त्याच्याकडे जनतेत शक्ती निर्माण करणारं साधन म्हणून पहात होते. चरख्यामुळे एखाद्या समूहाची शक्ती वाढते आणि लोकांना आपण एकमेकांच्या जवळचे कोणीतरी आहेत असं वाटू लागतं. चरख्यामुळे श्रमांना प्रतिष्ठा मिळते, चरखा हे शांतीचं प्रतीक आहे, स्वातंत्र्य आणि सेवेचं प्रतीक आहे. चरखा स्वस्तातल्या साध्या साहित्यातून बनतो. सहज दुरूस्त करता येतो. चरख्यामुळे हातांची कुशलता वाढते शेतीत काम करून ती वाढत नाही. चरखा बनवायला कुणा इंजीनियरची जरूरी नाही. चरखा शिकवण्यासाठीसुद्धा कुणा खास शिक्षकाची गरज नाही. ती सुंदर सर्जनशील कला आहे. अगदी झोपडीत वृद्ध अशक्त माणसांना किंवा पाच वर्षांच्या मुलाला-मुलीला देखील चरखा चालवता येतो.

एकदा एका टीकाकारानं गांधीजींना विचारलं की, एकेकाळी जे भारतीय इतकं तलम कापड यंत्रांशिवाय विणू शकत होते, ते कापड त्यांच्या गरजा पुरवून पुन्हा परदेशी जात होतं, ते भारतीय गुलाम आणि गरीब कसे झाले? गांधीजींनी उत्तर दिलं, “अनेक वर्षांपूर्वी चरख्याचा स्वातंत्र्याशी काही संबंध नव्हता. त्याला गुलामीचीच पार्श्वभूमी होती. गरीब बाया भाकरीच्या तुकड्यासाठी किंवा त्या काळच्या सरकारनं फेकलेल्या चार कवड्यांसाठी चरखा चालवत. आता आपण जास्त हुषारीनं चरखा चालवायला हवा आणि सूतकताईच्या सर्व बारीक-सारीक तपशीलांचा वैज्ञानिक दृष्टीनं अभ्यास करायला हवा. निर्जीवपणे चरख्याचं चक्र फिरवत राहणं म्हणजे जपमाळेचे मणी ओढण्यासारखंच आहे. इतकाच जर चरख्याचा यांत्रिक उपयोग केला तर तो नष्ट होण्याच्याच लायकीचा राहील.”

मूलोद्योग शिक्षणातल्या शिक्षकांना सूतकताईचं शैक्षणिक मूल्य समजावून सांगतांना ते म्हणत चरखा हे सेवेचं माध्यम आहे. ते सुतारकाम, मातीकाम, रंगकाम यासारखं व्यावसायिक काम नाही. गांधीजींनी चरख्याला सूर्याची उपमा दिली. त्याच्याभोवती इतर हस्तकला कशा फिरतात ते सांगितलं. त्यांनी हेही सांगितलं की सुताचे फेरे मोजताना मुलांना अंकगणित शिकता येईल. याशिवाय भूगोल, इतिहास आणि निसर्गाचा अभ्यासही होऊ शकेल. कापूस प्रथम कुठे निर्माण झाला. कोणत्या प्रकारच्या मातीत कापूस पिकतो, वेगवेगळ्या देशांमध्ये कापसाच्या व्यापारात कशी प्रगती झाली हे सगळं मुलांना सूतकताईच्या निमित्तानं सांगता येईल. टकळीवर सूत काततांना मुलांना हेही शिकवता येईल की टकळीचा मधला दांडा लोखंडी का असतो आणि तिची पितळी चकती विशिष्ट व्यासाची का असते, यातून त्या संदर्भातलं गणित मुलांना शिकवता येईल.

चरखा जयंतीशी संबंध जोडल्यावरच गांधीजींनी देशभर मोठ्या प्रमाणावर आपला वाढदिवस साजरा करण्याला संमती दिली. खादीचा वापर आणि सूतकताई यांची लोकप्रियता वाढवण्याची एकही संधी गांधीजींनी सोडली नाही. ते जेव्हा काँग्रेसचे अध्यक्ष झाले, त्यांनी चार आणे देऊन काँग्रेसचं सभासदत्व घेण्याऐवजी खादी विक्रीची जबाबदारी घ्यायला लोकांना सांगितलं. काँग्रेसच्या प्रत्येक सभासदानं रोज अर्धा तास सूतकताई करावी आणि दर महिन्याला ठराविक प्रमाणात हातानं काढलेलं सूत खादी बोर्डाला द्यावं असं सांगितलं जाई. त्यांच्या शेवटच्या काळात त्यांनी चरखा संघाला असं सांगितलं की जो खादी खरेदी करेल त्या प्रत्येक ग्राहकानं हाती काढलेलं थोडं तरी सूत द्यावं. तेव्हा लोकांनी खादीचं सूत तयार करण्याविषयी कुरकूर सुरू केली. तेव्हा गांधीजींनी विचारलं, "जर लोकांनी सूतकताई केली नाही तर खादी कुठून येणार?"

कापडाच्या टंचाईविषयी कोणी बोलू लागलं तर गांधीजी ते ताबडतोब खोडून काढत. भारतात गरजेपेक्षा जास्त कापूस पिकतो आणि काम करणारे हात पुष्कळ

आहेत हा त्यांचा विश्वास होता. घराघरात चरखा किंवा टकळीच्या रूपानं छोटे कापड कारखाने सुरू केले तर कापडाची टंचाई कधीही जाणवणार नाही. सूतकताई ही हळूहळू त्यांची आतली गरज बनत गेली. त्यांची अशी भावना होती की सूतकताईमुळे गरीबातल्या गरीब माणसाजवळ आपण पोचतो आहोत आणि त्याच्यामधून परमेश्वराजवळ! ते म्हणत, "चरख्याच्या मंद गतीबद्दल निराश व्हायला मला अनेक जन्म घ्यावे लागतील. तुम्ही माझा यावरून त्याग केलात किंवा मला मारून टाकलंत तरी मी चरखा सोडणार नाही."

❊❊

# बनिया

गांधीजी एकदा म्हणाले होते, "मी बनिया आहे आणि माझी हाव फार मोठी आहे. तिला काही मर्यादा नाही" जातीनं ते बनिया होते. वडलांची 'दिवाण' म्हणून गादी चालवण्यासाठी त्यांना तयार केलेलं होतं. पण ते कधी दिवाण झाले नाहीत. त्याऐवजी भिक्षेक-यासारखं ते जगले. पण त्यांच्या आतला बनिया सतत जागा होता.

ते फार काटकसरी होते आणि स्वस्त टिकाऊ आणि तरी कलात्मक वस्तूंची त्यांना पारख होती. त्यांनी सगळ्या चैनीच्या गोष्टींचा त्याग केला होता. ते स्वतः तयार केलेलं खादीचं कापड नेसत, जाडीभरडी चादर पांघरत आणि हातानं तयार केलेल्या मजबूत चपला वापरत. त्यांनी त्यांच्या पत्नीला आणि मुलांनाही साधे खादीचे कपडे वापरायला लावलं होतं. ते जेवणातही अनेक पदार्थ घेत नसत. भाकरीचे एक दोन तुकडे, भात, उकडलेल्या भाज्या, कच्ची हिरवी पानं, बकरीचं दूध, गूळ, मध आणि फळं एवढ्याच गोष्टी ते घेत. दिवसभरात पाचपेक्षा जास्त पदार्थ ते खात नसत.

गांधीजी असं मानत की भारत हा गरीब देश आहे. इथला गरीब माणूस दिवसाला फक्त एक आणा मिळवतो अशा वेळी दागिने किंवा सजावटीच्या वस्तूंमध्ये मोठ्या प्रमाणात पैसा अडकून पडणं योग्य नाही. तो गुन्हा आहे. त्यांच्या पत्नींकडे दागिने नव्हते.

भारतातली लक्षावधी गरीब मुलं महागडं शिक्षण घेऊ शकत नाहीत त्यामुळे त्यांनी त्यांच्या चारही मुलांना शाळेत किंवा कॉलेजला पाठवलं नाही. ते स्वतः त्यांचे शिक्षक बनले. त्यांनी पगार देऊन कोणी नोकर नेमला नाही आणि सर्व प्रकारचे शारीरिक कष्ट ते स्वतः करत. मातीच्या झोपडीत रहाणं त्यांना अधिक पसंत होतं. ते अनेकदा


पुनःपुन्हा भारतभर हिंडले पण तेही तिस-या वर्गाचे प्रवासी म्हणून. गाडीत ते बरोबरचे जास्तीचे कपडे किंवा कागदाचे गठ्ठे उशी म्हणून वापरत. स्वदेशी घोंगडी आणि खादीच्या चादरींनी त्यांचा बिछाना बनत असे. एकदा त्यांनी मच्छरदाणी न वापरता झोपण्याचा प्रयोग केला. रात्री झोपताना त्यांना अंगाभोवती एक चादर गुंडाळून घेतली आणि चेह-याला रॉकेल फासलं. त्यांनी असं ऐकलं होतं की गरीब शेतक-यांना मच्छरदाणी परवडत नाही त्यामुळे ते असं करतात.

जेव्हा ते चौथ्यांदा इंग्लंडला गेले तेव्हा त्यांना याची खात्री करून घ्यायची होती की इंग्रज राज्यकर्ते खरोखर भारताला स्वातंत्र्य देणार आहेत की नाही. या प्रवासतही ते बोटीवर डेकवरचे प्रवासी म्हणून प्रवास करत होते. त्यांचे सेक्रटरी आणि सहकारी सर्वांना त्यांनी सांगितलं होतं की ट्रंकभर कपडे बरोबर घेऊ नका. इंग्लंडमध्येही भारतीय पद्धतीचा धोतर, कुडता आणि सँडल्स असा वेष करण्याचं आवाहन त्यांनी केलं होतं. बोटीच्या प्रवासात एका मित्रानं गांधीजींना ७०० रुपयांची किंमती शाल भेट दिली. गांधीजींनी ती ७००० रुपयांना बोटीवरच विकून टाकली "गरिबांचा प्रतिनिधी एवढंच करू शकतो." ते म्हणत मित्रांनी मला इतक्या शाली दिल्या आहेत की मला त्यांचं एक दुकान काढता येईल. असे जमलेले सर्व पैसे ते हरिजन उद्धाराच्या कामात वापरत.

जेव्हा गांधीजी फ्रान्समध्ये उतरले तेव्हा त्यांना केवळ धोतर नेसलेलं पाहून फ्रेंचांना धक्का बसला. गांधीजी हसत म्हणाले, "तुम्ही तुमच्या देशात गरजेपेक्षा चार बोटं जास्त लांब कपडे वापरता मला गरजेपेक्षा चार बोटं कमी उंचीचे कपडे वापरणं योग्य वाटतं." काही लोकांना याचं नवल वाटत होतं की गांधीजी इंग्लंडच्या राजाला देखील त्याच पोषाखात भेटणार होते आणि एवढ्या थंडीत आणि चांगले सूट बूट घातलेल्या लोकांमध्ये त्यांच्या या अपु-या पोषाखात वावरणार होते. गांधीजी मिस्किलपणे त्यांना म्हणाले, "राजानं आम्हा दोघांच्याही वाटणीचे कपडे घातलेले असतील." गोलमेज परिषदेला ते चर्चेसाठी गेले. ऑक्सफर्ड आणि केंब्रिज विद्यापीठांमध्ये गेले,

आणि बकिंगहॅम राजवाड्यातही गांधीजी आखूड, धोतर, ठिगळ लावलेली शाल आणि चपला याच पोषाखात गेले. चर्चिल त्यांच्याबद्दल रागानं बोलताना म्हणाले, "भारताचा अर्धनग्न फकीर!" त्याचा गांधीजींना अभिमानच वाटला. लंडनमध्ये त्यांचा रोजचा जेवणाचा खर्च १२ आण्यांच्यावर नसायचा.

कोणत्याही प्रकारे वस्तू वाया घालवणं गांधीजींना अस्वस्थ करीत असे. ते म्हणत चिंध्या विकता येतात आणि दात घासण्यासाठी वापरलेल्या काड्या धुऊन वाळवून इंधन म्हणून वापरता येतात. दिवसाचे २४ तास ते कामांसाठी वापरत ते अतिशय वक्तशीर होते. कोणत्याही कामाला उशीर होत नसे. त्याचबरोबर कुठलंही काम ते घाईनं करत नसत. कमीत कमी बोलण्यावरही त्यांचा विश्वास होता. त्यांनी अनेक भाषणं केली, अनेक लेख लिहिले पण कधीही वरवरचे उथळ शब्द वापरले नाहीत. सर्व पाठकोरी पत्रं आणि पाकिटं ते जपून ठेवत. त्यांच्या आकाराप्रमाणे ते गठ्ठे बांधून हाताशी ठेवत आणि लिहिण्यासाठी त्यांचा उपयोग करत. काही महत्त्वाचे लेख, मजकूर, एवढंच नव्हे तर व्हाइसरॉय, राजे, इंग्लंडचे पंतप्रधान यांना लिहिलेली पत्रं अशा पाठको-या चिठ्ठयांवर लिहिलेली आहेत. एकदा एका मुलानं त्यांना भेट दिलेली छोटी पेन्सिल हरवली आणि एकदा त्यांनी अनेक वर्षं वापरलेला पाय घासायचा दगड हरवला तर तो शोधाशोधीनंतर सापडेपर्यंत त्यांच्या जिवाला चैन नव्हती. स्वातंत्र्यानंतर जेव्हा मंत्री आणि विधान सभा सदस्य महागडे कागद आणि ऑफिसमधली लेखन सामग्री वैयक्तिक पत्रव्यवहारासाठी वापरू लागले तेव्हा गांधीजींनी त्यांना फटकारलं होतं. त्यांनी असा इशारा दिला होता की, इंग्रजांच्या सवयी आणि लकबीचं अनुकरण आपण करत राहिलो तर आपला नाश होईलच पण आपण भारतालाही लयाला नेऊ. इंग्रजांना त्यांच्या अंकित देशांमध्ये आपला रूबाब दाखवायचा होता. त्यांच्या सर्व खर्चिक सवयी आपण सोडून दिल्या पाहिजेत. हाती बनवलेला कागद, त्यावर देवनागरी आणि उर्दूत लिहिलेला साध्या छपाईतला मजकूर असे कागद पत्र लिहायला वापरले गेले पाहिजेत. नेते हे लोकसेवक आहेत त्यांनी खर्चिक मानपत्र आणि महागडे पुष्प-गुच्छही स्वीकारता कामा नये.




गांधीजी गरिबांसाठी जो निधी जमवत त्यातून पैन्‌-पै वाचवत असत. सार्वजनिक निधीसाठी ज्या मनीऑर्डर्स येत किंवा धनादेश येत त्यांच्यावरची वटणावळही वाचवण्याचा त्यांचा प्रयत्न असे. स्वयंसेवकांनी आणि संयोजकांनी जर सार्वजनिक निधीबाबत बेफिकिरी दाखवली तर त्यांची गांधीजी चांगलीच खरडपट्टी काढत. १८९६ या वर्षात जेव्हा गांधीजींनी भारताला भेट दिली, तेव्हा भारतीय जनतेनं त्यांना एक हजार रुपये दिले. त्यांनी त्यांचा खर्च सर्व तपशीलांसकट लिहून दिला होता. त्यात अशा काही गंमतीशीर नोंदी होत्या. ट्राम १ आणा, पाणी ६ पैसे, जादूगार ८ आणे, थिएटर ४ रु.

गांधीजी नेहमी म्हणत – आपल्या चळवळीत उधळपट्टीला स्थानच नाही. स्थानिक कार्यकर्ते जर माझ्यासाठी महाग संत्री किंवा द्राक्षं आणत असतील किंवा मला १२ हवी

असताना १२० आणत असतील तर त्याचा परिणाम काय होणार? लाखो मूक लोकांचे आपण खरेखुरे विश्वस्त झालो पाहिजे. ते सल्ला देत "जिथे तुम्ही चालत जाऊ शकत असाल तिथे वाहन वापरू नका. त्यांच्या तरूणपणात स्वतः ते खूप चालत. दक्षिण आफ्रिकेत ते आश्रमापासून जवळात जवळच्या दुकानातून खरेदी करण्यासाठी काही वेळा ४२ मैल चालत असत आणि तेही काही रुपये वाचवण्यासाठी. घरून ऑफिसात आणि न्यायालयात ते रोज पायीच जात.

एकदा त्यांचं भाषण तिकीट लावून आयोजित केलं होतं. विषय होता "राष्ट्रप्रेमासाठी जातीविद्वेष आवश्यक आहे का?" त्यातून जमलेला निधी देशबंधू स्मारक निधीला देण्यात आला. गांधीजींनी त्यांचं भाषण "ईश्वर सत्यरूप आहे" प्रथमच ध्वनिमुद्रित करून दिलं. एका ग्रामोफोन कंपनीला त्यांनी ते प्रसिद्ध करण्याची परवानगी दिली. अर्ध्या तासात त्यांनी ६५,००० रू. मिळवले आणि ते हरिजन निधीला दिले. पैसे वाचवण्याइतकेच पैसे मिळवण्यातही ते वाकबगार होते. इंग्रज सरकारने जेव्हा त्यांच्या पुस्तकांवर बंदी घातली तेव्हा त्यांनी ती पुस्तकं उघडपणे विकली. पाच, दहा, पन्नास रूपयांनाही "हिंद स्वराज्य"च्या प्रती विकल्या. त्याची मूळ किंमत चार आणे होती. दांडी पदयात्रेत त्यांनी उचललेलं अर्धा तोळा मीठ त्यांच्या एका प्रशंसकानं ५२५ रु. ला विकत घेतलं. अर्धा तोळा सोन्याची किंमत तेव्हा ४० रु. होती. जगात कुठेही कुणा बनियानं मीठ अशा प्रचंड किंमतीला विकलं नसेल.

लोकं त्यांची स्वाक्षरी घ्यायला येत ते त्यांना माहीत होतं. ते स्वाक्षरीसाठी पाच रुपये मागत. एखाद्या दात्यानं भले हजारो रुपये दान दिले असतील तरी स्वाक्षरी मागायला आला तर त्याचीही सुटका नव्हती. खादीची विक्री वाढावी म्हणून गांधीजी एकदा विक्रेते झाले. उजव्या हातात वाराचीपट्टी आणि डावीकडे खादीचा ढीग. ते बिलं लिहीत गेले आणि त्यांनी थोड्या वेळात चांगली विक्री केली. ५० मिनिटात त्यांनी ५०० रुपयांची खादी विकली. आणखी एकदा प्रवासात असताना त्यांनी खादीची विक्री केली. त्यांनी आयोजित केलेल्या खादी प्रदर्शनात एका आठवड्यात ४००० रु. ची

खादी-विक्री झाली. एरवी तिथे वर्षाला ६००० रु. ची खादी-विक्री होत असे. या सगळ्या प्रयत्नांमुळे असं झालं की, खादी भांडाराची वर्षाची विक्री ४८ रु. वरून ६५,३१२ रुपयांवर गेली. काँग्रेस अधिवेशनातील हस्तकलेच्या प्रदर्शनाला भेट देणा-या सर्वांना त्यांनी हस्तकलेच्या वस्तूंचे स्वयंसेवी प्रचारक होण्याची विनंती केली.

परदेशी मालावर बहिष्कार घालण्याच्या त्यांच्या शिकवणुकीचा परिणाम असा झाला की, बंगालमधील परदेशी कापडाची विक्री ५० टक्क्यांनी घटली. इतर राज्यांतही असंच घडलं आणि परदेशी व्यापाराला फटका बसला. भारताच्या वाढत्या गरजा पाहून भारतानं आयात वाढवावी असं त्यांना वाटे. मात्र इंग्रजांचा व्यापार भारताला धोकादायक नसेल तरच त्याला परवानगी द्यावी या मतावर ते ठाम होते. खादी वापरायची आणि दुसरीकडे सगळ्या विदेशी वस्तू वापरायच्या. मोठे व्यापारी आणि कारखानदार इंग्रजांशी भागीदारी करून स्वतःच्याच देशाची लूट करायची संधी देत होते. गांधीजींना संपूर्ण भारतानं खादीची वस्त्रं वापरायला हवी होती आणि कुटिरोद्योगांना नवसंजीवनी द्यायची होती.

उन्मत्त इंग्रज सरकारकडून त्यांना कोणत्याही सवलती मिळत नव्हत्या, अनुदान मिळत नव्हतं आणि दुसरीकडे लोकांची उदासीनता त्यांना निराश करत होती तरीही त्यांना लोकांना स्वावलंबी बनवायचं होतं. अन्न, वस्त्र आणि इतर प्राथमिक गरजा भागवण्यासाठी लोकांनी स्वतः कष्ट करावेत, स्वतःची कौशल्यं वापरावीत याचं शिक्षण ते देत होते. अखिल भारतीय ग्रामोद्योग संघ आणि अखिल भारतीय चरखा संघाची स्थापना झाली आणि त्याच्या शाखा देशभर सुरू झाल्या. वर्ध्यामधल्या मगनवाडीत सूतकताई, विणकाम, कागद आणि साबण तयार करणं, चामड्यापासून वस्तू बनवणं, लोहारकाम, घाणीतून तेल काढणं, मधमाशा पाळणं, सुतारकाम, धान्य कुटणं असे अनेक उद्योग सुरु केले. ते नेहमी म्हणत आपल्या शेतात तयार झालेल्या गव्हाच्या आपल्या घरात तयार केलेल्या पोळ्या जेवढ्या स्वस्त आणि गोड लागतात तेवढी स्वस्त बाहेरची पोळी नाही मिळणार त्याचप्रमाणे स्वतःच्या घरात बनलेल्या कपडाइतकं

स्वस्त कापड कुठेही मिळणार नाही. बेकार राहिल्यानं माणसं आळशी होत जातात त्याची त्यांना सर्वांत काळजी वाटायची. संपूर्ण देशाच्या भल्याच्या दृष्टीनं त्यांनी आपली अर्थसंकल्पनाच बदलायचा प्रयत्न केला. ते म्हणत - "तुम्हाला माहीत आहे का एवढं धान्य आपल्या देशात निर्माण करूनही आपण गव्हाची आयात करतो. आपण तांदुळातलं सगळं सत्व काढून टाकून पॉलिशचा तांदूळ खातो. साखरही सत्त्वहीन करून खातो. गिरणीत दळलेली पिठं घ्यायला आपण पैसे मोजतो आणि त्यातून आजारपणं विकत घेतो. ग्रामीण तेलाची घाणी चालवणा-याला आपण आयुष्यातून उठवलं. ५० वर्षांपूर्वीचा ग्रामीण माणूस जेवढा हुषार होता किंवा अनेक गोष्टी निर्माण करू शकत होता तेवढा आज राहिलेला नाही. तो सतत देत असतो पण त्याला परत काही मिळत नाही. माझ्या योजनेत ज्या गोष्टी खेड्यात तयार होऊ शकतात त्या शहरात निर्माण करू दिल्या जाणार नाहीत." त्यांनी लोकांना स्वतःचा तांदूळ स्वतः सडून घ्यायला सांगितलं. स्वतःला लागणारा गहू स्वतः दळायला सांगितलं, साखरेऐवजी ताजा गूळ वापरायला सांगितलं आणि स्वतः सूतकताई करणं, कापड विणणं हेही करायला सांगितलं. भेटीला आलेल्या परदेशातल्या पाहुण्यांना ते ताजा गूळ खाऊन पहायला सांगत.

गांधीजींनी भारतीयांना सांगितलं की, खादीची स्पर्धा गिरणीतल्या कापडाशी आहे हे विसरून जा. "गिरणीमालक त्यांचं कापड स्वस्त करण्याच्या प्रयत्नात राहतील. पण आपण खादी निर्माण करणा-यांना न्याय देण्याचा, योग्य तो रोजगार देण्याचा प्रयत्न महत्त्वाचा मानू. नाहीतर ते नकळत केलेलं शोषणच होईल." कागदाचा कारखानदार कामगारांना सहा पैसे रोजगार देत असे आणि कागद आणखी स्वस्त करण्याची त्याची इच्छा असे. गांधीजींनी त्याला सांगितलं की याहून स्वस्त दरानं ते कागद घेणार नाहीत.

शेतकरी आणि ग्रामीण कारागिरांचं शोषण करणा-या दलालांना वगळण्याचा गांधीजींचा प्रयत्न होता. त्यांना माहीत होतं की मातीत राबणा-यांना त्यांच्या उत्पादनाचं

मूल्य मिळत नव्हतं. गि-हाइकानं दिलेल्या किंमतीचा थोडाच हिस्सा त्यांच्यापर्यंत पोचत होता. शेतमालाच्या किंमती हा त्यांचा प्रश्न नव्हता. फक्त मध्यस्थ किंवा दलाल हा प्रश्न होता. अन्न आणि वस्त्र कोणत्याही प्रकारच्या निर्बंधाच्या ते विरोधात होते. बनिया मंडळींच्या काळ्या बाजारात आणि अतिरिक्त नफा कमावण्याचा नेहमी त्यांनी धिक्कार केला. लोकांची फसवणूक करून संपत्ती जमा करणा-या व्यापा-यांना त्यांनी नेहमी दूषणं दिली. अशा प्रकारे वाईट मार्गांनी मिळवलेली संपत्ती धार्मिक कारणांकरता किंवा सार्वजनिक कामांसाठी दान देण्यातून त्यांच्या पापांमधून त्यांची सुटका होईल अशी कल्पना असेल तर ते खोटं आहे असं ते म्हणत. ते बनियांना उद्देशून म्हणत, ''मोठे व्यापारी आणि भांडवलदार इंग्रज सरकारविरुद्ध बोलतात पण प्रत्यक्ष कृतीत ते इंग्रज सरकारच्या म्हणण्याप्रमाणेच वागतात. सरकार ९५ टक्के नफा कमावतं तर हे ५ टक्के पण नफाच कमावतात. स्वदेशीची चळवळ यशस्वी झाली नाही कारण भारतीय व्यापा-यांनी परदेशी माल स्वदेशी म्हणून विकला. भारताचा पराभव भारतीय व्यापा-यांनीच केलेला आहे आणि त्यांच्या माध्यमातूनच आपण ही चूक सुधारू याची मला खात्री आहे.

❊❊

# शेतकरी

गांधीजींनी एक कविता वाचली. त्यात शेतक-याला जगाचा पिता म्हटलं होतं. परमेश्वर जगाचा दाता आहे तर शेतकरी त्याचा हात आहे. भारताचं स्वातंत्र्य शेतक-यांच्या दारिद्र्यातून आणि अज्ञानातून मुक्तीमध्ये दडलेलं आहे यावर त्यांचा विश्वास होता. "७५ टक्क्यांच्यावर जनता जमिनीत राबणारी आहे. जमीन कसणाराच खरा जमिनीचा मालक आहे, गैरहजर जमीनमालक नाही. सब भूमी गोपालकी. जर आपण शेतक-यानं निर्माण केलेलं सगळंच त्यांच्यापासून हिरावून घेणार असलो, तर आपलं सरकार निर्माण होण्याची आशा सोडावी लागेल. शेतकरीच आम्हाला स्वातंत्र्य मिळवून देऊ शकतात. वकील, डॉक्टर्स, श्रीमंत जमीनदार ते सुरक्षित ठेवू शकत नाहीत.

राज्याच्या एकूण करापैकी २५ टक्के कर शेतक-यांकडून वसूल केला जाई. जमिनीवरच्या कराचं ओझं मोठं होतं. शहरात जेव्हा राजवाड्यांसारख्या खर्चिक इमारती बांधल्या जाताना दिसत तेव्हा गांधीजी दुःखानं म्हणत, "शेतक-यांनी मिळवलेल्या पैशातून हे सगळं चाललं आहे" शहरी समृद्धीची अशी प्रतीकं बघितली की त्यांना कराखाली दडपलेले शेतकरी, बेकायदेशीर मागण्या, कधीही परत न फेडली जाणारी कर्जं, निरक्षरता, अंधश्रद्धा, रोगराई हे सगळं डोळ्यांपुढे उभे राहत असे.

गांधीजी जन्मानं शेतकरी नव्हते पण शेतकरी होण्यासाठी त्यांनी सर्व प्रयत्न केले. शाळकरी वयात त्यांना फळांची झाडं लावायला आवडत. रोज संध्याकाळी शाळेतून आल्यावर ते पाण्याच्या बादल्या घेऊन गच्चीत जात आणि झाडांना पाणी घालत. ३६व्या वर्षी त्यांनी शेतावर शेतक-याचं जीवन जगायला सुरुवात केली. आश्रमासाठी जागा शोधताना फळझाडं असलेली एक एकर जागा त्यांना पसंत पडली. त्यांनी ती

विकत घेतली आणि तिथे त्यांच्या परिवारासह आणि मित्रांसह रहायला गेले. हळूहळू त्यांनी शेती करायला सुरुवात केली आणि पांढरपेशा व्यवसाय सोडून दिला. शेतावरच्या त्यांच्या सहका-यांनी झोपड्या बांधल्या. गांधीजी जमीन नांगरत असत, पाणी काढत, भाज्या आणि फळांची लागवड करत, लाकूड तोडत. लवकरच त्यांनी त्या जमिनीचं फळबागेत रूपांतर केलं.

दक्षिण आफ्रिकेत दहा वर्षं ते शेतावर राहिले. त्यातून त्यांना शेतीचा चांगला अनुभव आणि ज्ञान मिळालं. त्यांनी मधमाशापालनाची नवीन पद्धत शोधून काढली आणि लोकप्रिय केली. ती अहिंसक होती आणि अधिक शास्त्रीयही होती. त्यात मधमाशा किंवा पोवळं उध्वस्त होत नसे. शेतीच्या किंवा फळांच्या, भाज्यांच्या शेताजवळ जर मधमाशापालन केलं तर जास्त उत्पन्न कसं मिळतं हे ते समजावून सांगत. मधमाशा मध गोळा करायला जेव्हा फुलांवर जातात तेव्हा त्यांचे परागकण त्यांच्या पायाला चिकटून दुसरीकडे जातात आणि त्यातून उत्पादनाचा दर्जा उंचावतो आणि उत्पादन वाढतं.

जमीन नापीक आहे, पाणी पुरेसं नाही, चांगली अवजारं नाहीत या सगळ्या तक्रारी गांधीजींनी निकालात काढल्या. आपल्या श्रमांचा कल्पकतेनं वापर करणं ही शेतक-याची सर्वात मोठी शक्ती होती शेतकरी उत्साही, कल्पक आणि स्वावलंबी असायला हवा. एकदा एका ‘नई तालीम’च्या संयोजकानं तक्रार केली की, त्यांना दिलेली जमीन शेतीयोग्य नाही तेव्हा गांधीजी म्हणाले, “दक्षिण आफ्रिकेत कशा प्रकारची जमीन आम्हाला मिळाली होती हे तुला माहीत नाही. मी तुझ्या जागी असतो तर मी सुरुवातीला नांगर वापरला नसता. मी मुलांच्या हातात खुरपी दिली असती आणि त्यांना ती वापरायला शिकवली असती. ती कला आहे. बैल नंतर वापरता येतील. माती आणि कंपोस्ट खताचा लहानसा जरी थर असला तरी तो आपल्याला भाज्या काढायला उपयोगी पडेल. मानवी विष्ठेपासून १५ दिवसांत खत निर्माण होऊ शकतं. त्यासाठी चर खणावे लागतील. आपल्या मुलांना शेतीकाम हे मोठं सन्मानाचं काम आहे हे शिकवायला हवं. शेतीत काम करणं कमी दर्जाचं तर नाहीच उलट तो



मोठा मानाचा व्यवसाय आहे." मूलोद्योग शिक्षणाच्या योजनेत शेतीचा भाग फार मोलाचा आहे हा गांधीजींचा विचार होता.

भारताची फाळणी होण्यापूर्वी थोडंसंच आधी नोआखलीतल्या हिंदूंनी त्यांना विचारलं, "आम्ही इथे कशाच्या आधारावर रहायचं? मुसलमान शेतकरी आम्हाला सहकार्य करत नाहीत. त्यांचे बैल, नांगर आम्हाला देत नाहीत. गांधीजी म्हणाले, "काही कुदळ, फावडी जमवा आणि खणायला सुरुवात करा. कुदळींनी खणलेल्या जमिनीतून कमी पीक येतं असं काही नाही."

१९४३ या वर्षी गांधीजी जेव्हा तुरुंगात होते तेव्हा बंगालमध्ये लाखो भूकबळी झाले. त्या भयंकर आठवणी लोकांच्या आणि सरकारी अधिका-यांच्या मनात ताज्या होत्या. १९४७ या वर्षी जेव्हा पुन्हा दुस-या दुष्काळाची लक्षणं दिसू लागली तेव्हा व्हाइसरॉयनं गांधीजींचा सल्ला घेण्यासाठी आपल्या सचीवांना सेवाग्रामला विमानानं पाठवलं. गांधीजी जराही विचलित झाले नाहीत आणि त्यांनी जनतेला सांगितलं की

दुष्काळाची भीती मनातून काढून टाका. बंगालमध्ये भरपूर सुपीक जमीन आहे. पुरेसं पाणी आहे आणि काम करणा-या हातांचा तुटवडा मुळीच नाही. अशा परिस्थितीत अन्नाचा दुष्काळ कसा पडेल? लोकांना स्वावलंबी बनण्याचं शिक्षण द्यायला हवं. दोन दाणे खाणा-यानं चार उगवले पाहिजेत. प्रत्येकानं खाण्याजोगं काही स्वतः निर्माण करायला हवं. यासाठी सर्वात सोपा मार्ग म्हणजे स्वच्छ माती घ्या, त्यात नैसर्गिक खत मिसळा, थोडंसं वाळलेलं शेणही चांगल्या खताचं काम करतं, एखाद्या मातीच्या कुंडीत किंवा पत्र्याच्या डब्यात ते घाला आणि काही भाज्यांच्या बिया त्यात पेरा. रोज पाणी घाला. सर्व दिखाऊ समारंभ बंद करायला हवेत. बियाणं निर्यात करणं बंद करायला हवं. गाजरं, रताळी, बटाटे, सुरण, केळी यांच्यापासून पुरेसे पिष्टमय पदार्थ मिळतील. यामागची कल्पना अशी की, सध्या जेवणातून धान्य आणि डाळी वगळून साठवून ठेवायच्या." त्यांच्या स्वावलंबनाच्या आवाहनात लोकांनी निर्धारानं काम करणं, शिस्त पाळणं आणि कष्ट करणं, नवीन प्रकारच्या खाण्याच्या सवयींशी जुळवून घेणं आणि परदेशातून भीक न मागवणं हे अपेक्षित होतं.

जेव्हा अन्न आणि वस्त्रावर निर्बंध होते तेव्हा गांधीजींना सरकारी कोट्यातून धान्य मागण्याची गरज नव्हती. ते गहू, तांदूळ, डाळी आणि साखरेशिवाय राहू शकत होते आणि स्वतःचं कापड स्वतः तयार करत होते.

'हरिजन' मध्ये त्यांनी आजूबाजूला उपलब्ध असलेल्या टाकाऊ वस्तूंमधून कंपोस्ट खत कसं तयार करावं याबद्दल तपशीलवार सूचना दिल्या होत्या. गाईचं शेण, माणसांचं मल-मूत्र, भाज्यांच्या साली, पाण्यावर उगवणारी हायसिन्थ ही वनस्पती या सर्वांचा उपयोग करता येतो. कंपोस्ट खत कुठल्याही भांडवलाशिवाय स्वतःचे श्रम आणि कल्पकता वापरून करता येतं. आश्रमात मल-मूत्रापासून खत तयार करण्यासाठी जमिनीत उथळ खड्डे केलेले असत. जमिनीच्या वरच्या एक फुटापर्यंतच्या थरातले जंतू मल-मूत्राचं खत तयार करतात. जर हा कचरा खोल खड्ड्यात पुरला तर त्यातून दूषित वायू बाहेर पडतात आणि हवेत प्रदूषण पसरवतात. उथळ खड्ड्यांमधे काही दिवसातच त्याचं चांगलं खत होतं. या कामाला शेतकरी भंगी-कम-शेतकरी काम

म्हणत. ते त्यांना फारसं आवडलं नाही. गांधीजींना रासायनिक खतांपेक्षा नैसर्गिक खतं जास्त पसंत होती. पीक लवकर मिळावं म्हणून रासायनिक खतांचा वापर त्यांच्या मते धोकादायक होता. त्यांच्यामुळे जादूसारखा परिणाम दिसण्याऐवजी जमीन कायमची नापीक होण्याची शक्यता जास्त होती.

त्यांना बैलांनी ओढण्याच्या नांगराच्या जागी ट्रॅक्टरही मान्य नव्हता. साबरमती आश्रमात त्यांनी सर्व सुधारित नांगर वापरून पाहिले पण जुना बैलांचा नांगरच सर्वात सोयीचा ठरला. तो मातीचं रक्षण करत असे कारण तो बी पेरण्याइतकंच खोलवर खणत असे पण त्याखाली जाऊन नुकसान करत नसे. त्याहूनही ट्रॅक्टरमुळे शेकडो माणसांची शेतीच्या कामातून हकालपट्टी होईल हे त्यांना मुळीच आवडणारं नव्हतं. त्यांना माणसं उत्पादनाच्या कामात गुंतलेली हवी होती. यांत्रिक अवजारं शेतक-यांमधल्या सृजनक्षमता बोथट करतील अशी त्यांना भीती होती. प्रत्येकानं आपली लहान लहान शेतं नांगरत बसायची पारंपरिक पद्धत त्यांना पसंत नव्हती कारण "शंभर कुटुंबांनी एकत्र शेती करून आलेलं उत्पन्न वाटून घेणं जमिनीचे शंभर लहान लहान तुकडे करण्यापेक्षा केव्हाही चांगलं होतं. गावात प्रत्येकाकडे बैल आणि बैलगाडी असणं यात फार नुकसान होतं." त्यांनी सहकारी पद्धतीनं पशुपालनाचाही पुरस्कार केला. या एकत्रित पद्धतीनं सर्व जनावरांना योग्य ती वैद्यकीय मदत मिळेल, सर्वांचं मिळून एक चराई कुरण राखता येईल आणि अनेक गाईंसाठी योग्य तो वळू निवडता येईल. सामान्य शेतक-याला ह्या सोयी मिळू शकत नाहीत. गुरांच्या चा-यालाच त्यांच्या पासूनच्या उत्पन्नापेक्षा जास्त खर्च येतो. गुरांची संख्या वाढली की, गरिबीच्या ताणांमुळे शेतकरी वासरं विकतो, खोंडं मारून टाकतो किंवा त्यांना उपाशी मारतो. तो गुरांना नीट वागवत नाही आणि क्रूरपणे त्यांच्याकडून मेहनत करून घेतो.

गाईच्या संरक्षणावर गांधीजींनी विशेष भर दिला. गाय ही शेतीच्या अर्थव्यवस्थेत सर्वात मूल्यवान असते. जेव्हा गांधीजी भारतभर यात्रा करत तेव्हा शेतक-यांचे मलूल डोळे आणि गाईंची दयनीय अवस्था पाहून ते निराश होत, "भारतात गाईला आदरानं

गोमाता म्हणतात पण तिला इतकं वाईट वागवणारा दुसरा कुठलाही देश नसेल. मुसलमान लोक गाई मारतात म्हणून त्यांच्याशी वैर करणं हा आता त्या आदराचा भाग झाला आहे आणि तिच्या स्पर्शानं स्वतःला पवित्र करून घेणं हाही त्याचाच भाग आहे. अनेक पांजरपोळ आणि गोशाला गाईंच्या छळाच्या छावण्या झाल्या आहेत." पांजरपोळांनी भाकड आणि आजारी जनावरांची देखभाल करावी आणि पशुपालनाचं मार्गदर्शन करावं अशी त्यांची अपेक्षा होती. गाईचं दूध आणि लोणी म्हशीपेक्षा अधिक चांगल्या दर्जाचं असतं म्हणून त्यांना ते जास्त पसंत होतं. त्याशिवाय गाय मेल्यानंतरही तिची कातडी, हाडं, मांस, कातडी यांचा उपयोग होतो.

आश्रमातल्या गोशाळेला गांधीजींनी चांगला वळू ठेवला होता आणि एक कमी खर्चाचा तरीही आदर्श गोठा तयार केला होता. गोशाळेच्या प्रत्येक बारीकसारीक कामात त्यांचं लक्ष असे. सर्व नवजात वासरांना ते प्रेमानं थोपटत. एकदा एका वासराला असाध्य रोगानं पछाडलं. कोणताही वैद्यकीय उपाय उपलब्ध नव्हता. गांधीजींनी त्याचं आयुष्य संपवायचं ठरवलं आणि डॉक्टरांनी जेव्हा त्याला कायमच्या झोपेचं इंजेक्शन दिलं तेव्हा गांधीजी त्याचा खूर हातात धरून बसले होते. अहिंसेच्या पुजा-यानं ही हिंसा करावी याचा अनेकांनी निषेध केला. एका जैनानं तर हे पाप गांधीजींच्या रक्तानं धुण्याची धमकी दिली. गांधीजींनी शांतपणे या वादळाला तोंड दिलं.

माकडं जेव्हा आश्रमातली पिकं, फळं, भाज्या यांची नासाडी करत तेव्हा त्यांना मारून टाकण्याचा प्रस्ताव गांधीजींनी मांडला आणि आणखी एकदा अहिंसेच्या अंध पुजा-यांना धक्का दिला. ते म्हणाले, "मी स्वतः शेतकरी आहे त्यामुळे पिकं वाचवण्यासाठी मला कमीत कमी हिंसेचा मार्ग स्वीकारणं भाग आहे. माकडांचा त्रास आता गळ्याशी आलेला आहे. माकडं आता बंदुकीच्या गोळ्यांनाही घाबरत नाहीत. उलट बंदुकीचे बार ऐकून अधिकच ओरडा करतात. जर इतर काही मार्गच उरला नसेल, तर मी खरोखरच त्यांना मारून टाकण्याचा विचार करतो आहे." एरवी कधीही माकडांना आश्रमात कुणी मारत नसे.

गरीब शेतक-याचं उत्पन्न कसं वाढवायचं हीच गांधीजींना सततची चिंता होती. वर्षातून चार ते दहा महिने त्यांना काम नसायचं. नुसत्या शेतीवर भागत नसे. तीस कोटी लोकांचा हा निरुद्योगी वेळ कामी लावण्यासाठी त्यांनी स्त्रियांना घरात चरखा देऊन आणि पुरुषांना हातमाग देऊन प्रयत्न केला त्यांना या अशिक्षित, अर्धनग्न, कुपोषित शेतक-यांचे उत्पन्न वाढवायचं होतं आणि त्यांना अशा पातळीवर आणायचं होतं की जिथे त्यांना चौरस आहार, राहण्याजोगतं घर, अंगभर कपडे आणि योग्य शिक्षण मिळेल. त्यांच्यात प्रतिकाराची शक्तीही निर्माण व्हायला हवी. शेतकरी-कामकरी प्रजा रक्षणासाठी ते उभे राहिले आणि म्हणाले, “जेव्हा शेतक-यांना आपल्या सामर्थ्याची जाग येईल आणि जेव्हा त्यांना कळेल की त्यांच्या “नशिबानं” त्यांना या हतबल अवस्थेत लोटलेलं नाही, तेव्हा तो कायदेशीर काय अन् बेकायदेशीर काय याचा विचार करणार नाही. स्वराज्याचा खरा अर्थ जेव्हा शेतक-यांना कळेल तेव्हा त्यांना त्यापासून दूर ठेवण्याचं धाडस कोणीही करणार नाही.”

गांधीजींच्या नेतृत्वाखाली शेतक-यांनी असहकाराची चळवळ सुरू केली, कायद्यानं बंदी असूनही मीठ बनवलं, सार्वजनिक सभांमधून स्वातंत्र्याची शपथ घेतली. सरकारी कर न भरण्याच्या आंदोलनात त्यांच्या जमिनी, मालमत्तेवर जप्ती आली, त्यांचं पैशांचं नुकसान झालं पण त्यांची नैतिक उंची वाढली.

❋❋

# लिलाव करणारे

गांधीजींना महात्मा म्हणणं किंवा त्यांच्या पाया पडणं हा गुन्हा ठरवावा अशी गांधीजींची इच्छा होती. त्यासाठी ते एखादं बिल पास करून घेण्यालाही पाठिंबा देणार होते. पण त्यांना ते नायक म्हणून शहरात, खेड्यात होणारं स्वागत टाळता आलं नाही. काही ना काही चांगलं काम करण्याच्या निमित्तानं ते गावोगावी जात राहिले, जनतेच्या संपर्कात राहिले. सगळीकडे त्यांचं भरभरून भक्तीनं आणि प्रेमानं स्वागत व्हायचं. त्यांना पुष्पगुच्छ दिले जात, हार घातले जात, लोक त्यांना उंची चौकटीतली मानपत्रं देत, किंवा थैल्या, दागिने, दागिन्यांच्या पेट्या देत. गांधीजींनी या प्रेमाचं कौतुक केलं पण त्यांना हारतुरे, झेंडे, मानपत्रं यात होणारी पैशाची उधळपट्टी अमान्य होती. ते म्हणत "जिथे सामान्य माणसाचं दिवसाचं सरासरी उत्पन्न तीन पैसे आहे तिथे ही उधळपट्टी काय कामाची?"

लोकांना त्यांनी हे सगळं थांबवायला सांगितलं पण काही उपयोग झाला नाही. या वाया जाणा-या गोष्टीचं रूपांतर त्यांना उपयोगी संपत्तीत करायचं होतं. त्यांच्या मनात एक कल्पना चमकली. लोक त्यांना पैसे द्यायला तयार होते पण त्यांना सार्वजनिक रीत्या दान करण्याची अधिक चांगली संधी का देऊ नये? त्यांनी सर्व भेटवस्तूंचा लिलाव करायचं ठरवलं. विशेषतः फुलांसारख्या अल्पजीवी वस्तूंचा. सार्वजनिक सभांमध्ये व्यासपीठावर बसलेले गांधीजी म्हणत, "इथे कुणी छोट्या मुली नाहीत त्यामुळे या हारांचं काय करावं ते मला कळत नाही. कुणी हा हार विकत घेईल का? ते आनंदानं घोषणा करत – दोन रुपये एक वार, तीन रुपये, पाच रुपये.... आणि लिलावाची रक्कम वाढत जाई, एखादा हार किंवा लिंबू विकत घ्यायला. कधी कधी हाराचे ३०

रु. मिळत तर कधी ३०० रु. खेड्यातही लोक लिलावाची बोली करण्यात मागे नव्हते. एकदा गांधीजींनी एक दागिन्यांचा डबा उचलला आणि म्हणाले, "याची किंमत रु. २५० आहे. नाही नाही मी चुकून म्हणालो. याची किंमत ७५ रु. आहे जेव्हा कोणीतरी ३०० रु. देऊ केले तेव्हा ते म्हणाले, "३०० रु.....३०० रु. चला, मला आणखी पैसे हवेत. पूर्वी मला अशा पेटीला १००० रु. मिळाले होते." कलकत्त्याच्या नागरिकांनी त्यांना तीन प्रसंगी सुंदर भारी पेट्यांमध्ये मानपत्र दिलं आणि त्यांनी त्या सगळ्यांचा लिलाव केला. ते म्हणाले, "या गोष्टींचा लिलाव करून मी त्यामागच्या प्रेमाला कमी लेखतो आहे असं कृपया समजू नका. मी तर माझ्याबरोबर ट्रंका नेत नाही. मला ह्या पेट्या नेणं शक्य नाही. आश्रमातही त्या ठेवायची काही सोय नाही. त्यामुळे मला असा लिलाव करणं यात काही चुकीचं वाटत नाही. लिलावात एक मोकळी निरोगी ईर्षा असते, एखाद्या चांगल्या कामाला मदत करण्यासाठी माणसामध्ये जे औदार्य असतं ते जागं करण्याचा हा साधा मार्ग आहे आणि हे पण लक्षात घ्या की माझ्या लिलावात भाग घेणारे लोक उगाच मला खूष करण्यासाठी म्हणून काही प्रचंड किंमत देत नाहीत"

कधी क्वचितच असं घडत असे की, गांधीजींच्या उदारपणे देण्याच्या आवाहनाला श्रोत्यांनी प्रतिसाद दिला नाही. त्यांनी लिंबू १० रु. ला विकलं, सुताचा हार २०१ रु.ना, सोन्याची टकळी ५००० रु. ना, दागिन्यांची पेटी १००० रु. ना विकली. एका संस्थेची पायाभरणी केल्यावर त्यांनी ते घमेलं आणि फावडं १००० रु. ना विकलं. एकदा लिलावात समोर एक छोटा मुलगा होता. त्याच्या गळ्यात सोन्याचं लॉकेट होतं. गांधीजींनी तिकडे हात दाखवला. आईनं मुलाला उचललं गांधीजींनी मुलाला थोपटलं आणि त्याचं लॉकेट काढून त्याचा लिलाव केला.

एकदा त्यांनी घोषित केलं की, "माझ्याकडे पुष्कळ अंगठ्या जमलेल्या आहेत आणि मला त्या सगळ्या विकून टाकायच्या आहे." तीनदा लिलाव पुकारल्यावर अंगठी ४४५ रु. विकली गेली. एरवी त्या अंगठीची खरी किंमत ३० रु. होती. एकदा

त्यांना त्यांच्याकडे जमा झालेल्या नोटांमध्ये आणि चांदीच्या, तांब्याच्या नाण्यांमध्ये एक कवडी मिळाली. गांधीजींना तिचं फार कौतुक वाटलं, "एखाद्या गरीब माणसाकडे द्यायला काहीच नसावं त्यामुळे त्यानं ही कवडी दिली असेल. त्यानं त्याचं सर्वस्व दिलेलं आहे. हे त्यागाचं प्रतीक आहे. त्यामुळे त्याचं मोल सोन्यापेक्षा जास्त आहे" आणि खरोखरच तो सोन्यापेक्षा जास्त मोलाची आहे हे सिद्ध झालं. लिलावात एकानं तिचे १११ रु. दिले.

सतत प्रवासाचे ताण-तणाव, भरगच्च कार्यक्रम किंवा अनेक गुंतागुंतीच्या प्र नांचं ओझं असलं तरी गांधीजींच्या उत्साहाचा झरा कधी आटला नाही किंवा त्यांचं बनियेपण हरवलं नाही. ७८ व्या वर्षी हिंदू-मुसलमानांमधला तणाव आणि जातीय दंगली यांनी त्रस्त झाले असतानाही गांधीजी बिहारला गेले, दंगलग्रस्त मुसलमानांसाठी त्यांनी निधी गोळा केला आणि भेट म्हणून मिळालेल्या दागिन्यांचा लिलाव केला.

गांधीजींकडे त्यांचे स्वतःचे काहीही पैसे, मालमत्ता नव्हती. ते गरीब आश्रमवासी म्हणूनच रहात. एकदा त्यांनी एक तांब्याचा पैसा सार्वजनिक निधीला दिला. या प्रसंगाची आठवण म्हणून गांधीजींच्या एका भक्तानं तो ५०० रु. ला खरेदी केला आणि जवळ ठेवला.

❊❊

# भिकारी

गांधीजी सार्वजनिक कामात जास्त जास्त गुंतत गेले आणि कुटुंबाकडे किंवा वकिलीकडे लक्ष द्यायला त्यांना वेळ मिळेनासा झाला. त्यांच्या असं लक्षात आलं की जनतेची सेवा करायची असेल तर आपण होऊन गरिबीचं व्रत घ्यायला पाहिजे, सर्व सुखसोयी आणि चैनीच्या गोष्टी सोडून द्यायला पाहिजेत, स्वतःची सर्व संपत्ती, मालमत्ता यांचा त्याग केला पाहिजे. एक वेळ अशी आली की, त्यांना स्वतःची मालमत्ता हा गुन्हा वाटू लागला आणि तिचा त्याग करणं ही मोठा आनंद देणारी घटना ठरली. एकापाठोपाठ एक गोष्टी त्यांच्यापासून दूर गेल्या. त्यांनी आपल्या वाडवडिलार्जित मालमत्तेवरचा हक्क सोडला. त्यांच्या आयुर्विम्याचे हप्ते बंद केले. ज्या वकिलीतून महिना रु. ४०००/- मिळत ती वकिली बंद केली. त्यांना दक्षिण आफ्रिकेत भेटीदाखल मिळालेलं सोनं, चांदी, हिरे आणि फीनिक्स आश्रमाची किंमत रु. ६५,००० या सगळ्याचा सार्वजनिक कामासाठी विश्वस्त निधी निर्माण केला. त्यांनी स्वतः जीवनातली सुरक्षितता नाकारली आणि स्वतःची पत्नी, मुलगे आणि नातेवाईकांनाही कठोरपणे ती नाकारायला लावली.

त्यांच्या आयुष्याची शेवटची ४० वर्षं ते मित्र आणि भक्तांनी स्वेच्छेनं दिलेल्या दानावरच जगले. टॉलस्टॉय आश्रमातही गांधीजी आणि त्यांचा परिवार यांचा खर्च त्यांचे जर्मन मित्र कालनबाख चालवत. भारतातले सर्व आश्रम दानावरच चालत.

पंडित मालवीयांना भिका-यांचे राजपुत्र म्हणत तर गांधीजी भिका-यांचे राजा होते. सार्वजनिक कारणासाठी भिक्षांदेही करणा-यांच्या इतिहासात गांधीजींनी जागतिक उच्चांक निर्माण केला. दक्षिण आफ्रिकेत त्यांना स्वतःमधल्या या क्षमतेचा शोध लागला.

तेव्हा त्यांच्यावर नाताळ भारतीय काँग्रेसच्या सभासदांनी दिलेल्या वर्गण्या गोळा करण्याची जबाबदारी होती. एकदा संध्याकाळी उशीरा ते एका श्रीमंत दात्याकडे गेले. त्यांना ८० रु. घ्यायचे होते. पण सर्व मार्गांनी विनंत्या करूनही त्यांनी फक्त ४० रु. दिले. गांधीजींना भूक लागली होती. ते दमले होते पण ते चिवट होते. ते रात्रभर तिथे बसले आणि सकाळी त्यांना ८० रु. मिळाले.

दक्षिण आफ्रिकेत स्थायिक झालेल्या भारतीयांच्या ऐतिहासिक झगड्यामध्ये सामील झालेले ५००० विरोधक आणि त्यांची कुटुंबं यांना मदत करण्यासाठी निधी उभारण्याची जबाबदारी गांधीजींवर होती. रोजचा खर्च ३२०० रु. होता. गांधीजींच्या मागणीला भारतातून चांगला प्रतिसाद मिळाला. राजपुत्रांनी आणि व्यापा-यांनी पैसे पाठवले. काँग्रेस अधिवेशनात गांधीजींच्या मोहीमेसाठी मदतीचं आवाहन केल्यावर लोकांनी नोटांचा आणि सोन्या-चांदीचा अक्षरशः वर्षाव केला.

गांधीजींनी सर्व देणग्यांच्या पावत्या दिल्या आणि खर्चाचा तपशीलवार हिशेब सादर केला. दात्यांच्या भावनांचा ते नेहमी आदर करीत आणि ज्या मदतीसाठी देणगी आली असेल त्या व्यतिरिक्त कोणत्याही कारणासाठी एक पैसासुद्धा वापरत नसत. सार्वजनिक पैसा योग्य प्रकारे खर्च करण्याबाबत ते फार जागरूक होते. जेव्हा काही लोकांनी आव्हान दिलं तेव्हा त्यांनी टिळक स्वराज्य फंडाचे हिशेब टीकाकारांनी तपासावेत असं आमंत्रण दिलं. कारण टिळक स्वराज्य फंडातून तीन महिन्यात एक कोटी रुपये जमवण्याचं लक्ष्य होतं. एका मित्रानं विनंती केली की, गांधीजी एका नाटकाला दहा मिनिटं जरी आले तरी, त्यातले नट ५०,००० रु. देतील. गांधीजींनी ही विनंती मान्य केली नाही तरीही एक कोटी पंधरा लाख रुपयांचा निधी जमला. ते नेहमी म्हणत, “हजारो श्रीमंत लोकांचं या मोहिमेत स्वागतच आहे. तरीही गरीबांकडून आलेल्या एकेका पैशानं, एकेका रुपयानं कार्याला खरा आशीर्वाद मिळतो. जाणतेपणानं दिलेला एक पैसा म्हणजे दात्यानं स्वराज्याबद्दल व्यक्त केलेला निर्धार आहे. गरीब वृद्ध माणसं त्यांच्या थरथरत्या बोटांनी घट्ट बांधून ठेवलेले पैसे गाठी सोडून देणगीदाखल

देत तेव्हा ते दृश्य गांधीजींच्या मनात कोरलं जाई. स्वखुशीनं त्यांनी आपली बचत त्यांच्या सुपूर्द करणं याचं गांधीजींना फार कौतुक वाटे. टिळक स्वराज्य फंडाखेरीज गांधींनी काहींच्या स्मृतींसाठी फंड जमवले. त्यात हुतात्मा झालेली वलिअम्मा ही मुलगी, गोखले, लजपत राय, देशबंधू दास, ॲन्ड्रयूज आणि जालियनवाला बागेचे हुतात्मा होते. त्यांनी लोकांना सांगितलं होतं की, जालियनवाला बाग स्मारक उभं करण्यासाठी लागणारा निधी जर ठरलेल्या वेळेत जमा झाला नाही तर ते त्यांचा आश्रम विकतील आणि जेजे देणं शक्य आहे ते सगळं देतील. दोन महिन्यात दहा लाख रुपये जमा झाले, देशबंधू स्मारक निधीसाठी. त्यांना जेव्हा कळलं की रविन्द्रनाथ टागोर शांतिनिकेतनसाठी पैसे जमा करण्यासाठी त्यांच्या नाटकांचे प्रयोग घेऊन देशभर हिंडत आहेत, त्यांनी त्या वयस्कर कविवर्यांचं मन वळवलं आणि त्यांचा दौरा थांबवण्याची विनंती केली. त्यांना पहिला हप्ता म्हणून ५०,००० रु. ची देणगी दिली.

जेव्हा पूर येत, दुष्काळ पडे, भूकंप होत तेव्हा हा महात्मा भिक्षा मागायला बाहेर पडे. खादीच्या प्रचारासाठी आणि अस्पृश्यतेचं पाप धुऊन काढण्यासाठी त्यांनी भारतभर झंझावाती दौरे केले. हरिजन फंडासाठी त्यांनी दोन कोटींपेक्षा जास्त रुपये जमा केले. जर गरजूंना जेवण देण्यासाठीच कुणी पैसे देत असेल तर गांधीजी ते नाकारत असत. त्यांचा असा विश्वास होता की, माणसाची खरी गरज अन्नाची नसते तर आत्मसन्मानानं जगणारा माणूस म्हणून त्याला सन्मानानं जगता येण्याची ओढ असते "ज्याच्या अंगावर कपडा नाही त्याला कपडा देऊन मी कुणाचा अपमान करणार नाही कारण त्यांना गरज कपड्याची नाही तर कामाची आहे. मी त्यांना भाकरीचे तुकडेही देणार नाही आणि वापरलेले कपडेही."

तुरुंगात एका डॉक्टरांनी त्यांना एकदा विचारलं, "गांधीजी, धट्टीकट्टी माणसं जर भीक मागत असतील तर त्यांना बंदी घालायला नको का? तसा कायदा तुम्ही कराल का?" गांधीजी म्हणाले, "जरूर, पण माझ्यासारख्या माणसांना मात्र भीक मागायचं स्वातंत्र्य असेल." त्यांनी मागणा-यानं निवड करण्याचा आग्रह धरू नये या वचनाला विरोध केला. त्यांच्या घोषणा, त्यांचा दात्यांशी होणारा संपर्क, आणि वर देणगी



स्वीकारण्यासाठी ते घालत असत त्या अटी हे सगळं विलक्षण वेगळं होतं. रेल्वे गाडीत उभं राहून, प्लॅटफॉर्मवर उभं राहून किंवा चालत्या मोटारीतून ते लोकांपुढे त्यांचं भिक्षापात्र करत बहुतेक वेळा त्यांना भिक्षा देण्यासाठी झुंबड उडे. शेकडो वृद्ध, अपंग, स्त्री, पुरुष मैलोन् मैल चालत त्यांना भिक्षा देण्यासाठी येत. काही लोक त्यांच्या बागेतून वांगी, भोपळे आणि भाज्या आणत. एका निवासी शाळेच्या विद्यार्थ्यांनी त्यांना हाती कातलेल्या सुताचा ढीग दिला त्यांनी स्वतः विणलेल्या खादीचं कापड दिलं आणि स्वतः काही दिवस दूध, तूप, गहू न खाता जमवलेले थोडे पैसे दिले. एकदा

एका विधवा बाईनं दोन आणे उसने घेतले आणि ते गांधीजींना दिले. तिला जेव्हा विचारलं, 'तू दोन आणेच का दिलेस?" ती म्हणाली, "मी काही ते मदत म्हणून दिलेले नाहीत तर माझं ते स्वप्न होतं, सर्वस्वाचा त्याग केलेल्या या महात्म्याला भिक्षा देण्याचं. ते मी पूर्ण केलं."

काही लाख रुपये जमवणं हा त्यांच्या दृष्टीनं पोरखेळ होता. ते ध्वनिक्षेपकावरून, तार करून, वृत्तपत्रातून भिक्षेचं आवाहन करीत. एकदा त्यांनी एका पत्रकाराची हॅट काढून घेतली आणि तिचा भिक्षापात्र म्हणून उपयोग केला. आश्चर्यचकित झालेला तो पत्रकार गांधीजींच्या प्रयोगाचा पहिला बळी ठरला आणि त्याला त्या नव्या भिक्षापात्रात पैसे टाकावे लागले.

जेव्हा गांधीजी भिक्षा मागण्याच्या मोहिमेवर बर्माला गेले, ते सांगत होते, "१४ वर्षांनंतर मी बर्मामध्ये येतो आहे. दुष्काळ जरी १४ वर्षात आला तरी तुम्ही त्याचं दुःख करत नाही आणि धैर्यानं त्याला तोंड देता. मी आशा करतो की तुम्ही या दरिद्रीनारायणाच्या प्रतिनिधीची भूक भागवाल. कुणी सांगावं हा प्रतिनिधी पुन्हा कधीही इकडे येणार नाही!" श्रीमंत व्यापारी जेव्हा कंजूषपणे दान देत तेव्हा ते म्हणत, "दानाची ही यादी फाडून टाका आणि नवीन करा. गुजराथी लोकांच्या खिशात तर मी हात घालणारच कारण मी गुजराथी चेट्टी आहे." त्यांच्या या फटक्याचा परिणाम रक्कम दुप्पट होण्यात झाला. श्रीलंकेच्या लोकांना ते म्हणाले, "जेव्हा महेन्द्र श्रीलंकेला आले. तेव्हा भारतातले लोक उपाशी मरत नव्हते. आमचा तर सूर्य तळपत होता आणि आपण सगळे त्या गौरवात आमचे भागीदार होतात. आपण जर ते जुनं नातं मानत असाल आणि त्याचा अभिमान बाळगत असाल तर केवळ पैसे देऊन चालणार नाही. दागिने द्यायला हवेत." एकदा कच्छच्या लोकांनी त्यांना म्हटलं, "आपण कच्छमध्ये जो पैसा गोळा कराल त्याचा उपयोग कच्छ मधेच करावा" तेव्हा गांधीजी म्हणाले, "जर माझ्यावर विश्वास ठेवून तुम्हा मला दान देता आहात तर हाही विश्वास ठेवा की, हे पैसे केव्हा, कुठे आणि कसे वापरायचे ते मला चांगलं माहीत आहे."

एकदा ते दुःखानं म्हणाले, "माझ्याजवळ हनुमानासारखी छाती फाडून दाखवण्याची ताकद नाही. खात्री बाळगा, तिथे तुम्हाला फक्त रामावरचं प्रेम दिसेल आणि राम मला लक्षावधी उपाशी-तापाशी भारतीयांच्या चेहऱ्यावर दिसतो. ते दिवसभरात अनेकदा १२ सभा घेत आणि विनंती करत – "मला पाव आणा द्या, अर्धा आणा द्या, तुम्हाला जे शक्य ते हवं तर एक पैसा द्या." सार्वजनिक सभांमध्ये ते मानपत्र स्वीकारत आणि विचारत, "थैली कुठे आहे?" कधी कधी ते म्हणत, "मी जाणार नाही. मी इथे एकटा बसून राहीन." आणि अशा प्रकारे लोकांना देणगी द्यायला लावत. कधी कधी मोठा जनसमुदाय मध्यरात्रीपर्यंत थांबून राही कारण त्यांना कुणाला घरं, कुणाला दागिने, धनादेश, नोटा, सोनं-चांदी, तांब्याची नाणी, सुतांचे ढीग, खादी द्यायची असे. त्यांच्या ७८व्या वाढदिवशी त्यांना ७८ लाख सुतांचे हार दिले गेले.

एकदा त्यांच्या भिक्षेमध्ये कवडी सापडली होती. त्यांना ते त्यागाचं सर्वात मोठं प्रतीक वाटलं. सोन्यापेक्षाही मौल्यवान. एका खुनी माणसानं फाशीच्या तक्तावर चढण्याच्या वेळी सूचना दिली, गांधीजींना त्याचे सर्व १०० रु. राष्ट्रीय कामासाठी देण्यात यावेत.

असं नेहमी होई की, सभेत जमलेले पैसे मोजायला आणि उचलून न्यायला तिघा चौघांची मदत लागे. एकदा एका कार्यकर्त्याने गांधीजींना त्याचे हात दाखवले. तांब्याची नाणी मोजून. हिरवे झाले होते. गरीब लोकांनी ही नाणी वर्षानुवर्ष जमिनीखाली पुरून ठेवली होती. गांधीजी म्हणाले, "या देणगीमागे आशीर्वाद उभा आहे. आपण या कामाकडे समर्पण म्हणून पाहतो पण त्यांच्या दृष्टीनं त्यांच्या निराशेनं काजळलेल्या जगात एक आशेचा किरण आहे. त्यांना हे उज्ज्वल भविष्याचं प्रसादचिन्ह वाटतं आहे."

पेशानं भीक मागण्याला विरोध करणं हा एक गांधीजींमधला एक विरोधाभास होता. भिकाऱ्यानं आपला सगळा सन्मान बाजूला ठेवून भाकरीसाठी भीक मागणं त्यांना मुळीच पसंत नव्हतं. भिकाऱ्यांना भीक देऊ नका. काम द्या असं ते म्हणत. भारतात तेव्हा फुकटच्या साधूंची संख्या ५६ लाख होती. गांधीजींना त्यांचा फार राग

होता. अपंग लोक सोडले तर कुणाचंही समाजाला उपयोगी काम न करता लोकांच्या दयेवर जगणं त्यांना मान्य नव्हतं. ते म्हणत, "भीक देणं आणि घेणं दोन्ही चुकीचं आहे" त्यांना धट्टयाकट्टया माणसानं भीक मागणं म्हणजे तर चोर होण्यासारखंच वाटे.

बिहारच्या भूकंपाच्या वेळी भूकंपग्रस्तांना ते सांगत आपल्या अन्न, वस्त्र, निवा-यासाठी छावणीत काम करा. नाहीतर त्यांना लोकांच्या दयेवर राहण्याची सवय लागेल. लोकांच्या दयेवर कोणीही जगणं बरोबर नाही. त्यांना त्यांचा सल्ला असा होता, "प्रामाणिकपणे चांगलं काम करा. मला भिकारी नको आहेत. काम मागा आणि ते विश्वासपूर्वक करा. काम करा, काम करा. भीक मागू नका."

❋❋

# डाकू

गांधीजी भिका-यांचे राजा होते तर डाकूंचे राजकुमार होते. दिवसेंदिवस भारतात श्रीमंत माणसं अधिकाधिक श्रीमंत होत होती आणि गरीब माणसं अधिक गरीब होत होती हे गांधीजी पहात होते. त्यांना स्वतःची समानतेची कल्पना लोकांना सांगायची होती. भारतातल्या खेड्यांची पुनर्रचना करणं आणि ग्रामीण जनतेची अज्ञान, दारिद्र्यातून सुटका करणं हे त्यांचं ध्येय होतं.

गांधीजींनी श्रीमंतांकडून पैसा घेऊन गरजूंना दिला. त्यासाठी त्यांनी तलवारी, मशाली वापरल्या नाहीत तर प्रेम आणि नीती ही शस्त्रं वापरली. प्रेमानं लोकांची मनं वळवली आणि नैतिक दबाव निर्माण केला. त्यांनी श्रीमंतांना त्यांचा पैसा आणि पंडितांना त्यांचं ज्ञान गरीब जनतेला द्यायला सांगितलं. भांडवलदारांनी त्यांचा नफा कामगारांमध्ये वाटून द्यावा असं सांगितलं. राज्यकर्त्यांनी प्रजेला मानवीहक्क द्यावेत हे सांगितलं आणि भित्र्या आळशी लोकांना त्यांचा आळस सोडून द्यायला सांगितलं. परकी सत्तेला जनतेच्या कल्याणाची पर्वा नव्हती. त्यामुळे त्यांनी भारतीयांनी ती सत्ता स्वतःच्या हाती घ्यावी यासाठी प्रोत्साहन दिलं.

त्यांच्यासारख्या समर्पित महात्म्यानं तळमळीनं केलेल्या या आवाहनाच्या जादूई मोहिनीनं तरुण, वृद्ध, साधीभोळी ग्रामीण जनता आणि धूर्त धंदेवाईक सर्वांना सारखंच मोहित केलं. एखाद्या चक्रीवादळासारखे ते भारतभर फिरले आणि लोकांना त्यांची त्यांची संपत्ती, त्यांची मुलं, त्यांचं सर्वस्व राष्ट्राच्या पायाशी अर्पण करायचं आवाहन केलं. मूर्च्छित मनांना त्यांनी हलवून सोडलं. देशसेवेसाठी मालकांनी आपली मुलं



त्यांच्या स्वाधीन केली, घराघरातल्या गृहिणींनी त्यांचे दागिने त्यांना दिले आणि गरिबांनी आपलं सगळं किडूक-मिडूक त्यांच्या स्वाधीन केलं.

एकदा देशात पिकं जळून गेली. शेतकरी निराश झाले होते. सरकारला मात्र सगळाच्या सगळा कर वसूल करायचा होता. करवसुली करणा-या अधिका-यांच्या धमक्यांनी गरीब जनता हताश झाली. त्यांनी कर देण्यासाठी आपले बैल आणि औतं विकायचा विचार केला. गांधीजींनी त्यांना सरकारकडून कराची लूट करायचा सल्ला

दिला. जनतेनं "कर देणार नाही" अशी मोहीम सुरू केली. गांधीजींच्या नेतृत्वाखाली सत्याग्रही शेतक-यांच्या एका तुकडीनं शपथ घेतली. "आम्ही सर्वजण असं घोषित करतो की आम्ही आपण होऊन सरकारला यावर्षी पूर्ण किंवा उर्वरित कर देणार नाही, आमची जमीन जप्त केली तरी चालेल." सरकारनं शेतक-यांच्या जमिनी उभ्या पिकांसह जप्त केल्या. गांधीजींनी शेतक-यांना सांगितलं की तुमच्या मेहनतीचं फळ तुमच्या शेतात उभं आहे. जमिनीवर जप्ती आली तरी काय झालं? तुम्हाला तुमचं पीक काढून घेण्याचा अधिकार आहे. त्यांनी लोकांना शेतातून कांदा काढून घ्यायला सांगितलं. त्याप्रमाणे सत्याग्रही स्वयंसेवकांच्या एका तुकडीनं कांद्याचं पीक काढून घेतलं. सत्याग्रहींचे नेते मोहनलाल पंड्या यांना अटक झाली. ते तुरूंगातून सुटून आल्यावर त्यांचं शाही स्वागत झालं आणि त्यांना "कांदा-चोर" अशी पदवी दिली गेली. गांधीजी त्या सभेचे अध्यक्ष होते. त्यांनी त्यांना स्वतःच्या हातानं विजयतिलक लावला.

आणखी एका प्रसंगी दुष्काळी परिस्थितीला गांधीजींनी रयतेला असाच सल्ला दिला. सरकारी अधिकारी करवसुली न झाल्यामुळे संतप्त झाले आणि त्यांनी शेतक-यांची घरं जप्त केली, त्यांना झोपड्या सोडायला सांगितलं. शेतक-यांनी त्यांचं थोडं सामानसुमान गोळा केलं आणि ते त्यांची जन्मगावं सोडून निघून गेले. अधिका-यांनी जप्त केलेल्या जमिनी विकायचा प्रयत्न केला पण कोणी घेणारा मिळेना या प्रकरणाची बरीच दीर्घ चौकशी झाल्यावर शेतक-यांची मागणी अंशतः मान्य झाली आणि त्या वर्षाच्या करातून त्यांची सुटका झाली.

चंपारण्यात गोरे मळेवाले जनतेला निळीचं उत्पन्न घ्यायला सांगत पण नियमितपणे पैसे देत नसत. जनतेला सक्तीनं काम करायला लावत आणि स्वतः मोठा फायदा उकळत. असाच एक त्रस्त शेतकरी गांधीजींजवळ यावर उपाय विचारायला गेला. गांधीजी तिथे गेले. तपशीलवार चौकशी केली आणि शेतक-यांच्या बाजूनं उभे राहिले. त्यावर पुष्कळ पत्रव्यवहार, सभा-बैठका आणि आंदोलनानंतर ही वाईट प्रथा बंद

झाली आणि निळीचा व्यवसाय करणा-या गो-यांचा प्रचंड नफा त्यांच्या हातून गेला. चंपारण्यातून हा अनेक शतकांचा निळीचा कलंक धुतला गेला.

भारतात तेव्हा दरडोई सरासरी उत्पन्न दिवसाला १ आणा होतं. पण त्या तुलनेत मिठावरचा कर मात्र भारी होता. लक्षावधी उपाशी-तापाशी जनता मीठ-भाकरी खाऊन रहात असे त्यांना हा मिठावरचा कर फार जड होता. देशाच्या काही भागांत मीठ करणं आणि मिळवणं शक्य होतं. काही ठिकाणी खाड्या होत्या, काही ठिकाणी मिठाचे खडक होते पण मीठ तयार करायला कायद्याने बंदी होती. या सगळ्याच्या विरोधात गांधीजींनी मिठाचा सत्याग्रह सुरु केला. त्यांनी हे शोषण बंद करण्याचा निर्धार केला. 'एक तर मला जे हवं आहे ते घेऊन मी परत येईन किंवा तुम्हांला माझं मृत शरीर समुद्रावर तरंगताना दिसेल. जर आम्ही मारले गेलो तर आम्ही स्वर्गात जाऊ, जर आम्हाला पकडलं तर तुरुंगात जाऊ, आणि विजयी झालो तर घरी परत येऊ."

साबरमती आश्रमापासून ते २५ दिवसांत २४१ मैल पायी चालत गेले आणि दांडी किना-यावर मूठभर मीठ उचलून त्यांनी मिठाचा कायदा मोडला. सरोजिनी नायडूंनी या कायदेभंगाबद्दल त्यांना हार घातला आणि विजय-तिलक लावला. गांधीजी म्हणाले, "मूठभर मीठ उचलणं हा तर पोरखेळ झाला. मी आता सगळंच मीठ ताब्यात घेणार आहे." सबंध भारतात लोकांनी कायदा तोडून मीठ तयार करायला सुरुवात केली.

पोलिसांनी अशा मिठासाठी वेड्यासारखी शोधाशोध सुरु केली. पडदा-नशीन स्त्रियांच्या पालख्यादेखील मिठाच्या शोधासाठी उघडल्या जात होत्या. एकदा गांधीजी मोटारीतून जात होते. रस्त्यात पोलीस पाहून त्यांनी विचारलं, "माझ्याजवळ बेकायदेशीर मीठ आहे, तुम्हाला मला पकडायचं आहे कां?"

गांधीजींनी घरसानाच्या सरकारी मीठ भांडारावर हल्ला करायचा निश्चय केला पण त्यापूर्वीच त्यांना अटक झाली. तरीही त्यांच्या सत्याग्रहींची अहिंसक फौज मीठ-भांडाराजवळ पोचली. पोलिसांनी सत्याग्रह्यांना क्रूरपणे लोखंडी सळ्यांनी मारलं.

ब-याच जणांची हाडं मोडली, डोकी फुटली; रक्तानं जमीन लाल झाली. भारतात इतर ठिकाणी देखील अनेक मिठाचे साठे लुटले गेले. वर्षभरांतच मिठाचा कायदा सैल करण्यात आला. घरगुती वापरासाठी मीठ बनवणं आणि जेथे मिठाचे नैसर्गिक साठे होते त्याच्या आसपासच्या गावांत मीठ विकणं कायदेशीर झालं.

इंग्रज सरकारला गांधीजींसारख्या एका मजबूत शत्रूशी सामना करावा लागला आणि ह्या शत्रूनं हे सिद्ध करून दाखवलं की फसवाफसवीपेक्षा सरळ लूटमार करणं ही अधिक चांगली गोष्ट आहे. इंग्रज भारतात व्यापारी म्हणून आले होते. त्यांनी भारतातला व्यापार ताब्यात घेतला आणि कापड-उद्योग नष्ट करून टाकला. एकेकाळी भारतातल्या या कापड व्यापाराचा सबंध जग हेवा करीत असे. इंग्रजांनी विणकरांचे अंगठे कापून टाकले. घरोघर चालणारे चरखे आणि हातमाग बंद झाले. काही कारागीर शेती करू लागले तर काही मजूरी करून पोट भरू लागले. कुशल कारागीरांचे अकुशल मजूर बनले. जिथं एकेकाळी समृद्धीचं साम्राज्य आनंदानं नांदत होतं, तिथे दारिद्र्याचं वाळवंट पसरलं. लंकेशायर आणि मँचेस्टरचं कापड भारतात येऊ लागलं आणि भारतातून कोट्यवधी रुपये इंग्लंडमध्ये पोचू लागले. जे इंग्रज व्यापारी हातात कापड मोजण्याची काठी घेऊन आले. तीच काठी आता राजदंड बनली. इंग्रज इथले राजे बनले.

ब-याच विचारांती गांधीजींनी विदेशी कापड विदेशी मद्य आणि विदेशी मालावर बहिष्कार टाकण्याची योजना तयार केली. ते अथकपणे भारतीयांना आग्रह करत राहिले की हातानं सूत काता, हातमागावर कापड विणा आणि तेच खादीचं कापड वापरा. लोकांनी प्रचंड प्रतिसाद दिला. गांधीजींनी हातानं सूत कातण्याची आणि हातमागावर वस्त्र विणण्याची कला पुन्हा जिवंत केली आणि विदेशी कापड आणि विदेशी मद्याच्या दुकानांसमोर धरणं धरण्यासाठी स्त्रियांचं एक पथक बनविलं. शहरांत आणि खेड्यांत गांधीजी सभेत भाषणं देत आणि विदेशी वस्तूंची होळी केली जाई. यामुळे विदेशी वस्तूंची आयात कमी झाली आणि इंग्रजांच्या मालकीच्या अनेक कापड गिरण्या बंद पडल्या. गांधीजींच्या सुताच्या चेंडूनी बंदुकीच्या गोळ्यांचं काम केलं आणि

इंग्रजांचे कापड कारखाने बंद पडले. हजारो मजूर बेकार झाले. यानंतर अनेकवर्षांनी जेव्हा गांधीजींनी लँकशायरला भेट दिली तेव्हा मिलमजूरांसमोर बोलताना ते म्हणाले, “इथली बेकारी पाहून मला फार दुःख होतं आहे. तुमच्याकडे तीस लाख लोक बेकार आहेत आणि आमच्याकडे जवळजवळ सहा महिने तीस कोटी लोक बेकार असतात. इथे बेरोजगारांना सरासरी सत्तर शिलिंग भत्ता मिळतो, तर आमच्याकडे सरासरी महिन्याचं उत्पन्न सात शिलिंग आणि सहा पेन्स एवढं आहे. भारतीय विणकरांच्या मुलाबाळांच्या तोंडची भाकरी ओढून घेऊन आपल्याला संपन्न होण्याची इच्छा आहे का? जर भारत स्वतःचं कापड निर्माण करू शकतो तर लँकशायर कडून कापड घेतलं पाहिजे हे नैतिक बंधन कशासाठी? तुम्हाला लक्षावधी गरीब भारतीयांची थडगी बांधून स्वतःला समृद्ध होण्याची इच्छा आहे कां?” त्यांच्या ह्या मोकळ्या बोलण्यामुळे इंग्रज मजुरांमध्ये ते लोकप्रिय झाले. आणि त्यांनी आनंदाने आरोळ्या देत त्यांच्याबद्दलचा आदर व्यक्त केला.

गांधीजींनी श्रीमंत आणि गरीब यांच्यामधली उत्पन्नाची आणि सामाजिक सुविधांची मोठी दरी बुजवण्याचा प्रचंड प्रयत्न केला. एकदा एका भंगी सभेत एका स्त्रीनं आपल्या हातातल्या दोन सोन्याच्या बांगड्या गांधीजींना भेट दिल्या आणि ती म्हणाली, “अलीकडे पती आपल्या पत्नीसाठी फार काही शिल्लक ठेवत नाहीत त्यामुळे मला आपल्याला ही लहानशीच भेट द्यावी लागते आहे. माझ्याकडे आता एवढंच उरलेलं आहे. हरिजनांच्या सेवेसाठी आपण यांचा स्वीकार करा.” गांधीजी म्हणाले, “मला मान्य आहे की, मी डॉक्टर, वकील आणि व्यापारी यांना गरीब बनवलं आहे आणि त्याचा मला प चात्ताप नाही.

भारतासारख्या गरीब देशांत जिथे रोज एका पैशासाठी लोक काही मैल चालत जातात तेव्हा किंमती दागिने घालणं कोणालाही शोभत नाही.” काहीवेळा तर तरुण स्त्रियांच्या हातातून बांगड्या निघत नसत तेव्हा गांधीजी त्या बांगड्या कापवून घेत. काही लोक टीका करत की, हे स्त्रियांचे दागिने काढून घेतात. पण गांधीजी उत्तर देत

माझी तर इच्छा अशी आहे की सभेला येणा-या हजारो भगिनींनी सगळे नाही तरी बरेचसे दागिने दान देऊन टाकावेत. त्यांच्या ह्या आवाहनानं अनेक स्त्रियांना स्फूर्ती दिली आणि त्यांनी आपले दागिने दान म्हणून देऊन टाकले. एकदा एका तरुण विधवा स्त्रीनं गांधीजींना घरी बोलावलं आणि त्यांना दागिन्यांचं दान दिलं. आणखी एका विवाहित तरुण स्त्रीचा पती महिना चाळीस रुपये मिळवत असे तिनं गांधीजींनी घरी यावं आणि आपले दागिने स्वीकारावेत म्हणून उपोषण सुरु केलं.

एका सार्वजनिक सभेत किशोर वयाची ‘कौमुदी’ नावाची मुलगी व्यासपीठावर गेली तिनं आपल्या गळ्यातला सोन्याचा हार, बांगड्या आणि कानातली काढून गांधीजींना दिली. गांधीजी अशा दात्यांकडून, दिलेले दागिने पुन्हा बनवून घेणार नाही असं वचन घेत. कारण ”स्त्रीचा खरा दागिना तिचं चारित्र्य आणि पावित्र्य हाच आहे.” अगदी कोवळ्या वयाची मुलं सुद्धा यातून सुटली नाहीत. एकदा एक छोटी मुलगी त्यांना फुलं देण्यासाठी आली आणि गांधीजींच्या दृष्टीला तिच्या हातातली अंगठी पडली त्यांनी ती अंगठी देण्यासाठी तिचं मन वळवलं.

एकदा एका मुलानं सद-यावर सोन्याची बटणं लावलेली होती. गांधीजींनी ती घेतली आणि त्याला म्हणाले, “आता तू मला योग्य प्रकारे नमस्कार कर आणि जा” पालकांच्या परवानगी शिवाय ते मुलांकडून कधीही दागिने घेत नसत.

गांधीजी अजब डाकू होते. ह्या डाकूचं लोक स्वागत करत, त्याच्यावर विश्वास ठेवत आणि त्यानं आपल्याला लुटलं याबद्दल कृतकृत्य होत. त्यांच्या एका भक्तानं त्यांना एकदा सांगितलं की तुम्ही माझ्या घरी राहिलात तर मी तुम्हाला प्रत्येक मिनिटाला ११६ रु. देईन पण गांधीजींना त्यांच्याकडे दोन मिनिटं थांबण्याएवढाच वेळ होता.

एकदा गांधीजी अचानक आजारी पडले. बातमी ऐकून त्यांचा डॉक्टर मित्र धावतच तिथे पोचला. गांधीजींनी त्याला चेष्टेत विचारलं, “मला तपासण्याबद्दल तू मला काय फी देणार?” त्यामुळे डॉक्टरांनी तपासण्याबद्दल स्वतः फी घेण्याऐवजी आपलं पाकीट तिथे रिकामं केलं.

मोतीलाल नेहरू आणि देशबंधू दास यांनी गांधीजींच्या हाकेसारखी आपली हजारो रुपयांची वकिली सोडून दिली आणि राजवाड्यासारखी आपली घरं राष्ट्राला अर्पण केली. अशा प्रकारे गांधीजींनी हजारो अमीरांना फकीर बनवून टाकलं.


***

# कैदी

गांधीजींनी भारतीयांना बंडखोरी शिकवली, असहकाराची चळवळ मोठ्या प्रमाणात सुरू केली. त्यामुळे त्यांना वारंवार तुरुंगात जावं लागलं. जेव्हा त्यांना अटक होत असे तेव्हा ते आपला गुन्हा मान्य करत आणि जास्तीत जास्त शिक्षेची मागणी करत. दक्षिण आफ्रिकेत तर ते आणि त्यांचे साथीदार यांच्यावरचे आरोप त्यांनीच आणलेल्या साक्षीदारांमुळे सिद्ध झाले. तेव्हा भारतीयांना तुरुंगात जाण्याचं भय होतं तुरुंगात जाण्याची लाजही वाटे, तुरुंगातल्या कष्टांची धास्ती होती, गुन्हेगारांना देण्यात येणा-या शिक्षा भयंकर वाटत. गांधीजींनी ही सर्व भीती त्यांच्या मनातून काढून टाकली.

त्यांना अकरा वेळा तुरुंगवास झाला. एकदातर चार दिवसात त्यांना तीनदा अटक झाली. जर दिलेली सगळी शिक्षा त्यांनी भोगली असती तर ते ११ वर्षं आणि १९ दिवस तुरुंगात राहिले असते. मधून मधून त्यांची शिक्षेची मुदत कमी होई. त्यामुळे ते एकूण ६ वर्षं १० महिने तुरुंगात राहिले. वयाच्या ३९ व्या वर्षी ते प्रथम तुरुंगात गेले. शेवटीत शेवटी ते तुरुंगाच्या दरवाजातून बाहेर पडले तेव्हा ते ७५ वर्षांचे होते.

दक्षिण आफ्रिकेत प्रथम गांधीजी तुरुंगात गेले तेव्हा त्यांच्याबरोबर पाच सत्याग्रही होते. त्यांनी तुरुंगातल्या वातावरणाबद्दल ब-याच भयानक गोष्टी ऐकल्या होत्या, त्यामुळे ते थोडे अस्वस्थ होते. त्यांना वाटत होतं की राजकीय कैदी म्हणून वेगळी वागणूक देऊन आपल्याला वेगळं तर ठेवणार नाहीत! आपल्या साथीदारांपासून लांब राहावं लागेल का काय? न्यायालयाच्या पिंज-यात उभं राहताना त्यांना चमत्कारिक वाटलं कारण ते तिथे वकील म्हणून पूर्वी वावरले होते. त्यांना दोन महिन्यांची साधी



तुरुंगवासाची शिक्षा झाली. न्यायालयातून त्यांना एका मोटारीतून गुपचूप तुरुंगात नेलं कारण न्यायालयासमोर बराच जनसमूह उभा होता, त्याला टाळायचं होतं. तुरुंगात पोचल्यावर त्यांना बोटांचे ठसे द्यावे लागले. त्यांचं वजन करण्यात आले. त्यांचे कपडे काढून घेतले आणि त्यांना तुरुंगाचे अत्यंत घाणेरडे कपडे घालायला दिले. दर दोन-तीन दिवसांनी त्यांचे आणखी साथीदार तुरुंगात येत. एका पंधरवड्यात हा आकडा १५० झाला. ५० लोकांसाठीच्या एका खोलीत त्यांना ठेवण्यात आलं. काहींना रात्री बाहेर झोपण्यासाठी तंबू ठोकले होते.

तुरुंगाचे निरीक्षक, गव्हर्नर आणि वॉर्डर रोज चार किंवा पाच वेळा तुरुंगांची पाहणी करत. गांधीजी आणि त्यांच्या साथीदारांना टोप्या हातात घेऊन रांगेनं उभं रहावं लागे. त्यांनी काही शारीरिक श्रम स्वेच्छेनं करण्याची तयार दाखवली पण त्याला परवानगी नव्हती.

तुरुंगातला आहार भारतीयांना मानवणारा नव्हता. सकाळ-संध्याकाळ त्यांना मीली पॅप नावाचा पदार्थ मिळे. मक्याच्या खिरीसारखा तो असे. त्यात दूध, साखर किंवा तूप नसे. कैदी तो खाऊ शकत नसत. काहीवेळा संध्याकाळी उकडलेल्या शेंगा असत. मिठाखेरीज इतर काहीही साखर, मसाले असं काहीही खाण्याला परवानगी नव्हती. यूरोपीय कैद्यांना मांस, पाव आणि भाज्या मिळत. त्या भाज्यांची सालं इतर काही भाज्यांबरोबर शिजवून काळ्या कैद्यांना देत. गांधीजींनी तुरुंगाच्या अधिका-यांना शंभर कैद्यांच्या सहीनं एक तक्रार लिहून पाठवली. त्यांना सांगण्यात आलं, "हा भारत नाही. हा तुरुंग आहे. चवदार पदार्थ खाण्याची इथे परवानगी मिळणार नाही." पंधरा दिवसात गांधीजींना भारतीयांसाठी तांदूळ, पाव, भाज्या आणि तूप मिळवण्यात यश आलं. त्यांना स्वतःचा स्वयंपाक स्वतः करण्याचीही परवानगी मिळाली. गांधीजी स्वयंपाकात मदत करत आणि रोज दोनदा वाढण्याचंही काम करत. गांधीजींना त्यांचे अनुयायी गांधीभाई म्हणत आणि चांगल्या खाण्याची मागणी न करता ती अर्धी कच्ची बिनसाखरेची मक्याची खीर ते खात असत. तिस-यांदा ते तुरुंगात गेले तेव्हा त्यांची जेवण्याची काही पंचाईत झाली नाही. ते फळांवर रहात आणि त्यांना पुरेशी केळी, टोमॅटो आणि दाणे वगैरे सुकामेवा मिळे. त्यांना तुरुंगातल्या शिस्तीचे काही नियम आवडले आणि सुटकेनंतरही त्यांनी चहा घेणं बंद केलं आणि सूर्यास्तापूर्वी जेवण घ्यायची सवय कायम ठेवली.

दक्षिण आफ्रिकेत आणखी दोनदा ते तुरुंगात गेले तेव्हा त्यांना बरेच कष्ट सहन करावे लागले. त्यांना सक्तमजुरीची शिक्षा झाली आणि न्यायालयात त्यांनी दहा वर्षं वकिली केली तिथून त्यांना बेड्या घालून नेण्यात आलं. त्यांना देशी कैद्यांसारखा पोषाख दिला होता. छोटी सैनिकी टोपी, सैल जाडंभरडं जाकीट, त्यावर कैदी नंबर होता आणि रुंद बाणासारख्या खुणा होत्या, अर्धी विजार होती, त्यावरही तशाच खुणा होत्या, जाड, राखाडी रंगाचे मोजे होते आणि चामड्याचे सँडल्स होते. त्यांना आपला बिछाना डोक्यावर घेऊन भरपावसात सहा फर्लांग चालत जावं लागलं. सर्वात भयानक निग्रो आणि चिनी कैद्यांबरोबर त्यांना ठेवण्यात आलं. काही झुलू कैद्यांनी त्यांना शिव्या

दिल्या आणि मारहाण केली. शौचाला जाण्यासाठीदेखील तिथे आडोसा नव्हता. त्यांचं असभ्यपणे वागणं पाहून त्यांना भीती वाटायची. त्यांना त्यांची भाषा समजत नसे. लवकरच त्यांना अंधारकोठडीत टाकलं. ४ फूट x ६ फूट असा तिचा आकार होता. छताजवळ एक खिडकी हवेसाठी होती. गांधीजींना त्यांचं जेवण बंद दारापाठीमागे उभं राहून घ्यावं लागे. रोज दोनदा त्यांना व्यायामासाठी बाहेर नेत. भाताबरोबर तूप दिलं नाही. याचा निषेध म्हणून त्यांनी १५ दिवस भात खाल्ला नाही. ते दिवसभरात मीली पॅपच्या एकाच जेवणावर रहात. त्यानंतर त्यांना पाव आणि तूप द्यायला सुरुवात केली. त्यांना नारळाच्या शेंड्यांची गादी, एक छोटी लाकडी उशी, दोन घोंगड्या आणि काही पुस्तकं दिली. रोज त्यांना एक बादली पाणी मिळे. कोठडीच्या एका कोप-यात मल-मूत्र विसर्जनासाठी एक बादली मोठ्या ट्रेमधे ठेवलेली असे. कैद्यावर नजर ठेवण्यासाठी त्या अंधारात एक बारीकसा विजेचा दिवा लावलेला असे. पण त्याचा प्रकाश इतका अपुरा असे की, त्यात पुस्तक वाचणं शक्य होत नसे. बदल म्हणून ते कोठडीत येरझारा घालू लागले तर पहारेकरी म्हणे, “असा चालू नकोस. माझी जमीन खराब होते.” ही एवढी मोलाची जमीन डांबराची केलेली होती.

गांधीजींनी अंघोळीची परवानगी मागितली तेव्हा पहारेक-यानं त्यांना कपडे काढून जायला सांगितलं. गांधीजी तशा अवस्थेत १२५ फूट जाऊ शकले नाहीत. नंतर कपडे स्नानगृहाच्या पडद्यावर टांगण्याची त्यांना परवानगी मिळाली. पण अंघोळ होण्यापूर्वीच त्यांना आदेश मिळाला, ‘सॅम, बाहेर ये” जर सॅम चटकन् बाहेर आला नसता तर निग्रोनं त्याला बडवून काढलं असतं.

दिवसाकाठी नऊ तास त्यांना काम करावं लागे. सद-यांचे खिसे कापणं, फाटलेल्या पांघरूणांचे तुकडे शिवणं किंवा लोखंडी दरवाजांना पॉलिश करणं अशी कामं असत. दरवाजे आणि जमिनी तीन तास घासून झाल्यावर त्यांनी पाहिलं तर ते तसेच दिसत होते. त्यांना स्वच्छतागृहं स्वच्छ करण्याचीही आज्ञा मिळाली. त्यांनी हे सगळे कष्ट हसतमुखानं झेलले पण जेव्हा ते त्यांच्या साथीदारांबरोबर राहू लागले तेव्हा त्यांची

अवस्था पाहून त्यांना वाईट वाटलं. काहीजण थकून जाऊन रडत होते, काहीं थकल्यानं बेशुद्ध पडत होते. त्यांना त्यांच्या घरातून काढून इथे या प्रकारच्या त्रासात, लाजिरवाण्या जगण्यात त्यांनी ओढून आणलं होतं. त्याग आणि कष्ट सोसणं हा गुलामी नष्ट करण्याचा एकमेव मार्ग होता यावर त्यांचा दृढ विश्वास होता या विचारानं त्यांना मनाची शांती परत मिळाली.

सकाळी सहा वाजायच्या आत प्रातर्विधी, अंघोळ आटपावी लागे. सात वाजता काम सुरू होई आणि त्या सर्वांना नऊ तास काम करावं लागे. गांधीजी एक मैल चालत जात आणि नंतर कठीण जमीन फोडायला सुरुवात करत. त्यांचं वजन घटलं. त्यांची पाठ दुखू लागली. तळहातावरच्या फोडांमधून पाणी येत असे. फावडं उचलायला त्यांना खूप त्रास होत असे. क्षणभर विश्रांती घेतली तर लगेच पहारेकरी ओरडत असे, "काम चालू. काम चालू" गांधीजी त्याला म्हणाले त्यानं त्याची वागण्याची पद्धत बदलली नाही तर ते काम करणं बंद करतील. याचा त्याच्यावर परिणाम झाला आणि तो जरा मऊ बनला. गांधीजी परमेश्वराची प्रार्थना करत, "माझा सन्मान राखण्यासाठी मला दिलेली सर्व कामं करण्याची शक्ती मला दे."

जेव्हा गांधीजी भारतात 'हिज मॅजेस्टीज् हॉटेल' मध्ये राहिले होते, सरकार त्यांचा सर्व खर्च करत होतं. तरीही त्यांना स्वतःच्या देखभालीसाठी जास्त खर्च झालेला चालत नसे. एकदा त्यांनी तुरुंगाच्या अधिका-यांना सांगितलं की, त्यांच्या खोलीतलं सर्व बैठकीचं सामान हलवावं, जास्तीची भांडीकुंडीही ठेवू नयेत. ते एक लोखंडाची कॉट वापरत आणि थोडीशी भांडी. असे सगळे खर्च भारताच्या गरीब मूक जनतेकडून वसूल केलेल्या करामधून होत असत हे त्यांना माहीत होतं त्यांना शेवटी आगा खान पॅलेसमध्ये स्थानबद्ध केलं होतं तेव्हा ते म्हणाले, "या प्रचंड राजवाड्यात मला स्थानबद्ध केलं आहे. मोठेमोठे पहारेकरी भोवताली आहेत, हा सगळा माझ्या मते सार्वजनिक निधीचा अपव्यय आहे. जेव्हा लोकं भुकेनं मरतायत्, तेव्हा आपण असं वागणं हा माणुसकीविरुद्ध केलेला अपराध आहे.

भारतात गांधींवर जेव्हा पहिला खटला भरला गेला तो लक्षात ठेवण्याजोगा प्रसंग होता. आपल्या आसनावर बसण्यापूर्वी इंग्रज न्यायाधीशांनी पिंज-यात उभ्या असलेल्या देशी माणसाला मान झुकवून अभिवादन केलं. गांधीजींच्या बंडखोर कृतीमुळे त्यांनी गांधीजींना सहा वर्षाचा साधा तुरुंगवास दिला. त्यांनी हे मान्य केलं की, "राजकारणात ज्यांची मतं तुमच्याशी जुळत नाहीत तेही तुमच्याकडे आदर्शाचं पालन करणारी व्यक्ती, उदात्त आणि साधुसंतांसारखं जीवन जगणारी व्यक्ती म्हणून पाहतात." गांधीजी म्हणाले, "भारतातल्या काही थोर देशभक्तांना याच कलमाखाली शिक्षा झाली होती. मलाही त्याप्रमाणेच शिक्षा होते आहे हेही माझं भाग्य समजतो. मला माहीत आहे की मी आगीशी खेळत होतो पण यापुढेही मी तेच करीन." जेव्हा गांधीजी न्यायालयात आले तेव्हा आणि गेले तेव्हाही सबंध न्यायालय त्यांना अभिवादन करण्यासाठी उठून उभं राहिलं. पोलिसांच्या तारायंत्राच्या गुप्त भाषेत गांधीजींचा उल्लेख "मुंबई राजकीय क्र. ५०" असा करत. बॅरिस्टर्सच्या यादीतून त्यांचं नाव काढून टाकलं होतं. तुरुंगात त्यांची उंची आणि जन्मखुणांची नोंद केली गेली. त्यांना एकट्याला स्वतंत्र कोठडीत ठेवलं गेलं. त्यांच्या अंगावर छोट्या धोतराखेरीज काही नव्हतं, तरी त्यांची झडती घेतली गेली, त्यांची पांघरूणं तपासली. गांधीजींनी याबद्दल तक्रार केली नाही. पण त्यांच्या पाण्याच्या तांब्याला बुटानं स्पर्श केला तेव्हा मात्र त्यांनी निषेध केला. कधी कधी या तुरुंगातल्या वागणुकीनं संतापून ते कोणालाही भेटत नसत किंवा पत्रही लिहीत नसत.

गांधीजी तुरुंगातल्या कष्टांनी कधीही घाबरून जात नसत किंवा मनात कटुताही साठू देत नसत. दरवेळी तुरुंगवास सोसून ते बाहेर आले की, त्यांचं मन अधिकच समृद्ध आणि संतुलित झालेलं असे. त्यांना तुरुंग म्हणजे विश्रांती वाटायची तिथे आपल्याला स्वतःला शिस्त लावण्याची संधी मिळते, चांगल्या साथीदारांची उणीव चांगली पुस्तकं भरून काढतात असं ते म्हणत. तुरुंगात त्यांना आनंदच वाटायचा. त्यांना वाचन करायला आवडत असे पण तुरुंगाबाहेर असताना त्यांची असंख्य कामं चालू असत आणि वाचायला वेळ मिळत नसे. तुरुंगात मात्र अभ्यासासाठी त्यांनी

वेगळा वेळ राखून ठेवलेला असे. ते तुरुंगात उर्दू शिकले आणि त्यांनी संस्कृत, तमिळ, हिंदी, गुजराथी आणि इंग्रजी पुस्तकं वाचली. दोन वर्षात त्यांनी मोठ्या लेखकांची १५० पुस्तकं वाचली. त्यात धर्म, साहित्य आणि सामाजिक शास्त्रासंबंधी पुस्तकं होती. गीता, कुराण, बायबल, बौद्ध, शीख, पारसी धर्मावरची पुस्तकंही होती. त्यांनी रामायण, महाभारत, उपनिषद, मनुस्मृती आणि पतंजली योग दर्शनही वाचलं. ६५ व्या वर्षी त्यांनी एका कैदी मित्राकडून खगोलशास्त्र शिकायला सुरुवात केली. ता-यांचा अभ्यास करण्यासाठी तुरुंगाच्या अधिका-यांकडून दुर्बिण मिळवण्यात त्यांना यश आलं.

तुरुंगातही गांधीजी नेमानं प्रार्थना करत, दिवसाकाठी चार ते सहा तास सूतकताई करत आणि जलद चालण्याचा व्यायाम करत. आगा खान पॅलेसमध्ये ७५ व्या वर्षी ते कस्तुरबांना आणि त्यांच्या भाचीच्या मुलीला भूगोल, भूमिती, इतिहास, गुजराथी व्याकरण आणि साहित्य शिकवत. पूर्वी त्यांनी त्यांच्याबरोबर तुरुंगात असलेल्या चिनी कैद्याला इंग्रजी शिकवलं होतं आणि आयरिश तुरुंगाधिका-याला गुजराथी शिकवलं होतं. तुरुंगात असताना त्यांनी मुलांसाठी एक पाठ्यपुस्तक लिहिलं होतं आणि दक्षिण आफ्रिकेचा सत्याग्रहाचा इतिहास लिहिला. उपनिषदातल्या ऋचांचं त्यांनी भाषांतर केलं आणि एका संत कवीच्या काव्याचा इंग्रजीत अनुवाद केला. हा अनुवाद "Poems from Prison" या नावानं प्रकाशित झाला. तुरुंगातून त्यांनी शेकडो पत्रं लिहिली त्यातली काही आश्रमातल्या सहका-यांना होती. तुरुंगातल्या अधिका-यांना, गव्हर्नर, व्हाइसरॉय आणि इंग्लंडच्या पंतप्रधानांनाही होती. दर आठवड्याला आश्रमातल्या मुलांसाठी ते सुंदर पत्रं पाठवत" जर तुम्ही पंखांशिवाय उडायला शिकलात तर तुमचे सगळे त्रास नाहीसे होणार. मला पंख नाहीत तरी मी मनातल्या मनात रोज उडत उडत तुमच्याकडे येतो. ही काय छोटी विमला आणि हा बघा हरी."

गांधीजींनी तुरुंगातल्या शिस्तशीर जीवनाचे फायदे लिहून ठेवले आणि आदर्श कैदी वागायला कसा असावा तेही वर्णन लिहिलं. सर्व कैद्यांनी त्यांना दिलेलं काम करावं मग ते कुठलं का असेना! आणि जोपर्यंत अनैतिक काही करायला लागत नाही

तोवर तुरुंगाचे नियम पाळावेत. अपमान झाला किंवा घाणेरडं अस्वच्छ अन्न दिलं तरच भूक-हरताळ करायचा नाहीतर उगाचच करायचा नाही. ते आणि त्यांचे सहकारी कधीच वाकून उभे रहात नसत आणि "सरकार, सलाम" असंही कधी ओरडत नसत.

स्वराज्य मिळाल्यानंतरही तुरुंगांची व्यवस्था पहावीच लागेल हे गांधीजींना मान्य होतं. तुरुंगांची सुधारगृहं आणि कार्यशाळा व्हाव्यात ही गांधीजींची इच्छा होती. तात्पुरत्या वाट चुकलेल्या गुन्हेगारांसाठी तुरुंग हे विद्यालय व्हावं. तुरुंगात असतांना त्यांनी असं सुचवलं होतं की कैदी उत्पादक काम करून काही गोष्टी निर्माण करू शकतील आणि त्यातून तुरुंग स्वतःचा खर्च भागवू शकतील. दुर्दैवानं तुरुंगाच्या अधिकारीवर्गानं एका कैद्याकडून आलेली ही सूचना म्हणून स्वीकारली नाही.

कधीकधी हा आदर्श कैदी अधिका-यांची पंचाईत करत असे. जेव्हा त्यांना पाव खाण्याची परवानगी मिळाली तेव्हा तो कापायला त्यांनी सुरी मागितली आणि भाजल्याशिवाय पाव खात नाही असं सांगितलं. रोजच्या चालण्यासाठी त्यांनी जास्त जागा मागितली. ते त्यांच्या सहका-यांची मुलांसारखी काळजी घेत. कुणाला दमा असेल, तर त्याच्यावर उपचार करण्याची जबाबदारी ते घेत. ते कधी आजा-यांवर निसर्गोपचार करत तर कधी आयुर्वेदाची उपचारपद्धती वापरत. त्यासाठी ते खास सोयीची मागणी करत. त्यांच्या मागण्या पु-या व्हाव्यात यासाठी ते अनेक दिवस उपोषण करत. यातून त्यांची प्रकृती बिघडली तर अधिकारी त्यांना सोडून देत. सरकारला जगप्रसिद्ध महात्म्याच्या प्रकृतीबद्दल कोणताही धोका पत्करायचा नव्हता. एकदा जेव्हा त्यांना आंत्रपुच्छाचा त्रास होऊ लागला. तेव्हा सरकारनं त्यांची खूप काळजी घेतली आणि लगेच त्यांच्यावर शस्त्रक्रिया केली. तुरुंगात ते दोनदा आजारी पडले.

गांधीजी नेहमी तुरुंगात जात तेव्हा त्याचे मित्र, नातेवाईक बरोबर असत. आगा खान पॅलेसमध्ये कस्तुरबा आणि त्यांचे सचिव महादेवभाई देसाई त्यांच्यासोबत होते. ते दोघंही तिथे वारले आणि त्यांचा अंत्यविधी आगा खान पॅलेसच्या आवारातच झाला.

गांधीजी म्हणाले, "करेंगे या मरेंगे" या मंत्राप्रमाणे ते दोघं जगले. आपल्या जगण्यानं त्यांनी तो मंत्र सार्थ केला आणि स्वातंत्र्यदेवतेच्या वेदीवर त्यांनी स्वतःचे प्राण अर्पण केले. ते अमर झाले आहेत"

❊❊

# सेनापती

दक्षिण आफ्रिकेनं गांधीजींना शक्तिशाली बनवलं. २३व्या वर्षी ते डर्बनला पोचले. तोवर ते लाजाळू, बुजरा तरुण होते. ज्या क्षणी त्यांनी दक्षिण आफ्रिकेच्या भूमीवर पाय ठेवला. त्या क्षणी त्यांना इथे काळ्यांना कसं वागवलं जातं ते कळलं. गोरे त्यांना 'कूली', हमाल म्हणत.

तिथे पोचल्यावर तिस-या दिवशी ते डर्बन कोर्टात हजर झाले. न्यायाधीशांचा मान राखण्यासाठी त्यांना त्यांचं पागोटं उतरवायला सांगितलं गांधीजींना हा अपमान वाटला त्यांनी तसं करायला नकार दिला आणि ते न्यायालय सोडून बाहेर पडले.

एक आठवड्यानंतर त्यांना रेल्वेनं दुस-या गावी जायचं होतं. त्यांनी पहिल्या वर्गाचं तिकीट काढलं आणि पहिल्या वर्गाच्या डब्यात जाऊन बसले. तिकीट तपासनीस आला आणि त्यानं त्यांना तिस-या वर्गात जाऊन बसायला सांगितलं. जेव्हा त्यांनी वाद घातला की त्यांच्याजवळ प्रथमवर्गाचं तिकीट आहे आणि ते पहिल्या वर्गानेच प्रवास करतील तेव्हा त्यांना रेल्वेतून फरफटत खाली ओढत आणलं. या अपमानाचा त्यांना धक्का बसला. अंधा-या प्रतीक्षागृहात ते एकटेच विचारात गढून गेले होते. काय करायला हवं? जिथे भारतीयांना वाईट वागवलं जातं तो देशच सोडून निघून जावं की आपल्या हक्कांसाठी लढा द्यावा? त्यांच्या देशाचा सन्मान पणाला लागला होता त्यांनी रहायचं ठरवलं. त्या रात्रीच त्यांच्या भावी कामांचा आराखडा ठरवला.

गांधीजींना त्यांच्या प्रवासाचा पुढचा टप्पा घोडा-गाडीतून प्रवास करून पुरा करावा लागला. त्यांना आत बसू दिलं नाही. घोडागाडी चालवणा-यांच्या शेजारी ते

बसले. थोड्या वेळानं त्यांना ती जागा रिकामी करण्याची आज्ञा मिळाली आणि पायरीवर बसायला सांगितलं. गांधीजींनी नकार दिला तेव्हां त्यांना बेदम मारण्यात आलं. गावात पोचल्यावर हॉटेलमध्ये त्यांनी खोली मागितली ती नाकारण्यात आली. त्यांनी ती रात्र एका भारतीय मित्राच्या दुकानात काढली. त्याला गांधीजींबद्दल कणव वाटली पण जे घडलं त्यात त्याला विशेष काही वाटलं नाही. ते नेहमीचंच होतं. त्या देशात असे प्रसंग तर रोजच घडत होते. भारतीयांना त्याची सवय झाली होती. दक्षिण आफ्रिकेत ते पैसे मिळवायला आले होते आणि आत्मसन्मानाचा बळी देऊन ते पैसे मिळवत होते. गांधीजींना या गुलामी मनोवृत्तीचा धक्का बसला. त्यांनी वृत्तपत्रांना आणि रेल्वेच्या व्यवस्थापनाला, घोडागाडी-सेवेच्या अधिका-यांकडे तक्रारी पाठवल्या.

काही काळातच त्यांना कळलं की भारतीयांना पदपथांवर चालण्याची मुभा नव्हती, रात्री ९ नंतर बाहेर फिरण्याची परवानगी नव्हती आणि ट्राममध्ये पुढच्या जागांवर बसायला बंदी होती. गावात भारतीयांना राहण्यासाठी विशिष्ट "कूली" ठिकाणं होती. गांधीजींना स्वतःलाच एकदा पहारेक-यानं फूटपाथवरून लाथा मारून खाली लोटलं होतं आणि 'कूली बॅरिस्टर' अशी पदवी दिली होती. त्यांच्या काही गो-या मित्रांची अशी इच्छा होती की गांधीजींना काही खास सवलती मिळाव्यात पण गांधीजींनी या प्रस्तावाला साफ नकार दिला. स्वतःपुरते काही फायदे, सोयी मिळवण्यात त्यांना काडीइतका रस नव्हता, तर हा वर्णविद्वेष त्यांना समूळ नष्ट करायचा होता. त्यांना कधी झाल्या घटनांची लाज किंवा भीती वाटली नाही किंवा त्यांनी कधी रागानं अपमान करणा-यांना शिक्षा केली नाही.

त्यांनी या शहरात भारतीयांना कोणकोणते त्रास सोसावे लागतात त्याची माहिती मिळवली. एका आठवड्यात त्यांनी सार्वजनिक सभा बोलवली आणि भारतीयांना त्यांची जीवनपद्धती बदलण्याचा आदेश दिला. त्यांनी प्रामाणिकपणे जगावं, स्वच्छतेच्या सवयी लावून घ्याव्यात, जातीभेद, धर्मभेद, प्रांतिकभेद सोडून द्यावा. गो-या लोकांना दोष देणारा एक शब्दही त्यांनी उच्चारला नाही. त्यांना त्यांच्या देशबांधवांना हे

समजावून सांगायचं होतं की त्यांची वागणूक योग्य असली तरच त्यांना मानवी हक्कांची मागणी करता येईल. ते कायम सर्वांना भेटत रहात आणि शांतपणे त्यांच्या कटु अनुभवांच्या कहाण्या ऐकत रहात.

एका वर्षानंतर भारतीयांचा मतदानांचा हक्क हिरावून घेणारा कायदा होऊ घातला होता. गांधीजींनी त्या कायद्याला विरोध करण्याचा आदेश दिला त्यांनी स्वयंसेवकांची यादी केली. ख्रि चन तरुण, मुसलमान आणि पारशी व्यापारी, हिंदू कारकून सर्वांना त्यांच्या सामाजिक कल्याणासाठी एकत्र काम करायला लावलं. त्यांच्या नेतृत्वाखाली लोक कामाला लागले कुणी त्यांनी तयार केलेल्या निषेध पत्राच्या प्रती लिहून काढल्या, काहींनी पैसे दिले, आणि इतरांनी हा लोकांना जाणवणारा संदेश दूरवर राहणा-या लोकांना पोचवला. महिन्याभरात पैसा गोळा झाला. निषेधाच्या १०,००० सह्या गोळा झाल्या. निषेध पत्राच्या छापलेल्या प्रती गव्हर्नर, नाताळचे प्रमुख, भारताचे व्हाइसरॉय इंग्लंडची राणी व्हिक्टोरिया यांच्याकडे पाठवल्या गेल्या आणि नाताळ, भारत आणि इंग्लंडमधल्या वृत्तपत्रांनाही प्रती गेल्या. दक्षिण आफ्रिकेत भारतीयांना मिळणा-या वाईट वागणुकीच्या बातमीला खूप प्रसिद्धी मिळाली. तो कायदा झाला आणि भारतीयांना मतदानाचा हक्क गमवावा लागला पण या सगळ्या प्रक्रियेत त्यांनी उदासीनता टाकून दिली. भीती मनातून काढून टाकली आणि ते सगळे सरकारनं अन्यायकारक कायदा केला तर आव्हान कसं द्यायचं हे शिकले. गांधीजींनी लवकरच 'नाताळ भारतीय काँग्रेस'ची स्थापना केली, तिच्या कामाचा आराखडा, नियम ठरवले आणि स्वतः सभासदांकडून देणग्या गोळा केल्या.

दक्षिण आफ्रिकेतल्या २० वर्षांच्या वास्तव्यात गांधीजींनी भारतीयांना अशा अनेक काळ्या कायद्यांना विरोध करायला शिकवलं. एका कायद्यानुसार सर्व भारतीय प्रौढांना वर्षाचा ४० रु. कर भरावा लागे. दुस-या एका कायद्यान्वये भारतात झालेली लग्नं बेकायदेशीर मानली जात, तिसरा एक कायदा असा होता की भारतीयांनी त्यांच्या बोटांचे ठसे असलेली प्रमाणपत्रं कायम बरोबर बाळगावी. साधारणपणे बोटांचे ठसे गुन्हेगारांचे घेतले जातात.

याचा निषेध म्हणून गांधीजींनी शेकडो पत्रं लिहिली आणि पाठवली. अनेक मान्यवर लोकांना याबाबतचं आवाहन आणि अनेकांच्या सह्यांच्या विनंत्या पाठवल्या. ते महत्त्वाच्या पदांवरच्या सरकारी अधिका-यांनाही भेटले. तेव्हा वृत्तपत्रातल्या मजकुरानं आणि सभांमधल्या भाषणांनी काहीही घडेना तेव्हा गांधीजींनी नवीन शस्त्र परजलं - सत्याग्रह! वाईट गोष्टींना अहिंसक मार्गानं केलेला विरोध.

आता गांधीजींनी भारतीयांना बोटांच्या ठशांनी नोंदणी करण्यावर बहिष्कार टाकायला सांगितला. त्यांनी भारतीयांना अनेक दिवस चालणा-या अहिंसक लढ्यासाठी तयार व्हायला सांगितलं. गरज पडली तर जेलभरो आंदोलन, मरण आलं तरी चालेल पण ह्या अन्याय नष्ट करायचा असेल तर स्वेच्छेनं त्रास पत्करणं हा सर्वात कमी वेळाचा उपाय आहे. त्यांनी त्यांना इशारा दिला की केवळ गांधीजींवर अवलंबून राहून त्यांना त्यांचं ईप्सित साध्य होणार नाही तर, त्यांनी सुचवलेला कार्यक्रम समजून घेऊन आणि त्याप्रमाणे कृती करूनच ते होईल. त्यांच्या सूचना लोकांना हिंदी, गुजराथी, तमिळ आणि तेलगू भाषांमधून समजावून दिल्या होत्या. त्यांच्या सेनेनं ही लढाई संपूर्ण अहिंसेनं लढायची शपथ घेतली. या सैन्यात रस्त्यावरची सामान्य माणसं, कारागीर, विक्रेते, खाणमालक, व्यापारी आणि स्त्रिया सामील झाल्या. गांधीजींनी ह्या निःशस्त्र, शांततापूर्ण, शिस्तशीर ५००० लोकांच्या सैन्याचं पायी चालत नेतृत्व केलं. ते त्यांच्या जथ्याबरोबर चालत, त्यांच्याबरोबर उघड्या आकाशाखाली झोपत, त्यांच्याबरोबर अर्धाकच्चा भात आणि पातळ आमटी खात. ते आजारी माणसाची सेवा करत, मागे पडणा-यांचं मनोरंजन करत, त्या सर्वांसाठी स्वयंपाक करत आणि त्यांना वाढत. त्यांच्या मानसिक ताकदीला शोभेल अशीच त्यांची शारीरिक ताकद होती. २५०० लोकांना सक्तमजुरीची शिक्षा झाली. १००० लोक आयुष्यातून उठले, काही शहीद झाले. ह्या नेत्याबरोबर, एरवी ऐषआरामाच्या जगण्याची सवय असलेल्या व्यापा-यांनी तुरुंगात खडी फोडली, झाडू मारण्याचं काम केलं. कस्तुरबादेखील सत्याग्रहात सामील झाल्या आणि त्यांना तुरुंगवास भोगावा लागला.

इंग्लंडमध्ये गांधीजींच्या मोहिमेला सहानुभूती मिळत होती. भारतात काँग्रेसच्या बैठकांमध्ये दक्षिण भारताच्या प्र नाची चर्चा होत असे. सर वेदरबर्न तेव्हा काँग्रेसचे अध्यक्ष झाले, ते म्हणाले, "हिंदू आणि मुसलमान खांद्याला खांदा लावून उभे राहिले तर काय घडू शकतं त्याचं ताजं उदाहरण दक्षिण आफ्रिकेत पहायला मिळतं आहे. गांधीजींच्या उत्कृष्ट नेतृत्वाखाली भारतीयांनी जी निर्धाराची भूमिका घेतली तिच्याबद्दल आभार प्रदर्शित करायला हवेत." गांधीजींच्या पदयात्रेचा रोजचा खर्च रु. ३२०० होता. त्यासाठी त्यांना पैसे हवे होते. भारतात पैशांसाठी आवाहन करण्यात आलं. स्त्रियांनी अंगावरून काढून बांगड्या, अंगठ्या दिल्या. राजकुमारांनी आणि मोठ्या धंदेवाल्यांनी हजारो रुपये दिले. टागोरांनी जमवलेली देणगी पाठवली अशा प्रकारे दीर्घमुदतीची तयारी असलेली लढाई भारतीयांना उपकारक समझोता होऊन थांबली. जर आत्मप्रतिष्ठा पणाला लागत नसेल तर गांधीजी तडजोडीला कायम तयार असत.

भारतात अनेक नेते होते. तरी गांधीजी भारतात परत आल्यावर त्रस्त लोकांनी, शेतक-यांनी, कामगारांनी त्यांची मदत घेतली. त्यांच्या प्रयत्नांतूनच चंपारण्यातली शेकडो वर्षांची सक्तीनं निळीचं उत्पादन करण्याची प्रथा नष्ट झाली, वेठबिगारीची पद्धत बंद झाली. गांधीजींनी स्थानिक प्र नांवर लोकांनी स्वतःच उपाय शोधावेत याला कायम प्रोत्साहन दिले. अशा प्रकारच्या सगळ्या असंतोषाला प्रसिद्धी मिळाली आणि भारतभरच्या लोकांचं लक्ष तिनं वेधून घेतलं.

गांधीजींनी जेव्हा जेव्हा जनतेमधून चळवळी उभ्या केल्या तेव्हा त्यांनी कायम त्याच युक्त्या वापरल्या. चंपारण्य, खेडा आणि बारडोलीच्या शेतक-यांच्या चळवळींखेरीज गांधीजींनी आणखी चार मोठ्या चळवळींचं नेतृत्व केलं आणि त्या त्यांच्या सेनापतीपदाच्या ३० वर्षांच्या कारकीर्दभर चालल्या. भारतभर प्रवास करीत आणि प्र नाचे सर्व तपशील समजून घेत असत.

ते हजारो लोकांच्या मुलाखती घेत आणि दिवसाकाठी १८ ते २० तास काम करत. सरकारशी लढा देण्यात गुंतलेल्या लोकांकडून माहिती मिळवत. ते हजारो

सार्वजनिक सभांमध्ये बोलत आणि शिस्तीचे काही नियम घालून देत. अहिंसा हा त्यांनी निवडलेला मार्ग होता. त्याबद्दल ते म्हणत, "देशापुढे आणखी एक उपाय आहे. तलवारी उपसणं. ते शक्य असतं तर भारतानं अहिंसेची शिकवण मानली नसती. नुसती भाषणं देऊन आणि मिरवणुका काढून स्वराज्य मिळणार नाही. इच्छाशक्ती तीव्र असायला हवी. आपण शूर शिपाई व्हायला हवं, पळून जाण्याची इच्छा नसलेले शूरवीर! तुम्ही सर्वांनी आपले प्राण देण्याची वेळ आली तरी, मागे हटता कामा नये. हे मिळवायचं असेल तर पुरुषार्थ जागा हवा. मारण्याऐवजी, गरज असली तर स्वतः मरायला लागेल. कोणाचा जीव घ्यायचा असेल तरी आपल्याला मरणाची भीती असतेच तरीही ते सोपं वाटत असेल तर कुणाचा जीव वाचवण्यासाठी मरण पत्करणं कठीण का वाटावं? दुस-यांचे जीव घेणं यात शौर्य नाही. आपल्या सन्मानासाठी आणि स्वातंत्र्यासाठी प्राण देण्यात खरं शौर्य आहे.

त्यांच्या अहिंसा सेवेमध्ये स्त्रिया, मुलं आणि वृद्ध माणसंही असत. मुलांच्या पथकाला वानरसेना म्हणत. गांधीजींचा अहिंसेवर इतका दृढ विश्वास होता की, कधी कुठे हिंसा घडली तर ते आपला सत्याग्रह मागे घेत. त्यांना छुपं युद्ध मान्य नव्हतं. ते नेहमी पुढे काय करणार आहेत ते घोषित करत असत. आणि लोकांनी त्यांचा राग, तिरस्कार आणि सूडाची भावना आपल्या हृदयातनं काढून टाकावी असं ते म्हणत.

गांधीजी लोकांकडून काम करून घेताना त्यांना कधीही खोटी आशा दाखवत नसत. ते त्यांच्या सैनिकांना सांगत, "त्यांच्यावर लाठीहल्ला होईल. तुरुंगवास घडेल. बंदुकीच्या गोळ्या त्यांना लागतील. फाशीच्या तक्तावर चढावं लागेल आणि निषेधासाठी हातही उगारता येणार नाही. त्यांची संपत्ती जप्त होऊ शकेल. त्यांचा मंत्र होता. "करेंगे या मरेंगे" त्याचा अर्थ दुःख सहन करणं असा होता आणि त्यामुळेच शत्रूचं हृदय पाझरू लागेल"

त्यांनी परदेशी कपड्यांची होळी करण्याचं लोकांना आवाहन केलं, जमिनीवरचा कर न भरण्याचं आंदोलन केलं, मिठाचा सत्याग्रह केला, सरकारी शाळा, महाविद्यालयं

आणि न्यायालयं यांच्यावर बहिष्कार घातला. लोकांना त्यांनी रचनात्मक कामं करण्याचं आवाहन दिलं. त्यांना लोकांनी सूतकताई करायला आणि विणकाम करायला लागावं असं वाटत होतं. ग्रामीण पंचायतींचं पुनरुज्जीवन करणं, राष्ट्रीय शाळा आणि महाविद्यालयं स्थापन करणं ही देखील त्यांची इच्छा होती. त्यांची एका वर्षात स्वराज्य मिळवून आणायची घोषणा अपयशी ठरली. पण लोकांची मनं मात्र बांधलेली होती ती मुक्त झाली. मोठ्या प्रमाणावर जनतेला जागं करणं हा मोठा फायदा होता. दांडी यात्रेनं लोकांवर जादू केली. शेकडो स्त्रिया त्यांचे पडदे, बुरखे दूर करून नैसर्गिक मीठ गोळा करायला आल्या. त्यांनी पुरुषांच्या बरोबरीनं आपणही राष्ट्राची सेवा करू शकतो हे सिद्ध केलं. त्यांनी परदेशी मद्य आणि परदेशी कापड विकणा-या दुकानांसमोर धरणी धरली. भारताच्या राजकीय इतिहासात प्रथमच गांधीजींनी अहिंसक असहकाराचं धोरण एवढ्या मोठ्या प्रमाणावर राबवलं.

गांधीजी युद्धाची परिभाषा वापरत आणि अहिंसक लढ्याचं वर्णन करत. "मी युद्ध करायला बाहेर पडलेलो आहे. ज्याप्रमाणे अफ्रीदी योद्धा बंदुकीशिवाय राहणार नाही. त्याचप्रमाणे तुम्हा अहिंसेच्या योद्धयांचं टकळी आणि चरख्याशिवाय चालणार नाही. चरखा तुमची बंदूक आहे आणि सुताचे गुंडे तुमची काडतुसं. स्वातंत्र्याचं रक्षण बंदुकांनी होणार नाही तर हातानं कातलेल्या सुताच्या गुंड्यांनी होईल.

तुम्ही घरसानाच्या मिठाच्या साठ्यावर आक्रमण कराल आणि यालाच पुढे लोक घरसानाची लढाई म्हणतील. गांधीजींच्या लढाईत तोफा, बंदुका, बॉम्ब यांना स्थान नव्हतं. त्यांच्या सैनिकांची शस्त्रं म्हणजे शौर्य, देशभक्ती, सहनशक्ती आणि आत्मसमर्पण ही होती.

गांधीजींना भित्रेपणापेक्षा हिंसा जास्त मान्य होती, पण त्यांनी शारीरिक शक्तीपेक्षा आत्म्याची शक्ती मोठी मानली. तिला जास्त महत्त्व दिलं. त्यांना एकदा विचारलं होतं, "ॲटम बॉम्बनी तुमच्या अहिंसेवरच्या विश्वासाला धक्का दिला असेल ना?" ते म्हणाले, "धक्का तर नाहीच दिला उलट त्यानं सत्य आणि अहिंसा ही जगातली सर्वात

बलाढ्य शक्ती आहे हे मला दाखवून दिलं. त्यांच्यापुढे ॲटम बॉम्बचा काहीही प्रभाव पडणार नाही.” ते म्हणत, “भारतानं जर अहिंसेच्या मार्गानं स्वातंत्र्य मिळवलं तर जगातल्या सर्व शोषितांना दिलासा मिळेल की त्यांचं स्वातंत्र्य दूर नाही.”

❁❁

# लेखक

गांधीजींनी बरीच पुस्तकं लिहिली. त्यातली बरीचशी पुस्तकं म्हणून लिहिली नव्हती. त्यांच्या सत्य आणि अहिंसा, स्वदेशी आणि चरखा यांच्यावरच्या लेखांचे, भाषणांचे संग्रह आणि स्त्रियांपुढे, विद्यार्थ्यांपुढे, राजांपुढे झालेल्या भाषणांचे संग्रह या स्वरूपात पुस्तकं झाली.

गांधीजींना फार चांगले लेखक म्हणून ओळखत असत. त्यांनी कधीही कानांना सुखद म्हणून सुंदर भाषेचे प्रयोग केले नाहीत किंवा ते कुठल्या शैलीच्या आहारी गेले नाहीत. त्यांची स्वतःची अशी जोरदार ओघवती शैली होती. त्यांच्या लेखनात त्यांच्या आशा, त्यांचा विश्वास, त्यांची दुःखं त्यांच्या निराशा प्रतिबिंबित होत. त्यांच्या जीवनपद्धती-प्रमाणेच त्यांची लेखनशैली साधी, स्वच्छ, नेमकी आणि अकृत्रिम होती. काही ब्रिटिश व्हाइसरॉय म्हणत की गांधीजी जे म्हणायचं ते उत्तम इंग्रजीत म्हणत, त्यांचं लेखन थेट भिडत असे आणि त्यांचे शब्द वेचक असत. गांधीजी म्हणत की मागे विचाराचं बळ असल्याशिवाय त्यांच्या तोंडून किंवा लेखणीतून एकही शब्द निसटत नसे.

ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीतल्या एका प्राध्यापकांनी गोलमेज परिषदेच्या वेळचं गांधीजींचं भाषण तयार करायला त्यांना मदत केली होती. त्यांनी म्हटलं होतं, “गांधीजींचं इंग्रजीतल्या अव्ययांवर जेवढं प्रभुत्व आहे तेवढं असलेला दुसरा कोणी भारतीय मला माहीत नाही. मी खूप मेहनत घेऊन मजकूर तयार करत असे. गांधीजी त्यावर एक नजर फिरवत आणि कुठेतरी एकदोन अव्ययांचा बदल करत आणि त्यानं एवढा चमत्कार व्हायचा की माझा अर्थ बदलून तो गांधीजींचा अर्थ व्हायचा.”

गांधीजींनी निवडक इंग्रजी लेखकांचं साहित्य आणि बायबल काळजीपूर्वक वाचलं होतं त्यामुळे अचूक शब्द निवडण्याची कला त्यांच्यापाशी होती. त्यांचं वाचन अफाट होतं आणि त्यांनी ते सर्व पचवलेलंही होतं.

त्यांनी तरुणपणी भारतीय विद्यार्थ्यांसाठी "लंडन गाइड" नावाची पुस्तिका लिहिली होती. तो त्यांचा लेखनाचा पहिला प्रयोग होता. त्यात लंडनचे बरेच उपयुक्त तपशील होते. त्यानंतर दोन पुस्तिका त्यांनी लिहिल्या, "ॲन अपील टु एव्हरी ब्रिटन" आणि "द इंडियन फ्रँचाइज" पहिल्या पुस्तिकेत नाताळमधल्या भारतीयांची परिस्थिती आणि दुसरीत नाताळमधल्या भारतीयांच्या मताधिकाराबद्दल लिहिलं होतं. त्यानंतर आलेल्या "ग्रीन पॅम्प्लेट"ची भाषा सरकारी अहवालांसारखी निवेदनाची होती. प्रथम प्रकाशनानंतर एक महिन्यानं त्यांनी दुसरी सुधारित आवृत्ती छापली या पुस्तिकेचा सारांश जेव्हा दक्षिण आफ्रिकेतल्या वृत्तपत्रांनी छापला तेव्हा तो वाचून युरोपीयन लोक संतप्त झाले. याचा परिणाम असा झाला की त्यानंतर जेव्हा गांधीजी दक्षिण आफ्रिकेत आले तेव्हा संतप्त गो-यांनी त्यांना घेरलं आणि त्यांना मारून टाकण्याचा प्रयत्न केला. त्यांना असा अनुभव आला की त्यांचं लेखन संक्षिप्त करता येत नसे. त्यांना स्वतःला कमीत कमी शब्दात लेखनाची कला साध्य होती. त्यांनी काँग्रेसची घटना तयार केली होती आणि अनेक ठराव लिहिले होते.


गांधीजींच्या आहाराच्या प्रयोगांविषयी त्यांच्या "अ गाइड टु हेल्थ" नावाच्या पुस्तिकेत नोंदी आहेत. त्यांनी गुजराथी "इंडियन ओपीनियन" मध्ये लिहिलेल्या लेखांचं ते इंग्रजी भाषांतर आहे. हे पुस्तक भारतात आणि विदेशात खूप लोकांनी वाचलं आणि त्याची इंग्रजीत, यूरोपियन भाषांमध्ये आणि भारतीय भाषांमध्ये भाषांतरं झाली.

जेव्हा एखादी कल्पना त्यांच्या मनाचा ताबा घेत असे तेव्हा कोण काय म्हणेल याची जराही भीती न बाळगता ते त्याबद्दल लिहीत असत. त्यांची लिहिण्याची ऊर्मी इतकी तीव्र असे की ते धावत्या गाडीत आणि हलत्या बोटीतही लिहीत असत. १८९६ मध्ये भारतात परत येताना त्यांनी बोटीवर "द ग्रीन पॅम्फ्लेट" लिहिलं. त्यांचं "हिंदी

स्वराज्य" हे आधुनिक संस्कृतीवरचं टीकात्मक लेखन त्यांनी सलग इंग्लंड ते दक्षिण आफ्रिकेच्या सागरी प्रवासात १९०९ मध्ये लिहिलं. ते बोटीवर मिळणारं लेखनसाहित्य वापरत आणि उजव्या हातानं लिहून दमायला झालं तर ते डाव्या हातानं लिहीत, दहा दिवसात त्यांनी ते पुस्तक पूर्ण केलं. टॉलस्टॉय यांनी ते वाचलं आणि म्हणाले की, "अहिंसक मार्गांनी विरोध करण्याचा मार्ग भारतापुरताच महत्त्वाचा नाही तर तो सबंध जगाच्या दृष्टीनं महत्त्वाचा आहे." कन्स्ट्रक्टिव्ह प्रोग्रॅम" नावाची पुस्तिका देशाच्या उभारणीच्या संदर्भात होती ती त्यांनी रेल्वेत लिहिली. त्यांच्या लेखनात क्वचितच काही दुरुस्तीच्या खुणा असत त्यात बदलही क्वचित करावा लागे. हे का शक्य होत असे याबद्दल ते म्हणत की, "सत्याच्या उपासनेतून ही अध्यात्मिक शिस्त येते तिच्यामुळे हे शक्य होतं."

एखाद्या कल्पनेचं भाषांतर करताना अचूक शब्द निवडण्याची त्यांची क्षमता विलक्षण होती. ते कधीही शब्दाला शब्द असं भाषांतर करत नसत. "डेथ डान्स"ला ते "पतंग-नृत्य" म्हणत. रस्किनचं "अन टु द लास्ट" वाचल्यानंतर त्यांना वाटलं की हा तर आपल्याच विश्वासांचा प्रतिध्वनि आहे. त्यांनी ते गुजराथीत भाषांतरीत केलं. त्याचं नाव त्यांनी "सर्वोदय" ठेवलं. कार्लाइलच्या लेखनातून काही भाग आणि कमाल पाशाच्या चरित्राचा काही भाग त्यांनी गुजराथीत आणला. त्यांनी लिहिलेला "स्टोरी ऑफ अ सत्याग्रही" हे जणू दुस-या भाषेत आलेलं प्लेटोचं "डिफेन्स अँड डेथ ऑफ सॉक्रेटिस" आहे. गांधीजी तुरुंगात होते तेव्हा त्यांनी आश्रम भजनावलीचं इंग्रजीत भाषांतर केलं आणि काही भारतीय संतकवींच्या काही कवितांचंही भाषांतर केलं. या पुस्तकाचं नाव "साँगज् फ्रॉम प्रिझन" असं होतं.

गांधीजींनी त्यांचं आत्मचरित्र गुजराथीत लिहिलं. त्यांनी अशा साध्या पण प्रभावी लेखनशैलीची वाचकांना ओळख करून दिली की त्यामुळे गुजराथी भाषा ही लोकांची भाषा झाली. या आत्मकथेचं इंग्रजी भाषांतर "द स्टोरी ऑफ माय एक्सपेरिमेंटस् विथ ट्रूथ" अनेक मान्यवरांना उत्तम साहित्यकृती म्हणून मान्य झालेलं आहे. त्या आत्मकथेतून



या जगप्रसिद्ध व्यक्तीचं व्यक्तिमत्त्व तर उलगडत जातंच पण त्याचबरोबर त्यांच्या लेखणीतून साकारलेली त्यांचे पालक, पत्नी, मित्रमंडळी यांची चित्रं पहायला मिळतात. त्यातले नाट्यपूर्ण प्रसंग आणि उत्सुकता कायम ठेवण्याची शैली, अधले मधले संवाद यांनी वाचक खिळून राहतात. जवळ जवळ सर्व भारतीय भाषांमध्ये या आत्मकथेचं भाषांतर झालं. आणि इंग्रजी, फ्रेंच, रशियन, जर्मन, चिनी आणि जपानी भाषेतही ती भाषांतरित झाली.

त्यांच्या सर्व लेखनात सत्य आणि उच्च नैतिक मूल्यांचा आग्रह असतो. पण ते लेखन म्हणजे असे वागा असे वागू नका याची कोरडी यादी नाही. त्यांनी मुलांसाठी बालपोथी आणि नीतिधर्म ही नैतिक शिकवणुकीची पुस्तकं लिहिली. मुलांना जो प्रत्यक्ष

आचरणात आणता येणार नाही असा काहीही उपदेश त्यांना करायला नव्हता. ते आश्रमातल्या मुलांना जी पत्रं लिहीत ती गंमतीशीर पण असत आणि त्यात काही सूचनाही असत. ते फार मोठे पत्रलेखक होते आणि एका दिवसात ५० पत्रं लिहू शकत. त्यांच्या सुमारे एक लाख पत्रांचा संग्रह त्यांच्या लेखनसाधनेचा एक महत्त्वाचा भाग आहे.

गांधीजी "कलेसाठी कला" या विचारप्रणालीच्या विरुद्ध होते. त्यांच्या मते कलेला सत्याचं अधिष्ठान असलंच पाहिजे आणि जर साहित्य माणसाला प्रगतीकडे नेत असेल तरच त्याचं काही मूल्य आहे असं ते म्हणत. भारतातल्या अर्धपोटी जनतेला चांगल्या गोष्टीची भूक होती आणि शेतकरी बैलांना हाकताना आवडीनं म्हणेल अशा छोट्या गाण्यांची जरूर होती असं त्यांना वाटे म्हणजे ते वाईट शिव्या विसरून जातील. साहित्यिकांच्या अधिवेशनात त्यांनी लेखकांना उद्देशून म्हटलं, "तुमच्या मनात या लाखो मूक लोकांना काय हवं आहे आणि त्यांना काय आवडेल, पचेल याचा विचार तरी येतो का? आपलं साहित्य कोणासाठी असणार आहे? मी त्यांना काय वाचून दाखवायचं?" एक उदाहरण म्हणून ते डीन फरार या लेखकांच्या "लाइफ ऑफ ख्राइस्ट" या पुस्तकाचा उल्लेख करत. इंग्लंडमधल्या सामान्य लोकांना कळेल अशा भाषेत हे पुस्तक लिहिलं आहे. गुजराथी "इंडियन ओपीनियन" मध्ये त्यांनी गुजराथीत अनेक विशेष स्त्री-पुरुषांची व्यक्तिचित्रं रेखाटली. त्यांचे आवडते कवि-तत्त्वज्ञ रामचंदभाई होते. त्यांचं चरित्र लिहिण्याची जेव्हा गांधीजींना विनंती केली तेव्हा ते म्हणाले, "मला त्यांच्याबद्दल लिहायचं असेल तर मला त्यांच्या घराचा, त्यांच्या खेळाच्या मैदानाचा काळजीपूर्वक अभ्यास करायला लागेल. त्यांच्या मित्रांना, शाळा-सोबत्यांना, नातेवाईकांना आणि अनुयायांना भेटावं लागेल." अशा वेळी देखील त्यांचं मार्गदर्शक तत्त्व सत्य हेच होतं, कल्पना हे नव्हतं.

भारतीय महाकाव्यांमध्ये असलेले प्रसंग, उदाहरणं आणि नीतिमूल्यं यांचे संदर्भ गांधीजी नेहमी देत. राम, कृष्ण आणि महम्मदाच्या जीवनातल्या गोष्टी सांगत. यामुळे जनसमुदायाला या कल्पना समजणं सोपं जाई आणि गांधीजींना त्यांच्या हृदयाला

स्पर्श करण्याची विलक्षण शक्ती मिळत असे. समाजातल्या अभद्र गोष्टींवर टीकास्त्र सोडताना गांधीजी मागे पुढे पहात नसत. गो-या लोकांचा काळ्यांवर अत्याचार किंवा गुंडगिरी करणं सवर्णांनी हरिजनांवर अत्याचार करणं किंवा स्वार्थी काँग्रेसजनांनी शुभ्र खादीधारी गुंड होणं सर्वांवर गांधीजींची लेखणी चाबकासारखी कडाडून, तुटून पडत असे. त्यावेळी याविषयी त्यांनी जी भविष्यं वर्तवली, ती आजही खरी सिद्ध होत आहेत. एकदा लॉर्ड कर्झननं असं वक्तव्य केलं की, “सत्याचा आदर्श मानणं ही बरीचशी पा चात्त्य कल्पना आहे.” याला विरोध करताना गांधीजींनी रामायण, महाभारत आणि वेदांमधली अनेक उदाहरणं देऊन सिद्ध केलं की भारतात प्राचीन काळापासून लोक सत्यानंच वागत होते. त्यामुळे लॉर्ड कर्झन यांनी भारतावर जो निराधार अपमानकारक कलंक लावला आहे तो त्यांनी सभ्य ब्रिटिश माणूस म्हणून मागे घ्यावा. गांधीजी एकदा म्हणाले होते, “महम्मद आणि त्यांचा शांततेचा संदेश आज कुठे आहे? आज जर महम्मद भारतात आले तर त्यांच्या अनेक तथाकथित अनुयायांना ते दूर लोटतील आणि माझा सच्चा मुसलमान म्हणून स्वीकार करतील. त्याचप्रमाणे येशू ख्रिस्त माझा सच्चा ख्रिस्ती म्हणून स्वीकार करतील. प चिमेकडे ख्रि चन धर्म शिल्लक नाही, असता – तर युद्ध झालंच नसतं!”

गांधीजी म्हणत, “कवि त्यांच्या स्वनिर्मित स्वप्निल जगात राहतात” पण ते स्वतः चरख्याचे गुलाम आहेत आणि चरखा अन्य कुणीतरी निर्माण केला आहे. पण त्यांच्या विचारांच्या आणि भाषेच्या सौंदर्यानं तत्कालीन अनेक थोर माणसांवर खोलवरचा परिणाम झाला. त्यांच्या लेखनातले अनेक परिच्छेद हे सिद्ध करतात की गांधीजी लेखणीच्या काही फटका-यांमध्येच कशी जिवंत चित्रं साकार करत.


“म्हैसूरमध्ये एका पुरातन देवालयात मी एक दगडाची छोटी मूर्ती पाहिली. ती माझ्याशी बोलली. ती एक अर्धनग्न स्त्री होती आणि ती कामदेवाच्या बाणांनी विद्ध होऊन आपल्या वस्त्रांच्या चुण्यांशी झटापट करत होती. तिच्या पायांशी एक मेलेला विंचू पडला होता. तो विंचू पराभूत कामदेवाचं प्रतीक होतं. तिच्या अंगांगातून विंचूदंशासारखी काम-वेदना स्पष्ट अनुभवाला येत होती.”

"तुम्ही ओरिसामध्ये हाडांचे सापळे पाहिले आहेत? या गरीब, अर्धपोटी, उघड्या-वाघड्या माणसांमधून असे कलावंत होऊन गेले की ज्यांनी अस्थि, शिंगं आणि चांदी मधून चमत्कार घडवले आहेत. तिथं जा आणि पाहून या की अशा हीन-दीन शरीरातही असा आत्मा असतो की जो निर्जीव शिंगांमध्ये आणि धातूमध्ये प्राण फुंकू शकतो! गरीब कुंभारानं मातीतून काय चमत्कार करून दाखवला आहे ते पहा"

"ते ठिकाण नदीकिनारी होतं. छोट्या छोट्या टेकड्या झाडाझुडपांनी आच्छादित होत्या आणि त्यांच्या रांगेतून नदी वहात होती. नदी किनारा वाळूचा बनला होता. चिखलाचा नव्हता. नदीच्या पाण्यातच व्यासपीठ उभारलं होतं. व्यासपीठाच्या समोरच्या रस्त्यावर दुतर्फा बारा हजार स्त्री-पुरुष संपूर्णपणे शांत बसले होते."

"पहाटे पहाटेच मी मलबारमध्ये प्रवेश केला. मी परिचित भागांमधून जात होतो तेव्हा अचानक मला एक "नयाडी" चेहरा भेटला. मी गेल्या वेळीही याला भेटलो होतो. अस्पृश्यतेविषयी चर्चा चालू असताना एक कर्कश्श आवाज ऐकू आला. माझ्याशी बोलणा-या लोकांनी सांगितलं, "आम्ही आपल्याला एक चालता बोलता जिवंत "नयाडी" दाखवतो." त्याला सार्वजनिक रस्त्यावरून चालायला बंदी होती. अनवाणी दबकत दबकत तो शेतातून चालला होता. मी त्याला जवळ बोलावलं. घाबरत थरथरत तो आला. मी त्याला सांगितलं माझ्यासारखाच तुलाही रस्त्यावरून चालण्याचा अधिकार आहे. तो म्हणाला, "असं नाही होणार, ते शक्य नाही. मी रस्त्यावरून नाही जाऊ शकत." आपण मला आता हास्यविनोद करत आपल्याशी बोलताना पहात आहात पण या सगळ्या हसण्या-खेळण्याच्या मागे तो 'नयाडी' चेहरा माझी पाठ सोडत नाही. मलबारमध्ये यात्रा करत असताना ही आठवण मला सतत टोचत राहील."


❋❋



My dear Jawaharlal
You must not be
stunned. Rather rejoice that God gives
strength & direction
to do my duty. I could
not do otherwise. As
the author of nonco-opera-
tion, a heavy respon-
sibility lies on my shoul-
ders. Do give me in
writing your im-
pressions of Lucknow
& Cawnpore. Let me
drink the cup to the
full. I am quite at
peace with myself.
19 9/24 Yours sincerely
M.K. Gandhi

गांधीजींचे हस्तांक्षर : उजव्याहाताने हाताने लिहिलेला मजकूर

(साभार : जवाहरलाल नेहरू संग्रहालय)


My dear Jawahar

We are living in strange times. Sitla Sahai ~~must~~ may depend himself. ~~Have you seen him~~! Please keep me informed of further developments. What is he? Is he a lawyer? Had he ever any connection with revolutionary activity?

As for the Congress, it would be better to make it as simple as possible so as to enable the present remaining workers to cope with it. ~~And~~ I know that your burden will be now increased.

But your health in [illegible] I do not [illegible] I wish and Ke[illegible]

3

I want your mental peace. I know that you will serve the country even as manager of a business. I am sure that Father will not mind any decision you may arrive at so long as it gives you complete peace.

Yours

30 9/25 [?] Bapu

I see that I must reserve the right hand for N.J [?]

गांधीजींचे हस्तांक्षर : डाव्याहाताने हाताने लिहिलेला मजकूर

(साभार : जवाहरलाल नेहरू संग्रहालय)

# पत्रकार

एकोणिसाव्या वर्षी इंग्लंडला पोचल्यानंतर गांधीजी वृत्तपत्रांचे नियमित वाचक बनले. भारतात शाळकरी वयात ते वृत्तपत्रं वाचत नसत. ते संकोची स्वभावाचे होते आणि चार लोकांमध्ये बोलू शकत नसत. २१ वर्षांचे असताना त्यांनी प्रथम "द व्हेजिटेरियन" या इंग्रजी साप्ताहिकात शाकाहार, भारतीय आहार पद्धती, सवयी आणि धार्मिक उत्सवांबद्दल लिहिले. त्यांच्या सुरुवातीच्या लेखनातही एखादी कल्पना साध्या सरळ भाषेत लिहिण्याची त्यांची क्षमता दिसून येते.

दोन वर्षांच्या विश्रांतीनंतर त्यांनी पुन्हा पत्रकारिकतेकडे लक्ष दिलं. त्यानंतर मात्र शेवटपर्यंत त्यांच्या लेखणीला कधीही विश्रांती मिळाली नाही. त्यांनी कधीही लोकांवर छाप टाकण्यासाठी लिहिलं नाही. अतिशयोक्तीसुद्धा ते काळजीपूर्वक टाळत असत. त्यांचं ध्येय सत्याची सेवा करणं, लोकांना शिक्षण देणं आणि देशासाठी उपयोगी पडणं हे होतं.

दक्षिण आफ्रिकेत पोचल्यावर तिस-याच दिवशी गांधीजींना न्यायालयात अपमानित केलं गेलं. त्यांनी ताबडतोब ही घटना स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध केली आणि रातोरात प्रसिद्धी मिळवली.

३५व्या वर्षी त्यांनी इंडियन ओपीनियनची जबाबदारी स्वीकारली आणि त्या माध्यमातून दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांना एकत्र आणलं आणि मार्गदर्शन केलं. या साप्ताहिकाची गुजराथी आवृत्ती फिनिक्स आश्रमात लगेचच प्रकाशित होत असे. गुजराथी इंडियन ओपीनियनमध्ये आहारावर त्यांनी एक लेखमाला लिहिली आणि थोर स्त्री-पुरुषांच्या

जीवनांवरही लेखमाला प्रसिद्ध झाली. या दोनही साप्ताहिकांच्या प्रत्येक अंकात गांधीजींचे लेख असत. साप्ताहिकासाठी एक संपादक होते पण गांधीजीच सर्व जबाबदारी घेत. त्यांना लोकांना शिक्षण द्यायचं होतं, त्यातून त्यांचा विचार घडवायचा होता. गोरे लोक आणि भारतीय यांच्यामधल्या गैरसमजुती दूर करायच्या होत्या आणि भारतीयांना त्यांचे दोष दाखवून द्यायचे होते. इंडियन ओपीनियनच्या अंकात ते जीव ओतून लिहीत असत आणि दक्षिण आफ्रिकेत चालू असलेल्या सत्याग्रहाचा तपशीलवार अहवाल प्रसिद्ध करत. त्यांच्या लेखनातून परदेशांमधल्या वाचकांना दक्षिण आफ्रिकेचं खरं चित्र मिळत असे. अशा वाचकांपैकी विशेष वाचक होते. भारतात गोखले, इंग्लंडमध्ये दादाभाई नौरोजी आणि रशियात टॉलस्टॉय. दहा वर्षं या साप्ताहिकासाठी गांधीजींनी अतोनात कष्ट केले. त्यांना इंडियन ओपीनियनच्या बदल्यात दर आठवड्याला २०० नियतकालिकं मिळत. ती सर्व ते काळजीपूर्वक वाचत आणि इंडियन ओपीनियनच्या वाचकांच्या उपयोगी अशा बातम्या लिहीत.

वृत्तपत्रं एखाद्या कल्पनेचा प्रचार करण्यासाठी प्रभावी माध्यम आहे हे गांधीजींना माहीत होतं. ते एक यशस्वी पत्रकार होते पण तो त्यांनी आपला पोटापाण्याचा उद्योग कधी केला नाही. पत्रकारितेचा हेतू सेवा हा आहे असा त्यांचा विश्वास होता. "पत्रकारितेचा उपयोग कधीही स्वार्थी हेतूंसाठी केला जाऊ नये किंवा त्यावर पैसाही मिळवू नये. आणि संपादकांवर कोणतंही संकट आलं किंवा पत्रावर आलं तरी परिणामांची तमा न बाळगता त्या पत्रानं देशाची मतंच स्पष्टपणे मांडली पाहिजेत. पत्रकारांना खरोखरच जनतेच्या हृदयात स्थान मिळवायचं असेल तर त्यांना वेगळी धोरणं आखावी लागतील."

आणि तरीही ते स्वतः घालून घेतलेले नियम अतिशय कडकपणे पाळत. ते कधीही भाषेला नटवत नसत, कधीही निष्काळजीपणे विधानं करत नसत आणि विनाकारण अनावश्यक विशेषणं वापरत नसत. ते निर्दोष भाषांतर करण्याबद्दल अतिशय जागरूक असत आणि शब्दांची निवड अतिशय साक्षेपीपणे करत त्यांना निनावी पत्रांचं वावडं होतं पण नियम म्हणून संपादकांना आलेली टीकेची पत्रंही छापत.

त्यांनी जेव्हा इंडियन ओपीनियन हाती घेतलं तेव्हा ते तोट्यात चालत असे. आणि त्याच्या फक्त चारशे प्रती खपत. त्यांना त्यातून फायदा नको होता पण स्वावलंबी नसलेल्या वृत्तपत्राचं संपादकपद सांभाळण्याची इच्छाही नव्हती. काही महिने ते केवळ हे वृत्तपत्र चालू रहावं म्हणून १२०० रु. दरमहा स्वतःच्या पदरचे देत. एकूण त्यांना २६००० रु. चा तोटा सोसावा लागला. याशिवाय नंतर त्यांनी जाहिराती न घेण्याचाही निर्णय घेतला. कारण त्यामुळे त्यांना आपल्या कल्पनांच्या प्रसारासाठी जास्त जागा मिळणार होती. त्यांना हेही दिसत होतं की जाहिराती स्वीकारल्या तर स्वतंत्रपणे काम करणं आणि नेहमी सत्य तेच लिहिणं शक्य होणार नाही. त्याचं निरीक्षण असं होतं – "सभासदत्वाच्या वर्गण्यांऐवजी मुख्यतः जाहिरातींवर अवलंबून राहणं हे अतिशय वाईट होतं. जे वृत्तपत्र मद्यपानाविरुद्ध लिहितं तेच जाहिरातींमधून मात्र मद्याचा पुरस्कार करतं. नव्याण्णव टक्के जाहिराती संपूर्णपणे निरुपयोगी असतात आणि देशाला घातक असतात. अनेक जाहिराती फसव्या असतात, असभ्य असतात"

गांधीजींनी आपल्या वृत्तपत्राचा खप वाढावा म्हणून अयोग्य मार्ग स्वीकारले नाहीत. त्याचबरोबर इतर वृत्तपत्रांबरोबर कधीही स्पर्धा केली नाही. अंकात प्रसिद्ध झालेल्या कोड्यासाठी बक्षीस वगैरे कधीही ठेवलं नाही. त्यांना सभासदसंख्या वाढवण्यासाठी प्रलोभनं दाखवायचीच नव्हती. "यंग इंडिया किंवा नवजीवन यांचा खप एकदम वाढावा अशी माझी इच्छा नाही. त्यासाठी मी इतर वृत्तपत्रांवर त्यांनी माझं चरित्र प्रसिद्ध करू नये अशी बंदीही घालणार नाही.

भारतातही ३० वर्षं त्यांनी जाहिराती न स्वीकारता त्यांची नियतकालिकं चालवली. त्यांनी असं सुचवलं की प्रत्येक राज्यात जाहिरातीसाठी एकच माध्यम असावं आणि त्यांनी लोकांना उपयोगी वस्तूंची वर्णनं द्यावीत. "यंग इंडिया"चं संपादकपद स्वीकारल्यानंतर त्यांना गुजराथी वर्तमानपत्र सुरू करायचंच होतं कारण स्थानिक भाषेतलं वृत्तपत्र ही गरज जाणवत होती. 'नवजीवन' नावाचं हिंदी आणि गुजराथीत प्रसिद्ध होणारं वृत्तपत्र त्यांनी सुरू केलं ते अर्थात् "यंग इंडिया"चं स्थानिक रूप होतं. अनेक लेख त्यांनी या

वृत्तपत्रांमधून नियमितपणे लिहिले. जेव्हा "यंग इंडिया"चे १२०० वर्गणीदार होते तेव्हा नवजीवनचे १२००० होते. त्यांनी नवजीवनची वार्षिक वर्गणी ८ रु. वरून ४ वर आणली. त्यांनी या साप्ताहिकांची पृष्ठसंख्या जेव्हा कमी करायचा निर्णय घेतला तेव्हा त्यांनी वाचकांची क्षमा मागितली नाही किंवा जेव्हा त्यांनी नवजीवनला झालेल्या नफ्यातून ५०,००० रु. खादीच्या कार्यासाठी देणगी म्हणून दिले तेव्हाही त्यांनी वाचकांची क्षमा मागितली नाही.

ते अभिमानानं म्हणत, "माझी महत्त्वाकांक्षा सामान्य जनतेपर्यंत पोचण्याची आहे. हे स्थानिक भाषांमधूनच करणं शक्य आहे. माझी भाषा साधी आणि रांगडी आहे. नवजीवनचे वाचक घोडागाड्यांचे चालक आहेत, कामगार आहेत. मला हे पत्र शेतक-यांपर्यंत आणि विणकरांपर्यंत त्यांच्या झोपडीत पोचायला हवं आहे. ते त्यांच्या भाषेत मला हवं आहे. कारण भारत त्यांचाच आहे. इंग्रजी वृत्तपत्राचं संपादन करण्यात त्यांना आनंद नव्हता. कारण इंग्रजी वाचणारी लोकसंख्या फार कमी होती.

वाचकांनी स्वतःला वृत्तपत्राचे मालक समजावं अशी गांधीजींची इच्छा होती. सर्व भारतीयांना ते स्वतःचं वृत्तपत्र वाटावं त्यांनी ते गांधीजीचं वृत्तपत्र मानू नये असं त्यांना वाटायचं.

ते म्हणत की नवजीवनमध्ये भाषेच्या काही मोठ्या चुका झाल्या तर वाचकांनी ते घेणं बंद करावं आणि नवजीवन बहिष्कार संघटना स्थापन करावी. मदनीसांच्या चुका, वार्ताहरांच्या आणि इतर सहका-यांच्या चुका, खिळे जुळवणा-यांच्या नजरचुका, प्रुफं वाचणा-यांच्या हातून होणारे घोटाळे, यंत्र बंद पडणं, अंक पोष्टात उशीरा पोचणं या सगळ्याची जबाबदारी संपादकांवर आहे असं ते मानत. ते संपादक असताना कधीही त्यांच्याकडून मजकूर उशीरा आला म्हणून वृत्तपत्र उशीरा निघालं असं झालं नाही मग ते बर्माला असोत, श्रीलंकेत असोत किंवा इंग्लंडला.

गांधीजींसारख्या कार्यमग्न व्यक्तीनं अशा पत्राचं संपादन करणं ही सोपी गोष्ट नव्हती. ७०व्या वर्षीदेखील कधीकधी त्यांना रात्री दीड वाजता 'हरिजन'चं काम करावं

लागे. कामांचं दडपण खूप असतानाच त्यांना लेखनही भरपूर करावं लागे. चालत्या गाडीत ते ब-याच वेळा लिहीत. त्यांचे काही महत्त्वाचे लेख किंवा संपादकीयांवर "लेखन रेल्वेगाडीत" असं लिहिलेलं असे. उजवा हात दमला तर ते डाव्या हातानं लिहीत. गंमत म्हणजे त्याचं डाव्या हाताचं अक्षर जास्त चांगलं यायचं. एखाद्या मोठ्या आजारातून बरे होत असतानाही ते दर आठवड्याला तीन ते चार लेख लिहीत असत.

भारतात त्यांनी एकही वृत्तपत्र तोट्यात चालवलं नाही. त्यांच्या इंग्रजी आणि स्थानिक भाषांमधल्या वृत्तपत्रांचे ४०,००० वर्गणीदार होते. ते तुरुंगात असताना ही संख्या ३००० वर आली. भारतातल्या तुरुंगातून जेव्हा त्यांची प्रथम सुटका झाली तेव्हा या साप्ताहिकांमधून त्यांची आत्मकथा क्रमशः प्रसिद्ध होऊ लागली. ही लेखमाला तीन वर्षं चालली आणि जगभरातल्या लोकांना ती आवडली. त्यांनी भारतभरच्या वृत्तपत्रांना त्यांच्या आत्मकथेचं पुनर्मुद्रण करण्याची अनुमती दिली होती. तुरुंगात असताना त्यांनी 'हरिजन' नावाचं आणखी एक साप्ताहिक सुरू केलं.

यंग इंडियासारखी याची किंमतही १ आणा होती. ते मुख्यतः अस्पृश्यांच्या सेवेसाठी होतं. अनेक वर्षं त्यात एकही राजकीय लेख नव्हता. ते प्रथम हिंदीमध्ये निघत असे. गांधीजींना तुरुंगातून आठवड्यातून तीनदा लिहायला परवानगी होती. इंग्रजी आवृत्तीसंदर्भात मागणीबद्दल त्यांनी मित्राला लिहिलं – "मी आधीच सांगून ठेवतो की इंग्रजी आवृत्ती योग्य प्रकारेच यायला हवी, त्यात वाचनीय मजकूर हवा आणि भाषांतरं अचूक हवीत. इंग्रजी साप्ताहिक अलिप्तपणे प्रकाशित करण्यापेक्षा हिंदी आवृत्तीवर समाधान मानावं असं माझं मत आहे. वृत्तपत्र स्वतःच्या पायावर उभं केल्याशिवाय मी चालवणार नाही." त्यांनी सुरुवातीला १०,००० प्रती काढण्याची सूचना दिली. असं तीन महिने करुन पहावं असं सांगितलं. दोन महिन्यात ते स्वावलंबी झालं. नंतर ते लोकप्रिय मतपत्र बनलं. नुसतं वृत्तपत्र राहिलं नाही. लोक ते करमणुकीसाठी वाचत नसत तर आदेशांसाठी वाचत. ते इंग्रजी, हिंदी, उर्दू, तमिळ, तेलगू, उडिया, मराठी, गुजराथी, कानडी आणि बंगाली एवढ्या भाषांमधून प्रसिद्ध होत असे. ते स्वतः हिंदी, उर्दू, गुजराथी आणि इंग्रजीत लेख लिहीत.

गांधीजींच्या वृत्तपत्रात कधीही चटकदार विषय नसत. त्यांनी अथकपणे रचनात्मक काम, सत्याग्रह, अहिंसा, आहार, निसर्गोपचार, हिंदू-मुसलमान ऐक्य, अस्पृश्यता, सूतकताई, खादी, स्वदेशी, कुटिरोद्योग आणि दारूबंदी यांच्यावर लिहिलं. त्यांनी शिक्षणाची दिशा बदलण्याचा प्रचार केला. आहाराच्या सवयींबद्दल लिहिलं आणि भारतभरातल्या लोकांच्या दोषांचेही ते कडक टीकाकार होते.

ते इतरांकडून काम करून घेण्यात कडक होते. त्यांचे सचीव महादेवभाई देसाई कधीकधी रेल्वेप्रवासात गर्दी टाळून प्रसाधनगृहात जाऊन बसत आणि त्याचं काम वेळेत पुरं करत. गांधीजींच्या मदतनीसांना सर्व गाड्यांची वेळापत्रकं माहीत असावी लागत. आणि टपाल केव्हा निघतं याच्या वेळाही माहीत असाव्या लागत कारण प्रकाशनासाठी त्यांना लेखी मजकूर वेळेत पोचावा लागे. एकदा गांधीजी ज्या गाडीनं प्रवास करत होते त्या गाडीला उशीर होत होता, बरोबर पाठवायचे लेख होते पण ते टपालानं पाठवायला वेळ नव्हता. तेव्हा इंग्रजी लेख एका मदतनीसाबरोबर पाठवले आणि अहमदाबादमधल्या त्यांच्या स्वतःच्या छापखान्यात छापण्याऐवजी मुंबईत छापून घेतले. अशाप्रकारे अंक वेळेवर बाहेर पडला.

यंग इंडियात लिहिलेल्या जहाल लेखांबद्दल गांधीजींना भारतात प्रथम तुरुंगवास घडला. वृत्तपत्राचा गळा घोटण्याच्या कोणत्याही सरकारी आदेशाचा त्यांनी स्वीकार केला नाही. जेव्हा त्यांच्या तीव्र भावना, विचार व्यक्त करण्यावर गदा येई तेव्हा ते लेखन थांबवत. त्यांचा विश्वास होता की कधीही त्यांनी त्यांच्या वाचकांना संपादकीय दिलं तर ते हातानं हजारो प्रती काढून त्या वाटतील. ते जिवंत आहेत तोवर त्यांचं वृत्तपत्र दाबलं जाईल पण त्यांचा संदेश दबणार नाही याचा त्यांना विश्वास होता. हाती लिहिलेलं वृत्तपत्र हा धाडसी काळातला धाडसी उपाय असेल ही त्यांना खात्री होती मग छापखान्यावर अवलंबून राहण्याची जरूर नाही आणि खिळे जुळवणा-याचीही आवश्यकता नाही. सरकारी आदेश न जुमानता १९१९ मध्ये त्यांनी बिन नोंदणीचं सत्याग्रह हे साप्ताहिक प्रसिद्ध केलं. हे एकपानी साप्ताहिक एक पैशाला विकलं जाई.

स्वतःच्या अनेक वर्षांच्या पत्रकारितेच्या अनुभवातून ते चांगल्या पत्रकारितेच्या परंपरांविषयी अधिकारानं बोलत, "वृत्तपत्रवाले म्हणजे चालते बोलते प्लेग झाले आहेत. लोक वृत्तपत्रांकडे बायबल, कुराण, गीतेप्रमाणे आदरानं पाहतात. एका वृत्तपत्रानं छापलं की दिल्लीत दंगा होणार आणि लोकांनी सगळ्या लाठ्या, सुरे खरेदी केले. पत्रकारांचं कर्तव्य लोकांना शौर्य शिकवणं आहे. त्यांना घाबरवून टाकणं नाही."

❋❋

## मुद्रक व प्रकाशक

गांधीजींनी इंडियन ओपीनियन, यंग इंडिया, नवजीवन आणि हरिजन या चार नियतकालिकांचं संपादन केलं. त्यांनी ती स्वतःच्या छापखान्यात छापली आणि प्रसिद्ध केली. त्यांना हे ठाऊक होतं की जर इतर कुणाच्या मालकीच्या छापखान्यात पत्रं छापली तर त्यांना आपली सर्व मतं मोकळेपणानं लिहिता येणार नाहीत. इंडियन ओपीनियन या साप्ताहिकाची जेव्हा त्यांनी जबाबदारी घेतली तेव्हा ते तोट्यात चालत असे. त्यांना छापखाना शहरातून हलवून लांबच्या फिनिक्स आश्रमात हलवायचा होता. त्यांच्या मित्रांना वाटलं असं केलं तर नक्की छापखाना बंद पडेल. त्यांनी त्यांची सर्व छपाईची यंत्रसामग्री, अवजारं आणि खुर्च्या-कपाटं एका शेडमध्ये व्यवस्थितपणे लावली. एक जुनं इंजिन वापरून छापखाना चालवला जाई. त्याचं ऑफिस वेगळ्या खोलीत होतं. पगार देऊन तिथं कोणीही शिपाई किंवा नोकर नेमलेला नव्हता. इंडियन ओपीनियनचे अंक शनिवारी रवाना होत. शुक्रवार दुपारपर्यंत लेख जुळवले जात. आश्रमातले तरुण-वृद्ध सहकारी खिळे जुळवायला, छपाईला, कागद कापायला, घड्या घालायला, पत्ते चिकटवायला, गड्डे करायला मदत करत. रेल्वे स्थानकावर ते वेळेत पोचवावे लागत. नेहमी ते मध्यरात्रीपर्यंत कामं करत. जेव्हा कामाचं खूपच ओझं असे तेव्हा गांधीजी इतरांबरोबर शुक्रवारी रात्रभर जागे रहात. कस्तुरबा आणि इतर भगिनी त्यांना मदत करत. इंग्लंडमधून एकदा त्यांनी लिहिल होतं, "मला वाटतं सर्व स्त्रियांनी शनिवारी फीनिक्स प्रेसला जावं." इंडियन ओपीनियन रविवारी बाजारात येत असे.

इंडियन ओपीनियन प्रथम ज्या दिवशी फिनिक्स आश्रमात छापलं जात होतं, त्या रात्रीच इंजिन बंद पडलं. गांधीजी आणि आश्रमातले सर्व तगडे सहकारी यांनी हातानं चाक फिरवत फिरवत इंजिन चालू ठेवलं आणि वेळेवर अंक बाहेर काढला. या रचनेमुळे गांधीजींना छापखान्याच्या कामातले सर्व बारकावे लक्षात आले. ते लेख लिहीत, टाइप सेट करत, छपाईला मदत करत, आणि प्रुफं पहात. अनेक तरुण मंडळी शिकाऊ कामगार बनली. एकदा इंडियन ओपीनियनच्या एका अंकाचं सर्व संपादन आणि छपाई तरुण मुलांनी केली. सुरुवातीला इंडियन ओपीनियन चार भाषात छापलं जाई. इंग्रजी, हिंदी, गुजराथी आणि तमिळ. पुरेसे संपादक आणि खिळे जुळवणारे न मिळाल्यामुळे नंतर अंक फक्त इंग्रजी आणि गुजराथीत छापला जाई. तेव्हा गांधीजी भारतात आले आणि अड्यारला गेले तेव्हा तिथली छपाईची प्रक्रिया त्यांनी किती तयार नजरेनं पाहिली होती, हे ॲनी बेझंट यांच्या लक्षात आलं.

साप्ताहिकांच्या छपाई खेरीज अनेक पुस्तकं, हिंदी, इंग्रजी आणि इतर भाषांमधलीही फिनिक्स आणि नवजीवन मुद्रणालयात छापली जात. गांधीजींनी सरकारला कधीही अनामत रक्कम दिली नाही. त्यांच्या लेखनातून त्यांना जे पैसे मिळत ते खादी उद्योगात जात. त्यांनी नवजीवन मुद्रणालयासाठी एका लाख रुपयांचा विश्वस्त निधी ठेवला होता.

वाईट छपाईला गांधीजी हिंसेचं कृत्य मानत. त्यांचा भर स्वच्छ मोकळा टाइप, टिकाऊ कागद आणि व्यवस्थित साधी आवरणं यावर असे. भारतात आकर्षक आवरणांची महाग पुस्तकं सामान्य गरीब वाचकांना परवडत नसत. त्यांच्या हयातीत नवजीवन मुद्रणालयानं अनेक पुस्तकं कमी किंमतीत छापली. त्यांची गुजराथीतली आत्मकथा फक्त १२ आण्यांना मिळे. देवनागरीतही या पुस्तकाची स्वस्त आवृत्ती छापली होती.

भारतभर एकच लिपी वापरली जावी असं गांधीजी आग्रहानं सांगत. त्याची गरज आणि फायदेही ते समजावत. तसं झालं तर वाचकांचा आणि छापखान्यांचा बराच वेळ आणि कष्ट वाचतील असं त्यांचं मत होतं. देवनागरी त्यांना पसंत होती कारण

जवळजवळ सर्व भारतीय भाषा संस्कृतपासून निर्माण झाल्या आहेत. इंडियन ओपीनियनच्या गुजराथी आवृत्तीत तुलसी रामायणाचं पानभर वर्णन हिंदी लिपीत छापलं होतं. 'हरिजन'साठी गांधीजींनी स्वतःच टाइप शोधला.

एकदा त्यांचा एक सहकारी छापखाना विकत घेणार होता, त्याला गांधीजींचा सल्ला असा होता – "तिथली यंत्रसामग्री नीट काळजीपूर्वक पाहून घ्या. सगळी यंत्रं 'डबल रॉयल' आहेत ना हे पहा. टाइप झिजलेले तर नाहीत ना हेदेखील बघून घ्या."

त्यांना लेखनाचे अधिकार ही गोष्ट पसंत नव्हती. त्यांचं सर्व लेखन हे ते सार्वजनिक मालमत्ता समजत. मात्र जेव्हा त्यांना त्यांचं लेखन हेतुपूर्वक दूषित करण्याची शक्यता दिसली तेव्हा त्यांनी लेखनाच्या अधिकाराचे नियम पाळायला मान्यता दिली.

मुलांची पुस्तकं ठळक अक्षरात छापली जावीत, त्यासाठी उत्तम कागद वापरावा आणि प्रत्येक प्रकरणासाठी छान चित्र छापावं असे त्यांचे विचार होते. त्यांना छोट्या पुस्तिका जास्त आवडत. त्या मुलांना थकवून टाकत नाहीत आणि हाताळायलाही सोप्या पडतात. राष्ट्रीय शिक्षणाचा अधिकार हाती असलेल्या एका आश्रम बंधूनं एक पाठ्यपुस्तक छापलं. त्यात प्रत्येक पानावर चित्रं होती. आणि रंगीत आर्ट पेपरवर ते छापलं होतं. त्यानं मोठ्या अभिमानानं गांधीजींना विचारलं, "बापूजी, ते पाठ्यपुस्तक तुम्ही पाहिलं का? ती संपूर्ण कल्पना माझी आहे" गांधीजींनी त्याला म्हटलं, "होय. ते सुंदर आहे पण ते तुम्ही कोणासाठी छापलं आहे? किती वाचकांना पाच आणे किंमतीचं पुस्तक विकत घेणं परवडणार आहे? भारत हा लक्षावधी उपाशी लोकांचा देश आहे आणि त्यातल्या मुलांच्या शिक्षणाचे तुम्ही अधिकारी आहात. जर इतर पुस्तकांच्या किंमती एक आणा असतील तर तुमच्या पुस्तकाची दोन पैसे असायला हवी." गांधीजींनी एकदा दोन आणे किंमत असलेलं एक साप्ताहिक ताब्यात घेतलं आणि त्याची किंमत एक आणा केली.

प्रकाशनात फक्त काटकसर हे त्यांचं ध्येय नव्हतं. एकदा नवजीवननं गोखल्यांच्या भाषणांचं आणि लेखांचं गुजराथी भाषांतर छापायचं ठरवलं. एक शिक्षणतज्ज्ञानं ते

भाषांतर केलं. जेव्हा पुस्तक छापून तयार झालं, तेव्हा गांधीजींना प्रस्तावना लिहिण्याची विनंती केली गेली. त्यांना ते भाषांतर चांगलं वाटलं नाही, ते समजून केलेलं नव्हतं त्यामुळे त्यांनी ते नष्ट करायला सांगितलं. त्यांना सांगितलं गेलं की त्यावर ७०० रु. खर्च झालेले आहेत तेव्हा ते म्हणाले, "यावर बाइंडिंग आणि आवरणाचा आणखी खर्च करून ते लोकांच्या समोर आणण्याजोगं आहे का? वाईट साहित्य लोकांच्या हाती देऊन त्यांची अभिरूची बिघडवावी असं मला वाटत नाही." ते सगळे कागद जाळून टाकण्यात आले. रद्दी म्हणून ते विकण्याची परवानगीही मिळाली नाही.

गांधीजी कायम मुद्रण-स्वातंत्र्याचा आग्रह धरत. त्यांची मतं मोकळेपणानं छापण्यावर जेव्हा सरकारनं बंदी घातली तेव्हा त्यांनी साप्ताहिकं छापणं बंद केलं. त्यांच्या लेखन स्वातंत्र्याच्या प्रेमापोटी त्यांची मुद्रणालयं जप्त केली गेली, कागदपत्रांची नासधूस केली, त्यांना आणि त्यांच्या सहका-यांना तुरुंगात टाकलं गेलं. तरीही ते कधीही निराश झाले नाहीत आणि म्हणाले, "आपण यंत्र आणि टाइपाची मूर्ती फोडून टाकू. लेखणी हाच आपला छापखाना. सूत काढणा-यांचे हात हीच आपली छपाई यंत्रं. प्रत्येकानं माझा चालता बोलता कागद व्हा आणि तोंडानं बातम्यांचा प्रसार करा. यावर कोणतंही सरकार बंदी घालू शकणार नाही."

***

## नवीन पद्धती आणणारे

दक्षिण आफ्रिकेत असताना गांधीजींनी विजारीवर सँडल्स वापरायला सुरुवात केली. त्या काळी ते जरा वेगळं होतं. त्यांना झकपक बुटांपेक्षां सँडल्स जास्त पसंत होते कारण उन्हाळ्यात त्यानं पाय थंड रहात आणि थंडीत आत मोजे घालता येत. ते स्वतः सँडल्स बनवत. तेव्हाच्या दक्षिण आफ्रिकेचे पंतप्रधान जनरल स्मटस् होते. हे हातानं बनवलेले सँडल्स मजबूत आणि आरामशीर असतात अशी कीर्ती त्यांनी ऐकली. त्यांना सँडल्स वापरून पहायचे होते. गांधीजींनी खास त्यांच्यासाठी सँडल्स करवून घेतले आणि त्यांना भेट दिले.

पारंपरिक, सर्वमान्य अशा पद्धतीपेक्षा वेगळ्या पद्धतीनं गोष्टी करण्याचा गांधीजींचा मार्ग होता. त्यांनी सुरु केलेल्या काही फॅशन्सचं लोक नंतर अनुकरण करत. काही मात्र लोकांनी न स्वीकारल्यानं नाहीशा होत.

जेव्हा प्रथमच ते काँग्रेस अधिवेशनाला गेले तेव्हा वेगळ्या जातीजमातींची तर वेगळी स्वयंपाकघरं होतीच पण वेगळ्या चवींचं अन्न वेगवेगळ्या स्वयंपाकघरात बनत होतं. ते थक्क झाले. जीवनातल्या बारीक सारीक गोष्टींनाही त्यांच्या मते महत्त्व होतं. त्यांना असं जाणवलं की लोकांनी हे भेदभाव सोडून देऊन एकीची भावना वाढवल्याशिवाय स्वराज्य मिळणार नाही! त्यांना ही नासधूस बंद करायची होती. किती पैसा, किती वेळ, किती श्रम वाया जात होते! खाण्यापिण्याच्या सवयीत सोपेपणा आणून हे सगळं वाचवायचं होतं. त्यांनी आहारावर अनेक प्रयोग केले. त्यांच्या आश्रमात साधं, बिनमसाल्याचं शाकाहारी अन्न सार्वजनिक स्वयंपाकघरात शिजत असे. मुसलमान, पारशी, ख्रिस्ती, हिंदू सर्वजण एका जेवणघरात बसून एकच शाकाहारी जेवण जेवत असत.

कच्च्या कोशिंबिरी, फळं, शेंगदाणे, उकडलेल्या भाज्या, हातसडीचे तांदूळ आणि हातानं दळलेली गव्हाची कणिक यांचं आहारातलं महत्त्व गांधीजी पटवून देत. ताजा गूळ किंवा मध यांच्यात साखरेपेक्षा अधिक जीवनसत्त्वं असतात हे स्पष्ट करून सांगत. पदार्थ वरून दिसतो कसा यापेक्षा आहारातल्या त्याच्या गुणधर्माचा विचार लोकांनी करावा याचं शिक्षण ते देत होते.

फैझपूर काँग्रेसमध्ये जमलेल्या मान्यवरांना आणि भेटीसाठी आलेल्यांना प्रथमच हातसडीच्या तांदुळाचा भात आणि कोंड्यासकट पोळ्या वाढल्या होत्या. काँग्रेसचं वार्षिक संमेलन खेड्यात घ्यावं ही गांधीजींची कल्पना होती. त्यापूर्वी ५० वर्षं उच्चशिक्षित नेते आणि बुद्धिजीवी लोक यांचा संमेलनात प्रमुख सहभाग होत. गांधीजींनी काँग्रेसला सामान्य जनतेत नेली आणि सामान्य माणसाचा चेहरा तिला दिला. साधा भारतीय पोषाख घालून ते हिंदीत श्रोत्यांना उद्देशून भाषण करीत.

फैझपूरमधल्या टिळक नगरच्या सर्व तपशीलांची योजना गांधीजींनी केली. ग्रामीण कामगारांनी ग्रामीण भागात मिळणा-या साहित्यातून टिळक नगर उभारलं. थोर-कलावंत नंदलाल बोस यांनी गांधीजींचं स्वप्न प्रत्यक्षात आणलं. झोपडीच्या भिंती आणि छप्पर बांबूचं केलं होतं. रंगीत बांबूंच्या कमानींचा मार्ग करून तो टोपल्या टांगून सजवला होता. प्रवेशद्वारावर फडकणारा राष्ट्रीय झेंडा गांधीजींनी स्वतः केला होता. त्यानंतर काही वर्षांनी त्यांनी झेंड्याला पूर्ण रूप दिलं. त्यात आडवे तीन रंगाचे पट्टे होते. केशरी, पांढरा आणि हिरवा. पांढ-या पट्ट्यावर मधोमध गडद निळ्या रंगात चरख्याचं चित्र होतं. ते अहिंसेचं आणि भारतातल्या सामान्य माणसाचं प्रतीक होतं.

आपला साधा आणि अभिरूचीपूर्ण राष्ट्रीय पोषाख निर्माण करण्याचं श्रेय गांधीजींना आहे. जेव्हा त्यांनी दक्षिण आफ्रिकेत ऐतिहासिक पदयात्रा काढली तेव्हा शेकडो खाणकामगार आणि वेठबिगार सामील झाले. ते बहुतेक दक्षिण भारतातले होते. सर्वांचा छळ झाला, बरेच तुरुंगात गेले आणि काहींना प्राणही गमवावे लागले. त्यांबद्दलचा आपलेपणा आणि सहानुभूती व्यक्त करण्यासाठी गांधीजी त्यांचा पोषाख कुडता आणि

लुंगी वापरू लागले. चालण्याच्या काठीऐवजी ते लाठी घेऊ लागले आणि खांद्यावर झोळीसारखी पिशवी.

सरकारच्या दडपशाहीला हिंसेला विरोध करण्यासाठी गांधीजींनी सत्याग्रह, अहिंसा, असहकार आणि सामूहिक सविनय कायदेभंग ही प्रभावी शस्त्रं निर्माण केली. पाशवी सत्तेला असहकारानं कडक विरोध दर्शवणारे म्हणून ते भक्त प्रल्हाद आणि बिभीषणाचं उदाहरण देत. त्यामुळे ती आपली स्वतःची कल्पना नाही असं ते सांगत मात्र ते विरोधाचं तंत्र राजकारणात आणणं आणि धीटपणे ते सरकारला विरोध करण्यासाठी जनतेला शिकवणं मात्र त्यांची स्वतःची देणगी होती. त्या प्रयत्नाला यशही दांडगं मिळालं. एकदा एका विदेशी पत्रकारानं त्यांना विचारलं, “ॲटम बॉम्बनं तुमचा अहिंसेवरचा आणि सत्यावरचा विश्वास उडवून दिला नाही का?” गांधीजींनी उत्तर दिले, “नाही. सत्य आणि अहिंसेवरचा माझा विश्वास अढळ आहे. ती उच्चतम धैर्याची अशी प्रतीकं आहेत की त्यांच्यापुढे ॲटम बॉम्ब निष्प्रभ ठरेल. अहिंसा ही एकमेव गोष्ट आहे की जिला ॲटम बॉम्ब नष्ट करू शकणार नाही” भारतातल्या जनसामान्यांच्या शक्तीला जागं करण्याचं जे काम गांधीजींनी केलं त्याला तोड नाही.

गांधीजींच्या नेतृत्वाखाली भारतानं अहिंसेनं स्वातंत्र्य मिळवलं. भारतानं सर्व शोषित समूहांचं आशास्थान व्हावं असं त्यांना वाटे मग ते समूह आशियातले असोत किंवा अमेरिकेतले किंवा आफ्रिकेतले. “भारतातला लढा जेवढा अहिंसक आहे तेवढाच तो प्रबळ शक्तींविरुद्धचा दलित पीडितांच्या मुक्तीचा लढा आहे.” भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर अनेक वसाहतींनी भारताच्या पावलावर पाऊल टाकून रक्ताचा एकही थेंब न सांडता स्वातंत्र्य मिळवलं. अमेरिकेतही निग्रोंची मानवी हक्क मिळवण्यासाठीची चळवळ वाढते आहे, त्यांचे नेता मार्टिन ल्यूथर किंग यांनी गांधीजींचंच अनुकरण केलं.

विरोधकांचं हृदयपरिवर्तन करण्याचा प्रयत्न करता करता त्यांच्या पोषाखातही अनेक बदल होत गेले. दक्षिण आफ्रिकेतून भारतात परत आल्यानंतर गांधीजी धोतर, कुडता, लांब कोट आणि मोठी काठेवाडी पगडी वापरू लागले. लवकरच उष्ण



हवामानात हा पोषाख सोयीचा नाही असं त्यांना वाटलं. पागोट्यासाठी अनेक वार कापड वापरून वाया जात असे. त्यानंतर त्यांनी धोतर, कुडता आणि टोपी असा पोषाख वापरायला सुरुवात केली. तथाकथित सभ्य लोकांना महत्त्वाच्या बैठकांमध्ये आणि सार्वजनिक सभांमध्ये त्यांना या पोषाखात पाहून धक्का बसला. गांधीजी सूतकताई करत आणि हातमाग चालवत तेव्हा त्यांचा संपूर्ण पोषाख खादीचा असे. गांधी टोपी जवळ जवळ काश्मिरी टोपीचीच बहीण होती पण तिच्यावर भरतकामाची कलाकुसर

नसायची. ती टोपी पांढरीच हवी हा गांधीजींचा आग्रह होता. लोक तक्रार करत ती लगेचच मळते त्यावर ते म्हणत, "स्वच्छेतेचं महत्त्व कळावं म्हणूनच मी पांढरा रंग निवडला आहे. ही टोपी पातळ कापडाची आहे. सहज धुता येते आणि वाळायलाही वेळ लागत नाही. गडद रंगाच्या टोप्याही तेवढ्याच मळतात पण त्यांच्यात मळ लपून राहतो." खादी धोतर किंवा पायजमा, झब्बा आणि गांधी टोपी हा लोकप्रिय आणि सर्वमान्य राष्ट्रीय पोषाख झाला.

अनेक बिहारी, मारवाडी आणि गुजराथी लोकांनी त्यांचे दिमाखदार फेटे वापरणं सोडून दिलं आणि गांधी टोपी वापरायला सुरुवात केली. अनेक मुसलमानांनी त्यांच्या विशिष्ट टोप्या वापरणं सोडून दिलं, ते गांधी टोपी वापरू लागले. बंगाली आणि दक्षिण भारतीय लोक नेहमी टोप्या वापरत नसत ते गांधी टोप्या घालू लागले. लाल कापड बघून जसा बैल भडकतो. तसं स्वदेशीच्या चळवळीत गांधी टोपी बघून इंग्रज सरकार संतप्त होत असे. गांधी टोपी घातलेल्या स्वयंसेवकांना पोलीस अमानुषपणे मारहाण करत आणि त्यांच्या टोप्या हिसकावून घेत. शाळकरी वयाच्या मुलांनाही गांधी टोपी घातली म्हणून शिक्षा होत असे. काही वेळा गांधी टोपी घातली म्हणून दहा रुपये दंड होत असे आणि तो दिला नाही तर १० दिवस तुरुंगात जावं लागे. गांधीजींनी स्वतः थोडे दिवस गांधी टोपी घातली होती. शेवटी त्यांचा पोषाख आखूड धोतर, खांद्यावर पंचा आणि चप्पल यावर येऊन थांबला. नेता हा जनतेचा खराखुरा प्रतिनिधी असायला हवा. असा गांधीजींचा विश्वास होता. ते यूरोप आणि इंग्लंडमध्ये गेले, महाराजाला भेटले ते याच पोषाखात. एकदा एका मान्यवर ब्रिटिश पाहुण्यांना बैलगाडीतून आश्रमात आणलं होतं. असे सर्व पाहुणे आश्रमात गांधीजींच्या मातीच्या झोपडीत जमिनीवर बसत आणि गंभीर विषयांवर गांधीजींशी, जनतेच्या प्रतिनिधीशी चर्चा करत. ते आश्रमात तयार होणारं साधं जेवण जेवत. हा सेवाग्राममधला संत अतिशय चांगला यजमान होता. पाहुण्यांच्या गरजांचा ते पूर्ण सहानुभूतीनं विचार करीत पण उच्चभ्रू पा चात्यांचं ग्रामीण पद्धतीनं आदरातिथ्य करण्यात त्यांना कुठलाही कमीपणा वाटत नसे. देखाव्यानं गरीब राष्ट्राचा मोठेपणा टिकून राहील अशा भ्रमात ते कधीही नव्हते. उलट ह्या

प्रकारचे देखावे, आपल्या बेगडी मोठेपणाचं प्रदर्शन, गरिबी लपवून ठेवणं याचं त्यांना फार दुःख होत असे. गांधीजींना त्यांच्या लहानशा गावातून नेहमी दिल्ली, सिमला, मुंबई, कलकत्ता अशा ठिकाणी व्हाइसरॉय, गव्हर्नर्स, ब्रिटिश राजकारणी आणि विदेशी मान्यवरांना भेटायला महत्त्वाच्या चर्चासाठी जावं लागे. त्यांच्या कल्पनांचा प्रसार करण्यासाठी आणि सामान्य माणसाशी थेट संवादासाठी त्यांनी काही वेळा सबंध भारताचा दौरा केला पण ते कधीही विमानानं गेले नाहीत. ते तिस-या वर्गानं प्रवास करत. स्वातंत्र्यापूर्वी इतर नेतेही त्यांचं अनुकरण करीत. गांधीजींना प्रशासनाची सर्व व्यवस्थाच बदलायची होती. "लोकशाहीमध्ये शेतकरी हा राज्यकर्ता असला पाहिजे. शेतकरी पंतप्रधान झाला तर तो रहायला राजवाडा मागणार नाही. तो मातीच्या झोपडीत राहील, उघड्या आकाशाखाली झोपेल आणि जेव्हा जेव्हा मोकळा असेल तेव्हा शेतात काम करेल."

श्रीमंती वातावरणात जन्मलेल्या आणि वाढलेल्या लोकांमध्ये त्यांच्या कल्पना स्वीकारण्याचं धाडस नसतं हे गांधीजींना माहीत होतं. मुलांना मुळातच वेगळ्या प्रकारे शिक्षण देऊन त्यांना मुळापासूनच तयारी करायची होती. काही थोर शिक्षणतज्ज्ञांनी केलेल्या प्रयोगांचा त्यांनी बराच विचार केला आणि मुलांच्या मनांना योग्य ते वळण लागावं यासाठी नवी शिक्षणपद्धती निर्माण केली ते त्या पद्धतीला "नयी तालीम" म्हणत. त्यात साक्षरतेला फार महत्त्व नव्हतं. नुसतं निरक्षरतेचं उच्चाटन त्यांना नको होतं. लोकांचं अज्ञान दूर करणं हे ध्येय होतं. हस्तकौशल्यांद्वारा शिक्षण देऊन त्यांना विद्यार्थ्यांची व्यक्तिमत्त्वं घडवायची होती आणि आत्मविश्वास निर्माण करायचा होता. त्यांना त्यांच्यात सर्वधर्मांविषयी सहिष्णुता निर्माण करायची होती. सर्व जातीजमातींविषयी प्रेम आणि सर्व कामांचा आदर हे निर्माण करायचं होतं.

त्यांच्या प्रार्थना सभांमध्ये त्यांनी जगातल्या सर्व धर्मांमधल्या प्रार्थनांमधून निर्माण केलेली प्रार्थना लोकांना शिकवली. गांधीजी अथकपणे शेकडो सभांमधून त्यांच्या कल्पना बोलत राहिले आणि वृत्तपत्रांमधून त्यांनी असंख्य लेख लिहिले. त्यांनी संपादित केलेल्या साप्ताहिकांमधून त्यांनी उत्पन्न मिळवून देणा-या सर्व जाहिरातीचं उच्चाटन

केलं. अशा प्रकारे ते पैसा नाकारत पण त्यांना कोणत्याही प्रकारची नासाडी चालत नसे. एकदा त्यांनी बैठक आयोजकांना सजावटीवरचा अनावश्यक खर्च टाळायला सांगितलं होतं. "पुष्पगुच्छ देणं संपूर्णपणे रद्द करता येईल. त्याऐवजी सुताचे हार देता येतील. सूतही गाठी घातल्यामुळे निरुपयोगी झालं असं होऊ नये. झेंडे आणि पताका वाया गेलेल्या खादीमधून कराव्यात. सन्मानपत्रं छापण्यात पैसे वाया घालवू नयेत. साध्या हातकागदावर सुंदर अक्षरात ती लिहावीत आणि खादीच्या कापडावर टाचून द्यावीत किंवा मुलं-मुली खादीवर सुंदर भरतकाम करून अक्षरं लिहू शकतील."

अंतर्गत सजावटीसंदर्भात त्यांच्या कल्पना आगळ्या वेगळ्याच होत्या. त्यांना खोलीत गालिचे घातलेले, सामानसुमानाची गर्दी, शोभेच्या वस्तूंचे संग्रह असं काही आवडत नसे. खिडक्यांचे पडदेही त्यांना पसंत नव्हते. एकदा एका दक्षिण भारतीय व्यापा-याकडे ते पाहुणे म्हणून गेले होते. त्यांना तिथला शोभेच्या वस्तूंचा संग्रह काही आवडला नाही. ते म्हणाले, 'आजूबाजूला फार सामानसुमान असलं तर माझा जीव गुदमरतो. या गर्दीत श्वास घ्यायला सुद्धा जागा उरत नाही. तुमची काही चित्रं फारच वाईट आहेत. जर मला तुम्ही चेट्टी नाडच्या सर्व राजवाड्यांच्या सजावटीचा ठेका दिलात, तर याच्या एक दशांश खर्चात मी ती करून दाखवीन. तुम्हाला ती रचना आरामशीर वाटेल आणि मोकळी, ताजी हवाही मिळेल. त्याशिवाय भारतातल्या चांगल्या कलाकारांकडून मी तुमच्या घराची सजावट उत्तम केल्याचं प्रशस्तीपत्रकही मिळवीन. सेवाग्राममध्ये गांधीजींच्या कुटीची नंदलाल बोस या कलावंतानं प्रशंसा केली होती त्याअर्थी गांधीजींचं हे आवाहन खरंच होतं. त्यांनी लिहिलं होतं - "गांधीजींच्या कुटीची जमीन आणि भिंती गाईच्या शेणानं सारवलेल्या होत्या. खोलीत एकही चित्र किंवा फोटो किंवा पुतळा नव्हता. एका कोप-यात चटई घातली होती. त्यावर खादीच्या चादरीची घडी आणि तक्क्या बसण्यासाठी ठेवला होता. खादीची चादर वर घातलेली एक लाकडी पेटी लिहिण्याचं टेबल म्हणून ठेवली होती. त्याच्या एका बाजूला एक काशाचा चकचकीत लोटा आणि त्यावर पिंपळपानासारखं एक लोखंडी झाकण होतं. कुटीमध्ये स्वच्छता, साधेपणा, नीट-नेटकेपणा सुंदर वातावरण होतं. ते गांधीजी

खादीचा पंचा कमरेभोवती गुंडाळून बसले होते. त्यांच्या चेह-यावर प्रसन्न स्मित होतं. एखादी पाणीदार लखलखती तलवार तिच्यातली हिंसा तेवढी वगळून तिथं बसली आहे असं मला वाटलं."

❊❊

# गारुडी

लहानपणी गांधीजींना सापांची भीती वाटे. ते अंधारात एकटे जायला घाबरत असत. त्यांना असं वाटायचं की अंधारात चोर, भुतं आणि साप त्यांच्यावर उडी मारायच्या तयारीत तिथे दबा धरून बसले आहेत.

जवळ जवळ ३५व्या वर्षी ते वानप्रस्थाश्रम स्वीकारल्या सारखे आश्रमात रहात. त्यांचा आश्रम म्हणजे फक्त राहण्यासाठी झोपडी असा अर्थ नव्हता तर शेतीला योग्य अशी पुरेशी जमीन असलेला मोठा परिसर होता. त्याला फळबाग जोडलेली असे. शहरी आवाजांच्या आणि हवेच्या प्रदूषणापासून दूर अशी ती शांत जागा होती. गांधीजींकडे पैसे नव्हते. त्यामुळे त्यांनी नेहमी स्वस्तातली माळरानं घेतली. सर्वच आश्रमांमध्ये फिनिक्स, टॉलस्टॉय फार्म, साबरमती, वर्धा, सेवाग्राम सगळीकडे भरपूर साप असायचे. झोपड्या बांधून होण्याआधी सहका-यांना तंबूत राहावं लागे आणि मुलांना असं घेऊन राहण्यात धोका असायचा. एखाद्या दिवशी विषारी साप छतावर टांगलेला दिसायचा तर कधी सायकलीजवळ दोन साप वेटोळं करून पडलेले दिसायचे. कधी कधी ते निजायच्या खोलीतही यायचे. त्यांचं काय करावं असा प्रश्न असायचा.

गांधीजींचा तर अहिंसेवर पूर्व विश्वास. ते खरे वैष्णव होते. आपल्या बायको मुलांचे प्राण वाचावेत म्हणूनही कधी त्यांनी मासे, मांस, कोबंडी यांचा औषधं म्हणून उपयोग केला नाही. गायी म्हशीचं दूध मिळवण्यासाठी अगदी दुधाचा शेवटचा थेंब पिळून घेण्यासाठी त्यांना खूप त्रास दिला जाई. हे पाहून त्यांनी गाई-म्हशीचं दूध पिणं बंद केलं. मग ते सापाला कसे मारू देतील? आश्रमातला नियम असा होता की



विषारी असला तरी सापाला मारायचं नाही. दोरीचं एक साधन साप पकडण्यासाठी केलं होतं. त्यांना पकडून आश्रमापासून लांब सोडलं जाई. पण ते जेव्हा पकडण्यासारख्या जागी नसत किंवा माणसाला त्यांच्या जवळ जाण्याची भीती वाटायची तेव्हा काय करावं असा प्रश्न होता. गांधीजींना माहीत होतं की हिंसा संपूर्णपणे टाळणं अशक्य होतं. भाज्या खाणं म्हणजे देखील वनस्पतींची हिंसाच होती. शेवटी खेदानं त्यांनी म्हटलं, "साप चावून मुलं मरण्यापेक्षा सापाला मारलं तर मला वाईट वाटणार नाही. मला स्वतःला अजून सापांची भीती वाटते तर मी इतरांना काय सांगणार सापाला भिऊ नका म्हणून?" जेव्हा सापांना पळवून लावण्याचे इतर सर्व उपाय थकले तेव्हा त्यांनी सापांना मारायला परवानगी दिली.

सापांबद्दलची सर्व माहिती मिळवण्याची त्यांची इच्छा होती. कालनबाख यांच्या मदतीनं त्यांनी विषारी आणि बिनविषारी साप ओळखायला सुरुवात केली. प्रात्यक्षिक दाखवण्यासाठी म्हणून कालनबाख यांनी नाग पकडला आणि पिंज-यात ठेवला. ते

स्वतः त्याला खाऊ घालत असत. आश्रमातल्या मुलांना तो साप पहायला फार गंमत वाटायची. कोणी त्याला त्रास द्यायचं नाही. गांधीजींना हे पसंत नव्हतं. ते कालनबाखना म्हणाले, "आपण त्याच्या सवयीचं निरीक्षण करण्यासाठी त्याला तुरुंगात डांबलं आहे. आपल्या मनातली मैत्री त्याला कळत नसेल. त्याच्याबरोबर खेळण्याचं धैर्य तुमच्यात नाही आणि माझ्यातही नाही. तुमची मैत्री देखील खरी नाही. तिच्यामागे भीती आहे. ह्या नागाला पाळण्यात कुठे प्रेम नाही दिसत." कदाचित नागालाही असं वाटलं असेल की ही माणसं काही फार मित्रत्वानं वागत नाहीत आणि तो एक दिवस पिंज-यातून पसार झाला.

आश्रमातला आणखी एक जर्मन सहकारी सापांना निर्भयपणे हाताळत असे. तो छोटे साप पकडून त्यांना तळहातावर खेळवत असे. गांधीजींना अशी निर्भयता शिकायची होती. सापाला हातात घेतल्यावर स्पर्शानं त्याला कळायला हवं की या माणसाच्या मनात आपल्या इजा करण्याचा हेतू नाही या पायरीला गांधीजींना पोचायचं होतं. तोंडानं रामनामाचा जप करत आपला हात सापाच्या तोंडात देणं ही त्यांच्या दृष्टीनं मोठीच मजल होती. पण शेवटपर्यंत साप किंवा विंचू हातात घेण्याचं त्यांना धैर्य झालं नाही. त्यांना ह्या गोष्टीची लाज वाटायची.

कितीही महत्त्वाचं काम असलं तरी सापांच्या अभ्यासातला रस त्यांनी कायम टिकवला. एकदा काही नेते त्यांच्याकडे सल्ला विचारण्यासाठी गेले होते. त्यांच्या गळ्याभोवती साप वेटोळं घालून बसलेला त्यांनी पाहिला आणि त्यांना धक्काच बसला. एका गारूड्यांशी बोलण्यात गांधीजी गढून गेले होते आणि साप हाताळण्याची कला त्याच्याकडून शिकायला ते उत्सुक होते. सर्पदंशावरचे इलाजही त्यांना शिकायचे होते. प्रयोगासाठी कोणालातरी साप चावून घ्यायला लागणार होता. गांधीजी स्वतः त्यासाठी तयार होते पण त्यांच्या सहका-यांना ते मान्य नव्हतं. गांधीजींचं जीवन फार मौल्यवान होतं, त्यावर प्रयोग करायला त्यांची परवानगी नव्हती. त्यामुळे गारूड्याचा चेला होण्याची गांधीजींची संधी हुकली. तेव्हा ते ७० वर्षांचे होते.

त्यापूर्वी काही वर्षं तुरुंगात असताना त्यांच्या हिरडीतून रक्त येत असे. एक निग्रो कैदी त्यांची काळजी घेत असे. त्यांना दोघांनाही एकमेकांची भाषा कळत नसे. ते खाणाखुणा, हातवारे करत. एकदा तो निग्रो माणूस दुखणारं बोट घेऊन त्यांच्याकडे ओरडत आला. चौकशी केल्यावर गांधीजींना कळलं की त्याला काहीतरी चावलं होतं. त्यांनी लगेच तुरुंगाच्या रुग्णालयाला चिठ्ठी पाठवली. दूषित रक्त बाहेर काढणं हा उपाय त्यांना माहीत होता. स्वच्छ चाकू मिळेना तेव्हा त्यांनी त्याचं विषारी रक्त चोखून घ्यायला सुरुवात केली. हिरडीत जखम असताना असं रक्त तोंडानी चोखणं धोकादायक होतं. पण त्यांना तो निग्रो दुःखानं तळमळत असताना पाहवत नव्हतं.

गांधीजींना हे माहीत होतं की सगळे साप विषारी नसतात आणि सर्वच सर्पदंशांनी माणूस मरतो असं नाही. फक्त १२ टक्के साप विषारी असतात. त्यांना सर्व लोकांना विशेषतः ग्रामीण लोकांना सापांबद्दलचं सर्व शिक्षण द्यायचं होतं. त्यांनी सापांविषयी काही लेख प्रसिद्ध केले. त्याबरोबर काही नेमकी रेखाटनं आणि आकृत्याही होत्या. त्यांनी एकदा हरिजनमध्ये लिहिलं, "आपल्याला कोणता साप विषारी किंवा कोणता बिनविषारी हे कळत नाही. त्यामुळे आपण विचार न करता सरसकट सगळे साप मारतो. काही वेळा तर सर्पदंश झालेली व्यक्ती भीतीनंच प्राण गमावते. विषारी सापही विनाकारण चावत नाही. त्यांच्यावर तुमचा पाय पडला किंवा तुम्ही त्यांना चुकीच्या पद्धतीनं हाताळलं तरच तो चावतो. साप शेतातले उंदीर खातात, पिकाला धोकादायक इतर प्राणी मारतात. म्हणून त्यांना क्षेत्रपाल म्हणतात. शेताचे रखवालदार! नागपंचमीच्या दिवशी खेड्यातल्या आयाबाया सापाला दूध देतात. सापांबद्दलची कृतज्ञता व्यक्त करण्याचा तो प्रकार आहे. विष्णु सात फण्यांच्या शेषावर झोपले आहेत असं चित्र मला आवडतं. त्यावरून आपल्याला कळतं की देव किती विश्वासानं सापांच्या अंगावर झोपला आहे आणि शेषानं त्याच्या डोक्यावर सात फण्यांचं छत्र धरलं आहे. देवाला सापांपासून धोका वाटत नाही."

एकदा काही उघडी वाघडी खट्याळ मुलं गांधीजींच्या झोपडीपाशी जमली होती. तिथं एक साप एका काचेच्या बरणीत ठेवला होता. त्याच्याकडे ती पहात होती. त्याला पकडून सर्जनकडे पाठवला होता. त्यांनी सांगितलं की तो अतिशय विषारी साप होता. त्यांनी त्याचं डोकं ठेचलं आणि गांधीजींकडे पाठवून दिला. त्याचा कणा जिवंत होता आणि तो नंतर तीन दिवस हालचाल करत होता. त्याचं दुःख कमी करण्यासाठी त्याला मारून स्पिरिटमध्ये ठेवला होता. गांधीजी खेड्यातल्या लोकांना जिवंत किंवा मृत साप दाखवत. त्यांनी जिवंत सापांसाठी एक पिंजरा बनवला होता.

गांधीजींनी एकदा आपल्या तत्त्वज्ञ मित्राला विचारलं, "जर एखाद्यावर सापानं हल्ला केला तर त्यानं काय करावं?" तो म्हणाला, "त्यानं सापाला मारू नये आणि साप त्याला चावू लागला तर चावू द्यावं." गांधीजी स्वतः सापाला कधी इजा करत नसत आणि सापही कधी गांधीजींना चावले नाहीत. किंवा आश्रमातल्या सहका-यांनाही चावले नाहीत. आश्रमात सर्पदंशानं कोणीही, कधीही मृत्युमुखी पडलं नाही. गांधीजींना अनेकदा सापांचा थंड स्पर्श अनुभवायला मिळाला पण त्यांनी दातांचा प्रसाद मात्र कधी दिला नाही.

थंडीच्या दिवसात एका संध्याकाळी गांधीजी एका मित्राबरोबर बोलत होते. त्यांनी चादर पांघरली होती. अचानक गांधीजींच्या चादरीच्या कडेवर एक साप आला आणि आत घुसण्यासाठी धडपड करू लागला. मित्रानं गांधीजींना शांत रहायला सांगितलं. गांधीजी शांत होते त्यांनी मित्राला सांगितलं की तुम्हीही काळजी करू नका. मित्रानं गांधीजींची चादर पकडली आणि एक झटका देऊन ती दूर फेकली.

एकदा गांधीजी जेवणानंतर विश्रांती घेत होते. तेव्हा त्यांच्या छातीवरून सरपटत साप गेला. ते मुळीच हलले नाहीत किंवा अस्वस्थही झाले नाहीत.

एकदा एक सुशिक्षित गारूडी गांधीजींना भेटायला रूग्णालयात आला. त्याला त्याचं साप हाताळण्यातलं कौशल्य दाखवायचं होतं म्हणून त्यानं काही विषारी साप

गांधीजींच्या पलंगावर सोडले. ते छानपैकी ब्लँकेटवर डोलत होते. गांधीजींनी त्यांच्याकडे बराचवेळ कुतुहलानं पाहिलं पण पाय जरासुद्धा हलवले नाहीत.

एका संध्याकाळी प्रार्थनेच्या वेळी गांधीजी शांतपणे बसले होते. तेव्हा एक साप त्यांची वाट सोडून त्यांच्याकडे सरपटत आला. त्यांचे सहकारी हबकून गेले. त्यांच्या हालचालींनी साप घाबरला आणि गांधीजींच्या मांडीवर त्यानं आश्रय घेतला. त्यांनी सर्वांना शांत रहायला सांगितलं आणि प्रार्थना चालू ठेवली. साप शांतपणे निघून गेला. गांधीजींना यावर जेव्हा त्यांची प्रतिक्रिया विचारली तेव्ही ते म्हणाले, "क्षणभर मी अस्वस्थ झालो पण परत शांत झालो. जर तो साप मला चावला असता तर मी म्हटलं असतं, "त्याला मारू नका. हिंसा करू नका. त्याला कुठेही जाण्याचं स्वातंत्र्य असायला हवं. त्याला भीती वाटेल असं काही करू नका."

❊❊

# पुरोहित

जेव्हा गांधीजींनी ब्रह्मचर्य स्वीकारलं आणि स्वेच्छेनं गरिबीचं जीवन पत्करलं तेव्हा त्यांनी सांगितलं की, ज्यांना लोकसेवा करायची असेल त्यांनी अविवाहित रहावं.

ह्या कल्पनेनं त्यांचा ताबा घेण्यापूर्वी ते त्यांच्या अविवाहित मित्रांना लग्नाचा आग्रह करीत. त्यांना असं वाटे की सर्वांनी एक मोठं कुटुंब म्हणून एकत्र रहावं. त्यांच्या भारतीय सहका-यांना ते दक्षिण आफ्रिकेत सहकुटुंब येण्याचा सल्ला देत. त्यांचे ब्रिटिश मित्र श्री. वेस्ट आणि श्री. पोलक यांनाही त्यांनी लवकर लग्न करण्याचा सल्ला दिला होता. पोलक यांना काही आर्थिक अडचणी होत्या त्यामुळे ते लग्नाबद्दल साशंक होते. गांधीजींनी त्यांना सांगितलं की तुमची मनं जुळली आहेत तेव्हा ठरलेलं लग्न फार लांबणीवर टाकणं योग्य नाही. श्री. पोलक यांची भावी वधू दक्षिण आफ्रिकेत आल्या आल्या त्यांनी दुस-या दिवशी लग्न केलं. गांधीजींनी लग्नाची सर्व व्यवस्था पाहिली आणि स्वतः लग्नात वराचा जवळचा मित्र म्हणून करवल्याची भूमिका केली.

भारतात त्यांच्या आश्रमांमध्ये गांधीजी कधी कधी पुरोहिताची भूमिका पार पाडत. त्यांची लग्नं जुळवण्याची पद्धत आणि पुरोहिताचं काम करण्याची पद्धत नवीन होती. त्यांनी हिंदू लग्न पद्धतीत सुधारणा करण्याचा प्रयत्न केला आणि चुकीच्या रीतिरिवाजांना विरोध केला. ते हुंडा पद्धतीच्या विरुद्ध होते. संपत्ती, पदवी, उच्च जात पाहून वधू-वरांचा निर्णय ठरावा हे त्यांना मान्य नव्हतं. ते तरुण-तरुणींची प्रकृती, चारित्र्य आणि श्रम करण्याची क्षमता यांना जास्त महत्त्व देत. ज्या विवाहात गांधीजी पुरोहित असत त्यात वधू-वर, हातानं काढलेल्या सुताची, हातानं विणलेल्या खादीची वस्त्रं परिधान

करत आणि हातानं कातलेल्या सुताच्या हारांखेरीज कुठलाही दागिना त्यांच्या अंगावर नसे. विवाह विधी देखील अत्यंत साधा असे. होमकुंडासमोर वर-वधू आपापल्या सुताचे हार काढून एकमेकांना घालत आणि वैदिक मंत्र म्हणत. वराला किंमती भेटी किंवा हुंडा दिला जात नसे.

गांधीजी हुंडा पद्धतीच्या विरोधी होते. त्यांनी कॉलेजच्या विद्यार्थ्यांना ते स्त्रियांना गुलाम समजतात म्हणून खूप फटकारलं होतं. पुरुषांनी स्त्रियांना आपल्या हृदयाची आणि घराची सम्राज्ञी न मानता विकाऊ गोष्ट मानलं याचं गांधीजींना फार दुःख होई. पत्नीला तर पुरुषाची अर्धांगिनी मानतात. गांधीजी म्हणत, "मला जर मुलगी असती तर, एक कवडीदेखील हुंडा मागणा-या पुरुषाशी तिचं लग्न करण्यापेक्षा मी तिला आजन्म कुमारिका ठेवलं असतं."

गांधीजींना लग्नातला डामडौल, जेवणावळी सगळंच नापसंत होतं. त्यांना वाटे की, लोकशाहीत धार्मिक कार्यक्रमात १० रु. पेक्षा जास्त खर्च करू नये. धार्मिक समारंभाखेरीज इतर सर्व रीती रिवाज रद्द करायला हवेत. देशातल्या गरीबातल्या गरीब लोकांनाही आपले रीतीरिवाज सोडायचे नव्हते. जे शेतकरी लग्नासाठी किंवा श्राद्धासाठी कर्जबाजारी होत त्यांना ते म्हणत, "मी तुमचा पुरोहित होतो. श्राद्ध किंवा लग्न करायला फार पैसा लागत नाही." लोक ज्याला श्राद्ध म्हणत त्यावर त्यांचा विश्वास नव्हता. त्यांच्या मते वाडवडिलांचं श्राद्ध करण्याचा एकमेव चांगला मार्ग म्हणजे त्यांचे गुण आपल्यात आणण्याचा प्रयत्न करणं आणि त्याप्रमाणे रोज वागणं.

यज्ञोपवीताचा जो गूढ अर्थ सांगितला जाई तो त्यांना मान्य नव्हता. त्यांचं म्हणणं असं होतं की यज्ञोपवीत घालण्यात काही अर्थ नाही. आर्य लोक स्वतःला अनार्यांपासून वेगळं दाखवण्यासाठी ते वापरत. ज्या सुतानं समाजात उच्च-नीच भेदभाव केला जातो त्याला काढून फेकून दिलं पाहिजे. ब्रह्मचर्याचं पालन हेच खरं यज्ञोपवीत आहे.

पौरोहित्य केलं म्हणून गांधीजी कधीही दक्षिणा किंवा भेट घेत नसत. पण कधी कधी हरिजन निधीसाठी वर्गणी मागून घेत. एकदा त्यांनी एक आंतर्जातीय विवाह

लावून दिला आणि दक्षिणा म्हणून हरिजनांसाठी विहिरी बांधण्यासाठी पाच हजार रुपये घेतले. त्यांच्या आश्रमात एक ब्राह्मण वधूवरांच्या लग्नात पुरोहिताचं काम एका स्त्रीनं केलं होतं.

एकदा एका लग्नात गांधीजींनी निमंत्रितांना ताजा गूळ खाऊ घातला. त्याचा खर्च फक्त सहा आणे आला. एकदा एका वराला त्यांनी पत्र लिहिलं, "तू इथे एकटा ये. मी इथे तुझं लग्न लावून देईन आणि दुकटा होऊन तू परत जाशील."

वराला त्याच्याबरोबर मित्रांना किंवा नातेवाईकांना आणण्याची काही गरज आहे असं त्यांना वाटत नव्हतं. जेव्हा त्यांनी सातजणांना आलेलं पाहिलं तेव्हा ते म्हणाले, "ओहो! सप्तर्षी आले आहेत!" नंतर ते म्हणाले, "हो! अरुंधती (वधूची आई) देखील आहे."

आपल्या तिस-या मुलाच्या लग्नात गांधीजींनी नवविवाहित दांपत्याला गीतेची एक प्रत, आश्रम भजनावली, मंगळसूत्र आणि एक टकळी भेट दिली. त्यांनी मुलाला सांगितलं, "तू तुझ्या पत्नीचा मान राखशील आणि तिचा मालक होणार नाहीस तर खराखुरा मित्र होशील. तुम्हा दोघांचं जीवन मातृभूमीला अर्पण करा. स्वकष्टानं आपला चरितार्थ चालवा."

वधूच्या आईनं वराला एक चरखा भेट दिला. विवाह संस्कारापूर्वी वधू-वरांनी उपवास केला, विहिरीजवळची जागा स्वच्छ केली, गाईचा गोठा साफ केला आणि झाडांना पाणी घातलं. हे सर्व चराचर, मानव, पशु आणि वनस्पती सर्वांच्या एकतेचं प्रतीक होतं. त्यांनी सूत कातलं आणि गीतेचं पठण केलं. गांधीजींची सप्तपदीची जी कल्पना होती त्याचे ही सर्व कामं हे भाग होते. विवाह ठरल्यानंतर गांधीजींनी दोन वर्षं तो थांबवून ठेवला आणि मुलगी अठरा वर्षांची झाली तेव्हाच विवाह केला.

गांधीजींनी बाल विवाहाला विरोध करताना म्हटलं, "जेव्हा मी तेरा वर्षांच्या मुलाला पाहतो तेव्हा मला माझ्या लग्नाची आठवण येते. मला स्वतःची कीव वाटते. मांडीवर बसण्याच्या वयाच्या मुलीचा पत्नी म्हणून स्वीकार करणं यात मला कोणताही धर्म दिसत नाही. ज्या मुलीच्या संमती शिवाय तिचे आई वडील लग्न लावून देतात

तिचं लग्न झालं आहे असं मी मानत नाही. पंधरा वर्षांच्या मुलीनं विधवा व्हावं हे माझ्या कल्पनेतही येऊ शकत नाही. विधुरांना दुसरा विवाह करण्याचा जेवढा अधिकार आहे तेवढाच विधवांनाही आहे." काही प्रसंगी ते घटस्फोटाच्या बाजूनं असत. एकदा तुरुंगातून त्यांनी एका हिंदू स्त्रीला आशीर्वाद पाठवले होते. ती एका पतीला सोडून दुस-याशी लग्न करणार होती."

गांधीजी स्वतःला सनातनी हिंदू मानत तरीही ते आंतर्जातीय, आंतर्प्रांतीय विवाहांच्या बाजूचे होते. त्यांचा विचार असा होता की याप्रकारच्या लग्नांनी वेगवेगळ्या जाती व धर्मांमध्ये जवळीक निर्माण होईल. जेव्हा त्यांच्या सर्वांत धाकट्या मुलानं गुजराथी बनियानं दक्षिणी ब्राह्मण मुलीशी लग्न केलं तेव्हा त्यांना फार आनंद झाला होता.

गांधीजींवर त्यांच्या श्रद्धांळू वैष्णव पालकांचा मोठा प्रभाव होता. बारा वर्षांपासूनच ते अस्पृश्यतेला पाप मानीत. सतराव्या वर्षी ते सर्वांना समानतेनं वागवायला शिकले. मग कोणाची जात, धर्म कोणताही असो. २१ व्या वर्षी त्यांनी गीता, बायबल आणि इतर धर्मातली पुस्तकं वाचली. त्यांना असं वाटे की, एकच धर्म स्वीकारणा-यानं "आमचा धर्म सर्वश्रेष्ठ आहे आणि इतर सगळे खोटे आहेत" असं म्हणू नये. त्यांनी २१व्या वर्षी गीता, उपनिषदं आणि वेदांचा अभ्यास केला होता. धर्मग्रंथांची वचनं ते नुसती उद्धृत करत नसत तर ती रोजच्या जीवनात आचरणात आणण्याचा प्रयत्न करीत. त्यांचा अनेक धर्मांचा अभ्यास होता. त्यातून त्यांना सहन करायची शक्ती मिळाली आणि दुःख सहन करण्याचं धैर्य मिळालं. त्यांना अशीही जाणीव झाली की शरीराच्या बळावर जो अवलंबून राहतो तो अधर्माचा प्रसार करतो आणि आत्म्याच्या बळावर जो विश्वासतो त्यालाच खरा धर्म कळला आहे. त्यांच्या मते धर्मान्तर करणं निरर्थक होतं. अतिशय सहजपणे ते हिंदू, शीख, बुद्ध, इस्लाम आणि ख्रिस्ती धर्माची मूलतत्त्वं समजावून सांगत. ते चर्चमध्ये ब-याच वेळा जात. एकदा त्यांनी हिंदूधर्मावर चार व्याख्यानं दिली त्यात प्रत्येक धर्माच्या वैशिष्ट्यपूर्ण गुणधर्मांकडे लोकांचं लक्ष वेधलं.

ते येशूची वचनं इतक्या चपखलपणे संदर्भासाठी वापरत की काही यूरोपियांना वाटलं की ते जन्मानं ख्रिस्ती आहेत. एकदा ते बोटीनं प्रवास करत होते तेव्हा नाताळच्या आदल्या रात्री त्यांच्या सहप्रवाशांनी त्यांना येशूच्या शिकवणुकीबद्दल बोलायला सांगितलं. प्रार्थनासभांमध्ये ते कुराणामधले आयत म्हणत असत. काही हिंदू आणि मुसलमानांनी यावर आक्षेप घेतला होता. हिंदुत्वाबद्दल त्यांची स्पष्ट मतं होती. जातिभेदाला त्यांचा विरोध होता. यामुळे हिंदू सनातन्यांचा त्यांनी रोष ओढवून घेतला. त्यांनी काळी निशाणं दाखवून त्यांचा अपमान केला. चपलांची माळ त्यांच्यासाठी तयार केली आणि त्यांना ठार मारण्याचाही प्रयत्न केला.

तरी ते म्हणाले, "जर अस्पृश्यता हा हिंदू धर्माचा एक भाग राहणार असेल तर मी स्वतःला कधीही हिंदू म्हणवणार नाही. जर हा मानवतेचा कलंक धुऊन काढला नाही तर हिंदू धर्म संपून जाईलच. आपला धर्म अहिंसेवर आधारित आहे. अहिंसा म्हणजे प्रेम. प्रेम फक्त शेजा-यावर, मित्रांवर करणं नाही तर आपल्या शत्रूंवरही प्रेम करणं." सर्वांना ज्यात प्रवेश मिळत नसे अशा देवालयात ते जात नसत. अनेक वर्षं प्रयत्न केल्यानंतर काही देवळात हरिजनांना प्रवेश देण्याच्या त्यांच्या आग्रहाला यश आलं.

त्यांच्या मते परमेश्वर म्हणजे सत्य आणि धर्म म्हणजे जीवन होतं. परमेश्वर पाण्याच्या एका थेंबात असतो, धुळीच्या कणाकणात असतो. गांधीजींना अमूर्ताची पूजा जास्त पसंत होती पण तरीही मूर्तीपूजेला त्यांनी विरोध केला नाही. कारण "ते मूर्तीपूजा करतात ते दगडाची पूजा करत नाहीत तर त्यात असलेल्या देवाची पूजा करतात." मूर्तीपूजेबद्दल वाद चालू असताना ते एकदा टागोरांना म्हणाले, "झाडाखाली शेंदूर लावून ठेवलेला छोटा दगड अंत्यजांचा देव आहे. तो महत्त्वाचा आहे. परमेश्वर आणि माणूस यांच्यातला तो एकमेव दुवा आहे. लंगड्या माणसाला जोवर तुम्ही चालायला शिकवत नाही. तोवर त्याच्या कुबड्या काढून घेण्याचा तुम्हाला अधिकार नाही." त्यांना झाडांची पूजा करण्यात काही वावगं दिसलं नाही. "मला तर वृक्षपूजेत

करुणा आणि काव्य दिसतं तो संपूर्ण वनस्पतीजगताविषयीचा आदर आहे त्यातून परमेश्वराची थोरवी आणि वैभवच दिसून येतं."

गांधीजींचं देऊळ अशी कल्पना निघाली तिला त्यांनी तीव्र विरोध केला आणि आश्रमात त्यांच्या पाया पडणं हा गुन्हा आहे असं सांगितलं.

या महात्म्यानं देशबांधवांना नवा मंत्र दिला - देशसेवा आणि दरिद्रीनारायणाची सेवा याच गोष्टी स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांच्याकडे नेतील. हाच स्वातंत्र्याचा मंत्र सर्वांना भयातून आणि गुलामीतून मुक्त करेल. जीवनाच्या अनेक अंगांमधून स्वचा त्याग कसा करावा याची उदात्त आणि धैर्यशील कला त्यांनी प्रत्यक्ष स्वतःच्या जगण्यातून शिकवली. "मानवजातीनं अहिंसेचा स्वीकार करूनच हिंसेतून बाहेर पडलं पाहिजे आणि प्रेमानं तिरस्कारावर विजय मिळवला पाहिजे" हे सांगताना ते कधीही थकले नाहीत.

गांधीजी सतत कामं करत राहिले. गीतेची शिकवण ते मनापासून मानत. जो माणूस कष्ट केल्याशिवाय, कर्मयज्ञ केल्याशिवाय आणि रोजचा त्याग केल्याशिवाय अन्न ग्रहण करतो तो चोर आहे. भाकरीसाठी कष्ट करण्याला ते एक कर्मयज्ञच समजत. त्यांनी शारीरिक कष्ट केल्याशिवाय एक दिवसही वाया घालवला नाही. ते कधीही खोटं बोलत नसत, किडा-मुंगी मारत नसत, कधीही कुणाची निंदा करत नसत. ते सूर्योदयापूर्वी उठत आणि सकाळ-संध्याकाळ प्रार्थना करत. त्यांच्या रोजच्या प्रार्थनेत गीता, उपनिषदं, कुराण आणि झेंड-अवेस्ता या धर्मग्रंथांमधला वेचक भाग असे. ते जमिनीवर असोत वा समुद्रावर, चालत्या गाडीत वा जहाजात, मुस्लिम, ख्रिस्ती, हरिजन कुणाकडेही त्यांचा मुक्काम असो, किंवा खेड्यापाड्यातून ते पदयात्रा करत असोत त्यांची प्रार्थना कधी चुकली नाही. तुरुंगातही हाच दिनक्रम असे. २१ दिवस ते अन्नग्रहण न करता राहू शकत पण प्रार्थना न करता एक दिवसही जात नसे. प्रार्थना म्हणजे त्यांना परमेश्वरावरचा चालता बोलता विश्वास वाटे, ती नुसती शाब्दिक बडबड नव्हती. प्रार्थनेचा हेतू परमेश्वराला खूष करणं हा नव्हता तर स्वतःला शुद्ध

करणं हा होता. ३६व्या वर्षी त्यांनी ब्रह्मचर्याचं व्रत घेतलं आणि फिनिक्स आश्रमात सामूहिक प्रार्थना सुरू केली. रोज संध्याकाळी तिथे भजनं म्हटली जात. ख्रिस्ती धर्मातल्या प्रार्थना म्हणत. आयुष्याच्या अखेरीला प्रार्थनासभांमध्ये ते लोकांना टाळ्या वाजवून रामनाम म्हणायला सांगत. भारतभर अशा प्रार्थना सभा व्हाव्यात ही त्यांची इच्छा होती.

गांधीजींना स्वतःला फसवाफसवी असह्य होत असे पण असं वागणा-यांना ते शिक्षा करत नसत. कोणी खोटं बोलला असेल किंवा काही वाईट कृत्य केलं असेल तर ते स्वतः उपवास करून आत्मशुद्धीसाठी प्रायश्चित्त करत.

ह्या पुरोहितानं अनेकदा देवळात मूर्तीची प्रतिष्ठापना केली आणि अनेक देवालयांची उद्‌घाटनं केली. अनेक शाळा आणि रुग्णालयांच्या कोनशिला बसवल्या. नोआखलीमध्ये त्यांनी मुसलमानांनी फोडलेल्या मूर्तीची पुन्हा प्रतिष्ठापना केली. दिल्लीत त्यांनी लक्ष्मीनारायणाचं देवालय तसेच वाराणशीमध्ये भारतमाता देऊळ, सेलूमध्ये हरिजनांसाठीचं मंदिर, रत्नागिरीत मारूती मंदिर यांची उद्‌घाटनं केली. रत्नागिरीत ते म्हणाले, "मी मारूतीची मूर्ती इथे बसवतो आहे याचं कारण त्याच्याकडे खूप शक्ती होती एवढंच नाही. शक्ती तर काय रावणाकडेही होती. पण मारूतीकडे आत्म्याची शक्ती होती, अध्यात्मिक शक्ती होती, ती त्याला त्याच्या ब्रह्मचर्यामुळे आणि रामावरच्या नितान्त भक्तीमुळे प्राप्त झाली होती."

गांधीजींचा रामनामावर अढळ विश्वास होता. शेवटच्या प्रार्थना सभेला जात असताना जेव्हा एका माथेफिरू हिंदूनं त्यांच्यावर गोळी झाडली तेव्हा त्यांचे शेवटचे शब्द होते "हे राम".

❋❋

# घटनाक्रम

| | |
|---|---|
| २ ऑक्टोबर १८६९ | पोरबंदर येथे गांधीजींचा जन्म |
| १८८१ | कस्तुरबांशी विवाह |
| नोव्हेंबर १८८७ | मॅट्रिकची परीक्षा पास |
| ऑक्टोबर १८८८ | वकिलीचा अभ्यास करण्यासाठी लंडनला पोचले |
| जून १८९१ | बॅरिस्टर झाले व भारतात परतले |
| एप्रिल १८९३ | दक्षिण आफ्रिकेला गेले |
| १८९६ व १९०१ | भारतात परत आले. |
| १९०१ | राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात प्रथम उपस्थिती |
| १९०३ | इंडियन ओपिनियनची जबाबदारी स्वीकारली |
| १९०४ | फिनिक्स आश्रमाची स्थापना केली |
| १८९९ व १९०९ | मध्ये भारतीय बोअर युद्ध व झुलू-विद्रोह या वेळी भारतीय सेवादलाचं संघटन केलं आणि नेतृत्व केलं |
| १९०६ | ब्रह्मचर्य व्रत स्वीकारलं |
| १९०६ व १९०९ | इंग्लंडला गेले |
| १९०८ | दक्षिण आफ्रिकेत प्रथम तुरुंगात गेले |
| १९१० | टॉलस्टॉय वाडीची स्थापना |

| | |
|---|---|
| १९१३ | दक्षिण आफ्रिकेतील ऐतिहासिक सत्याग्रहाचं नेतृत्व |
| १९१४ | दक्षिण आफ्रिका सोडून जानेवारी १९१५ ला भारतात पोचले. |
| १९१५ | साबरमती आश्रम, १९३३ वर्धा आश्रम, |
| १९३६ | सेवाग्राम आश्रमाची स्थापना |
| १९१७ | चंपारण्य सत्याग्रह सुरू केला |
| १९१८ | खेडा मध्ये कर-बंदी आंदोलन |
| १९१९ | अमृतसरमधे जालियनवालाबाग हत्याकांड |
| १९१९ | यंग इंडिया व नवजीवनचं प्रकाशन सुरू केलं |
| १९२१ | असहकाराची चळवळ सुरू केली |
| १९२२ | भारतात प्रथम तुरूंगवास |
| १९२७ | खादीच्या प्रचारासाठी दौरा केला |
| १९३० | दांडी यात्रा व मिठाचा सत्याग्रह - नेतृत्व |
| १९३१ | लंडनमध्ये गोलमेज परिषदेत सहभाग आणि यूरोपला भेट |
| १९३३ | हरिजनांसाठी देशभर दौरा |
| १९३७ | नई तालीमची सुरुवात |
| १९४२ | "भारत छोडो" चळवळीची सुरुवात |
| १९४२ ते १९४४ | आगाखान पॅलेसमध्ये शेवटचा तुरुंगवास |
| ३० जानेवारी १९४८ | महानिर्वाण |

❊❊

**गरवारे बालभवनच्या**
**कजा कजा मरू प्रकाशनाची मुलांसाठी सुंदर वेगळी पुस्तकं**

| | |
|---|---|
| अक्षर चित्रं | १०/- |
| पानांचे प्राणी | १०/- |
| अंगठ्याची चित्रं | १०/- |
| उडणारी मुलगी | १५/- |
| तूच का गं माझी आई | १५/- |
| खट्याळ उंदीर | १०/- |
| मांजरांची वरात | १५/- |
| बियांचे प्राणी | १५/- |
| बोलणारे दगड | १०/- |
| शहाणी मुलं – छान मुलं | २०/- |
| चित्ररूप गोष्टी | २०/- |
| प्रिय बाई, | ५०/- |

**गरवारे बालभवन**
३ ते १२ वयाच्या मुलांसाठी संध्याकाळी ४ ते ७ चालणारा उपक्रम. व्यायाम, खेळ, चित्रकला, हस्तकला, गोष्टी, गाणी, नृत्य, अभिनय, सहली, पक्षीनिरीक्षण, ट्रेकिंग, कारखाने – भेटी, सण – उत्सव, संमेलन, उन्हाळी – शिबिरं, बाहेरगावी शिबिरं वाचनालय कार्यकर्ता प्रशिक्षणं आणि खूप काही.

गरवारे बालभवननिर्मित मुलांसाठी मुलांच्या विश्वातील सुंदर कवितांच्या व गाण्यांच्या दोन कॅसेटस् –
- **झुळझुळ गाणी** • **इवली इवली चांदणी**

- ह्या पुस्तकानं गांधीजी आपल्याला जास्त चांगले समजतील.
- जीवनातल्या छोट्या छोट्या गोष्टीही प्रगल्भतेनं. रस घेऊन करणं हा गांधीजींच्या व्यक्तिमत्वाचा पाया होता.
- गांधीजींचं खरं योगदान काय होतं हे अनेकांना आजही माहीत नाही.
- गांधीजी सर्व कष्टाची कामं मोठ्या आनंदानं करीत.
- आपण कष्टक-यांना खालचा दर्जा दिला आणि कारकुनीला वरचा. त्यांची सगळी संस्कृती, प्रतिष्ठा आपण नष्ट केली म्हणून आज आपली परिस्थिती कठीण झाली आहे.
- बॅरिस्टर गांधी रोज पहाटे जात्यावर गव्हाचं पीठ दळत आणि पाच मैल चालत आपल्या कचेरीत जात. स्वतःचे केस स्वतः कापत, कुष्ठरोग्यांच्या जखमा धूत, रात्रभर जागून प्लेगच्या रुग्णांची सेवा करतं, मुता-या स्वच्छ कराचीही त्यांना लाज वाटत नसे. आळस, भय आणि तिरस्कार हे शब्द त्यांच्या शब्दकोषात नव्हते.
- वकिली व्यवसाय करतानाही त्यांनी कधी खोटेपणा केला नाही, खोटे साक्षीदार निर्माण केले नाहीत.
- भारतापुढचा प्र न लोकांना आराम पुरवण्याचा नाही तर त्यांचा रिकामा वेळ उपयोगात आणण्याचा आहे.
- गांधीजी कस्तुरबांची पोलकी शिवत, स्वतःचे व इतरांचेही कपडे धूत, हातात झाडू, बादली घेऊन सफाई करत, ते फार चांगले चांभार होते, आपल्यासाठी इतरांना कामाला लावणं त्यांना पसंत नव्हतं.
- एखाद्या आईसारखं ते लहान बाळाचं करत असत, आश्रमात त्यांनी शाळेच्या मुख्याध्यापकाची आणि प्रमुख आचा-याची जबाबदारी घेतली होती.
- ते म्हणत, नुसतं पुस्तकी शिक्षण देण्यापेक्षा त्याबरोबर तुमच्या मुलांना तुम्ही उत्तम स्वयंपाक आणि सफाई करायला शिकवलं तर तुमची शाळा खरी आदर्श!
- गांधीजी रोज सूतकताई करत, ते उत्तम डॉक्टर होते. परिचारक होते, शेतकरी होते, विणकर होते, लिलाव बोलण्यात कुशल होते. लेखक, संपादक, मुद्रक, प्रकाशक होते. ते भिका-यांचे राजा आणि डाकूंचे राजकुमार होते.
- गांधीजींच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू हे पुस्तक उलगडून दाखवतं!